अपरिचितांच्या क्रांतिकथा

गोपाळ गोडसे

अपरिचितांच्या क्रांतिकथा

गोपाळ
गोडसे

मृत्युंजय प्रकाशन

परिचय

होय ! ते वेडे होते. देशप्रेमाने वेडे, लोकप्रेमाने वेडे. परकीय शासनाच्या अस्तित्वामुळे वेडे. स्वातंत्र्याकरिता वेडे. अध्यात्माचे वेडे. मोक्षाचे वेडे. मुक्तीचे वेडे.

कोण्या तत्त्वाचे वेड घेतल्यावाचून लोकविलक्षण कार्य घडत नसते. जिवंत असेपर्यंत त्या कार्याच्या मार्गातील सर्व अपेक्षित आणि अनपेक्षित यातना भोगायच्या आणि देहत्यागाची सिद्धता ठेवायची हा मनाचा चिवटपणा ध्येयाशी एकरूप झाल्यावाचून येत नाही. त्या त्या क्षेत्रातील असेच तत्त्वनिष्ठ लोक इतिहास घडवीत असतात. क्रांतिकारक आपल्या रक्ताने, त्यागाने, प्राणार्पणाने राष्ट्राचा इतिहास घडवितात.

स्वातंत्र्याचा ध्यास दे कुणा कठोर कारावास,
कुणास विरहोच्छ्वास, कुणी हो जननिंदेचा घास ।
अंदमानचा वास, कुणाच्या गळ्यांत येई फास
शाईने का लिहिला जाई राष्ट्राचा इतिहास ?

विस्मृतीची धूळ साठल्यामुळे आता वाचण्यासही अवघड झालेल्या त्या रक्ताच्या इतिहासाच्या पानांचे दर्शन या ग्रंथांत होईल. प्रत्येक रक्तपातामागे मानवजातीचे प्रेम दिसेल; मानवताद्वेष दिसणार नाही. निरपेक्षता दिसेल; स्वार्थ दिसणार नाही. ईश्वराशी एकरूपता दिसेल; द्वैत दिसणार नाही. संसारी जीवनाच्या किंचित बाहेरची दृष्टी हवी.

यापेक्षा अधिक या अपरिचितांचा परिचय अनावश्यक आहे.

❀❀❀

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

कोणीतरी काही स्मृति कोरून ठेवतात त्या आधाराने इतिहास लेखन शक्य होते. या लहानशा ग्रंथात अनेक घटनांचे आणि व्यक्तींचे उल्लेख आहेत. दि रोल ऑफ ऑनर, (श्री कालीचरण घोष), माझी जन्मठेप, (स्वा. सावरकर), समग्र सावरकर वाङ्मयाचे काही खंड, सेडिशन कमिटी रिपोर्ट, भारतीय स्वातंत्र्याचे रणझुंझार (श्री. शं. रा. दाते) क्रांतिवीर बाबाराव सावरकर, (श्री. द. न. गोखले) हडसन गोगटे (क्रांतिवीर वा. ब. गोगटे) काही समकालीन वृत्तपत्रे इत्यादि साहित्याच्या आधारानेच घटनांची गुंफण करून त्यांना कथारूप देणे शक्य झाले.

काही माहिती समक्ष गाठीभेटींतून मिळाली किंवा पडताळून बघता आली.

चित्रे उपलब्ध झाली ती मुद्रित केली आहेत. भावी पिढ्यांना अमूर्ताचे स्मरण करता यावे म्हणूनच जणू, काही वीरात्म्यांनी आपली चित्रेही कोठे ठेवलेली नाहीत.

एका कथेतील काही समकालीन प्रसंगांची पुनरुक्ति कोठे कोठे दुसऱ्या कथेत झाली आहे. कथा एक ते सात आणि कथा बारावी प्रज्वलत साप्ताहिक (नागपूर) नीलिमा मासिक (मुंबई) धर्मभास्कर मासिक (मुंबई) ज्ञानदूत सांवत्सारिक (मुंबई) गर्जना साप्ताहिक कोल्हापूर यांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. समकालीन घटना मुख्य घटनेशी निगडित असल्याने त्यांचा त्या त्या स्वतंत्र पूर्ण कथेपुरता उल्लेख केला होता. कथा संकलित झाल्याने पुनरुक्ति अपरिहार्य होती.

❀❀❀

दुसऱ्या आवृत्तीचे पर्व

क्रांतिवीर बाबाराव सावरकर यांच्या स्मृतिदिवसाला, १६ मार्च १९७५ ला या पुस्तकाची पहिली आवृत्ती निघाली. नाव होते शाऔने का लिहिला जाऔ राष्ट्राचा इतिहास ? अपरिचितांच्या क्रान्तिकथा. मूल्य १२ रुपये होते.

पहिली आवृत्ती दोन वर्षांत संपली होती.

दुसऱ्या आवृत्तीचा योग येता येता सतरा वर्षे उलटली. १९९२ हे वर्ष बेचाळीसच्या 'छोडो भारत' आंदोलनाचे सुवर्ण महोत्सवी पर्व आहे. त्या स्मृतीचे उत्सव झाले आणि चालूही आहेत. उत्सवातील एक उणीव जाणवली, - **यांना विसरलो आम्ही !**

बेचाळीसचे छोडो भारत किंवा करो या मरो हे आंदोलन खंडित हिंदुस्थानच्या भूभागांतच सीमित होते काय ? कराची, रावळपिंडी, लाहोर, पेशावर, मुलतान, डाक्का अशा ठिकाणी जनतेचा उद्रेक झाला नव्हता काय ? ते देशभक्त कुठे आहेत ?

बेचाळीसचे आंदोलन हे अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांतील एक प्रयत्न होता. काही नेत्यांचा एकीकडे हा प्रचार चालू होता की, देऊन टाका ना पाकिस्तान; मुसलमानांचा प्रश्न नित्याचा सुटून जाईल. दुसरीकडे काही नेते डिंडिम वाजवीत होते, देशाचे विभाजन कदापि होऊ देणार नाही.

स्वा. सावरकर यांनी डिसेंबर १९४२ मध्ये कानपूरला झालेल्या हिंदू महासभेच्या अध्यक्ष पदावरून केलेल्या भाषणांत काँग्रेसची आत्मघातकी आणि आत्मवंचक नीति निदर्शनाला आणली होती. छोडो भारतचे पर्यवसान तोडो भारत मध्ये होणार आहे, कारण नेते स्वराज्यभावनेपेक्षा मुस्लीम तुष्टीकरण आणि हिंदू मुस्लीम एकतेच्या मृगजळी अभिनिवेशात अधिक गुरफटले आहेत हे अनुमानही त्यांनी तेव्हांच प्रकट केले होते. (हिंदूराष्ट्र दर्शन (इंग्रजी) आवृत्ती १९८४, पृष्ठ १९० ते २२९)

काँग्रेसला मुसलमानांनी सहयोग दिला नाही. ९४% मुसलमानांनी मुस्लिम लिगला म्हणजेच पाकिस्तान निर्मितीसाठी मत दिले.

काँग्रेसच्या हिंदू मुस्लिम एकतेच्या नीतीचा संपूर्ण पराभव झाला. फाळणी झाली. अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी बेचाळीसमध्ये ज्यांनी आंदोलन केले होते, त्याग केला होता, बंदीवास भोगला होता, त्या सर्वांना पाकिस्तानमधून उखडून टाकले गेले. त्यांचे अनेक नातेवाईक मारले गेले. उर्वरित लोक कष्टाने खंडित हिंदुस्थानात निर्वासित म्हणून पोहचले. हिंदू असणे हा त्यांचा अपराध होता. पाकिस्तानला त्यांच्या कल्पनेतील स्वराज्य मिळाले होते आणि मुस्लिम काफर है, काफर नापाक है ही त्यांची बलावती उपद्रवी अंधश्रद्धा त्यांना क्रियान्वित करण्याची संधी मिळाली होती.

बेचाळीसच्या सुवर्ण महोत्सवी पर्वात आम्हाला आज पाकिस्तान किंवा बांगला देश येथे अस्तित्वात असलेल्या हिंदुस्थानातील भूखंडाच्या नगरातील देशभक्तांची आठवण झाली नाही.

कारण असे की अखंड हिंदुस्थानसाठी लढा होता याची आठवण आम्हाला सातत्याने मारण्याची होती.

पाकिस्तानने अभिमान मिरविला 'इस्लामी राष्ट्र आणि ते ही हिंदुस्थानच्या भूमीवर' हा.

खंडित हिंदुस्थानने अभिमान मिरविला 'गर्व से कहो, हिंदू स्वतंत्र झाला नाही.'

ज्यांनी पाकिस्तान निर्मितीसाठी आपले मत दिले त्या सर्वांना हिंदुस्थानात ठेवले. जे गेले होते त्यांना परत बोलावले.

अल्पसंख्यांकाना संरक्षण हे बेचाळीसच्या आंदोलनाच्या प्रस्तावातील सूत्र आहे. म्हणून आम्ही अल्प संख्यांकासाठी विशेष ध्यान पुरवीत आहोत असे प्रधानमंत्री नरसिंह राव यांनी सांगितले. त्यांनी सांगितले नाही ते हे की देशाचे विभाजन आम्ही कधीही होऊ देणार नाही हे वचनही दिले गेले होते.

मुसलमानांना हिंदुस्थानात स्वाधीनता देऊन अल्पसंख्यांकांचा प्रश्न सोडविल्यानंतर पुन्हा तोच प्रश्न उभा करणे याचा अर्थ असा की शेष हिंदुस्थानचे इस्लामीकरण करण्यासाठी हिंदुस्थानच्याच पैशातून

प्रोत्साहन.

निर्वासित झालेल्या देशभक्तांचा, त्यांनी केलेल्या त्यागाचा आणि सांडलेल्या रक्ताचा यापेक्षा अधिक तो अपमान तो कोणता असू शकेल ?

हिंदू मुस्लिम एकता नीती सद्हेतुने अवलंबिली होती असे मानले, पण ती फसली हे लक्षात येताच ते तथ्य स्वीकारण्याचा, मान्य करण्याचा प्रामाणिकपणा नेत्यामध्ये नव्हता. म्हणून पाकिस्तानात (आणि नंतरच्या बांगला देशात) हिंदूंचा जो नरसंहार झाला त्याचे किंचितही दु:ख कधी व्यक्त करण्याचा प्रांजलपणा नेते दाखवीत नाहीत. खंडित हिंदुस्थानच्या स्वराज्यासाठी लक्षावधी हिंदूंचे रक्त सांडले गेले. निर्वासित नावाचे अपमानकारक मूल्य मोजावे लागले याचे स्मरण नेत्यांनी ठेवले नाही आणि ते स्मरण राहू नये असेच प्रयत्न केले.

त्या व्यतिरिक्त, अनेक अल्पज्ञात क्रांतिकारक असे आहेत की त्यांनी अखंड हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी आज जे पाकिस्तान आहे किंवा बांगलादेश आहे त्यातील अनेक भाग आपल्या रक्ताने आणि शत्रुच्या रक्ताने भिजविले आहेत. प्रस्तुत ग्रंथात दिसेल की बाल मुकुंद, भाई परमानंद, विरेंद्र इत्यादींची कर्मभूमी तेथेच होती.

देशाच्या दुर्दैवाने आम्ही त्यांचा त्याग विसरलो. त्यांचे बलिदान विसरलो. एकच अहम आमच्यामध्ये बावरत आहे; जे काही कार्य केले ते आम्ही !

राष्ट्रीय एकात्मतेची काही जाणीव ठेवून स्वीकार करायला हवा, यांना विसरलो आम्ही !

पहिली आवृत्ती वितस्ता प्रकाशनने काढली. रविराज प्रकाशनने दुसरी आवृत्ती काढण्याचे उत्तरदायित्व स्वीकारले. मी त्यांचा आभारी आहे.

※※※

क्रम

१	मृगेन्द्राची झेप	९
२	वैष्णव जन तो तेने कहिये	२०
३	हुतात्मा प्रद्योत	३६
४	देव भक्त दोन्ही एक	४०
५	वीरेन्द्रकुमार दत्तगुप्त	४७
६	कुकरीने वचन दे	५३
७	'बम' बाल्याचे जानवे	६६
८	प्रतिशोध	७८
९	मुकुंद ! मीही येते !	९२
१०	इंदुभूषण : एक कोवळे बलिदान	१२३
११	मी बोलणार नाही !	१२९
१२	पांढरा चाफा	१३६
१३	त्वस्थंडिली अतुलधैर्य वरिष्ठ बंधू	१४०

॥ १ ॥

मृगेन्द्राची झेप

पेडीनंतर डग्लस आणि बर्ज यांना चिरनिद्रा देऊन मिदनापूरने आणि तेथील क्रांतिकिशोरांनी हिंदुस्थानची अस्मिता जागी ठेवली. सहजसुलभ यौवनभावनांनी किशोरींच्या संगतीत रोमहर्षकता उपभोगण्याच्या ठिकाणी या किशोरांनी प्रणय केला पिस्तुलांशी. सप्तपदी केली फाशीच्या फळीवर !

"आला; निर्मल आला !" मृगेन्द्रने इतरांचे लक्ष प्रथम आपल्याकडे खेचले आणि सर्वजण त्याने डोळ्याने संकेत केलेल्या दिशेकडे बघू लागले. पंचेत सरोवराच्या तीरावर बसलेल्या आणि वावरणाऱ्या मंडळींतून मधूनच निर्मल दिसत होता तर मधूनच दृष्टीआड होत होता. पण तो या दिशेनेच येत होता हे स्पष्ट दिसत होते. ब्रिज किशोर चक्रवर्ती, अनाथ बंधु पंजा, संतोष कुमार, रामकृष्ण राय, मृगेन्द्र दत्त, ही सर्व मुले त्याची वाट बघत होती.

घोळके आणि तुटक बसलेली माणसे न्याहाळत न्याहाळत निर्मल जीवन घोष आपल्या मित्रांत येऊन मिसळला. त्याने इकडे तिकडे पाहिले होते. आपण सुरक्षिततेने बोलू शकू एवढे अंतर जवळात जवळ

बसलेल्या लोकांपासून राखले गेले आहे याचे त्याने निरीक्षण केले. काहीशा दबलेल्या स्वरात तो म्हणाला,

"मित्रहो! उद्याला बर्ज स्वत:च खेळणार आहे!"

त्याच्या शब्दांत उत्तेजना होती, आनंदही होता. पण जसे स्वर दबलेले होते तशीच ती उत्तेजना आणि तो आनंदही दबलेला होता.

"कुठे ?" मृगेन्द्रने विचारले.

"बंदीगृहासमोरील क्रीडांगणांत"

"सामना निश्चित झाला ?"

"झाला. खरे म्हणजे तो आधीच निश्चित झाला होता. पण बर्ज खेळणार की प्रेक्षक म्हणून राहणार हे निश्चित नव्हते."

"तो खेळणार आहे म्हणतोस ?"

"होय ! टाऊन क्लबच्या कार्यवाहाला आताच भेटून आलो मी ! प्रतिस्पर्धी समूहाचा म्हणजे मोहामेडन स्पोर्टिंग क्लबचा एक सदस्यही तेथेच होता तेव्हा !"

मृगेन्द्रचे डोळे चमकले. तो झटकन ब्रिज किशोरकडे वळला, "टाळी दे ब्रिज !" तो म्हणाला. ब्रिजने टाळी दिली. "काय सुचले तुला सांग तरी !" ब्रिज म्हणाला.

"काम झाले !" मृगेन्द्र म्हणाला. पुढे तो गप्पच राहिला. त्याच्या डोळ्यासमोर दृश्य दिसू लागले. खेळ चालू होण्याच्या भरांत आहे; प्रेक्षकांचे कुतूहल डोळ्यांत आणि कानांत उतरू लागले आहे; खेळाडू फूटबॉल इकडे तिकडे लाथाडीत आहेत; पंच आपल्या शिट्या सरसावण्याच्या पवित्र्यात आहेत; बर्ज आपले स्थान घेण्यासाठी वाटचाल करीत आहे... ! तो पुन्हा भानावर आल्यासारखे बोलला, "उद्याचा सामना मुस्लिम समूह जिंकणार नाही, टाऊन क्लब जिंकणार नाही ! आपण जिंकणार आहोत. निर्मल ! दे टाळी !"

निर्मलने टाळी दिली. पण त्याने सावधानतेची सूचना दिली. "कालच्यासारखे होऊ नये !"

"तसे नाही होणार निर्मल !" ब्रिज म्हणाला. काल नेमका तो फडतूस शिपाई आडवा आला असता. बर्जमोबती केवढे कडे होते काल, बघितलेच आहेस तू. आपल्याला त्याच्या मोबतीचे कडे केव्हा थोडे ढिले होते ते बघायचे होते. आणि उद्याला ती संधी येत आहे. आपल्याला हवी तशी !"

"तुझी योजना तरी सांग, म्हणजे त्याप्रमाणे लगेच सिद्धता ठेवायला." अनाथ म्हणाला.

"सांगतो." मृगेन्द्र म्हणाला. "ब्रिज, तू सांग, बर्ज कुणीकडून पटांगणावर येईल ते."

"एक मुलींच्या शाळेचा मार्ग, दुसरा पूर्वेकडचा. पण पूर्वेकडच्याच मार्गाचा संभव अधिक."

"ठीक आहे. तू पूर्वेकडे तोंड करून म्हणजे त्या वाटेकडे तोंड करून पण वाटेतून दूर उभे राहायचेस. मी पटांगणांत राहीन. सामना आरंभ होण्याच्या आधी खेळाडू फूटबॉलशी खेळतात ना, त्यांच्यात. माझ्याबरोबर कोण असेल?"

"मी." अनाथ म्हणाला.

"ठीक आहे." मृगेन्द्र म्हणाला.

"तू माझ्यावर अन्याय करीत आहेस मृगेन्द्र. काल काम झाले असते तर, अग्रभागी मीच राहिलो असतो ना ?" रामकृष्ण कुरकुरला.

"आणि माझ्यावरही !" निर्मल म्हणाला. मी तिकडे वाटेवर उभा राहून काय करू ? तिथे काही काम होणार नाही हे ठाऊक आहे तुला."

"हे पहा" मृगेन्द्रने समजावले, " हे आहे सामूहिक काम. फूटबॉलच्या खेळात मी मध्य अग्रिम (सेंटर फॉर्वर्ड) राहीन किंवा अर्धाग्रिम (सेंटर हाफ) राहीन असे प्रत्येकजण म्हणू लागला तर खेळ होईल का ? लक्ष्यपालापासून (गोलकीपरपासून) ते मध्याग्रिमापर्यंत सर्वच स्थाने एकोप्याने सांभाळली तरच ते सामूहिक काम. टीम वर्क."

निर्मल किंवा रामकृष्ण यांचे समाधान झाले नसले तरी त्यांना ते मानून घेणे भाग होते. कोणातरी योजकाकडे सूत्रे दिल्याबाचून काम होत नसते, एवढा विवेक त्यांना होता.

पण एकप्रकारची असूया ! मनुष्यात जन्मजात असलेला हेवा ! मृगेन्द्र एक नेता किंवा मार्गदर्शक म्हणून तो पुढे किंवा अग्रभागी असणे ठीक. पण हा अनाथबंधु ! या कामांत अगदीच नवखा हा ! याने नेत्याबरोबर राहायचे ? आणि निर्लज्ज चटकन मी पटांगणांत तुझ्याबरोबर राहतो म्हणून म्हणाला ! बरे, आता योजना फिरवताही येणार नाही ! खरे म्हणजे त्यांच्या मनांत मृगेन्द्रनेही पुढे राहणे योग्य नव्हते.

आधी कोणी मरायचे यासाठी ही मानसिक स्पर्धा होती या मुलांची ! उद्याचे दृश्य त्यांच्याही डोळ्यासमोर नाचत होते. मरायची संधी पटांगणावर मिळण्याचीच शक्यता अधिकात अधिक होती. आणि ती संधी तर मृगेन्द्र आणि अनाथ यांना मिळत होती. काल ती संधी रामकृष्ण आणि निर्मल यांना मिळाली असती, पण योग नव्हता.

'आपले दैव !' असे मनांत म्हणत त्या दोघांनी आपापली कामे समजावून घेण्याची इच्छा दर्शविली.

"मी काय करायचे ?" ब्रिजने विचारले.

"संकेत. तुझ्या अंगावर तुझा तो हिरवट स्वेटर असू दे. आमचे लक्ष तुझ्यावर राहील. आम्ही खेळांत असलो तरीही. तीच गाडी आहे, याची खूण म्हणून तू स्वेटर काढावयाचास, पण ती गाडी पुढे सरकल्यावर. आधी नाही. तुला मधेच स्वेटरवाचून आम्ही पाहिले की आम्ही समजू."

"माझी छरिका ? माझे पिस्तूल ?"

"जवळ ठेवायची ती. आमच्यापैकी कोणालाही निघून जायची संधी असली आणि आम्ही निघालो आणि गोळ्या अपुऱ्या पडल्या, पुन्हा भरण्याला वेळ नसला तर तू सिद्ध राहायचेस. काम झाले नाही तरच निसटण्याचा प्रयत्न होईल, अन्यथा नाही."

"माझे काम ?" निर्मलने विचारले.

"तेच, पण कन्याशाळेजवळ." रामकृष्णकडे वळून मृगेन्द्र म्हणाला, 'तूरे, रे रे रे करीत नको बसू. तांनिघेरिया स्थानकापाशी तू सज्ज असायचेच. कळले ?'

कामाची वाटणी झाली. येथे उपस्थित नसलेल्या मुलांना भेटून सूचना देण्याचे काम ब्रिजला करायचे होते. सर्वजण उठले. जवळच्या 'सरससस' आहारगृहात जाऊन त्यांनी जणू काही शेवटचा असा एकत्र आहार घेतला.

आव्हान प्रतिआव्हनाचे ते दिवस होते. आव्हान देणारी शक्ती प्रचंड होती. प्रत्येक नागरिकाच्या ती मानगुटीवर स्वार झालेली होती. ते होते ब्रिटिश साम्राज्य. त्यांची हिंदुस्थानवरील मगरमिठी त्या मगरीच्या कराल दाढा, एकेका नागरिकाला आपल्या दाढांत भरडून चूर्ण करण्यास त्यांना वेळ लागत नसे. प्रतिआव्हान याचाच अर्थ त्या दाढांत भरडले जाण्याची सिद्धता करणे.

क्रांतिकारकांना याची पूर्ण जाणीव होती. अनुभवाने सिद्ध झालेला तो सिद्धांत होता. पण त्यांच्या स्वातंत्र्याच्या ध्येयावर त्यांची निष्ठा होती. अहिंसा, सुताने स्वराज्य असल्या धाग्यांनी त्यांनी स्वत:ला कधी बांधून घेतले असलेच तर स्वत:ला त्यांनी मुक्तही करून घेतले होते. ब्रिटिश सत्तेला शस्त्रानिशी लढा देऊन धक्के देणे याला 'हिंसा' या गर्हणीय शब्दाने संबोधणे त्यांना घृणास्पद वाटे. ब्रिटिश लोक येथे मांड ठोकून बसले आहेत ते न्याय्यपणे, नीतीने, हे त्यांना संमत नव्हते. म्हणूनच कोठे भ्रामक तत्त्वज्ञानाच्या सुतांत गुरफटून घेण्यापेक्षा त्यांना ब्रिटिशांच्या कराल दाढांत चिरडून घेणे आनंददायी वाटे. त्यांच्या मृत्यूतूनच ते त्यांचे जीवन बघत होते. पुऱ्या हिंदुस्थानची अस्मिता बघत होते. परकी सत्तेचे बंध एकेक करून तुटत असल्याचे दृश्य त्यांना दिसत होते.

स्वातंत्र्ययुद्धांत बंगालने रक्ताची संततधार लावली होती. त्याच उपक्रमांत मिदनापूरचा

जिल्हाधिकारी जेम्स पेडी याला क्रांतिकारकांनी दि. ७-४-१९३१ ला ठार मारले होते.

रॉबर्ट डग्लस हा त्यानंतर आलेला जिल्हाधिकारी भीतभीतच स्थानापन्न झाला होता. काँग्रेसच्या स्वयंसेवकांना सुरुलिया बंदीगृहांत बंद करून त्यांचा छळ करण्याचे काम डग्लसने केले होते, असा क्रांतिकारकांनी त्याच्यावर आरोप केला होता. त्याला कळविले होते, की 'सत्याग्रह्यांवरील अत्याचार तुझ्यामुळेच होत आहेत की नाहीत, आम्ही तपास करीतच आहोत. तुझे वर्तन सुधारले नाही तर आम्ही तुझा समाचार घेऊं.'

डग्लस फारसा बाहेरही पडत नसे. पण जिल्हाधिकारी म्हटल्यावर हिंडणे अनिवार्यच होते. आरक्षी अधिकाऱ्यांनी क्रांतिकारकांच्या प्रतिआव्हानाची नोंद घेतली होती. ते सावलीप्रमाणे डग्लसबरोबर असत असे म्हणण्यापेक्षा डग्लसला ते आपल्या सावलीतूनच हिंडवीत असत ही स्थिती होती.

आणि इतके करूनही क्रांतिकारकांनी ३०-४-१९३२ ला संधी साधली होती. ती जिल्हापरिषदेच्या प्रशालांतच !

क्रांतिवीर प्रद्योत याच्याजवळ चिठी होती. "हिलीजच्या अत्याचाराचा पुसटसा प्रतिकार." आजचे प्रारंभिक अंकगणित."

डग्लसनंतर बी. ओ. जे. बर्ज (Burge)जिल्हाधिकारी म्हणून मिदनापूरला काम पाहू लागला. 'आमचे प्रारंभिक अंकगणित' याचा अर्थ भावी हत्याकांडाचा हा प्रारंभ आहे असा आरक्षी अधिकाऱ्यांनी केला होता. मागचे दोन जिल्हाधिकारी मारले गेले होते. मिदनापूरला झडत्या, धरपकड यांचा सुळसुळाट झाला होता. त्यांतच करबिरोधी आंदोलनांतील तरुणांना छळण्याचे काम या नव्या जिल्हाधिकाऱ्याने आरंभले होते. नागरिक संत्रस्त झाले होते.

नोव्हेंबर ६, १९३२ ला बर्जने आपल्या आरक्षी अधिकाऱ्यांना छळबलाचे आणि दहशतीचे नवे तंत्र चालू करण्याची आज्ञा दिली होती. नागरिक त्या नव्या दहशतीने दबले होते. त्याचवेळी त्या दबलेल्या कंठातील किंकाळ्या कोठे तरी एकत्रित होत होत्या.

ते क्रांतिकारक होते ! अगदी तरुण मुले ! आताच उमलू घातलेली फुले ! प्रशालेत किंवा महाशाळेत शिकणारी. जीवनाचा आनंद लुटा, यौवनाचा आस्वाद घ्या असल्या व्याख्यांच्या नादी लागून कोठे पोरींची थट्टा, टिंगल , करावी आणि आपले 'सुधारकपण-' अर्थात उलूपण मिरविण्यांतच भूषण वाटावे अशा वयातली मुले.

या मुलांची दृष्टी 'बिघडली' होती. जीवनाचे सौख्य त्यांना असल्या सर्वसामान्य

मार्गात दिसले नाही. रोमांचकारी प्रसंगात तारुण्याचा आस्वाद असतो हे खरेच. मुलींच्या संगतीत ते रोमहर्षक प्रसंग निर्माण होतात हेही खरे. पण एका वेगळ्या प्रांगणांत ते रोमहर्षकता शोधीत होते. रक्त सळसळणे, भावनांचे उद्दीपन हे घटक रोमहर्षक प्रसंगात साधारण (कॉमन) असतात.

आरक्षी दलाचे गुप्तचर ठिकठिकाणी पेरलेले होते. कोठे कोणी पिस्तुलाच्या, बॉंबच्या गोष्टी बोलत असेल त्याचा कानोसा घेण्याचे काम हे गुप्त कान करीत. अनेक लोक पकडले जात. आपण कां पकडले गेलो याची कित्येकांना कल्पनाही नसे. क्वचित संभाषणांतून आलेल्या बॉंब, पिस्तूल या शब्दांचा त्या वस्तूंशी, त्यांच्या वापराशी, त्या संबंधित घटनांशी किंवा घटकांशी काही संबंध नसे. पण ते लोक छळाचे बळी होत.

गुप्तचर हे दुधारी शस्त्र असते. तरुण मुलांनी आपलेही गुप्तचर पेरले. त्यांनाही कांही शोध घ्यायचा होता.

बर्ज आपल्या बंगल्यातून सहसा बाहेर पडत नसे. ज्या समारंभांना त्याला जायचे असे तेथे आरक्षी दलाचा कडेकोट प्रबंध असे. गुप्तचर इतके असत की एकदा आरक्षी प्रमुखाने एका गुप्तचरालाच संशयित म्हणून अटक केली. त्याचे ओळख-पत्र दाखवीपर्यंत त्याला अटकेत राहावे लागले. पण त्यामुळे तो उघडा पडला होता. त्याच्या इतर मित्रमंडळीत त्याला स्थान राहिले नाही.

असे दुखावले गेलेले कांही घटक क्रांतिकारकांना उपयोगी पडत.

बर्ज हे क्रांतिकारकांचे लक्ष्य होते. त्याचे जाणे-येणे कोठे असते, त्याच्या सभा कोठे केव्हा आयोजित केलेल्या आहेत, ही माहिती गोळा करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. त्यांना त्यांत यश मिळत असे.

शस्त्रे मिळविणे हे काम तसे सोपे नव्हते. पण कोणत्या तरी दुव्याने साखळी जमली. मृगेन्द्र, अनाथ, निर्मल, ब्रिज, रामकृष्ण इत्यादी मुलांनी कलकत्त्याला प्रयाण केले. तेथून शस्त्रे आणली. खरगपूरला ते उतरले. तेथून सायकलने ते मिदनापूरला गेले. आरक्षींच्या दृष्टीत न येण्यासाठी जी म्हणून दक्षता घेणे योग्य आहे असे त्यांना वाटले ते सर्व ते करीत होते.

गोपे टेकडीच्या पायथ्याशी एक ओसाड घर होते. ही मुले त्या ठिकाणी आपला अड्डा जमवीत. आसपास किर्रर झाडी होती. लक्ष्यवेधाचे शिक्षण घेण्यास ते स्थान चांगले होते. त्यांनी तो अभ्यास केला.

परवाच्या दिवशी बर्ज एका सभेला जाणार असल्याचे या मुलांना एके दिवशी कळले. महापुरामुळे बंगालच्या मोठ्या भागातील गावांना जो तडाखा बसला होता

त्यामुळे अनेक घरे उद्ध्वस्त झाली होती. माणसे, गुरे वाहून गेली होती. पिके नि:शेष झाली होती. साहाय्याची हाक दिली गेली होती. शासकीय पातळीवरून निधी उभारला जात होता. अशाच एका सभेला बर्ज उपस्थित राहणार होता.

मुलांनी सिद्धता केली. आखणी केली. ते सभेला गेले होते. त्यांना संधी मिळाली नव्हती. वायफळ बार करण्यात लाभ शून्य आणि हानी सर्व हे निश्चित होते. मुलांनी माघार घेतली होती.

बर्जला खेळण्याचा नाद होता. विशेषत: फूटबॉलमध्ये तो रमत असे. क्रांतिकारकांना हे ठाऊक होते. त्यामुळे त्या खेळात आणि खेळाडूतही त्यांनी प्रवेश मिळविला होता. हेतू असा की केव्हा तरी कोठे तरी सामना झाला की समोरासमोर बर्ज येऊ शकेल.

पूरग्रस्त साहाय्य समितीच्या सभेतील प्रयत्न हुकल्यानंतर लगोलग संधी उभी राहिली. दिनांक ३१ ऑगस्ट १९३३ या दिवशी फूटबॉलचा एक सामना ठरला होता. बर्ज उपस्थित राहणार असे कळताच क्रांतिकारकांनी पुन्हा कंबर बांधली. आणि त्यांच्या दुर्दैवाने त्याही दिवशी त्यांना माघार घ्यावी लागली होती.

डग्लसला मारणाऱ्या वीर प्रद्योतकुमारला फाशी जाऊन आठ महिने होत होते. १२ जानेवारी १९३३ ला त्याला मिदनापूर बंदीगृहात फाशी दिले होते. त्यानंतर लोटणारा प्रत्येक दिवस या तरुण मुलांना असह्य होत होता. हाताशी आलेली संधी वाया जाणे याने तर फार उद्‌विग्नता येई.

पण पुन्हा आशा पालवे. आशा कसली ? तर मरणाची ! बलिदान करण्याची ! तारुण्यातील रोमांचकारी घटना अनुभवण्याची !

आज ते मिदनापूरच्या पंचेत सरोवराभोवती याचाच खल करीत बसले होते.

कार्यविभागणी निश्चित झाल्यावर आणि मग सरसरस आहारगृहांत एकत्र खाणे करून ते विसर्जित झाले होते.

उच्चभ्रू घरांतील स्त्रियांनी या मुलांना त्यांच्या रोमहर्षक काळात सहयोग दिला होता. कोणी त्यांची शस्त्रे ठेवून घेतली होती, तर कोणी त्यांना आश्रय दिला होता. उद्या पुन्हा प्रयोग म्हटल्यावर ज्यांनी आपापली शस्त्रे अशा ठिकाणी ठेवली होती, त्यांनी ती तेथून आपल्या हाती घेण्याच्या वेळा मनात योजून ठेवल्या होत्या.

आज दिनांक २ सप्टेंबर ! हा दिवस हौतात्म्याचा, उज्ज्वलतेचा, ठरेल का ?' आज आपण संधी साधू शकू याचा विश्वास मृगेन्द्रला वाटला होता.

निर्मल महाशालेच्या आर्टस्‌च्या पहिल्या वर्षाला होता. तो आणि रामकृष्ण एकाच वर्गात असायचे. पण रामकृष्णने शालांत परीक्षा होताच शिक्षण सोडले होते. ब्रिजने

महाशालेचे दुसरे वर्ष पुरे केले आणि शिक्षण सोडले होते. इतर मुलेही त्या आसपासच्या शिक्षणाची आणि वयाची होती.

दुपारी दोनला ते एकत्र आले. आपापली शस्त्रे त्यांनी तपासून पाहिली. कामे पुन्हा समजावून घेतली. कोणी कोणत्या मागनि जायचे ते ठरविले. विनाकारण बळी पडायचे नाही, कार्य सिद्ध होवो किंवा विफल होवो. इतरांनी कसे निसटायचे इत्यादी सूचना झाल्या.

टाऊन क्लबचा अध्यक्ष स्वत: बर्ज होता. त्याच्या संघात काही प्रमुख अधिकारी खेळणार होते. आरक्षी उपअधीक्षक (असिस्टंट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस) खेळाडूंतील एक ब्रिटिश राजस्व निरीक्षक (रेव्हिन्यू इन्स्पेक्टर) पंचाचे काम करणार होता.



अनाथ बंधु पंजा

प्रेक्षागार प्रेक्षकांनी फुलले होते. थोडचाच वेळात सामना चालू होणार होता. मुस्लिम संघाचे सर्व खेळाडू आणि त्यांचे पर्यायी खेळाडूही चेंडूची उडवाउडवी करीत होते.

मृगेन्द्र आणि अनाथ अगदी सहजपणे पटांगणातील त्या खेळाडूंच्या घोळक्यात गेले आणि आपल्या पदचापल्याने आपले क्रीडानैपुण्य दाखवू लागले. हे अनभ्यस्त असावेत, किंवा यांचा सामन्याशी काही संबंध नसेल असे कोणाला वाटलेही नाही. पण त्या दोघांचे लक्ष होते दूर अंतराबर असलेल्या स्वेटर घातलेल्या निर्मलकडे.

मृगेन्द्रच्या लक्षांत आले की जीवनच्या अंगावर स्वेटर नव्हता. त्याने स्वत: जवळ आलेला फूटबॉल अनाथच्या दिशेने मारला आणि रेडी ए. बी. (अनाथ बंधु, लक्ष दे) अशी तोंडाने मोठ्याने सूचना दिली. इतरांच्या तशा सूचनातच हीही सूचना विरून गेली, विसरून गेली. अनाथने डोक्याने चेंडू तिसऱ्या दिशेला उडविला.

दोघेही हळूहळू खेळांतून दूर सरकू लागले. त्यांनी पाहिले की बर्जची गाडी पूर्वेकडेला उभी आहे. भोवती आरक्षी दल आहे. बर्ज उतरतो आहे. त्याच्या दोन्ही अंगांना दोन अंगरक्षक आहेत. ते उंचेपुरे आहेत.

बर्जसह ते अंगरक्षक क्रीडांगणाच्या सीमारेषेवर आले आणि थांबले. बर्ज पटांगणाच्या मध्याकडे चालू लागला.

दक्षिणेकडील आज्यन्ताकडे (गोलकडे) चेंडूफेक करीत असलेल्या मुस्लिम संघातून मृगेंद्र आणि अनाथ आपसांत अंतर ठेवून धीम्या, सहजगतीने बर्जकडे जाऊ लागले. त्यांनी पाहिले की आता ते अंगरक्षक धावत जरी आले तरी त्याच्या आत आपण बर्जजवळ पोहोचत आहोत.

बर्ज बारा-पंधरा फुटांच्या कक्षेत आला. थोडा पुढे गेलेल्या अनाथला ओलांडून तो पुढेही गेला. त्याचे लक्ष खेळाडूंकडे होते.

मृगेंद्रने आपली स्वयं छरिका (ॲटोमॅटिक पिस्तूल) काढली आणि दहा फुटाच्या अंतरावरून त्याने बर्जच्या छातीवर तीन गोळ्या मारल्या. त्याचवेळी अनाथने आपल्या चक्री छरिकेतून (रिव्हाल्व्हरमधून) पाच गोळ्या बर्जवर सोडल्या.

बर्जला एकूण सहा गोळ्या लागल्या. तो तत्काळ भूमीवर पडला आणि काही क्षणांतच गतप्राण झाला.

क्रीडांगणाचे रणांगण झाले. बर्जच्या संघातून खेळणारे खेळाडू बर्जच्या रक्षणासाठी होते. छरिका लपवून अंगावर ठेवण्याचे क्रीडांगणावर एरवी कारण नव्हते. मृगेंद्र काय, अनाथ काय किंवा त्यांच्या समूहांतील आणखी तरुण काय, याची जाणीव ठेवून होते. त्यामुळेच त्यांना अधिक लोक या कामी वापरणे भाग होते. बर्जला मारण्यात ते यशस्वी झाले होते. त्या यशाला महत्त्व होते ते याच कारणासाठी.

पंचवीस तीस फुटांवरच तो आरक्षी उपअधीक्षक उभा होता. गोळीबार ऐकताच त्याने पाठ वळविली आणि झालेला आणि होत असलेला तो प्रकार त्याने क्षणार्धात टिपून घेतला. तो तडक पुढे सरसावला आणि आपल्या छरिकेतून त्याने मृगेंद्रवर गोळी सोडली. मृगेंद्रने त्याच्यावर गोळी सोडली तो ती त्याच्या दोन पायांमधून गेली. झटापटीत तो अधिकारी खाली पडला आणि मृगेंद्रही.

सीमारेषेवरून निरीक्षण करणारे बर्जचे अंगरक्षक धावत घटनास्थळावर आले. त्यातल्या एकाने पडलेल्या मृगेंद्रावर गोळी झाडली. मृगेंद्र निपचित पडला. दुसऱ्या दिवशी त्याचा रुग्णालयात अंत झाला.



निर्मल जीवन

पंच म्हणून नेमलेल्या त्या राजस्व निरीक्षकाने आपल्या छरिकेने अनाथवर गोळी झाडली. अनाथ तत्काळ गतप्राण झाला.

आव्हान प्रतिआव्हानाच्या या सामन्यात क्रांतिकारकांनी पहिला आज्यंत केला, पहिला गोल केला. शासनाने पाठोपाठ दोन आज्यन्त केले. ते आणखी कितीतरी करणार होते, पण प्रतिआव्हानाची पहिली फेरी क्रांतिकारकांनी जिंकली होती, हिंदुस्थानने जिंकली होती. विजयश्रीचा मुकुट वीरात्म्यांच्या डोक्यावर होता. मिदनापूर पुरता तरी कलशत्रय-हॅट-ट्रिक-क्रांती हुतात्म्यांनी साधला होता.

अपेक्षेप्रमाणे सर्व प्रेक्षागाराला गराडा घातला गेला. चौघांना संशयित म्हणून तेथल्या तेथेच अटक केली. सर्व नगरच्या नगर झडतीच्या बरवंटचाखाली भरडले गेले. जे बाचले ते दैवयोगाने !

एकासाठी दोन जावोत, चार जावोत, दहा जावोत, पण बर्ज राहता कामा नये, त्याची उन्मत्तता आम्ही चालू देणार नाही हे इंग्लंडला दिसले पाहिजे, हिंदुस्थानच्या दीन दुबळ्या जनतेचे प्रतिनिधित्व त्यातीलच काही घटक आपल्या जिवाचे मोल देऊन करतात हे जसे हिंदुस्थानला ठाऊक झाले आहे तसेच इंग्लंडला पटले पाहिजे, जगाला दिसले पाहिजे हा मृगेंद्रचा आग्रह असे. त्या वामनमूर्तीची दृढता हिमालयाहून उत्तुंग होती. विचारांची गहनता समुद्राइतकीच काय, जणू पृथ्वीच्या केंद्रापर्यंत भिडली

होती.

चार महिने आरक्षींचे तपासाचे काम चालले. एक विशेष न्यायालय बसविले गेले. दिनांक ३ जानेवारी १९३४ ला न्यायविचार (!) चालू झाला.

निर्मल जीवन घोषला या वेळी तरी पहिल्या क्रमांकाच्या अभिनयाचा मान मिळाला. ब्रिज किशोर चक्रवर्ती, रामकृष्ण रे इत्यादी एकूण तेरा मुलांवर अभियोग भरला गेला.

सव्वा महिन्यात निर्णय झाला. त्यात निर्मल, ब्रिज आणि रामकृष्ण यांना फाशी सुनावली गेली. चौघांना जन्मठेप झाली.



रामकृष्ण राय

दि. १३ ऑगस्ट १९३४ ला उच्च न्यायालयाने पुनरावेदन ऐकलं. दिनांक ३०-८-१९३४ ला त्याने निर्णय देऊन खालच्या न्यायालयाने दिलेल्या शिक्षा स्थिर केल्या.

त्याच दोराचा पुन्हा सन्मान झाला दिनांक २५-१०-१९३४ ला. ब्रिज आणि रामकृष्ण यांनी दोराच्या सेतूवरून स्वातंत्र्याच्या दिशेने स्वत:ही वाटचाल केली आणि हिंदुस्थानलाही ओढून नेले आणि स्वत: मुक्ती मिळविली. दिनांक २६-१०-१९३४ ला निर्मल जीवन घोषने स्वातंत्र्यलक्ष्मीच्या उद्घोषांत चिरंजीवनाकडे धाव घेतली.

लेवुनि वसने सहज सतीची अचल उभे जे सरणाकाठी !
कृतज्ञतेने प्रणाम ऐशा अज्ञातांच्या स्मरणासाठी ! ❀❀❀

॥ २ ॥

वैष्णव जन तो तेणे कहिये

भारतावर छलाबलाने राज्य करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यास यमसदनाची वाट दाखविणाऱ्या एका दक्षिण भारतीय तरुण क्रांतिवीराची रोमांचक कथा !

"आणि लोकहो ! अशा प्रकारे त्या राजाने प्रथम आपल्या धान्याची कोठारे मोकळी केली. लोकांची क्षुधा भागविण्यास तेवढा उपाय अपुरा आहे, असे दिसताच त्याने सर्व द्रव्याचा विनियोग गाडे भरभरून धान्य आणविण्यासाठी केला. त्याने राजपद सोडले नाही, पण वैभव सोडले. प्रजेप्रमाणेच तो राहू लागला. 'ज्या प्रजेच्या बळावर मी राजपद मिरवितो ती प्रजाच जर आज दीनदुबळी असेल, कष्टी असेल, भुकेली असेल, तर माझे बळही तितकेच दुबळे, कष्टी आणि भुकेले राहणार ! हे वैभव प्रजेसाठीच मी सांभाळले आहे. प्रजा सुखी होत जाईल तसतसे वैभवही पुन्हा उभे राहील' अशी त्याची विचारसरणी होती. प्रजेशी एकरूप होणारा तो राजा ! राजाला विष्णूचा अंश म्हटले आहे, ते अशा राजाला. पीडित जनतेच्या प्रेतांवर बांधलेले सिंहासन धर्महीन असते. अशा सिंहासनावरील राजा विष्णूही

नसतो, विष्णूचा अंशही नसतो."

व्यंकटशास्त्री कीर्तनाच्या ध्रुपदावर येत होते. "जो दुसऱ्याचे दु:ख जाणतो आणि आपल्या शक्तीप्रमाणे ते निवारण करण्याचा प्रयत्न करतो तो सत्पुरुष असतो. त्यालाच साधू म्हणतात. त्याचा वेश साधूचा असायला लागत नाही. त्याच्या गळ्यात तुळशीमाळ नसली तरी त्याच्या साधूपणात न्यून राहात नाही. तो भस्मविलेपन करीत नसला तरी त्याचे अंत:करण शुद्ध असते. त्याचे मस्तक उदात्त असते. दु:खितांशी तादात्म्य पावलेला पुरुष देवाच्या जवळ असतो. देव अशा पुरुषाच्या सान्निध्यात असतो. म्हणा -

जे का रंजले गांजले । त्यांसि म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेची जाणावा ॥

तुतीकोरीनमध्ये सातव्या इयत्तेत शिकत असलेल्या बांची अय्यरच्या बालमनावर त्या कीर्तनाचा विलक्षण परिणाम झाला. लोकांची कशी दुर्दशा चालली होती याचे वर्णन व्यंकटशास्त्रींनी केले तेव्हा त्याला हुंदके येत होते. ते त्याने दाबले होते. त्याचे मन इतके भावाकुल झाले की त्याला वाटले आपण राजा असतो तर आपणही असेच केले असते.

परदु:खाचा प्रत्यय त्याने बालवयातील अविचारीपणाने एकदा घेतला होता. तो आणि त्याचा वर्गमित्र लक्ष्मण जिना उतरत होते. मधेच बांचीला कसली तरी आठवण झाली आणि तो झटकन वळला. अचानक लक्ष्मणच्या पायात त्याचा पाय आला आणि लक्ष्मण उरलेल्या पाच-सहा पायऱ्या धडपडत खाली आला आणि पडला. आपल्यामुळे लक्ष्मण पडला याची जाणीव बांचीला झाली. त्याला कसे लागले असेल या विचाराने म्हणजे अविचाराने जाणूनबुजून तो जिन्यावरून गडगडला. लक्ष्मणला तसे लागले नव्हते. बांचीचे मात्र अंग ठेचाळले आणि कपाळाला खोक पडली. लक्ष्मणची वेदना जाणण्यासाठी आपण स्वत: होऊन जिन्यावरून पडलो हे मात्र तो काही बोलला नाही.

पद्मनाभ गुरुजी वर्गात एकदा आकांक्षेची चाचणी घेत होते. 'तू कोण होणार ?' हा त्यांचा प्रत्येक विद्यार्थ्याला प्रश्न होता. 'मी विधिज्ञ होईन, मी स्थापत्यवेत्ता होईन, मी गणितज्ञ होईन, ही सामान्य उत्तरे होती. 'मी इंजिन चालक होईन, मी नावा बांधीन, ही औत्सुक्य निर्माण करणारी उत्तरे होती. 'मी जादूगार होईन, मी कोंबडबांचा व्यापारी होईन, ही विनोद निर्माण करणारी उत्तरे होती. बांचीचा क्रम यायचा होता. त्याला वाटत होते आपल्या मनांतील उत्तर कोणी देऊ नये.

बांचीची पाळी आली. आपली आकांक्षाच जणू सफल झाली आहे अशा प्रसन्न मुखाने त्याने उत्तर दिले, 'मी साधु होईन !'

उपहासाचा कडेलोट झाला. पाच मिनिटे सर्व वर्ग हसत राहिला. 'जय आलख निरंजन' करणाऱ्या बैराग्याच्या वेषात काही विद्यार्थी बांचीला बघू लागले. धुनी पेटवून अंगावर रक्षा फासून बसणाऱ्या बाबांची बालमूर्ती काही विद्यार्थ्यांना बांचीत दिसू लागली.

पद्मनाभ गुरुजी हसले खरे; पण त्यांनी ते उत्तर खरे म्हणून स्वीकारले. तरीही त्यांच्या प्रश्नाला ते उत्तर नव्हते. त्यांनी विचारले, "साधु म्हणजे काय रे ?"

काही दिवसांपूर्वी कीर्तनात ऐकलेले बिबेचन गुरुजींना ऐकविण्याचे धाडस बांचीच्याने होईना. त्यातून पुन्हा विद्यार्थ्यांच्या उपहासाने तो कोलमडला होता, कोमेजला होता.

त्याने त्रोटक उत्तर दिले. "सत्पुरुष."

"बरोबर आहे !" गुरुजींनी त्याला धीर दिला. "पण मी विचारले ते व्यवसाय कुठला करणार या उद्देशाने. सत्पुरुष किंवा साधु हा व्यवसाय नव्हे, नाही का ?"

बांचीला चूक समजली. तो म्हणाला, "मी शिकेन आणि मला चांगला वाटेल तो व्यवसाय करीन. आता काहीच मला सुचत नाही !"

विषय संपला. विद्यार्थ्यांनी मात्र बांचीचे नाव 'बांची बैरागी, बांची गोसावी, बांची साधू' असे पाडून टाकले. बांचीनेही ते हसतखेळत घेण्याचा सराव केला.

वर्षे लोटली. बांची शिकला, त्रावणकोर वनविभागात (फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये) त्याला लेखनिकाची नोकरी मिळाली.

देशात काय चालले आहे याचे वृत्तपत्रातून ज्ञान घ्यावे आणि पोटापाण्याचा उद्योग सांभाळावा, एवढेच त्याचे जीवन मर्यादित झाले. पण त्याच्या मनात एक असमाधान बाबरत असे.

वर्ष १९०९ मधील १ जुलैला मदनलाल धिंग्राने इंग्लंडमध्ये कर्झन वायली याचा वध केला. त्या घटनेचे पडसाद पाठोपाठ हिंदुस्थानातही उमटले. बांची वार्ता वाची आणि विचारमग्न होई. 'कोण हा मदनलाल ? स्वत:च्या जीवाची याने भीती कशी बाळगली नाही ? याचा प्रेरक कोण असेल ? याचा उद्देश कोणता असेल ? अशा प्रश्नांनी त्याच्या मनात काही वेळ अस्वस्थता येत असे. वर्तमानपत्रातून त्याला समजत असे ते एवढेच की, मदनलालने फार निंद्य कृत्य केले, त्याने हिंदुस्थानला काळीमा आणला. पण बांची विचार करी, एवढी निंदा पिऊनही जो मृत्यूच्या जबडचात ताठपणे उभा राहतो त्याच्यामागे स्वत:च्या जीवापेक्षा प्रबळ चेतना असली पाहिजे.

वर्ष-दीड वर्षापूर्वीच्या घटना बांचीच्या स्मरणात होत्या. मार्च १९०८ मध्ये दिनांक ९ ला चिदंबरन् पिल्ले यांचे तिन्नवेल्लीला भाषण झाले. त्यासाठी चिदंबरन् आणि सुब्रह्मण्यम् शिव यांना पकडले होते. पाठोपाठ तिन्नवेल्लीला दंगा उसळला. शासकीय वस्तू आणि वास्तू यांना आगी लागल्या. त्यांतही २७ जणांवर खटला भरला गेला

आणि त्यांना शिक्षा झाल्या.

कृष्णस्वामींचे १७ मार्च १९०८ चे करूरचे भाषण (करूर, जिल्हा कोइमतूर) त्यांना अटक, शिक्षा, 'स्वराज्य' या तेलगू वृत्तपत्रांचे पुनरुज्जीवन, त्यातील 'चिदम्बरन् ह्यांना शिक्षा का' आदि लेख, 'इंडिया' या तामीळ वृत्तपत्रातील २३ ते २७ मे १९०८ चे प्रसिद्ध लेख, त्यामुळे प्रकाशक श्रीनिवास अय्यंगार यांना झालेली शिक्षा या सर्व प्रकारांनी मद्रास विभागांत जागृती होत होती.

वांचीचे असमाधान असे ते तो स्वत: दूर राहून, सुरक्षित स्थळी राहून, या घटनांकडे बघत असे याचे. पण नेमके काय असमाधान आहे याची व्याख्या त्याला करता येत नसे.

नाशिकला अनंत कान्हेरे या मुलाने दि. २२-१२-१९०९ या दिवशी जिल्हाधिकारी जॅक्सन यास मारले. ती वार्ता तीनचार दिवसांत सर्व हिंदुस्थानभर पसरली. वांचीला वाटले आपल्याला काहीतरी सापडले आहे.

मित्रांशी गप्पागोष्टी करता करता त्याला समान विचाराचे चार मित्र मिळाले. चाराचे आठ झाले, आठांचे वीस झाले.

कार्यपद्धती, घटना, घटक, घडण आदींची कल्पना नसतानाच 'अभिनव भारत समाज' या नावाने या तरुणांच्या गुप्त बैठकी होऊ लागल्या. आसपासच्या गावातून ते बारे शिरू लागले.

१९१० च्या १९ एप्रिलला ठाणे बंदीगृहात फाशी गेलेल्या कान्हेरे, कर्वे, देशपांडे यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मे १९१० मध्ये तुतीकोरीन येथे अभिनव भारत समाजाची बैठक झाली. वांचीने एक प्रभावी भाषण केले.

"दुष्काळ, रोगराई आणि दारिद्र्यच यांनी प्रतिवर्षी लक्षावधी लोक मृत्युमुखी पडत आहेत. राजाचे कर्तव्य म्हणून जर इंग्रज लोकांची ही नीती असेल तर आम्हा प्रजाजनांनाही आता आपले कर्तव्य केले पाहिजे. इंग्रजांना संपविणे हाच आपल्याला पर्याय आहे. स्वराज्य मिळविले पाहिजे. आपले हृदय कान्हेरे, देशपांडे, कर्वे, मदनलाल धिंग्रा यांच्या हृदयासारखे वज्रच केले पाहिजे. हृदय बलवान झाले की हात बलवान होतील. हात बलवान झाले की शस्त्र उचलण्याची शक्ती येईल. शस्त्रे आपोआपच हाती येतील.

"इथलीच गोष्ट पहा. तिन्नवेल्लीचा हा कलेक्टर ॲशे, विल्यम डीएस्कॉर्ट ॲशे ! स्वदेशी स्टीम नॅव्हिगेशन कंपनीमध्ये ढवळाढवळ करून त्याने साधले ते एकच की हिंदुस्थानातील पैसा हिंदुस्थानात राहू नये. तो त्या नौकानयन समूहाप्रमाणे हिंदुस्थानही रसातळाला नेईल. आपल्यांत धुगधुगी आहे तोवर काहीतरी केले पाहिजे. आपल्या बांधवांना, आपल्या नेत्यांना छळबळाने बंदीत टाकले, अंदमानांत टाकले, फाशी

दिले तरी हिंदुस्थान चेपला जाणार नाही, उलट अधिक आवेगाने उफाळून इंग्रजांची मस्तके छिन्नभिन्न करील, हे आपण ब्रिटिशांना दाखविले पाहिजे. आपणच आपल्या बांधवांचे दुःख जाणायचे. तेच धर्मकृत्य !

'वैष्णव जन तो तेणे कहिये पीड परायी जाणे रे !"

नीलकंठ ब्रह्मचारी त्याच कालखंडात मद्रास विभागात स्वदेशी व्रताच्या आंदोलनासाठी दौरा करीत होते. शंकर कृष्ण अय्यर त्यांचे घनिष्ठ सहकारी होते. तेही त्या दौऱ्यावर असत. शंकर कृष्ण हा वांचीचा मेहुणा. जून १९१० मध्ये त्याने वांचीची ओळख नीलकंठ ब्रह्मचारी यांचेशी करून दिली. परिचय वाढल्यावर काही कार्यपद्धती आखली गेली. पण वांची आपली नोकरी सांभाळून वेळ देत असे.

वर्ष १९१० च्या शेवटी वांची तिन्नवेल्लीहून मद्रासच्या गाडीतून प्रवास करीत होता. आहे यापेक्षा अधिक उत्पन्नाची नोकरी मिळण्याची एक संधी तेथे उपलब्ध होती.

एका सहप्रवाशाच्या पिशवीतून एक इंग्रजी वर्तमानपत्र डोकावत होते. वांचीने प्रवाशाकडे पाहिले. पस्तीशीच्या जवळपासचा दाढीधारी तरुण होता तो. 'बघू का ?' म्हणून वांचीने वृत्तपत्राकडे संकेत करून इच्छा दर्शविली.

"जुने आहे ! अगदीच जुने !" तो प्रवासी म्हणाला. पण ओळख करून घ्यावी म्हणून त्याने विचारले, "शिक्षक आहात ?"

"नाही. वनविभागात असतो."

"कुठला भाग ?"

"त्रावणकोर."

"राहता कुठे ?"

"तिन्नवेल्ली. पण तुतिकोरीनलाही जाऊन येऊन असतो."

वांचीने प्रवाशाला त्याचा परिचय विचारला. तो औषधाचा एक फिरता विक्रेता असल्याचे कळले. परदेशी औषध निर्माण्यांशी (फॅक्टरींशी) त्याचा प्रत्यक्ष संबंध असल्याचे त्याने सांगितले. 'या निर्माण्यांचे मी प्रतिनिधित्व करतो' असे म्हणून त्याने आपल्या पिशवीतील एक-दोन अंक वांचीपुढे धरले, आणि ठराविक ठिकाणी निर्देश केला.

वांचीने ती विज्ञापने पाहिली. अंक जुने होते हे तो प्रवासी बोलल्याच होता. पण हाती आल्यावर माणसाचे सुप्त कुतूहल चाळवते. वांचीने एक अंक उघडला.

ते इंग्लंडमधील वृत्तपत्र होते. जवळजवळ दीड वर्षापूर्वीचे ! झरझर दृष्टीने पाहता वांचीचे डोळे एका ठिकाणी खिळले. मधेच कुठेतरी मदनलाल धिंग्रा असे नाव त्याच्या डोळ्यापुढून सरकले. त्याने पाहिले तो 'आव्हान !' नावाचे शीर्षक त्यावर

होते.

वांची वाचू लागला.

"तुम्ही हिंदुस्थानातील देशभक्तांना क्रूरपणे फाशी दिलेत, अंदमानात धाडलेत, त्याचा प्रतिशोध म्हणून त्यादिवशी इंग्रजी रक्त सांडण्याचा मी प्रयत्न केला हे मला मान्य आहे."

"माझ्या सदसद्विवेक बुद्धीच्याच परामर्शानि मी हे साहस केले. कोणाच्या सांगण्याने नव्हे. मी संगनमत कोणाशी केले असले तर केवळ माझ्या कर्तव्यबुद्धीशी.

"एखादे राष्ट्र जोवर परकीय सत्तेच्या पाशवी बळाच्या टाचेखाली दाबून ठेवले जाते तोवर त्या जित राष्ट्राचे त्या जेत्या राष्ट्राशी अविरत युद्ध चालू असते. नि:शस्त्र केले गेल्यामुळे जितांना रणांगणावर युद्ध खेळणे शक्य नसते. म्हणूनच मला अचानक प्रहार करणे भाग पडले. मला तोफा प्राप्त नव्हत्या, तुम्ही त्या आमच्याजवळ ठेवल्या नाहीत, म्हणून मी छरिका (रिव्हॉल्व्हर) हे साधन वापरले."

"माझ्या देशावर अत्याचार हा परमेश्वराशीच द्रोह आहे, परमेश्वराचीच अवहेलना आहे, परमेश्वराचा अपमान आहे, ही माझी धारणा आहे. कारण मी हिंदू आहे. माझ्या देशाचे कार्य म्हणजेच श्रीरामाचे कार्य आहे. मातृभूमीची सेवा ही श्रीकृष्णाची सेवा आहे. मी आहे निर्धन ! ना माझ्याजवळ सुदृढ शरीरसंपदा ! मातृभूमीला अर्पण करण्यास माझ्याजवळ माझ्या रुधिराबाचून दुसरे काय असणार ? म्हणून स्वातंत्र्याच्या यज्ञवेदीवर मी आत्मयज्ञ करण्यास उभा आहे.

"सध्या हिंदुस्थानवासियांना कोणता पाठ हवा असेल तर तो कसे मरावे हा आहे. आणि तो पाठ शिकविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वत: मरून दाखविणे ! त्यासाठी माझे हे आत्मार्पण आहे ! माझे हौतात्म्य उज्ज्वल ठरेल !

"हिंदू आणि इंग्रज यांचे अस्तित्व असेपर्यंत - (म्हणजे सध्यांचे जित-जेत्यांचे अनैसर्गिक नाते संपत नाही तोवर) - हिंदुस्थान आणि इंग्लंड यांचे असेच रक्ताळलेले संबंध राहतील.

"माझी देवाजवळ प्रार्थना आहे की, जोवर मातृभूमिविमोचनाचे कार्य पुरे होत नाही तोवर म्हणजे मानवतेच्या कल्याणासाठी, भगवंताच्या अधिष्ठानासाठी, ती स्थायी स्वरूपात स्वतंत्र होत नाही तोवर मला त्याच मातृभूमीत जन्म यावा आणि तिच्यासाठी असेच मरण येत राहावे."

"मदनलाल धिंग्रा"

वांचीने वाचन संपविले. त्याने दुसराही अंक मागेपुढे केला विचारांची तंद्री दूर सारून त्याने प्रवाश्याकडे पाहिले.

प्रवासी वांचीच्या मुद्रेवरील भाव टिपत होता. वांचीने विचारले, "मदनलाल विद्यार्थी

होता ?"

"होय ! स्थापत्य शाखेत."

"तो पंजाबचा होता ?"

"होय !"

"अभिनव भारत काय आहे ?"

"हिंदुस्थानची नवी पिढी म्हणजे अभिनव भारत."

"हा शब्दार्थ झाला. मी संस्थेविषयी म्हणत आहे."

"संस्थाही तशीच. नव्या पिढीने हिंदुस्थान स्वतंत्र करायचा. पारतंत्र्य पुसून टाकायचे. तो अभिनव भारत !"

बांची पुन्हा अंधारातच राहिला. त्याने विचारले, "त्याचे सभासद कोण आहेत ?"

"नवीन पिढी ! तू सुद्धा !"

बांचीला सहसा सन्मानित झाल्यासारखे वाटले, पण तो सन्मान पेलण्याची शक्ती स्व:कडे येईल का असेही त्याला वाटले. हा प्रवासी कोडयात बोलतो आहे, पण याच्याजवळून आपली जिज्ञासा पुरी होईल असे त्याने अनुमान केले. तो म्हणाला, "मला उलगडा होत नाही, ह्या त्रोटक बोलण्यातून काहीच समजत नाही. तुम्ही नीट सांगाल काय ?"

प्रवासी म्हणाला, "तुला खरेच जाणायची इच्छा आहे काय ?"

"होय !"

"त्यासाठी काय करशील ?"

"दिवस मोडेन; थोडाफार प्रवास करण्याची आर्थिक शक्ती माझी आहे."

"या ठिकाणी येशील ? पुढच्या बुधवारपर्यंत ? म्हणजे आणखी सहा दिवसांनी ?" बांचीच्या हाती एक चिठोरे देत प्रवाशाने विचारले.

बांचीने वाचले. 'पांडेचरीत' ! पांडेचरीत ब्रिटिश राज्याला धक्के देणारे काही घटक आहेत असे त्याने ऐकले होते. नीलकंठ ब्रह्मचारी पांडेचारीला जात येत असत हे त्याला ठाऊक होते.

'इंडिया' या तामीळ वृत्तपत्राचा पसारा श्री. श्रीनिवास अय्यंगार यांच्या अटकेनंतर मद्रासमधून गुंडाळावा लागला. ते वृत्तपत्र पांडेचारीत गेले आणि एम. पी. तिरुमल आचार्य यांच्या संपादकत्वाखाली अधिक तीव्र भाषेत लिखाण करू लागले असे त्याने वाचले होते. या औषधविक्रेत्याचा यामध्ये काही संबंध असेल का, अशी शंका बांचीला आली. पण त्यासंबंधी काही विचारण्यास हे ठिकाण अगदी अयोग्य होते. बांचीने आपली वही काढली आणि तो ठिकाणा उतरून घेऊ लागला.

प्रवाशाने अडविले. "उतरून घेऊ नको. नुसता ध्यानात ठेव. सोपा आहे."

वांचीने ठिकाणा ध्यानात ठेवला. 'येईन' असे त्याने आश्वासन दिले. पुढल्याच स्थानकावर प्रवासी उतरला. याला अद्याप पुढे जायचे होते आणि हा येथे उतरला कसा असा विचार वांची करीत राहिला. पण तसे बोलण्यापूर्वीच प्रवासी मार्गस्थ झाला होता.

माडीवरील प्रवेशद्वारावर पाटी होती. 'ए. ए. षडानन मुदलियार !' आपल्या स्मरणशक्तीला वांचीने चालना दिली. खुणेप्रमाणे तो आला होता. मनाने आढेवेढे घेतले तरी त्याने दार वाजविले.

क्षणभराने दार उघडले. गोविंदशास्त्री कुठे राहतात, हे विचारण्यासाठी त्याच्या कंठाने पवित्रा घेतला होता. पण समोर त्याने त्या प्रवाशाला - गोविंदशास्त्रींना पाहिले म्हणून तो पवित्रा तसाच जिरला.

शास्त्रींनी वांचीचे स्वागत केले. त्याला आतल्या खोलीत नेले. थोडा वेळ बसण्यास सांगून ते स्वत: बाहेरच्या खोलीत आले आणि आणखी एका खोलीत गेले.

थोडचा वेळाने वांची खोलीचे निरीक्षण करू लागला.

एक छायाचित्र होते भिंतीवर. त्या खाली 'हुतात्मा मदनलाल धिंग्रा; स्वर्गारोहण १७-८-१९०९ असे लिहले होते. आणखी एक समूह चित्र होते. गोविंदशास्त्री यांना वांचीने त्या चित्रात ओळखले.

मदनलाल धिंग्रा यांनाही ओळखले. आणखी पाच त्याला परिचित नव्हते. चित्राखाली नावे नव्हती. कुतूहलाने वांचीने चौकटीचे मागचे अंग पाहिले. तेथे नांवे लिहिलेली होती. एम. पी. टी. आचार्य, व्ही. व्ही. एस. अय्यर, व्ही. डी. सावरकर, एस. कृष्णवर्मा, मॅडम कामा, लाल हरदयाल.

"शास्त्रीचे नाव नाही हे कसे काय ?' वांची विचार करीत आहे तोवर शास्त्री आले. दोन पत्रावळीवर त्यांनी उप्पीट आणले आणि एका लोटीत कॉफी.

'तू येशील असे वाटत होतेच मला, बोल तुला काय विचारायचे आहे ?' असे म्हणून शास्त्रींनी विषयाला हात घातला.

'पहिली शंका : आपले नांव ?' वांचीने थोडचा धिटाईने विचारले.

'मी व्ही. व्ही. एस. अय्यर. ते छायाचित्र पाहिलेस का ? त्यामागे नावे आहेत त्यावरून कळेल तुला.'

'छायाचित्र पाहिले मी. नावेही वाचली. म्हणूनच विचारण्याचे धाडस केले. मला कल्पना नव्हती मी इतक्या श्रेष्ठ व्यक्तीच्या सहवासात इतक्या लवकर येईन म्हणून.'

'कोण श्रेष्ठ ?'

'एम. पी. टी. आचार्य !' 'इंडिया'चे संपादक, लेखक.

श्यामजी कृष्णवर्मा : तरुणांना इंग्लंडमध्ये क्रांतिकार्यात साहाय्य करणारे क्रांतिकारक.

मॅडम कामा : फ्रान्समध्ये राहून हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा म्हणून धडपडणारी स्त्री.

लाला हरदयाल : यांचेविषयी मी अधिक जाणत नाही. पण ते या प्रभावळीत आहेत याचा अर्थ मी समजतो.

आपण ! ऋषीजी ! औषधाचे विक्रेते नव्हे, तर मरगळलेल्या हिंदुस्थानासाठी संजीवनीचे आपण वितरक आहात !

आणि व्ही. डी. सावरकर ! त्यांची पाच एक महिन्यापूर्वीची मार्सेलिसची उडी ! सध्या चालत असलेला अभियोग ! यापेक्षा श्रेष्ठ प्रभावळ हिंदुस्थानात कोणती असेल ?"

या तरुणाचे वाचनही बरे दिसते, असा विचार करीत अय्यर क्षणभर स्वस्थ होते. वांची पुढे म्हणाला,

'आणि मदनलाल ! महाशय ! आपण त्यांना समक्ष पाहिलेत ? मला कुतूहल आहे ते त्या विषयाचे. सावरकरांना आपण समक्ष पाहिलेत ? मी विचार करतो तो त्या तरुणांच्या तेजाचा, त्यांच्या साहसाचा, त्यांच्या नि:स्वार्थतेचा. पाहिलेत आपण त्यांना ?

अय्यर किंचित उद्विग्न झाले. त्यांच्या डोळ्यांपुढे सावरकरांची शेवटची भेट तरळू लागली.

नऊ-दहा महिन्यांपूर्वीची गोष्ट होती. ब्रिस्टल बंदिगृहात सावरकरांना बंद केले होते. थंडी कडाक्याची होती. कारण मार्च अद्याप संपला नव्हता, सावरकरांना भेटण्यासाठी ते बंदिगृहाच्या दाराशी गेले, आपले नाव दिले आणि वाट बघत बसले.

सावरकरांना आतून बोलावले गेले. गजांआडून बंधाच्या त्यांच्या त्यांच्या इष्ट मित्रांशी, आप्तांशी, भेटी चालल्या होत्या. सावरकर भेटीच्या जागी उभे राहिले. घोळक्यांतून आपला कोण इष्ट मित्र आहे याचा शोध घेऊ लागले. अय्यर भेट मिळते की नाही या शंकेत होते. पण त्यांनाही भेटीसाठी सोडले, तेव्हा ते सावरकरांना बघण्यास उत्सुक झाले. दोघे सहकारी समोरासमोर आले. 'अग्रणी ! तुम्ही पॅरिस का सोडलेत ?' अय्यर यांनी कळवळून विचारले, 'कुठे येऊन पडलात !' सावरकरांनी सांत्वन केले, 'इथे त्या गोष्टींची चर्चा करून लाभ काय ? मी इथे आहे खरा ! वस्तुस्थिती ही आहे ! चूक झाल्याने असेल किंवा योग्य झाल्याने असेल. आता बघायचे उरले एवढेच की याला तोंड कसे द्यायचे.'

मित्रांची विचारपूस झाली. पुढचे कार्य कसे कोणी कुठून करायचे याविषयी ज्या मर्यादेत आणि दक्षता घेऊन बोलणे शक्य होते ते बोलणे झाले. ते हिंदीतून झाले. अंदमान किंवा फाशी हे सावरकरांचे विधिलिखित स्पष्ट दिसतच होते. ते मनापुढे लटकत असताना गोष्टी चालल्या होत्या आणि भेटीचा अवधी संपत आल्याची

घंटा झाली. बंदिगृहाचे अधिकारी निर्ढावलेल्या शब्दांत 'वेळ संपली' म्हणाले. भारावलेल्या अंत:करणाने अय्यर यांनी सावरकरांचा निरोप घेतला होता. त्यांना निरोप दिला होता. बांचीने प्रश्न विचारला होता. आणि सावरकरांचे 'अंदमान' हे घोषित झालेले भवितव्य त्यांच्या डोळ्यापुढे तरळू लागले. त्याला ते म्हणाले, "होय बांची ! मी सावरकरांनाही पाहिले आहे आणि मदन लालजींनाही ! एकाची तर भेट अंतिमच ठरली. सावरकरांचीही माझी शेवटचीच भेट ठरणार असेल ! माझीच अंदमानची यात्रा कधी विधियोगाने नियोजित केली असेल तर गोष्ट वेगळी ! पण ते जाऊ दे. तुला काय जाणून घ्यायचे आहे ? तू काय विचार करतोस ?'

बांची थोडा दबूनच बोलला. फार मोठ्या व्यक्तीशी आपण बोलत आहोत याची जाणीव त्याच्या मनावर तरंगत होती. तो म्हणाला, जो राजा म्हणवितो त्याने प्रजेला सुख दिलेच पाहिजे. मी वनविभागात आहे. आमचा अधिकारी ज्ञान मिळवितो तो आमच्याकडून आणि त्याचा उपयोग करतो तो आमच्यावर कुरघोडी करण्यासाठी !"

"मग राजा कसा पाहिजे ?"

"राजाचे कारणच काय ? प्रजेचेच राज्य पाहिजे. आणि राजा असलाच तर असा असावा की जो प्रजेशी समरस होऊ शकतो."

"त्याला उपाय काय ?"

"आपणच राजे व्हायचे !"

"कसे ?"

"मिळेल त्या उपायाने."

"त्या उपाययोजनेने आपल्याला आपले राज्य बघायला मिळाले नाही तर ?"

"सर्व प्रजेशी राजा एकरूप असावा लागतो. हे तत्त्व मानले आणि राजेपद आपणाकडे ओढून घ्यायची इच्छा असली तर आपल्या पश्चातही प्रजेच्या रूपाने तो राजा जगतच राहील, चिरंजीव होईल. नाही का ?"

"कुणाचे बोलतो आहेस तू हे ?"

"खरे म्हणाल तर व्यंकटशास्त्रींचे. पण आता माझे. कारण त्यांच्या विचारांशी माझे अंतर्मन समरस होऊ पाहते."

व्यंकटशास्त्रींचे नाव येताच अय्यर यांनी नीलकंठ ब्रह्मचारी याचे नाव त्याला विचारले. कारण नीलकंठांशी शंकर कृष्ण अय्यर याने बांचीचा परिचय करून दिला होता. हे त्यांना शंकर कृष्ण यांचेकडून मधल्या वेळात कळले होते. बांचीच्या विचारधारेचाही अप्रत्यक्ष परिचय त्यांना मिळाला होता. "माझी एकदा भेट झाली आहे. काही बैठकीही झाल्या आहेत."

"केव्हा ?"

"पाचरसहा महिने झाले, ते बहुधा जून १९१० मध्ये असेल. ते दौऱ्यावर होते. माझे मेहुणे शंकर कृष्ण यांनी प्रथम भेट करून दिली."

"काही बोलणे झाले ?"

"तेव्हा विशेष नाही. पण मला दोन तीनदा भेटले. पुढे जमले नाही."

वांची अय्यर आणि ऋषिजी यांचे आणखी दोन तास बोलणे झाल.

वांची आणि ऋषिजी यांच्या गाठीभेटी होऊ लागल्या. कधी नीलकंठ ब्रह्मचारी त्यांच्याबरोबर असे. कधी शंकर कृष्ण असे. कधी आणखी कोणी तरुण असे.

तेनकाशी, शेनकोट्टा मुनालूर (त्रावणकोर) तुतिकोरीन, हा परिसर अंधारातील गुप्त बैठकींनी लुकलुकू लागला. 'अभिनव भारत समाज' कार्यप्रवण झाला. कोठे 'भारतमाता समिती (असोसिएशन)' या नावाने तर कोठे 'नव भारतमाता समिती' या नावाने.

मद्रासच्या आरक्षी दलाच्या उपाधिकाऱ्याच्या (डेप्युटी आय. जी. पी. च्या) पुढ्यांत एक पत्र होते : "ॲशे यांस - भारतमाता समितीचे आम्ही सदस्य तुम्हाला या पत्राने समज देत आहोत. सार्वजनिक क्षेत्रात कोणताही हस्तक्षेप करू नका. या सूचनेची उपेक्षा केलीत आणि आपले वर्तन बदलले नाही, तर थोडयाच दिवसात तुमचा कपाळमोक्ष होईल.

तुमचे विश्वासू

बी. एम. ए.

(नव भारतमाता असोसिएशन)

डिसेंबर १९१० च्या मध्यात आलेल्या त्या पत्रावरून सगळीकडे हेर धाडून या नव भारतमाता समितीच्या घटकांचा छडा लावण्याचे काम चालू होते. तेवढ्यात 'वंदे मातरम्' शीर्षकाचे एक परिपत्रक तिन्नवेल्लीहून काही ठिकाणी पाठविले गेल्याचे आरक्षींना समजले होते. त्या पत्रकाचा आशय होता,

'तरुणांनो ! गुप्त संस्थेत या ! हिंदुस्थान स्वतंत्र करायचा तर रक्त सांडले पाहिजे, आपले आणि इंग्रजांचे.'

त्या पत्राखाली 'फिरंगी नाशिनी मुद्रणालय' असे मुद्रणालयाचे नाव दिले होते. पत्र तामीळ भाषेत होते.

काही महिने लोटले होते. 'अभिनव भारत' च्या हालचालीची माहिती मुंबईकडून मागविण्याचा उपक्रम अधिकाऱ्यांनी चालू केला होता. सध्या तेथे अभियोगच उभा असल्याने पुष्कळशी माहिती संकलित झाली होती. समज मिळून सहा महिने होत आले होते. क्रांतिकारी कोणी नसतीलच. किंवा क्वचितच कोठे ठिणगी असेल तर नाशिकच्या कटाचा ३७ जणांवरील अभियोग संपल्यामुळे, त्यांतील कडक शिक्षांमुळे, विझली असेल, असा आशावादी विचार आरक्षीदल करीत होते.

जून १७ वर्ष १९११ हा दिवस उजाडला आणि त्याच दिवसांत आरक्षीदलाला कळून आले की या ठिणगीचे अस्तित्व होते, तिचा भडका उडाला होता.

गेले सात आठ दिवस वांची, नीलकंठ, शंकर कृष्ण आदि तरुण ॲशेच्या पाळतीवर होते. तो तिन्नवेल्लीहून कोडाईकनालला जाणार असल्याचा तपास त्यांनी केला होता.

दिनांक १६ ला त्यांनी वाट पाहिली. दिवस व्यर्थ गेला. नीलकंठ शंकरला म्हणाला, "आपला योग येतो आहे की नाही ?" वांची म्हणाला, "योग आपणच आणू. मी शिक्षण घेतलेले व्यर्थ जाणार नाही."

दि. ९ जानेवारी १९११ पासून तीन महिन्यांची सुटी घेऊन वांची पांडेचरीला गेला होता. तेथे ऋषिजींनी लक्ष्यवेधाचे शिक्षण काही तरुणांना दिले होते. वांचीही तज्ञ झाला होता. त्या संदर्भात त्याचे उत्तर होते.

कोणीतरी मोठा अधिकारी गाडीने प्रवास करणार असल्याची चिन्हे स्थानकावर दिसू लागली होती. शंकर आणि वांची स्थानकावर होते. त्यांनी लक्ष ठेवले. अपेक्षेप्रमाणे ॲशे आला. त्याची पत्नीही त्याच्यासह प्रवास करणार होती.

मन्यन्चीवरून कोडाईकनालला जाण्याचा मार्ग होता. तेथे गाडी बदलावी लागे. शंकर आणि वांची यांनी मन्यंचीच्या दर्शिका (तिकिटे) घेतल्या, सकाळी ११ वाजता गाडी मन्यंचीला आली. पुढच्या गाडीचा फलाट तिसरा होता. तेथे गाडी अद्याप लागली नव्हती.

एक आणि दोन फलाट जोडून होते. समोरच्या फलाटावर दुसरी गाडी उभी होती ती इतक्यात हलणार नव्हती.

कोडाईकनालची गाडी लागेपर्यंत ॲशेला बसण्यासाठी समोरच्या उभ्या गाडीत सोय केली होती. ॲशे आपल्या पत्नीसह तेथे जाऊन बसला.

ॲशेचा नोकर तीन क्रमांकाच्या फलाटावर सामान नेण्याच्या कार्यात मग्न होता.

कलेक्टर आहे म्हणून काही अधिक आरक्षी फलाटावर तरंगत होते.

आपले मनुष्यबळ थोडे, शस्त्रबळ थोडे, याची जाणीव वांची आणि शंकर यांना होती. तेव्हा संरक्षण ढिले असेल अशीच वेळ साधून आघात यशस्वी होण्याची शक्यता होती.

ॲशे वाचनात लागला होता तर त्याची पत्नी फलाटावर बघत होती.

उतारूंची वर्दळ विरळ होऊ लागली होती.

छत्रिकेच्या (रिव्हॉल्वरच्या) आवाजाने आसपासच्या लोकांचे लक्ष आवाजाच्या दिशेकडे वळले. वांची ॲशेच्या डब्यासमोर उभा होता. त्याने ॲशेला मारले होते. ॲशेने टोपी भिरकावून प्रतिकार करण्याचा क्षीण प्रयत्न केला होता. पण गोळीने आपले काम केले आहे इतपत निरीक्षण वांचीने केले होते. तो उभा राहिला होता

तो तेवढ्याचसाठी.

मिनिट-दीड मिनिट थांबल्यानंतर तो तेथून निघाला. त्याला ॲशेच्या नोकराने अडविण्याचा प्रयत्न केला, पण वांचीजवळ भरलेली छरिका पाहिली आणि तो भानगडीत पडला नाही. कारण ते शक्यच नव्हते.

'धावा धावा' चे पडसाद फलाटावर उमटले. कोणाही आरक्षीला वांचीला धरता आले नाही. वांची प्रथम धीम्या गतीने आणि मग द्रुतगतीने फलाटाच्या दुसऱ्या टोकाला पोहोचला. 'कुणी पुढे येऊ नका, हे शस्त्र भरलेले आहे.' असे त्याने लोकांना बजावले होते.

ॲशेला तिन्नवेल्लीकडे हलविण्यात आले. पण रुग्णालयात पोहोचले ते ॲशेचे प्रेत.

वांची फलाटाच्या दुसऱ्या टोकाच्या न्हाणीघरात घुसला. त्याचे मन स्वस्थ झाले. काम झाले त्याचे त्याला समाधान वाटले.

मनावर थोडा भार होता तो उतरला. 'आपण हे का केले हे लोकांना कळणारच आहे, आपल्या खिशातील पत्रच ते सांगेल.' तो मनात म्हणाला.

तामीळमध्ये लिहिलेले पत्र वांचीने खिशात ठेवले होते.

"आम्ही हिंदुस्थानवासी ब्रिटिशांना हाकलून देण्याच्या प्रयत्नात आहोत. आम्हाला स्वराज्य प्रस्थापित करावयाचे आहे, मानवधर्म स्थापित करायचा आहे.

"श्रीराम, शिवाजी, श्रीकृष्ण, गुरु गोविंदसिंह, अर्जुन यांनी या भूमीत राज्य केले, अन्य पंथीयांना संरक्षण दिले. पण इंग्रज पाचव्या जॉर्जला - एका म्लेंछाला, एका गोवधकाला आमच्या माथी मारू बघत आहेत."

"पाचवा जॉर्ज हिंदुस्थानात येईल तेव्हा त्याला मारण्यासाठी तीन सहस्र मद्रदेशीय शपथबद्ध आहेत. त्यांचा हेतू निदर्शनाला आणण्यासाठी मी हे कृत्य केले आहे."

जीवन आणि मरण ! वांचीचे मन हसले. किती झिरझिरित पडदा आहे या दोहोंमध्ये ! माझे मरण मी माझ्या हातात खेळवीत आहे ! पण माझे जीवनही माझ्या मरणात आहे. कारण झिरझिरित पडदा उभयमार्गी आहे. दुमार्गी आहे, एकमार्गी नव्हे !

'ॲशे ! तुला पीडा झाली मरताना ? तू विश्वास ठेव. तुझ्या पीडेची मला कल्पना आहे ! तुझे अन् माझे वैर थोडेच होते ? पण मदनलाल धिंग्रा म्हणत असे ना, की

"Every Englishman who is good enough to rule India is bad enough to be shot !"

'जो म्हणून इंग्रज येथे राज्य करण्यात कुशल आहे तो त्याच प्रमाणात वध्य

आहे !'

'ॲशे ! तू कुशल प्रशासक होतास पण म्हणूनच इंग्रजी राज्याचे पाश हिंदुस्थानभोवती करकचून आवळून धरण्याचे तू पाप करीत होतास.

'माझे भवितव्य मला ठाऊक आहे ! पण ते मला नव्याने कळत नाही. हाती शस्त्र घेतले तेव्हाच माझे स्वत:चे भवितव्य डोळ्यासमोर दिसले होते. तुझे जे भवितव्य घडले तेच माझे आहे !'

'पण एक अंतर आहे. तू दुसऱ्यांच्या पीडा न जाणता जीवन जगलास. मी दुसऱ्याच्या पीडा जाणून मरण जगणार आहे. मरण म्हणजे जीवनाचा अंत ही तुझी ऐहिक धारणा आहे, तर मरण ही जीवनाची एक प्रक्रिया आहे ही माझी आध्यात्मिक भावना आहे.

'तरीही ॲशे ! वैष्णव जन तो तेणे कहिये पीड परायी जाणे रे,' हे मी घोकलेले आहे. आपण साधु व्हायचे असे माझे बालपणातील स्वप्न होते. वैयक्तिकरीत्या तुझ्या दु:खात मी सहभागी आहे, हे मी तुला कसे दाखवू ?'

विद्युत्‌वेगाने धावणाऱ्या विचारांना येथे पूर्णविराम आला आणि वांचीने ती भरलेल्या छरिकेची नळी स्वत:च्या कंठनाळावर धरली. मनात मातृभूमीला वंदन करून, तिची स्वतंत्रता इच्छून त्याने घोडा ओढला.

मातृभूमीला एका सत्पुरुषाच्या रुधिराचे स्नान झाले.

(नंतरच्या घटना - मन्यन्ची स्थानकावर जिल्हाधिकारी ॲशे यांना मारल्यावर आणि वांची (किंवा वांछी) अय्यरने आत्महत्या केल्यावर शंकर कृष्ण अय्यर पकडला गेला.

अभियोग उभा राहिला. तो तीन न्यायमूर्तींपुढे चालला. तेरा आरोपी होते. नीलकंठ ब्रह्मचारी आरोपी क्रमांक १ होता.

अभियोग चालू असताना आरोपीचा छळ झाला तो सहन न होऊन व्यंकटेश्वर अय्यर विधिज्ञ (वकील) यांनी सुरी मिळवली आणि कंठ चिरून घेऊन आत्महत्या केली. धर्मराज अय्यर यालाही छळ चुकविण्याचा तो सोपा मार्ग वाटला. त्याला सुरी मिळाली नाही, विष मिळाले, त्याने विषप्राशन केले.

ॲशेच्या वधाच्या दोन आठवड्यांनंतरच स्वा. सावरकर यांना मद्रासमार्गे अंदमानला धाडले जात होते. महाराजा आगनाव उभी होती. सर्व बंद्यांना आणि आरक्षींना आगनावेत चढविल्यानंतर सर्वात शेवटी सावरकरांना नेण्यासाठी एका स्वतंत्र नावेची व्यवस्था केली. मद्रासचे दोन देशी अधिकारी त्यांच्यासमवेत त्या छोट्या नावेतील मार्गरक्षक दलांत (एस्कोर्ट) होते. मार्सेलिसची उडी जगप्रसिद्ध झाली होती. आरक्षींनी अधिक

दक्षता घेतली होती.

मद्रासची घटना सावरकरांना कळली असेल काय, आणि त्यांच्याकडून त्याविषयी काही माहिती मिळते काय याची चाचपणी ते अधिकारी (त्यातील एक) करू लागले. त्यांनी विषय काढला, 'तुमच्यामागे इंग्लंडमधील तुमच्या क्रांतिकार्याचे काय झाले ?

"तुम्हीच सांगा ! मी तर बंदीत आहे !" सावरकरांनी उत्तर दिले.

"ते खरंच ! आणखी ते कट तरी करले भिकार हो ! चार माणसे देखील नसायची त्यात !"

"मग तुम्ही का नाही भर घातलीत त्यात !"

"छे ! अहो, या मद्रासकडचे लोक का तुमच्या तिकडच्या तरुणांसारखे उच्छृंखल आहेत ! शांत जीवन जगणारे ते लोक ! इथे कुणी तरला प्रचारक आला तर त्याला अनुयायीच मिळणार नाही !

ते सावरकरांच्या मुद्रेवरून प्रतिक्रिया शोधू बघत होते. 'मद्रास शांत कसे म्हणता तुम्ही ? प्रचारकांना अनुयायी मिळणार नाहीत हे तरी कसे म्हणता ? अमुक घटना येथेच नाही का घडली ? अमुक अमुक देशभक्त मद्रासचेच नाहीत काय ?' अशी सहजप्रतिक्रिया असू शकते. आपले कार्यच कोणी हिणविले की उन्मेष येतो आणि प्रतिकारासाठी पुरावे पुढे करण्याची प्रवृत्ती असते. सावरकरांनी तसा कोणताच संकेत दिला नाही. ते ऐकत राहिले. अधिकारीच पुढे म्हणाले, 'तुमचा काय अनुभव आहे ?"

सावरकर म्हणाले, 'मद्रासचे तुम्ही निवासी. मी नव्हे. माझ्यापेक्षा तुम्हालाच अनुभव अधिक नाही का ?

उत्तर आले, "माझा अनुभव म्हणाल तर मद्रासकडे सर्वत्र शांतता आहे !"

सावरकरांनी हसून उत्तर दिले. "होय ना ? अगदी शांतता आहे ही निश्चिती आहे ना तुमची ?" अधिकारी समजला ! सावरकरांना ठाऊक आहे तर !

दुसऱ्या अधिकाऱ्याने संभाषणाचे एका वाक्यात मूल्यमापन केले, "तुम्ही सावरकरांना चाचपू बघत आहात; तर ते तुम्हाला चाचपत आहेत !"

तिन्नवेल्ली कटाच्या अभियोगाचा निर्णय १५-२-१९१२ ला लागला. नऊ ओरोपींना एका वर्षापासून सात वर्षेपर्यंत वेगवेगळ्या शिक्षा झाल्या. एका न्यायाधीशांच्या मताने चारच जणांना त्यांच्या दोषसिद्धीसाठी शिक्षा देणे योग्य होते. उच्च न्यायालयाकडे प्रकरण गेले असता स्थूलत: पहिल्या नऊ जणांच्या शिक्षेचाच निर्णय स्थिर ठेवण्यात आला.

'अभिनव भारताच्या सदस्यांचा तिन्नवेल्ली घटनेतील संबंध दाखविताना रौलट

प्रतिवृत्तात 'वंदेमातरम्' या पॅरिसहून निघणाऱ्या क्रांतिकारी वृत्तपत्राचा उल्लेख केला आहे. वंदेमातरमचा एप्रिल १९११ चा अंक मेच्या शेवटी प्रसिद्ध झाला. त्यातील लेखांत एक प्रक्षोभक आशय होता.

"सभेत किंवा सदनात, रुळावर किंवा डब्यांत, दुकानात किंवा प्रार्थनाघरात, बागेत किंवा जत्रेत संधी मिळेल तेथे इंग्रजांना ठार केले पाहिजे. अधिकारी आणि सामान्य असा भेद करू नका. नानासाहेब पेशवे हे जाणत होते. बंगाली तरुण हे ओळखू लागले आहेत. त्यांच्या प्रयत्नांना सुयश मिळो. इंग्रजांना बजवा की तुम्ही अडचणीतून बाहेर येईपर्यंत तोंड उघडू नका." तिन्नवेल्ली घटनेनंतर जुलै १९११ मधील अंकात कामाबाईंनी लिहिले होते की भगवद्गितेच्याच संदेशाप्रमाणे हे बंध होत आहेत.

तिन्नवेली आणि मेमनसिंगच्या तरुणांनी दाखविले आहे की हिंदुस्थान झोपलेला नाही. (१९ जून १९११ ला मेमनसिंग येथे एका सब्इन्स्पेक्टरला ठार मारले होते.)

तिन्नवेल्ली कटाचा आणखी एक विशेष म्हणजे त्यात जातिनिरपेक्षपणे हिंदूतील सर्व थरातील जातींचे लोक समाविष्ट होते.

स्वा. सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध असताना श्री. व्ही.व्ही. एस्. अय्यर त्यांना भेटून गेले होते. जे अशक्य वाटले ते शक्य झाले होते. पण दोन महिन्यांनीच म्हणजे १९२५ च्या पूर्वार्धातच त्यांचे निधन झाले. वास्तविक रत्नागिरीतील भेटीनंतर पुन्हा केव्हाही भेटता येईल अशी शक्यता वाटली होती. पण यावेळी नियतीने ती शक्यताच अशक्य करून टाकली !





॥ ३ ॥

हुतात्मा प्रद्योत

"सुरूलिया विभागांतील काँग्रेसच्या स्थानबद्धांवर अनन्वित अत्याचार होत आहेत, डग्लस् ! ते तुझ्या आज्ञेने होत आहेत काय ? ते तुला ठाऊक आहे की नाही ? आम्ही आमचा पवित्रा घेत आहोत त्यापूर्वी या गोष्टीचे स्पष्टीकरण झाले पाहिजे. आम्ही कांही दिवस वाट बघू. आरक्षी अत्याचार थांबवीत आहेत का, त्यावर लक्ष ठेवू. त्यांच्यात सुधारणा दिसली नाही तर त्यांचे आम्ही बघून घेऊ. तसेच डग्लस् ! तुलाही त्याचे भीषण परिणाम भोगावे लागतील."

मिदनापूरच्या ब्रिटिश उच्छेद समितीची पत्रके चौकीचौकींवर चोरून लावली जात होती. जिल्हाधिकारी डग्लस् यालाही ती धाडली जात होती. उच्छेद समितीच्या घटकांच्या शोधांत असलेल्या आरक्षी दलाने अनेक तरुणांना पकडले होते; पण समितीचे घटक त्यांना मिळाले नव्हते.

आरक्षीदलाने सतर्क होण्याला तसेच कारण होते. ती पत्रके पोकळ नव्हती. त्यामागे शक्ती होती. आरक्षींना त्याची प्रचीती आली होती.

रॉबर्ट डग्लसच्या पूर्वी जे. पेडी हा जिल्हाधिकारी होता. त्याला क्रांतिकारकांनी एप्रिल १९३१ ला गोळ्या घालून ठार मारले होते.

वातावरणाची डग्लसलासुद्धा कल्पना आलेली होती. अधिकारपद घेतल्यावर तीन चार महिन्यांनी म्हणजे ऑगस्ट १९३१ च्या आरंभी आरंभी त्याने आपल्या भावाला लिहिले होते. " लिहिण्याचे सार म्हणजे माझे आयुष्य खरोखरीच फार धोक्यांत आहे. " डग्लसचा भाऊ राजमहेंद्रीच्या महाशाळेचा प्राचार्य होता.

बंगालचे वातावरण सारखे उष्ण होते. ते कधी थंड होऊच दिले जात नव्हते. नवविवाहित तरुणीची पतीकडे ओढ असावी तसे तरुणांचे थवेच्या थवे मृत्यूकडे, आत्मार्पणाकडे ओढ घेत होते. त्यांना त्याचे विलक्षण आकर्षण वाटत होते.

हिजली स्थानबद्ध बंदिगृहात (हिजली डिटेन्शन कॅंप) अनेकजणांना जखडून ठेवले होते. काही लहानशा बोलाचालीवरून अधिकारीवर्गाने अगदी ठरवून १६ सप्टेंबर १९३१ ला गोळीबार केला होता. संतोषकुमार मित्र हा कलकत्त्याचा तरुण आणि तारकेश्वर सेन हा बारिसालचा तरुण यांना गोळ्या लागल्या आणि त्यांत त्यांचे तत्काळ निधन झाले होते.

अनेक जणांना दुखापती झाल्या होत्या, त्या संगिनीच्या होत्या, दंड्यांच्या होत्या आणि गोळ्यांच्याही होत्या.

हिंसा-अहिंसा या जंजाळांतून क्रांतिकारक कधीच मुक्त झाले होते. या निरपराध, नि:शस्त्र लोकांवर बंदिगृहात झालेल्या या अत्याचाराचा प्रतिशोध घेतलाच पाहिजे, अशी आग तरुणांच्या हृदयाला लागली होती.

हिजली बंदिगृहातील त्या हत्याकांडाची चौकशी डग्लसने केली होती. त्याचा निष्कर्ष होता...

" आरक्षींनी गोळीबार केला त्याचा स्थानबद्धांनी अर्धवटपणे आणि अगतिक होऊन प्रतिकार केला. त्यावर आरक्षींनी सैरावैरा गोळीबार केला, त्याला समर्थन देता येणार नाही. दोन स्थानबद्ध त्यात मारले गेले. अनेकांना दुखापती झाल्या."

" काही आरक्षी बंदिगृहाच्या वास्तूंत शिरले त्यालाही काही कारण नव्हते. दंड्यांनी आणि संगिनींनी त्यांनी जे प्रहार केले तेही असमर्थनीय होते. त्यांनी गोळीबार केला त्यालाही काही कारण नव्हते."

तरीपण डग्लसचे ते प्रविवृत्त मानभावीपणाचे असल्याचे क्रांतिकारकांना दिसून आले होते. सुरूलिया भागांत आरक्षींचे अत्याचार चालूच होते.

क्रांतिकारकांचे आव्हान आरक्षीदलाने स्वीकारले होते. डग्लसच्या संरक्षणाची दक्षता ते घेत होते, तर त्याला उडविण्याची संधी क्रांतिकारक शोधीत होते.

डग्लस जिल्हापरिषदेचा - डिस्ट्रिक्ट बोर्डचा - अध्यक्ष होता. अनेक सभा होत. यांना त्याला उपस्थित राहावे लागे.

अशीच एक सभा ३० एप्रिल १९३२ ला आयोजित केली होती. सभासद मोठ्या

संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमपत्रिकेवरील एकेक विषय चर्चेला येत होता. काही सूचना-उपसूचना पुढे येत होत्या. थोडाफार वाद होत होता. पण सर्व सुरळीत चालले होते. डग्लस अध्यक्ष या नात्याने व्यवस्थित नियंत्रण ठेवीत होता.

संध्याकाळचे साडेपांच वाजले होते. कार्यक्रम-पत्रिकेवरील नववा विषय बघावयाचा होता.

पश्चिम दारांतील मधल्या बाटेने दोघे तरुण सभागृहात आले होते. ते किती वेळ तेथे होते हे कोणाच्याच लक्षात आले नाही. पण एखादा संकेत मिळावा आणि आपण कार्यप्रवण व्हावे तसे साडेपांच वाजले आणि ते दोघे तरुण डग्लसच्या शक्य तितक्या जवळ गेले. एक डाव्या अंगाला तर दुसरा उजव्या अंगाला. त्यांनी आपल्या छरिका (पिस्तुले) सरसावल्या.

बारा ते पंधरा फुटाचे अंतर होते. नेम धरून त्या तरुणांनी एकाच वेळी गोळीबार केला. एकूण सहा गोळ्या त्यांनी सोडल्या होत्या.

डग्लसच्या छातीत, पोटांत आणि दोन्ही हातात गोळ्या घुसल्या होत्या. त्याला रुग्णालयात नेले. खरगपूरहून वैद्यकीय पथक मागविले. पण रात्री पावणेदहाला त्याला मृत्यू आला.

प्रद्योतकुमार भट्टाचार्य हा त्या तरुणांतील एक होता. ते दोघ उत्तर दाराने बाहेर पडले. एक अधिकारी छरिका घेऊन पाठलाग करीत होता.

'अमर लॉज' पर्यंत ते एकत्र पळाले. तेथे दोन रस्ते फुटतात. प्रद्योत एका रस्त्याला लागला. त्याचा पाठलाग होत होता. तो जवळच्या झोपडपट्टीत घुसला.

तीन चार आरक्षी तेथे पोहोचले होते. त्यांनी त्या भागाला वेढा दिला. जेथे प्रद्योत घुसला होता त्या झोपडीत गोळीबार केला. प्रद्योत तेथून निसटला पण दुर्दैव आडवे आले. एका निवडुंगाच्या झाडांतच तो अडकून राहिला.

आरक्षींनी त्याला धरले, बाहेर काढले, त्याची झडती घेतली. झडतीत एक चिठी मिळाली.

"हिजलीच्या अत्याचाराचा अल्पसा प्रतिशोध ! त्यातील हुतात्म्यांची इंग्लंडला जाणीव असू दे, आणि आमच्या बलिदानाने हिंदुस्थान जागा होऊ दे."

प्रद्योतच्या खिशांत एक सहाबारी छरिका मिळाली. पांच घरे भरलेली होती. एक रिकामे होते.

पण त्या गोळीने डग्लसवर प्रहार झालाच नव्हता असे परीक्षेत आढळले. दुसऱ्या तरुणाने झाडलेल्या गोळ्यांनी डग्लस मेला असला पाहिजे, असा तर्क निघाला.

तो दुसरा तरुण सापडू शकला नाही. प्रद्योतची साल सोलली होती. यातनः

असह्य झाल्याने त्याने आपल्या जोडीदाराचे नाव सांगितले, सितांशु बोस !

आरक्षींनी लगबगीने शोध घेतला. जो ठिकाणा सांगितला होता तेथे कोणी सितांशु बोस मिळत नव्हता, तर सितांशु बोस म्हणून ज्याला धरून आणले तो तो तरुण नव्हता. प्रद्योतवर पुन्हा प्रयोग चालू झाले होते. पण काही निष्पन्न होत नाही हे बघितल्यावर, २१ मे १९३२ ला आरक्षी प्रमुखांनी प्रगट केले, 'जोडीदाराचा शोध करून देणारास पाच सहस्र रुपये पारितोषिक मिळेल.'

दि. ८ जून १९३२ ला प्रद्योतवरील अभियोग चालू झाला. दुसरा तरुण सापडला नाही. दि. २२ जूनला सुनावणी संपली आणि २५ जूनला न्यायालयाने निर्णय दिला, 'फाशी' !

जवळजवळ सहा महिन्यांनी म्हणजे १२ जानेवारी १९३३ ला प्रद्योतला मिदनापूर बंदिगृहात फाशी दिले. त्याचे वजन तोपर्यंत कितीतरी पटीने वाढले होते. दोन्ही - शारीरिक आणि हौतात्मिक !

❀❀❀

॥ ४ ॥

देव-भक्त दोन्ही एक

कथेचा कालखंड : पहिल्या महायुद्धाचे काळात म्हणजे वर्ष १९१४-१५ मध्ये हिंदुस्थानचे स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी गदर पक्ष नावारूपाला आला. पण त्या पूर्वीच्या सहा-सात वर्षांपासून यूरोप, अमेरिका येथे विसुरलेल्या हिंदुस्थानच्या नागरिकांचे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न चालू होते.

स्वा. सावरकर इंग्लंडमध्ये असताना भारत भवनात स्थापलेल्या अभिनव भारत क्रांतिसंस्थेच्या कामाचा विस्तार वेगवेगळ्या नावाने ठिकठिकाणी होत होता. वर्ष १९०८ मध्येच कॅलिफोर्नियात 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' कार्य करू लागली होती. श्री. तारकानाथ दास त्या लीगचे प्रमुख होते. श्री. पांडुरंग खानखोजे आणि नंतर श्री. काशिराम यांनी ती कार्याची धुरा उचलली होती.

श्री. लाला हरदयाळ सावरकरांचे समकालीन नेते होते. सावरकरांना अटक होऊन त्यांना हिंदुस्थानात आणले गेले होते. लाला हरदयाळ युरोपमधील भारतीयांच्या जागृतीचे काम करीत होते. कामाच्या अधिक उठावासाठी ते कॅनडा, अमेरिका (संघराज्य)

येथेही हिंडत होते.

श्री. विष्णु गणेश पिंगळे यांनीही 'लीगचे' नेतृत्व केले आणि एशियाटिक इमिग्रेशन ॲक्टच्या वापराने भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लोकमत जागे केले. एप्रिल १९११ मध्ये लाला हरदयाळ यांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने लोकांत उत्साहाची प्रेरणा निर्माण केली.

हिंदुस्थानी असोसिएशन ऑरेगॉनमध्ये (यु. स्टेटस) स्थापन झाली. त्याच धर्तीवर पॅसिफिक तीरावरील इंडियन असोसिएशन काम करू लागली. या संस्थांचे अर्थातच एकमेकांशी संपूर्ण सहकार्य असे. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य हा सर्वांचा साधारण हेतू होता.

गदर पक्षाची स्थापना त्यातूनच झाली. युद्धाचे वारे वाहू लागले होते. युद्धाची ठिणगी केव्हा पडते याचीच वाट बघितली जात होती. अशा स्थितीत नुसते परदेशांत राहून लोकमत जागृत करण्याने काही साधण्याजोगे नव्हते. सैनिकी आक्रमण आणि त्याला हिंदुस्थानातील सैनिकी उठावाची साथ असे संधान बांधूनच पावले टाकण्याने प्रत्यक्ष कृती होणार होती.

सॅनफ्रान्सिस्को येथे गदर पक्षाने 'गदर' हेच आपले मुखपत्र काढले. देशी भाषांतूनही ते मुद्रित करण्याचा उपक्रम चालू झाला. त्यांच्या प्रती हिंदुस्थानातील नागरिकांत विशेषत: सैन्यांत वितरित व्हाव्यात अशाही योजना कार्यान्वित झाल्या.

वर्ष १९१३ च्या नोव्हेंबर १ च्या 'गदर'च्या पहिल्याच अंकात असे आव्हान आणि आवाहन आहे -

"आज या दूरभूमीवरून पण देशी भाषांतून ब्रिटिश राज्याविरुद्ध युद्धाचा उद्घोष होत आहे... तुझे नाव काय ? बंड ! तुझे काम काय ? उत्थान ! ते कुठे घडेल ? हिंदुस्थानात ! आणि अगदी लवकर लेखणी आणि शाई यांचे रूपांतर बंदूक आणि रक्त यांच्यात होईल."

इकडे अतिपूर्वेकडील भारतीयांतही या सामूहिक उत्थानाची योजना कार्यान्वित होत होती. शांघाय, हाँगकाँग, मॅनिला, पेनांग, सिंगापूर, सयाम इत्यादी ठिकाणी 'गदर' चे संघटन आकार घेऊ लागले होते.

कॅनडा आणि अमेरिका येथून शीख मोठ्या संख्येने हिंदुस्थानकडे निघाले होते. कोरिया, तोशामारू, माशिया मारू, कवाची मारू, साला मिरू इत्यादी जलयाने शिखांना हिंदुस्थानात आणीत होती. शस्त्रास्त्रांचा पुरवठाही व्यवस्थित होईल अशी योजना होती.

हा उठाव यशस्वी होऊ शकला नाही. अनेकजण पकडले गेले. अनेकांना फाशी,

जन्मठेप अशा शिक्षा झाल्या.

कॅनडा किंवा अमेरिका ब्रिटिशांचेच सहाय्यक असल्याने त्या देशांत उभ्या राहिलेल्या संघटना मोडून काढण्याच्या कामात ते देश ब्रिटिशांना साहाय्य देत होते. पण त्यातूनही हे अडसर दूर करण्यासाठी काही वैयक्तिक हत्या हे क्रांतिकर्ते करीत असत, ते अनिवार्य म्हणून. अशा हत्येत वैयक्तिक प्रतिशोधाची भावना नसे. अशा दोनचार हत्या करून ब्रिटिशांचे राज्य उलथून पडेल अशीही कोणाची कोती भावना नसे.

अशा हत्या करताना स्वत:चे प्राणही अर्पण करण्याची सिद्धता ठेवावी लागे. नव्हे अशी सिद्धता असल्यावाचून हात उचलणे केवळ असंभव असे. त्या आत्मयज्ञाला धीरोदात्तता , त्याग, प्रामाणिकपणा आणि ईश्वरोपासना अशा गुणांची बैठक असे. कोणाची प्रकट झाली असेल, कोणाची नसेल.

त्या काळात हिंदुस्थानपासून राहस्रावची मैल दूर, अशा आध्यात्मिक बैठकीवर उभे राहून स्वातंत्र्ययज्ञाच्या स्थंडिलावर आहुती देणाऱ्या एका देशभक्ताची ही कथा आहे.)

व्हँकुव्हरच्या गदर पक्षाचे कार्य

कॅनडाच्या पूर्व पट्टीवर पॅसिफिक महासागराच्या तटावर व्हँकुव्हर हे पट्टण (बंदर) आहे. अतिपूर्वेकडे वाहतूक करण्यास ते बंदर सोयीचे आहे.

कॅनडामध्ये अनेक वर्षे वस्ती करून असलेल्या शीख समाजावर जाचक निर्बंध येऊ लागले होते. त्यामुळे त्या समाजातही स्वभावत:च ब्रिटिशविरोधी उठाव करण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरूप येत होते.

कोमागाटा मारू ही नौका स्वतंत्र सैनिकांसह हिंदुस्थानाकडे निघाली होती. ती योजना व्हँकुव्हरच्या स्वतंत्र हिंदुस्थान संघाच्या कार्यकर्त्यांनी शिजविली होती.

कोमागाटा मारूचा प्रयत्न अयशस्वी झाला होता. तोच प्रयत्न पुढे रेटला जाईल म्हणून ब्रिटिश सत्ता जागरूक होती. शीख समाजात फाटाफूट निर्माण केली आणि म्होरके पकडले म्हणजे या संघटनेच्या कार्याला पायबंद बसणार होता.

संघटना फोडण्याचे कारस्थान

परप्रांतात, विशेषत: परदेशांत एका विशिष्ट समाजाचे घटक अधिक संख्येने असतील तर एकत्र येण्यासाठी ते त्यांची पूजास्थाने उभारतात, श्रद्धास्थाने निर्माण करतात. व्हँकुव्हरात शिखांनी आपला गुरुद्वारा उभारला होता. त्या महायुद्धाच्या काळात हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या दिशेने पावले टाकण्याचे धोरण त्या समाजाने अंगिकारल्याने तो गुरुद्वारा भौतिक आणि आध्यात्मिक मार्गाकडे नेणारा आश्रम ठरला होता.

स्वतंत्रता म्हणजे तरी मुक्तीचे रूप नव्हे का ? मोक्षाची मूर्ती नव्हे का ? ते

परब्रह्म नव्हे का ? तो आनंद नव्हे का ? स्वातंत्र्यवीरांनी सूत्ररूपाने म्हटले आहे...

हे स्वतंत्रते भगवती ।
मोक्ष मुक्ति ही तुझीच रूपे ।
तुलाच वेदान्ती ।
स्वतंत्रते भगवती । योगिजन
परब्रह्म वदती ।

तो शीख समाज आता जागृत दैवत पुजू लागला होता. नुसत्या कर्मठ मंत्रतंत्रातून तो बाहेर पडला होता. त्याला त्या मंत्रातील अर्थ स्पष्ट होऊ लागला होता. खड्ग कशासाठी ? शोभेसाठी नव्हे, तर दुष्टांच्या निर्दालनासाठी, याचा त्या समाजाला साक्षात्कार होऊ लागला होता.

ब्रिटिशांच्या गुप्तचर शाखेने कॅनडा शासनाच्या संगनमताने आपले जाळे या शीख समाजात पसरण्याला आरंभ केला होता. विल्यम हॉप्किन्सन या हिंदुस्थान आरक्षी दलाच्या एका इंग्रजाला त्यांनी व्हँकुव्हरच्या या फाटाफुटीच्या कामावर नेमले होते. हिंदुस्थानात काम केल्याचा अनुभव हॉप्किन्सनला होता. हे लोक प्रलोभनाला बळी पडतात, धमकीला भितात, आणि आपल्या भावाच्या घरालाही भोक पाडण्यास प्रवृत्त होतात, हा त्याचा अनुभव होता. असे लोक निवडायचे कौशल्य मात्र पाहिजे, हे त्याचे गणित होते. आजच्या परिभाषेत सी.आय. ए. जे कौशल्य दाखविते ते काम तेव्हा ब्रिटिश गुप्तचर विभाग हाप्किन्सनकरवी करीत होता.

बेलासिंग नावाच्या एका प्रतिष्ठित शिखाची त्याने आपला साहाय्यक म्हणून गुप्तपणे योजना केली. बेलासिंग आपली करणी करू लागला. सर्व शासनच पाठीशी उभे असल्याने त्याला एक प्रकारचा मद चढला होता. तो हेर आहे ही गोष्ट उघडी पडली तरी त्याला तो भीत नव्हता.

बेलासिंगाने काही असे लोक मिळविले की ते त्याला साहाय्य करतील. पण असे लोक मिळविण्यासाठी तो प्रलोभने दाखवी आणि वेळी आपल्या प्रतिष्ठितपणाचा उपयोग करून लोकांची कोंडी करी. कधी धमकीने काम साधण्याजोगे असेल तर तोही मार्ग त्याला वर्ज्य नव्हता.

पण या प्रकारात सर्वच लोक हाताला लागत, असे नव्हे. क्रांतिकारकांना लोक मिळविण्यास जसे परिश्रम पडत आणि कोणीतरी कच्चा दुवा आपण हाताळला तर तो तुटेल, फुटेल ही भीती असे, तसेच बेलासिंगचे होत राहिले. बेलासिंगचा बेत शीख समाजाला कळून आला. अर्थातच क्रांती करण्याला प्रवृत्त झालेल्या त्यातील घटकांना त्याचे आणि त्याच्या लोकांचे हे वर्तन आवडले नाही.

प्रथम हा रोग नाहीसा केला पाहिजे या विचाराने क्रांतिकारकांनी बेलासिंगच्या काही हस्तकांना नाहीसे केले. ते कसे आणि कोठे हे उमगलेच नाही. अर्जुनसिंग नावाच्या बेलासिंगाच्या हस्तकाला तर रामसिंगने भर दिवसा गोळ्या घालून ठार मारले. रामसिंगने 'आत्मरक्षण' हा बचाव दिला आणि न्यायलयाने तो बचाव गृहीत धरला.

बेलासिंग चिडून गेला होता. आपण काहीतरी केलेच पाहिजे या विचाराने तो अस्वस्थ झाला.

वर्ष १९१४ च्या ऑगस्टमध्ये गुरुद्वारात सत्संग आयोजित केला होता. गुरुद्वार सगळ्यांनाच मोकळे असल्याने आणि त्यात बेलासिंग हा बाह्यात्कारी शीख असल्याने तोही या मेळ्यात आला होता.

गुरुग्रंथ साहेबापुढे 'मथ्था' टेकणे चालू होते. बेलासिंग डोके टेकवायला गेला.

कॅनडातील संघटनेचे प्रमुख श्री. बागसिंग आणि एक कार्यकर्ता वतनसिंग ग्रंथासनापाशी म्हणजेच गाभाऱ्यापाशी बसले होते. बेलासिंगचे ते लक्ष्य होते. त्याने पिस्तूल काढले आणि बागसिंग आणि वतनसिंग यांना गोळ्या घालून ठार मारले.

बेलासिंगला न्यायालयापुढे आणले. प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाच फार चक्रे फिरली होती. हत्येच्या आरोपावरून बेलासिंगवर अभियोग भरला होता, तरी हॉप्किन्सनने त्याला प्रतिभूवर सोडवून घेण्याची व्यवस्था केली होती. बेलासिंगवर आरोप ठेवला त्याचे उत्तर त्याने स्वीकारोक्तीने दिले, पण आपण आत्मरक्षणासाठी हा गोळीबार केला असा बचाव दिला.

हॉप्किन्सन न्यायाचा काटा आपल्याला हवा तसा दाबीत होता. न्यायमूर्ती नावालाच होते. बेलासिंगच्या आत्मरक्षणाचा बचाव गृहीत धरला गेला.

पण आता शीख समाज खवळून उठला होता. बेलासिंग सुटला यापेक्षा ज्याने सोडविले तोच अपराधी असल्याचे क्रांतिकारकांच्या लक्षात आले. पंजाबीत म्हण आहे 'चोर को न मारो चोर की माँ को मारो ता कि और चोर पैदाही न हो !' क्रांतिकार्यात फाटाफूट पाडणारा बेलासिंग असेल, तर त्याची प्रेरणा हॉप्किन्सन होता, ती प्रेरणाच नाहीशी केली तर ?

देशाची, मातृभूमीची, समाजाची, हिंदुस्थानची सेवा आपल्या प्राणाहुतीने करण्यास उतावीळ असलेला एक तरुण तेथे उपस्थित होता. त्याचे नाव त्याच्या कृतीला शोभेसे होते, सेवासिंग ! मेवासिंग असेही त्याचे दुसरे नाव होते.

व्हिक्टोरिया हे व्हँकुव्हरजवळ असलेले कॅनडातील आणखी एक नगर आहे. बेलासिंगचा अभियोग तेथे चालला होता. हॉप्किन्सन त्या न्यायालयात बेलासिंगला

कशा प्रकारे साहाय्य करता येईल हे दाखविण्यात गुंतला होता.

सेवासिंगाने आपली छरिका काढली आणि हॉप्किन्सनच्या चिंध्या केल्या. त्याने सांगितले ते हे की, भावाला भावाविरुद्ध चिथवण्यास आणि उभे करण्यास या हॉप्किन्सनने प्रवृत्त केले आहे. मी हे कसे सहन करू ? अशा माणसास गोळ्या घालून ठार मारण्यानेच न्याय होईल. एरवी नाही.

सेवासिंगला फाशी सुनावली; आणि या ठिकाणी त्याचे दिव्यत्व दिसून आले. आपल्या बचावासाठी त्याने कोणतेही युक्तिवाद मांडले नव्हते; पळवाटा काढल्या नव्हत्या. मी हेतुपुरस्सर हॉप्किन्सनला मारले हे त्याने स्पष्टपणे मान्य केले होते.

दिनांक १५ जानेवारी १९१५ हा त्याचा फाशीचा दिवस होता. गुरुद्वारातील ज्ञानी (पंडित) यांना त्याची अंतिम भेट होऊ दिली होती.

देवाशी अद्वैत

मरणाऱ्या व्यक्तीला मरण्यापूर्वी आपल्या कृतीचा पश्चात्ताप बोलावयाचा असेल, आपली पापे मान्य करायची असतील आणि त्यायोगे स्वत:च्या मनावरील भार हलका करावयाचा असेल तर त्याला संधी मिळावी म्हणून धर्मोपदेशकाची भेट देण्याची प्रथा आहे. माणुसकीच्या उपचारातीलच तो एक उपचार आहे. सेवासिंग याला ती संधी मिळाली होती; पण प्रश्न एवढाच होता की त्याच्या मनाला अशी काही गोष्ट खटकत राहिली होती काय की ज्यायोगे त्याच्या मनावर भार असावा !

ज्ञानीची भेट झाली आणि त्यांना असे दिसले की सेवासिंग अतिशय उल्हसित आहे. कोणते तरी नवे अस्तित्व आपणास मिळणार आहे, ते अस्तित्व आकर्षक आहे आणि तेथे पोहोचण्याचा प्रवास अगदी थोडा आहे. याच पुढच्या जीवनाच्या आनंदात तो बावरत होता. ज्ञात आणि अज्ञात जगाला सांधणारा तो फळ्यांचा सेतू त्या झुलत्या दोराला धरून काय तो ओलांडायचा आहे आणि तो अज्ञात जीवनप्रवाह हाताला येणार आहे, या उद्याच्या उल्हासात तो मग्न होता. त्याची जणू समाधी लागली होती. 'सोऽहं' चा प्रत्यय त्याला येत असल्याचेच जणू दिसत होते.

तो ज्ञानींना म्हणाला "गुरुवर ! माझे कोणाशीही वैर नाही ! मी कोणाशी द्वेषबुद्धी धरलेली नाही. कारण अशी द्वेषबुद्धी मनात बाळगणे हे माझ्या धर्माच्या विरुद्ध आहे. तसेच एखाद्याला या जीवनातून नाहीसे करणे, एखाद्याला ठार मारणे, हे माझ्या प्रकृतीच्या विरुद्ध आहे. हां ! हॉप्किन्सनच्या संबंधात मात्र मला अपवाद करावा लागला तो केवळ आपद्धर्म म्हणून ! आणि काही प्रसंगी आपद्धर्म अवलंबिणे हेच धर्माचरण असते. माझ्या दीनदुबळ्या देशबांधवांना हॉप्किन्सन छळू लागला

होता. पण मी या ऐकीव माहितीवर विसंबलो नाही. समक्ष हे प्रकार पाहिले. त्यानंतर मी त्याच्यावर झेप घेतली. हॉप्किन्सनच्या कृत्याला आळा घालण्याचा माझ्याजवळ दुसरा काही उपाय नव्हता. त्याचे ते दुर्वर्तन चालूच राहणार होते. त्याला पायबंद बसावा यासाठी मला एकच शक्य होते, त्याला या जगातून नाहीसा करणे. ते मी केले.

त्याच्या फाशीचे कार्यवहन झाले. दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ जानेवारी १९१५ या दिवशी सानफ्रान्सिस्को क्रॉनिकलने सेवासिंगच्या भाषेतच लिहिले आहे...

"एखाद्या भुकेल्या अर्भकाने आपल्या मातेकडे स्तनपानासाठी धाव घ्यावी त्याच उत्कंठेने, त्याच आतुरतेने, त्याच भुकेने, त्याच आनंदाने मी तो स्वर्गाचा सेतू चढणार आहे. मी शीख आहे; प्रामाणिक शीख आहे. एक ॐ काराचे नाव माझ्या ओठावर रुळणार आहे. एखादी पुष्पमाला गळ्यात घेताना आंनद वाटतो, नाही ? तो दोर मी त्याच सहजतेने, त्याच संतोषाने गळ्याभोवती घेणार आहे. कारण मला त्यात प्रत्यक्ष परमेश्वराच्या नावाचीच पुष्पमाला मिळणार आहे. तो सर्वशक्तिमान परमेश्वर मला आपल्या कुशीत घेईल; कारण मी जे केले आहे ते परमार्थाने प्रेरित होऊन केले आहे. स्वार्थाने लिप्त होऊन नव्हे. माझ्या या कृतीने माझ्या बांधवांचे हित व्हावे, इतकेच नव्हे, तर या कॅनडाच्या शासनाचे हित व्हावे हीच माझी अंतरीची इच्छा होती !"

खरोखर ! देशप्रेम आणि ईश्वरप्रेम किती एकरूप आहे ! मोक्षयोग आणि क्रांतियोग किती अभिन्न आहेत ! देव आणि भक्त यांचे अद्वैत आपल्याला अशा क्रांतियोग्यांच्या आत्माहुतीच्या ज्योतीत दिसते. समर्थांच्या वचनाचा बोध होतो.

देव भक्त दोन्ही एक ।
ऐसे ज्ञान जया निश्चयात्मक ।
साधुजनी मोक्षदायक ।
तोचि जाणावा ॥
सोऽहं आत्मा स्वानंदधन ।
अजन्मा तो तूचि जाण ।
हेंचि साधूचे वचन ।
सदृढ धरावे ॥

❋❋❋

॥ ५ ॥

वीरेंद्र कुमार दत्तगुप्त

काहीतरी भीषण प्रकार झाला आहे अशा वावटळीत लोकांची धावपळ चालू होती. कुजबुजीचा गलबला लोकांच्या थव्याथव्यातून उठत होता, पण तो प्रत्यक्ष घटनेच्या कितीतरी नंतर...

काही लोक घटनास्थळापासून दूर दूर जात होते, तर काहीजण कुतूहलाने पण तितकेच दबकत दबकत घटनास्थळाकडे जात होते. मध्येच दिसणाऱ्या एखाद्या थव्यातून काही शब्द कानावर येताच, काय झाले हे कळण्यासाठी ते थबकत होते, काहीतरी शब्द कानात साठवीत होते, पण तेवढ्याने समाधान न झाल्याने आणखी माहिती कळावी म्हणून ते आगेकूच करीत होते.

घटनास्थळावर आरक्षींचा-पोलिसांचा-गराडा पडला होता. सेनेच्या घोडदळी तुकड्या थोड्याच वेळात रस्त्यारस्त्यातून फिरू लागल्या होत्या. प्रकाश विरघळू लागला होता. थवे विरू लागले होते.

सर्व काही सुन्न झाले होते. सकाळच्या

वर्तमानपत्रापर्यंत आता कुतूहल थोपवून धरणे भाग होते.

त्या भयानक घटनेच्या पृष्ठभूमीवरील त्या अंधारात आणखी भीषणता ओतली जात होती. बेचू चटर्जी मार्गावरील एका खाणावळीवर धाड पडली होती. धराची उलथापालथ झाली. दहा-बारा तरुणांना आरक्षींनी पकडून नेले होते.

हजारा भागात एक खोलीत एक दिवा मिणमिणत होता. जतीन मुखर्जी हा तरुण कोणाची तरी वाट बघत होता. वेळ पडली तर निसटता यावे असा दुसरा मार्ग त्याने योजून ठेवला होता. त्याचे लक्ष दूरवर भिरभिरत होते.

दुसऱ्या मार्गाच्या उपयोगाची वेळ आली नाही. तो अपेक्षित होता तो तरुण-अक्षय्य प्रसाद-त्याला येऊन मिळाला होता.

अक्षय्यजवळ काहीतरी विलक्षण वृत्त होते. पण त्याच्या मनातील खळबळ त्याने तोंडावर दिसू दिली नाही. आपल्या हालचालीवर त्याने परिणाम होऊ दिला नाही.

'काम झाले ! या शब्दांनी त्या नवागताने आपल्या मनावरील भार हलका केला.

अंधारातील भीषणता येथे उजळून निघाली होती. येथेच तर त्या भीषणतेचा उगम होता !

'बहोत अच्छे !' अक्षय्यला प्रतिसाद मिळाला. 'आणि बीरेन ?'

'बीरेन पकडला गेला !' अक्षय्यने सुस्कारा सोडला. 'मी तेथेच होतो.'

'चालेल चालेल ! आपण सगळेच जण पकडले जाणार आहोत ! कोणी आधी, कोणी मग ! हा पृथ्वीचा नाही तरी सापळाच नाही का ? यदृच्छेने आपण यात पडतो आणि यदृच्छेने कोठे तरी पकडले जाऊन मृत्यूचा घास बनतो - पुन्हा नव्या रूपाने सापळ्यात अडकण्यासाठी.' जतींद्राने त्या सुस्काऱ्याचे सांत्वन तत्त्वज्ञानाने केले. 'बरे, सांग आता पुढे काय काय झाले ते !'

'तुला आम्ही सोडले आणि संध्याकाळी चार वाजता पोहोचलो. न्यायालयाचे काम चालू होते. आम्ही आत जाऊन आलो. एकूण परिसराचे निरीक्षण केले. दबा धरून बसण्याची जागा मनात योजून ठेवली.

'आमच्या हालचाली सावधपणे होत होत्या. त्यातला मुख्य भाग म्हणजे आमचा सावधपणाही कोणाच्या लक्षात येऊ नये इतक्या सहजतेने आम्ही वावरत होतो.' अक्षय्य आपले कौतुक सांगत होता.

'काम झाले हे तू सांगितलेस; तेव्हा तुम्ही सावध होतात हे स्पष्टच आहे. दुसरे, तू येथवर पोहोचला आहेस यावरूनही तुम्ही सावध होतात याची कल्पना येते, पण आतासाठी नाही तरी पुढच्या कृतीसाठी एक सूत्र ध्यानात ठेव.'

'कोणते ?'

'कधी कधी नियोजित कार्य होण्याच्या आधीच पकडले जाण्याचा प्रसंग येतो.

त्यावेळी सावधपणा नसणे हेच काही कारण नसते. किंवा प्रतिपक्ष अधिक जागरूक असतो म्हणून अपयश येते अशीही स्थिती नसते. म्हणून कधी अपयश आले तर कार्याच्या दृष्टीने त्याचे मूल्यमापन 'प्रयत्न हेच यश' असे करायचे असते. बरे, पुढचे सांग.'

'पाच वाजून गेले. आवराआवर करून एकेकजण बाहेर येत होता. आलमची आवराआवर होत होती हे आम्ही पाहिले. त्याने कागद लावून गुंडाळून चपराशाजवळ दिले. मुख्य अधिवक्ता-ॲडव्होकेट जनरल-बॅरिस्टर कार्डली नॉर्टन तेथेच होता. आता आलम दहापंधरा मिनिटात बाहेर पडेल हे दिसत होते. आम्ही आपापल्या ठिकाणी जाऊन सिद्ध स्थितीत राहिलो. वीरेन जिन्याच्या तोंडाशी राहिला. मी दुसरीकडे शंभर फुटांवर राहिलो.

'साडेपाचला आलम बाहेर पडला. त्याची काठी त्याच्याजवळ होतीच. नॉर्टन त्याच्यापुढे होता.'

पूर्वेकडच्या जिन्याच्या तोंडाशी ते पोहोचले.

'वीरेन पुढे सरसावला. शिपायाचे आणि आलमचे लक्ष आधी त्याच्याकडे गेले. पण आधी म्हणजे तसे उशिराच ! कारण वीरेनने छरिका रोखून गोळी सोडलीही होती.

'गोळी वर्मी लागली होती. दुसऱ्या गोळीचे कारण नव्हते हे वीरेनने पाहिले. शमस-उल-आलम एखादे पाऊल पुढे टाकण्याच्या आतच भुईवर पडला. तो लगेच मेला !'

'वीरेन ?' जतींद्रने उत्सुकतेला वाट दिली.

तो सरळ जिना उतरून आला. त्याला कोणी अडवले नाही. पत्रालयासमोरील पूर्वेकडे निघणाऱ्या फाटकाकडे तो धावला. फाटक बंद होते. लोकही एकत्र झाले होते. त्याला सुरक्षितता वाटली नाही म्हणून त्या गर्दीतच त्याने आकाशात गोळी सोडली.

'गर्दी पांगली. वीरेनला वाट मिळाली. तो उत्तरेकडे निघणाऱ्या फाटकाकडे गेला. तेथून बाहेर पडला.'

'आता तो रस्त्यावर आला होता. एका सशस्त्र रक्षकाने त्याचा पाठलाग चालविला होता. पण लोकांचा अडथळा वीरेनला त्रासदायक होत होता. त्याचा वेग मंदावला. तो हेस्टिंग्ज स्ट्रीटवर आला आणि त्या रक्षकाने त्याला गाठले. तेवढ्यात एक गोळी वीरेंद्रने सोडली, पण रक्षकाला ती लागली नाही. वीरेन पकडला गेला.'

आता सहजच जतीन्द्रने सुस्कारा सोडला. आठ दिवसांपूर्वी हाच प्रसंग त्याच्यावर आला असता. आपण मागे राहिलो, वीरेन्द्र पुढे गेला अशी एक अस्पष्ट खंत त्याच्या

मनांत डोकावून गेली.

पण पुन्हा त्याचा विवेक जागा झाला, आज नाही तर उद्या आपलीही पाळी आहेच !

जवळपास आरक्षींची हालचाल होत असावी असा जणू दोघांना वास आला. त्यांनी एकमेकात कुजबूज केली. मागोवा घेतला. ते अद्यापही सुरक्षित अंतरांवर होते. म्हणजेच आरक्षीदल तेथवर पोहोचण्यास अद्याप अवसर होता.

खोली अगदी मोकळी होती. दारावर आणि कड्यांवर ओलसर रुमाल फिरवून ते सुरक्षित मार्गाने बाहेर पडले.

वर्ष १९०५-१९०६ पासून बंगाल प्रांत क्रांतीच्या वणव्याने पेटू लागला होता. ब्रिटिश शासनाने बलप्रयोगावर विलक्षण भर दिला होता. त्यामुळे त्या त्या स्थानांवर असलेल्या व्यक्ती टिपून मारण्याचे कार्य क्रांतिकारकांनी हाती घेतले होते. चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड याने अनेक तरुणांना शिक्षा ठोठावल्या होत्या. त्याची बदली कलकत्त्याहून मुझफ्फरपूर येथे झाली होती. त्याला ठार मारण्यासाठी प्रफुल्लचंद्र चाकी आणि खुदीराम बोस यांनी मुजफ्फरपूर येथे जाऊन ३० एप्रिल १९०८ या दिवशी त्याच्या बग्गीवर स्फोटगोल (बॉंब) टाकला.

दोन केनेडी स्त्रिया त्या बग्गीत होत्या. स्फोटामुळे त्या मरण पावल्या. किंग्जफोर्डची बग्गी दुसरी होती. तो बाचला.

तरुणांनी पळ काढला. दुसऱ्या दिवशी १-५-१९०८ ला प्रफुल्लचंद्र चाकी यास मोखामेघाट स्थानकावर पकडले. त्याने स्वत:वर गोळी झाडून घेतली. खुदीराम बोस त्याच दिवशी पकडला गेला. त्याच्यावर खटला चालला. त्याला ११-८-१०९०८ ला मुजफ्फरपूर येथे फाशी दिले.

पण या बॉंबच्या धडक्याच्या लाटा सर्व बंगालभर पसरल्या. अनेक तरुणांना अटक झाली. त्यांच्यावर अलीपूर सत्र न्यायालयात राज्यक्रांतीचा अभियोग भरला. या अलीपूर स्फोटगोल कटात एकेचाळीस तरुण होते.

पण या सरसकट धरपकडीने बणवा थांबणार नव्हता !

या कटाच्या अभियोगात नरेन्द्र गोस्वामी क्षमेचा साक्षीदार होता. क्रांतिकारकांनी त्याला ३१-८-१९०८ या दिवशी बंदिगृहातच गोळ्या घालून ठार मारले. कन्हैयालाल दत्त आणि सत्येन्द्रनाथ यांना अनुक्रमे १०-११-१९०८ आणि २१-११-१९०८ या दिवशी अलीपूर तुरुंगात फाशी दिले.

तीनचार महिन्यातच क्रांतिकारकांनी पुन्हा एकदा बंगाल हादरवला. प्रफुल्लचंद्र चाकी याला नंदलाल बॅनर्जी या आरक्षी अधिकाऱ्याने पकडले होते. त्याच्या कौशल्यासाठी

त्याला एक सहस्र रुपये पारितोषिक दि. ११-५-१९०८ ला मोठ्या समारंभाने देण्यात आले होते. ऑक्टोबर १९०८ पासून नंदलाल बॅनर्जी कलकत्त्यास आला होता. दि. ९-११-१९०८ ला क्रांतिकारकांनी नंदलालला देहान्त पारितोषिक दिले !

अलीपूर स्फोटगोल प्रकरणात आशुतोष विश्वास आरक्षी अभियोजक - पोलीस-प्रॉसिक्युटर-होता. आपली स्वामिनिष्ठा दाखविण्यासाठी त्याने कित्येक वाकडे मार्ग अवलंबले होते. दि. १०-२-१९०९ ला चारुचंद्र बसूने आशुतोषला भर न्यायालयातच गारद केले. अगदी एका हाताने ! कारण चारुचंद्रला उजव्या हाताची बोटे आणि पंजा नव्हता ! उजव्या खुंटाला त्याने छरिका (पिस्तूल) बांधली होती, आणि नेम साधून डाव्या हाताने त्याने घोडा ओढला होता ! चारुचंद्रला अलीपूर बंदिगृहात १९-३-१९०९ ला फाशी दिले.

आणि आज पाळी होती समस-उल-आलमची ! एक आगाबू आरक्षी अधिकारी होता तो. डेप्युटी सुपरिंटेंडेंट ! अलीपूर स्फोटगोल प्रकरणात त्याने वाटेवेगळे साहाय्य केले होते. म्हणून अशा क्रांतिकारकांच्या प्रकरणांत बॅरिस्टर नॉर्टनने त्याला आपला उजवा हात म्हणून पाळले होते.

क्रांतिकारकांना चीड होती ती त्यामुळेच. वीरेंद्रकुमार दत्तगुप्त या तरुणाने आपले शिर जणू आधीच धडावेगळे करून ठेवले होते. तो आज आलमबर टपून बसला होता.

तसे आपला जीव धोक्यात असल्याची कल्पना आलमला आली होती. इतकेच नव्हे, तर नॉर्टनलाही तशी जाणीव क्रांतिकारकांनी दिली होती.

दिनांक २४-१-१९१० हा आलमसाठी 'कयामतका दिन' नियतीने योजला होता. त्यापूर्वी आठ दिवस मृत्यूची सावली आलममागून धावली होती. आलमला कल्पना आली, पण ती सावली अदृश्य झाली होती !

आशु विश्वासला मारले त्यानंतर काही दिवसातच आलमचाही पाठलाग झाला होता. पाठलाग करणाऱ्या त्या तरुणास पकडले होते. पण किरकोळ, बावळट, अगदीच पोरसवदा तरुण, त्यात पुन्हा नि:शस्त्र, आलमसारख्या उंच अधिकाऱ्यापर्यंत आपले हात पोहचवू शकेल हे संभवनीय वाटण्याजोगे नव्हते म्हणून तो तरुण सुटला होता.

पण होता होता त्या अयशस्वी तरुणांचा संचार आज वीरेंद्रनाथ दत्तगुप्ता यांच्यात झाला होता.

स्वत:च्या जीविताविषयी जागरूक असल्याने आलमला जगण्यातील प्रत्येक क्षणी शत्रू दिसत होता. जगण्यातील प्रत्येक क्षण हा मृत्यूवरील विजयाचा असल्याचा त्याला आनंद होता.

त्याला गोळी लागताच त्याच्या ध्यानात आले की शत्रूने आपल्याला गाठले.

शेवटची धडपड म्हणून तो 'पकडा पकडा' असे ओरडला. पण मृत्युनेच आलमला त्यावेळी पकडलेले होते. इतके घट्ट की आपला कालपुरुषही त्यास बघता आला नाही.

वीरेंद्रजवळ ३८ ची छरिका होती. एक सुराही त्याने जवळ ठेवला होता.

दि. २७-१-१९१० ला वीरेंद्रवरील अभियोगास प्रारंभ झाला. दि. ३१-१-१९१० ला त्याचा अभियोग सत्र न्यायालयात संपला.

वीरेंद्रला काही बोलायचे नव्हते. त्याने विधिज्ञ मागितला नाही. दिलाही नाही; जे बोलायचे होते ते त्याने छरिकेतून बोलून घेतले होते.

हो ! तरीही त्याच्या जिभेचा स्वाद मेला नव्हता, कारण मन मरगळले नव्हते. 'मला कचोरी, रसगुल्ला आणि संदेश खायचा आहे आज !' त्याने न्यायालयातच एक दिवस इच्छा व्यक्त केली. त्याला ते पदार्थ दिले गेले.

वीरेंद्र ढाक्का जिल्ह्यातील विक्रमपूरचा राहणारा. जलपायगुडीला त्याचे शिक्षण झाले. तेही त्याच्या बहिणीकडे.

वयाच्या बाराव्या वर्षी त्याने बहिणीचे घर सोडले, आणि तो कलकत्त्याला आला. तेथे त्याच्या भावाने त्याला हात दिला. पण पूर्वदक्षता म्हणून या घटनेपूर्वी दोन महिने त्याने भावाचे घर सोडले आणि बेचू चटर्जी गल्लीतील खाणावळीत तो राहण्यास आला. अठरा-एकोणीस वर्षाच्या या पूर्व बंगाली युवकाने अपूर्व दिव्य केले.

त्याच्या तोंडून जतीन मुखर्जीचे नांव गेले ते आरक्षींनी एक सापळा टाकला त्यामुळे !

२१ फेब्रुवारी १९१० या दिवशी वीरेंद्रला फाशी देण्यात आले. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य रक्ताच्या थेंबा थेंबागणिक तितकेच जवळ येत होते.

वीरेन्द्र ! 'रक्ताबाचून स्वराज्य मिळविले' असा कंठशोष करण्याचा दांभिक राज्यकर्त्यांचा उन्माद पराकोटीला पोहोचला होता ! ते तुझ्या सारख्यांचे रक्त विसरले. पण त्याही पलीकडे, तुझी जन्मभूमि विक्रमपूर त्यांनी इस्लामला दान दिली, तुझे भावी पिढीतील नातेवाईक मारले गेले आणि काही निर्वासित म्हणून शेष हिंदुस्थानात आले ! कृतघ्नता आणि इस्लाम दासता हा राज्यकर्त्यांचा स्थायीभाव झाला ! शेष हिंदुस्थानचे शीघ्रतिशीघ्र इस्लामीकर करण्याचे त्यांचे ध्येय झाले आहे.

वीरेन्द ! ते साध्य होणार नाही ! वीरेन्द्र या पिढीतही आहेत.

❀❀❀

॥ ६ ॥ कुकरीने वचन दे !

अलंकारिक भाषेने नव्हे तर प्रत्यक्ष कृतीने ज्याने आपले शिरकमल स्वतंत्रतेच्या कार्यात मातृभूमीच्या चरणी उतरवून ठेवले त्या वीर सुशील-कुमार सेनची ही कथा आहे.



सुशीलकुमार सेन

सुशीलकुमार सेनचे भवितव्य उच्च न्यायालयाच्या एका न्यायाधीशावर अवलंबून होते. त्याने निर्णय प्रतिकूल दिला तर दुसऱ्या न्यायाधीशाने दिलेली

सात वर्षांची शिक्षा भोगणे प्राप्तच होते.

वास्तविक अलीपूर कटाच्या खटल्यात सुशीलला गोवणे ब्रिटिश राजवटीच्या दहशत प्रणालीतील एक प्रकार होता. न्याय, प्रामाणिकपणा याचा लवलेशही त्या प्रणालीत नव्हता.

सिल्हट जिल्ह्यातील बालियाचोंग गावी सुशील आपल्या घरी विद्याभ्यास करीत होता. त्याचे वय साधारणत: पंधरा वर्षांचे होते. त्याचे महाविद्यालयीन शिक्षण कलकत्त्याला चालू होते. अत्मा मातेर नॅशनल कॉलेज ही त्याची महाशाळा होती.

दिनांक ३० एप्रिल १९०८ या दिवशी मुजफ्फरपूर येथे किंग्जफोर्ड या दुष्ट आणि क्रूर न्यायाधीशाला मारण्याचा प्रयत्न दीनेशचंद्र रे आणि खुदीराम बोस यांनी केला होता. त्यापाठोपाठ आरक्षी दलाने जी सर्वत्र झडती घेतली त्यांत माणिकताला, नाभाकिरसन मार्ग, गोपी मोहनदत्त मार्ग, हॅरिसन रोड, शीलचे निवासालय, देवघर हे भाग होते. आरक्षींना आक्षेपार्ह साहित्य मिळाले होते. एकेचाळीस तरुणांना त्यांनी पकडले होते. ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्याचे कारस्थान असा आरोप ठेवून आरक्षी दलाने तरुणांवर खटला भरला होता. तोच अलीपूरचा अभियोग.

एकेक तरुण गोळा करून आरोपींच्या मालिकेत भर घातली जात होती. संबंध दाखविता न येण्याजोगा एक तरुण होता सुशील कुमार सेन.

पण नाही म्हटले तरी सुशील कुमार आरक्षींच्या कृष्णसूचीवर येऊन गेला होता. त्याला आज आठएक महिने होऊन गेले होते.

'युगांतर'चे संपादक भूपेंद्रनाथ दत्त यांना राजद्रोही लेखांसाठी शिक्षा करावी म्हणून न्यायालयात अभियोग चालू होता. वंगकेसरी बिपिनचंद्र पाल यांना साक्षीला बोलावले गेले.

एका देशभक्ताला दुसऱ्या देशभक्ताविरुद्ध उभे करण्याची ती आवळ्या भोपळ्यांची मोट होती. लोकांचे कुतूहल वाढले होते. सर्वसामान्यांच्या दृष्टीने प्रश्न मोठा बिकट होता. त्यातून सुटका कोण कशी करून घेतो हे बघण्यात रुची होती. औत्सुक्य होते.

दि. २६ ऑगस्ट १९०७ या दिवशी न्यायालय भरून गेले होते. न्यायालयाच्या बाहेरही जनसमुदाय जमला होता. आणि कर्मचाऱ्याने हाक दिली. " बिपिनचंद्र पाल "

न्यायाधीशांच्या डाव्या कडेला असलेल्या साक्षीदारांच्या पिंजऱ्यात बिपिनचंद्र जाऊन उभे राहिले.

" म्हणा, देवाशपथ खरे सांगेन ' मुख्य कर्मचाऱ्याने न्यायाधीशांच्या वतीने पाल यांना सांगितले.

" शपथ घेणे माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध आहे. इतकेच नव्हे, तर या अभियोगात

दिनांक १५ मे १९०८ या दिवशी सुशीलला पकडून आणून त्याला अरविंद, बारीन्द्र, शशिभूषण यांच्या ओळीत बसविले होते.

न्यायालयाला घटनांविषयी साहाय्य व्हावे म्हणून एका न्यायसहाय्य मंडळाची - ॲसेसर्सची नियुक्ती केली होती. त्यात कलकत्त्यातील प्रतिष्ठित विचारवंत लोक होते.

शासनाच्या कलाने जाण्याचे धोरण अशा तथाकथित विचारवंतांचे असते. पण इतके असूनही सुशीलविरुद्ध असलेल्या तुटपुंज्या आणि खोट्या साक्षींच्या आधाराने त्यास 'दोषी' या वर्गात टाकावे असे त्यांचेही धाडस झाले नाही.

वर्षभराने ६ मे १९०९ या दिवशी सत्र (सेशन्स) न्यायाधीशाने निर्णय दिला. मंडळाने सुशील यास निर्दोषी म्हणून ठरविले असताही न्यायाधीशाने त्याला दोषी मानले आणि त्याला सात वर्षांचा कारावास दिला.

उच्च न्यायालयात पुनर्न्याय मागितला गेला. न्यायमूर्ती दोन होते. एका न्यायाधीशाने दोषी मानले, तर दुसऱ्याने निर्दोषी. म्हणून तिसऱ्या न्यायाधीशाकडे पुनर्न्याय तपासण्याचे काम दिले गेले. त्याच्याच मतावर आता सुशीलचे भवितव्य अवलंबून होते.

आज निर्णय लागणार ! दण्डित खरे, पण त्यांनाही सुप्त आशेने आनंद वाटत होता. मनाची सिद्धता म्हणावी तर ती या अभियोगात मुळीच संबंध नसलेल्या सुशीलनेही पूर्णपणे ठेवली होती. ब्रिटिशांच्या क्रूर नीतीला तो अनभिज्ञ नव्हता. इंग्रजांचे राज्य नाहीसे करणे म्हणजे काय, या व्यापक व्यूहाचे आकलन होण्याइतकी त्याची बुद्धी समर्थ होती. नुसते आपण फटके खाल्ले म्हणजे झाले, एवढ्या मर्यादित त्याने आपली देशभक्ती ठेवली नव्हती.

बिपिनचंद्र पाल यांना सहा महिन्यांची शिक्षा 'न्यायालयाचा अवमान' या अभियोगात दि. १९-९-१९०७ ला झाली होती.

सर्व बंगाली युवक चिडून उठला होता. लक्ष्य कोणाला करावे ? त्यातील उत्साही क्रांतिकारी गटात खल चालू झाला. किंग्जफोर्ड कलकत्त्याचा चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट होता. त्याचे निर्णय गेली तीनचार वर्षे अत्यंत क्रूर होते. त्यालाच उडविला पाहिजे या उद्देशाने त्यांनी योजना चालू केल्या.

एका पुस्तकाचाच ध्वम् केला तर ? एक योजना निघाली. पुस्तकाला फीत बांधून ठेवायची. ते पुस्तक किंग्जफोर्डच्या पुढ्यात जाईल अशी व्यवस्था करायची.

उत्साहात सर्वच जण आनंदून गेले. समोर चित्र उभे राहिले. उन्मत्त किंग्जफोर्ड आपल्या चपराशाला दम देत आहे. हे पुस्तक आत्ता कशाला म्हणून त्याची फीत उघडत आहे, तेवढ्यात ... !

भाग घेणे हेही माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीला न पटणारे आहे." पाल यांनी न्यायाधीशांना स्पष्ट शब्दात सांगितले.

क्रुद्ध झालेला न्यायाधीश आडवळणाने साक्षीदाराला त्याच्या दाव्याला बांधण्याचा प्रयत्न करू लागला.

"शपथ घेण्याला तुझा विवेकबुद्धीने आक्षेप आहे का ?"

"मी या अभियोगांत भाग घेण्यास नकार देतो. कारण..."

"मला त्याशी काही कर्तव्य नाही. कोणत्याही अभियोगात शपथ घेणे तुला आक्षेपार्ह वाटते काय ?"

"नाही. पण या अभियोगात भाग घेण्याला माझा आक्षेप आहे."

"मग तुला या अभियोगांत भाग घेतलाच पाहिजे."

"माझा नकार आहे."

"तुला प्रश्न विचारले जातील आणि जर उत्तर देण्यास तू नकार दिलास तर परिणाम भोगावे लागतील."

"माझ्या सदसद्‌विवेकबुद्धीला स्मरून नकार देणेच माझे कर्तव्य आहे."

झाले ! साक्षीदाराची साक्ष संपली ! न्यायाधीशाने बिपिनचंद्र पाल यांच्यावर न्यायालयाचा अवमान केल्याचा अभियोग भरल्याचे घोषित केले.

बाहेर हे वृत्त समजताच वंदे मातरम्‌च्या घोषणा झाल्या.

न्यायालय सर्वांना मोकळे असते, न्यायालय जनतेच्या इच्छेचे प्रतीक असते, इत्यादी बडबड करणारे इंग्रजी राज्य किती दांभिक आहे त्याचे प्रत्यंतर त्या राज्याचा दंड हाती घेतलेल्या कर्मचाऱ्यांनी, आरक्षी दलाने, सोजिरांनी आणून दिले. त्यांनी न्यायालयाच्या आवारात आणि बाहेर जमलेल्या लोकांवर लाठीमार चालू केला.

सियालडाकडून आलेल्या एका मुलाला त्या लाल बाजारातील जमावाचे कुतूहल वाटले म्हणून तो तिकडे गेला, तो एक गोरा सार्जंट लाठीमार करीत असलेला त्याने पाहिले.

त्या मुलाने त्या सार्जंटवरच चाल केली. चार थपडा त्याला मारल्या आणि हिंदुस्थानच्या अस्मितेची चुणूक त्याला दाखवली.

तो मुलगा होता सुशीलकुमार सेन.

त्याला पंधरा फटक्यांची शिक्षा झाली. ती त्याने सहन केली. लोकांनी त्याच्या धैर्यासाठी, प्रतिकार करण्याच्या बुद्धीसाठी त्याचा प्रकट सत्कार केला. त्याची महाशाला शासनाच्या क्रूर वर्तनाच्या निषेधार्थ एक दिवस बंद होती. तेव्हापासून सुशीलकुमार आरक्षींच्या कृष्णसूचीवर होता. त्याला अलिपूर कटाच्या अभियोगात गोवण्याचे कारण ते होते.

तेवढ्यात पुस्तक आतील स्प्रिंगमुळे उघडले गेले आहे आणि डिटोनेटरचा स्फोटक पदार्थाशी संयोग होऊन स्फोट झाला आहे. किंग्जफोर्ड गतप्राण होऊन पडला आहे !

गतप्राण होवो न होवो, एक धडक तर बसेल ! तरुणांना वाटले.

प्रश्न होता ध्वम् बनविण्याचा. हेमचंद्र दास यांनी इंग्लंडमधून पुण्याला आणलेली बिस्फोटक संहिता-बॉम्ब मॅन्युअल - बंगालपर्यंत पोहोचली होती. प्रयोग चालू होते. उल्हासकर दत्त याने एक ध्वम् सिद्ध केला होता.

हा ध्वम् उडवायचा कुठे ? त्यांनी पाहिले कलकत्त्यापासून फार दूर नसलेल्या देवदारच्या अरण्यातील टेकाडावर याचा प्रयोग करावा. फेब्रुवारीचा महिना होता.

स्फोट गोलातील द्रव्ये ज्योत लागते केव्हा आणि आपण भडका उडवितो केव्हा या प्रतीक्षेने उतावीळ असतील तसे आपण हा प्रयोग करतो केव्हा असे या तरुणांना होऊन गेले. पाचजण देवघरच्या दिघिरिया टेकडचात गेले. एक ठिकाण प्रयोगासाठी निवडले.

उत्साहाने फुरफुरणारा प्रफुल्लचंद चक्रवर्ती स्वत: स्फोटगोल फेकण्यासाठी सिद्ध होता.

प्रत्येकाने पन्नास फुटांवर आडोसे घेतले. ध्वम् फेकताच भुईसपाट पडून राहायचे, अशी सूचना प्रफुल्लला दिली गेली. त्यानेही ती पाठ केली होती.

प्रफुल्ल आपल्या नियतस्थळी जात होता.

मोठा स्फोट झाला. टेकड्या टेकड्यातून प्रतिध्वनी घुमू लागले. आडोसे घेतलेल्या तरुणांच्या कानठळ्या बसल्या ! सर्वच जण ओरडले, 'जमले ! जमले !'

स्फोटाचे प्रतिध्वनीही फिरू लागले. घटनास्थळाकडे सर्वजण निघाले.

हे काय ? प्रफुल्ल ?

होय ! प्रफुल्ल निपचित पडला होता ! त्याचे कपाळ दुभंगले होते. कवचा उडाला होता. एक डोळा नि त्याभोवतालचा भाग !

मेंदू बाहेर आला होता. प्रफुल्लचा प्राण गेला होता.

प्रफुल्लने ध्वम् फेकण्याआधीच वातीचा ज्योतीशी संबंध आला होता आणि स्फोटकांनी पेट घेतला होता. स्फोटगोल उडाला होता.

पहिल्या प्रयोगात एक बळी बाबा लागला होता तर ! देवापुढे ठेवलेला नैवेद्य देवाने खाऊन टाकावा तसे ! चिंता नाही ! अशीच सर्व फुले खुडावी ! श्रीराम चरणी अर्पण व्हावी !

प्रफुल्लच्या प्रेताचे काय करायचे ? ते पुरावे म्हटले तर साधने नाहीत आणि भुई खडकाळ. जाळावे म्हटले तर वाळलेली लाकडे कुठून आणायची ?

प्रेत हलविणे आपल्याला शक्य नाही. वन्यपशूच त्याची विल्हेवाट लावतील,

असे ठरवून तरुण तेथून कलकत्त्याकडे निघाले. त्यांचे यश फार मोठ्या संकटाने झाकळले होते. उत्साह राहिलाच नव्हता.

आणखी मित्रांसमवेत ते तरुण दुसऱ्या दिवशी देवघरच्या त्या अरण्यातील टेकडीवर गेले तो त्यांना प्रेत जसेच्या तसे दिसले ! गिधाडे किंवा पशूंनी फाडले तोडले नव्हते की सडलेही नव्हते.

प्रेत आपण उद्या पुरून टाकू, असे ठरवून ते परत निघाले. तिसऱ्या दिवशी बघतात तो काय ? तेथे प्रेताचा, कपड्यांचा मागमूसही नाही ! कोणा वाटसरूने ते कोठे तरी नेऊन पुरून टाकले, की कोणा वाघाने आपल्या गुहेत नेले, की यांपैकीच कोणा वरिष्ठ क्रांतिकारकाने दोघातिघांना विश्वासात घेऊन त्या अरण्यात वेगळ्या ठिकाणी ते प्रेत नेऊन पुरून टाकले ते कळण्यास आजही काही मार्ग नाही. इतिहासाचे ते पान निखळून जळून गेले आहे !

उल्हासकर दत्त सबंगड्यांना समजावीत होता. "आपले काय चुकले ते लक्षात आले आहे. एक प्राण, फार मोलाचा प्राण गेला खरा. पण तो जाताना एक सुधारणा सांगून गेला ! कोणत्या द्रव्याचा संयोग कोणत्या द्रव्याशी होऊ देता कामा नये ते लक्षात आले आहे. ही नवीन कृती बघा.

त्याने एक गोळा मित्रासमोर धरला. आता हा अगदी सुरक्षित आहे. हा वापरायचा आहे योग्य वेळी.

आता पुस्तकात लपविण्याच्या बॉम्बला बाह्यरचना वेगळी लागेल. त्याची आकृती मी काढली आहे. काही साहित्य गोळा झाले आहे. उद्या या वेळेपर्यंत तो सिद्ध होईल.

मरण्याचे म्हणाल तर आपणा सर्वांनाच प्रफुल्लच्या मरणाने दुःख झाले आहे. पण म्हणून थांबायचे कारण नाही. आपल्या सर्वांचीच आयुष्ये नियतीने अशाच कोणत्या तरी प्रकाराने नाहीशी करण्याचा लेख आपल्या भाळावर लिहिला आहे. कोणी आज, कोणी उद्या, म्हणून हानीने खचून जाऊ नका. पुढे चला."

दुसऱ्या दिवशी खरोखरीच एक जाडजूड पुस्तक सिद्ध होते. बाराशे पानांच्या पुस्तकाची त्याला जाडी होती. आतली दोन्ही अंगांची तीनशे पाने सोडून मधल्या सहाशे पानांच्या पोकळीत एक डबी बसविली होती. वातीने ज्योतीचा संबंध आणण्याची युक्ती एका स्प्रिंगने साधली होती. फीत उघडताच आतल्या स्प्रिंगने पुस्तक ताडकन् उघडले जावे आणि आतल्या डबीतील स्फोटक द्रव्यांचा स्फोट व्हावा अशी ती कृती होती.

कोवळा तरुण सुशीलकुमार ते पुस्तक किंग्जफोर्डच्या पुढ्यात पोहोचविण्याचे काम करणार होता.

एका संध्याकाळी शाळकरी मुलाच्या कपड्यात सुशीलकुमार किंग्जफोर्ड राहात असलेल्या 'गार्डन रीच' या कलकत्त्यातील बंगल्यात गेला. भट्टाचार्य विधिज्ञांनी हे पुस्तक साहेबांना देण्यास सांगितले आहे, असे म्हणून त्याने ते समोर आलेल्या पट्टेवाल्याच्या स्वाधीन केले. "देतो म्हणून सांगा" असा उलट निरोप पट्टेवाल्याने दिला. आपली मुद्रा नीट न दाखवता सुशील निघूनही गेला.

पट्टेवाल्याने ते पुस्तक साहेबांच्या पटलावर ठेवले. करसे कोणास ठाऊक, आता नको, मग बघू म्हणून ते किंग्जफोर्डने शेजारच्या मांडणीतील पुस्तकात स्वत:च ठेवून दिले. दैव दैव म्हणून जी काही वस्तू मानवी प्रयत्नांच्या बरकडी करून खेळत असते तिचा प्रत्यय असा येतो ! तो पुस्तकध्वम् अलीपूर अभियोग चालू झाल्यावर एका साक्षीदाराच्या तोंडून उघडकीला आला. तोवर किंग्जफोर्ड स्थलांतरित होऊन गेलेला होता.

सुशीलकुमारचा हा जिवावरचा खेळ अंधारात राहिला होता. मात्र त्याचा ज्या अभियोगाशी संबंध जोडला होता त्याशी त्याचा संबंध नव्हता. तू सुटणार ! तुझी शिक्षा सात वर्षांवरून बर्षावर आणली जाईल. तुझ्यासंबंधीचा न्यायाधीशाचा दृष्टिकोण दूषितच दिसला, इत्यादी तर्क वितर्क संपले होते. निर्णय बंदिगृहांत कळविला गेला...

"सुशीलकुमार निर्दोष !"

तो वेळेपर्यंत सुशीलकुमारचा पावणेदोन वर्षे बंदिवास झाला होता. कारण १५ मे १९०८ पासून ६ मे १९०९ पर्यंत तो न्यायाधीन म्हणून बंदिवासात होता आणि तेव्हापासून आज १८-२-१९१० पर्यंत शिक्षा भोगीत होता.

आपल्या सहकाऱ्यांचा निरोप घेऊन सुशील बाहेर पडला. काही दिवस त्याला स्वस्थ बसणेच भाग होते. कारण आरक्षी आता त्याच्यावर सतत लक्ष ठेवणार होते.

नाही म्हणायला तो अशोक नंदीच्या आईवडिलांना भेटून आला. सांत्वन म्हणून ते त्याला आवश्यक वाटले.

अशोक नंदी त्याचा सहाभियुक्त पण वेगळ्या गटात. २ मे १९०८ ला कलकत्त्यात झडत्या झाल्या त्यात त्याला १३४ हॅरिसन मार्गावरील घरात पकडले होते.

"माणिकताल येथे बनविलेले बॉंब तुझ्याजवळ आहेत." असा त्याच्यावर एक अभियोग, तर "अलीपूर कटात तू सहभागी आहेस" हा दुसरा आरोप.

पहिल्या खटल्याचा निर्णय ७-८-१९०८ ला लागला आणि तो सुटला. शासनाने त्याला दुसऱ्या खटल्याच्या निर्णयासाठी बंदिगृहातच अडकवून ठेवले. त्या खटल्यात त्याला ६ मे १९०९ ला ७ वर्षे काळेपाण्याची शिक्षा झाली.

मध्यंतरीच अशोकला क्षय झाला होता. प्रतिभूसाठी वारंवार आवेदने करूनही

ती फेटाळली गेली होती. दीर्घ शिक्षा झालेल्याला प्रतिभूवर सोडण्याची पद्धत नाही, अशा कारणाने ११ मे १९०९ या दिवशी प्रतिभू नाकारला गेला.

शासनाकडून सांगण्यात आले होते की, बंदिगृहात तो जेथे आहे तेथे मोकळे बारे येते. बाहेर तो ज्या घरात ठेवला जाईल त्यापेक्षा हे स्थान निश्चितच चांगले आहे.

डॉक्टरने कळविले, 'अशोक अद्याप मरणाच्या स्थितीत गेलेला नाही.

श्री. चित्तरंजन दास अशोकच्या वतीने भांडत होते. त्यांनी अशोकच्या वडिलांना राज्यपालाला आवेदन करण्यास सांगितले.

२ जुलैला राज्यपालाने अशोकची प्रतिभूवर मुक्तता केली.

१७ ऑगस्ट १९०९ ला चित्तरंजन दास यांनी उच्च न्यायालयात सांगितले की, 'आता प्रतिभू अडविण्याचा त्रास शासनाला पडणार नाही. कारण आदल्याच रात्री अशोक आपल्या सर्वांच्या न्यायपद्धतीपलीकडे जाऊन पोहोचला आहे !'

दि. २६ नोव्हेंबर १९०९ ला जो निर्णय लागला त्यात अशोक नंदी निर्दोष असल्याचे न्यायमूर्तींनी घोषित केले !

अशोकच्या मृत्यूनंतर सहा महिन्यांनी सुशील सुटला होता. म्हणून तो अशोकच्या आईबडिलांना भेटून आला.

हरीश आणि महेशचंद्र एक दिवस सकाळी सुशीलला भेटले. त्यांनी सुशील सुशीलच आहे एवढी निश्चिती करून घेतली आणि एक चिठ्ठी त्याच्यापुढे केली.

'आपली माणसे. आ-बा.'

सुशीलने अक्षर ओळखले. आज अनेक वर्षे सुशील क्रांतिकारी धडपडींच्या बाहेर होता. पण हातचा किंवा राखीव म्हणून आशु बानर्जी यांनी त्याचे नाव स्मरणात ठेवले होते.

पहिल्या महायुद्धाचे वेळी परदेशात असलेल्या तरुणांनी 'गदर' नावाने हिंदुस्थानात उठाव करण्याची योजना क्रांतिकारकांपर्यंत पोहोचली होती. सैनिक आणि जनता यांच्यात प्रचार पोहोचविण्याचे कार्य मोठे बिकट होते. तरुण सिद्ध होते, पण त्यांना घटकोघटकी लागणारे साहित्य कसे उभे करायचे ? सारखा कराबा लागणारा प्रवास, शस्त्रे, पुष्कळदा वेगळ्या प्रकारचे वेष करावे लागत त्याचा पुरवठा, या सर्वांना ते आखूड पडू लागले.

हरीश आणि महेश यांनी एक लूटमारीची योजना आखली होती. सहा तरुण तरी त्यासाठी हवे होते. पंचवीस ते तीस सहस्रांचे द्रव्य मिळण्याजोगे ठिकाण त्यांनी निवडले होते. परस्पर परिचयानंतर महेश म्हणाला,

'नदिया जिल्ह्यात प्रागपूर एक तालुका आहे. तेथून आठ मैलांवरील गावी एक

धनिक आहे. ते आपल्याला सोपे आहे. नुसत्या दहशतीने जमेल.'

आपल्याला ज्याअर्थी चिठ्ठी आली आहे, त्याअर्थी तितकेच आवश्यक काम आहे हे सुशीलने जाणले. अशा कामावर निघण्यापूर्वी कामाची निश्चिती पटवून घेणे आवश्यक होते. त्याने विचारले, 'मी यावे अशी तुमची इच्छा आहे ?'

'होय.'

'एक सहाय्यक म्हणून ?'

'नव्हे. आम्ही पाचजण सहाय्यक. नेतृत्व तू करावेस. आम्ही मानचित्रासहित सर्व कल्पना देतो.'

'ठीक आहे. उद्याचा दिवस जाऊ द्या. एक ठिकाण ठरवू या. परवा मी त्या ठिकाणी असेन. मात्र तुम्ही मला नेतृत्व देणार आहात म्हणून काही गोष्टी विचारल्या पाहिजेत.'

'विचार.'

'त्या व्यक्तीपाशी धन आहे हे कळण्याचा मार्ग ? तसेच, तोच धनिक का निवडला त्याचे कारण मला हवे आहे.'

'जोगेश्वर हा कळण्याचा मार्ग....'

'जोगेश्वर ? तो क्षमेचा साक्षीदार ?'

सुशीलने कपाळावर थोडी आठी घालून हरीशचे बोलणे मध्येच तोडून विचारले.

'होय, तोच. त्याला आज तीन वर्षे राजकुमार भोला या धनिकाने आश्रय दिला आहे.'

'रामकुमार हा एका दिवंगत आरक्षी अधिकाऱ्याचा धनाढ्य भाऊ आहे.' जोगेश्वरने आपल्या वास्तव्यात परोपरीने सांगितले की, तुमची सर्व संपत्ती गुपचूप क्रांतिकार्याला द्या. त्याने राजकुमारला हेही सांगितले, मी क्षमेचा साक्षीदार झालो तो छळ चुकविण्यासाठी. माझ्या पापाचे प्रायश्चित्त म्हणून क्रांतिकारकांनी मला ठार मारले तरी मी त्यांना दोष देणार नाही. पण माझे पाप थोडेसे धुण्याचा मार्ग म्हणजे त्या कार्याला अत्यावश्यक असलेले द्रव्य त्यांना उपलब्ध करून देणे. रामकुमार ते मान्य करीत नाही.

जोगेश्वर आज दोन महिने तेथून दुसरीकडे गेला आहे. सांगून ! पळून नव्हे ! तो मला भेटला. म्हणाला, अमुक ठिकाणचे द्रव्य तुम्ही हस्तगत करा, मी तुमच्यासह येणार नाही. कारण मी फितूर झालो म्हणून प्रगट झालो आहे. पण तुम्ही मला आपल्या कोठडीत ठेवा. मी सांगतो त्याप्रमाणे स्थिती असली, द्रव्य मिळाले तर मला मुक्त करा. नाहीतर मारून टाका. आणि नंतर मीच कदाचित ही वार्ता आरक्षींना देईन असा संशय असेल तरीही मला मारून टाका.

मी जोगेश्वरला अडकवून ठेवले. गुरूला भेटलो. कल्पना दिली. गुरूने त्याला

भेटण्याचे ठरविले. भेट झाली.

गुरूने एक प्रश्न विचारला. म्हणाला, द्रव्य मिळाले तरी, न मिळाले तरी, शिशाची एक गोळी तुझ्यासाठी आहे. तुला मोकळे केले तर तू काय करणार आहेस ?

जोगेश्वरने आपले कागदपत्र दाखविले. एका तेलवाहू नौकेवर त्याची नेमणूक झाली होती. ती वेगळ्या नावाने. तो परदेशात जाणार होता. "या लढाईच्या धामधुमीतच ?" असे विचारता त्याने सांगितले, 'संधी आत्ताच आहे.'

विश्वास बसावा इतपत खुणा आणि माहिती जोगेश्वरने दिली. एक मानचित्रही दिले.

गुरूने जोगेश्वरला आपल्या स्वाधीन ठेवण्याचे काम माझ्यावर सोपविले. एक माणूस पाठवून खुणा आणि मानचित्र तपासण्यास सांगितले. ते सर्व झाले आहे.' हरीषने आपले कथन पूर्ण केले.

'आपण उतरतो आहोत खरे, पण हे लोक कोण येत आहेत ?' नाव तीराला नेता नेता महेश म्हणाला. इतर तिघांचेही तिकडे लक्ष होते.

दुसऱ्या नावेत सुशील आणि आणखी दोघे बसले होते. ती नाव पुढच्या नावेच्या संकेताने चालत होती.

पण आता सुशीलने संकेत केला, 'नुसते थोडे रेंगाळा. उतरू नका.'

लोक अधिक जमू लागले. शाळेचे विद्यार्थी जलपर्यटनाला जातात त्याच पद्धतीने सर्व तरुणांनी वेष केले होते. पण काल जवळच्या गावात दरोडा पडल्याची वार्ता प्रागपूरपर्यंत आली होती आणि गावकरी त्या दृष्टीने या तरुणांकडे बघत आहेत असा रंग दिसला.

सुशीलने जवळपास पाहिले. काही नावा दूर बांधलेल्या होत्या. येथून अर्धा मैल दूर त्याने संकेत दिला, "चला."

बांबूने तीरापासून सुटका करून घेऊन नावा नदीच्या मध्यपात्राकडे निघाल्या. गावकरी एकेक परतू लागले. थोड्या वेळाने तेथे जमाव असा राहिला नाही असे दिसले.

समोरच्या तीरावर एक गाव होते. ते होते खलीलपूर. तिकडे नावांनी दिशा वळविली. तासाभरात ते त्या तीराला लागले.

जाताना त्यांचे नेहमीचे गाणे चालले होते-

तुजसाठी हे जीवन माते तुजसाठी ही मान ।
कणाकणाने रक्ताच्या या होवो तव सन्मान ।
मुक्ति साधण्या जिवंत अमुची हृदये देऊ दान ।
गंगौघासम रिपुरक्ताचे घालू तुजला स्नान ।

आम्ही माथेफिरू म्हणोनी शत्रु फुंकती कान ।
परंतु माते नको म्हणू गे तुझी मुले अज्ञान ।

जवळपास एक गोठा दिसला. सर्वजण गोठ्यात गेले.

त्यांनी काटक्या गोळा करून तीन दगडांची चूल पेटविली. जवळचे पातेले काढले, तांदूळ काढले आणि नदीचे पाणी आणून चुलीवर भात शिजत लावला. आज दोन दिवस ते अन्नावाचून होते, म्हणून दिसले त्या दुकानांतून त्यांनी तांदूळ आणले होते. नावेत जमणारे पाणी उपसून फेकण्यासाठी असलेले पातेलेच भात शिजविण्यास उपयोगी पडले.

"तो कोण येत आहे". एकाने लक्ष दिले. बहुधा त्या गोठ्याचा धनी असावा. जणू स्वत:शीच तो पुटपुटला.

तो गोठ्याचा धनीच होता. "कुठे चाललात मुलांनो ? आणि इथे घर आहे माझे जवळच. आठदहा माणसे मला जड नाहीत. चला तिकडे. भात अन् मासे करायला सांगतो." तो धनी म्हणाला.

"नको बाबा ! आभारी आहोत आम्ही ! आम्हाला रात्रीच्या आत बीस मैल जायचे आहे. इथेच थोडे खाऊन घेतो आणि नावा हाकारतो." हरीशने सांगितले.

धन्याने एकदा त्यांच्याकडे पाहिले. "बरं आहे मुलांनो. तुमची इच्छा" असे म्हणून तो वळला.

कोणीतरी व्यवस्थ येत आहे हे पाहताच एका मुलाने आपली छरिका बिजारीच्या आत लपविली. योग असा आला की धन्याने ते नेमके पाहिले. तो 'बरे आहे' म्हणून गेला खरा, पण त्याला संशय आला.

पंधराबीस मिनिटे कोणी फिरकले नाही. दोघे दोन दिशांना पहाऱ्यावर होते. आणि अर्ध्या तासातच त्यांनी सर्वांना सावध केले, भांडे उचला अन् चला.

आवराआवर करण्यात दोन मिनिटे गेली.

सहासात बंदूकधारी शिपाई पाचशे फुटांवर दिसू लागले.

सर्व मुले नावेवर जाऊ लागली.

गोळीबार ! एक ! दोन ! तीन ! मुले पळताना आरक्षींनी दुरूनच गोळीबार केला.

आरक्षी अधिक जवळ येऊ नयेत, पळण्याला वेळ मिळावा म्हणून तरुणांनी गोळ्या सोडल्या. एक-दोन-तीन-चार !

धूम धडाक्याने झाडीतूनही जणू प्रतिध्वनी निघू लागले. नदीच्या दुसऱ्या तीराकडे असलेला डोंगरही प्रतिध्वनी देत होता.

सर्व मुले सुरक्षितपणे नावेवर चढली आहेत हे सुशीलने पाहिले. बांबू सरसावून नावा पात्रांत सोडल्या जात आहेत हेही त्याने पाहिले. मुलांनी आडोसा निर्माण

करून ठेवला होता.

आणि हे काय ? सुशील कसा पडला ? पाय घसरून ? होय ! मातीवरील ओलेपणाने निसरडे झाले आणि त्यावरूनच तो घसरला.

तो पाण्यात पडला. नावेजवळ. महेशने त्याला हात दिला. तो हात घेईना ! काय झाले ?

सुशीलला गोळी लागली होती ! समोर येऊ बघणाऱ्या एका शिपायावर दोघांनी गोळीबार चालू ठेवला होता; तर दोघांनी खाली उतरून सुशीलला नावेत उचलून घेतले होते.

गोळीबार विरला. नावांनी गती घेतली.

दूर अंतराबर तरुणांना नावा दिसल्या. पण आता या दोन नावा त्यांच्या टप्प्याच्या बाहेर होत्या. काळोख होत होता आणि ढगही जमले होते.

'सुशील ! सुशील !' हरीश सुशीलला जागे करीत होता. डोळ्यांना पाणी लावीत होता.

सुशीलने डोळे उघडले. त्याला पूर्ण शुद्ध होती. त्याच्या छातीच्या उजव्या अंगातून रक्तस्राव होत होता.

"ऐक हरीश. मी मरत आहे. भावनांना लिपटून राहाल तर कार्यनाश होईल. पंधरा वीस मिनिटांत मी मरेन. माझे प्राण आवळू लागले आहेत. प्रेताचा पुरावा होईल.

"माझी कुकरी काढा. माझा मृत्यू होताच माझे मुंडके कापा. धड अवजड आहे ते जवळ बाळगू नका. मुंडके आणि धड वेगवेगळ्या ठिकाणी ! कळले" ?

सुशीलचा स्वर आणखी क्षीण होऊ लागला. "वचन दे. हरीश !" हरीशने हात पुढे केला.

"हाताने नाही ! कुकरीने दे वचन !"

हरीशने कुकरी काढून सुशीलच्या डोळ्यांसमोर धरली. आणि त्याच्या शक्तिहीन हाताजवळ नेली. त्याचे पाते सुशीलच्या हाताला लागले.

सुशीलला स्पर्श जाणवला. त्याने स्मित केले !

नाव झपाझप चालली होती. नोटा आणि चांदीचे रुपये मिळून अक्षरशः तीस सहस्र रुपये ते घेऊन आले होते.

रक्तपात कोठेही करावा लागला नव्हता. हे द्रव्यही गणन नसलेल्या कोणत्या कोपऱ्यांतील होते. वार्ता फुटण्याचीही भीती नव्हती.

आणि त्या द्रव्यापायी एक असे रत्न या तरुणांना धावे लागत होते की ज्याचे मूल्य अशा अनेक लुटींनीही पुरे होणार नव्हते !

सुशीलच्या मुखांतून हास्याचा उद्गार निघाला आणि पाठोपाठ स्मितरेषा !

होय ! सरत्या क्षणात सुशीलला प्रफुल्ल कुमार चक्रवर्तीचे प्रेत दिसले. भग्न झालेले मस्तक ! फेकला गेलेला डोळा ! आणि पाठोपाठ त्याला उल्हासकरचे शब्द आठवले.

"मरणाचे म्हणाल तर... आपल्या सर्वांचीच आयुष्ये नियतीने अशा कोणत्यातरी प्रकाराने नाहीशी करण्याचा लेख आपल्या भाळावर लिहिला आहे !"

"खरे आहे !" असा अस्पष्ट उच्चार सुशीलच्या मुखातून निघाला आणि त्याने मान टाकली.

सर्वचजण रुद्ध झाले. हरीशचे अश्रू गळले.

क्षणभरात हरीशला पुढच्या कर्तव्याची जाणीव झाली. त्याने अधिकारवाणीने दोन्ही नौकांना सांगितले, "नावा कडेला घ्या."

अंधार होता. सामसूम होते. तीर चांगले लागले.

हरीशने कुकरी घेतली. सुशीलच्या प्रेताच्या गळ्यावर एक घाव घातला, मुंडके तुटले नाही. त्याने ते फिरविले. त्याला भास होत होता. जणू सुशील बोलत आहे. "आणखी एक !"

दुसऱ्या घावाने मुंडके वेगळे झाले. ते घेऊन दोघेजण तीरावर गेले. पाण्याशेजारीच एक खोल खड्डा घेतला, तोंडावर कुकरीचे आडवे तिडवे अनेक घाव घातले; आणि त्या खड्ड्यात ते मुंडके पुरून टाकले.

धड बरोबर घेऊन नावा मध्य उलटून दुसऱ्या तीराकडे येऊन पोहोचल्या.

हरीश आणि मंडळींनी लूट सुरक्षितपणे गुरूच्या पुढे ठेवली. सुरक्षितता आली आहे असे पाहून, रुपयांनी भरलेल्या त्या थैल्यांकडे पाहून हरीशने 'सुशील ! सुशील !' म्हणून हंबरडा फोडला !

इकडे सुशीलच्या मृत्यूनंतर तीन दिवसांनी म्हणजे ६ मे १९१५ या दिवशी कृष्टोपूचूर या खलीलपूरजवळच्या एका खेड्याच्या तीरावर एका आरक्षीचे लक्ष गेले.

हा बांबू कसला उभा आहे ? त्याने पाहिले. तो जवळ गेला. बुडालेल्या नावेचा एक भागही जवळ दिसत होता.

मुख्य ठाण्यावर त्याने समाचार दिला. आरक्षी दल आले. मारे धरण्याचे मोठे जाळे टाकले. सडणाऱ्या स्थितीतील काही चिंध्या तेवढ्या त्या जाळ्यात आल्या होत्या.

※※※

॥ ७ ॥ 'बम' वाल्याचे जानवे

रामरखा या एका उपेक्षित क्रांतिवीराने जानव्याचे अभंगत्व हा मानबिंदू केला, त्यासाठी प्राण पणाला लावले, प्राण दिले, आणि जानवे अभंग ठेवले. काळाच्या ओघात नामवंत नेत्यांनी मात्र देशाचे अभंगत्व हाही मानबिंदू केला नाही !



रामरखा

'आज मला बरे वाटत नाही. मी काम करणार नाही.' रामरखाने काम न करण्याचे कारण निक्षून सांगितले.

मोगरी म्हणजे काथ्या कुटण्याची लाकडी हातोडी त्याच्यासमोर पडली होती. नारळाची सोडे (छिलके) ढिगाने पडली होती. इतर बंद्यांची जुपी झाली होती. आपापला वाटा घेऊन ते काम करीत होते. रामरखा बसून होता.

बंदिगृहात त्यांत अंदमानासारख्या छलागारात, दण्डिताने कामाला नकार देणे, हा मोठा अपराध होता. आणि त्यातून तो दंडित क्रांतिकारक पक्षाचा, बमगोळेवाला असेल तर बघायलाच नको.

रामरखाचा निश्चय बघून तांडेलाने आपल्या वरिष्ठाला-नाईकाला-तसे जाऊन सांगितले. तांडेल म्हणजे काही शिक्षा भोगून झाल्यावर, दंडिताला अधिकारी केले जाते तसा अधिकारी.

नाईकाने तांडेलाला धुडकावून लावले.

'तुला एक बंदी आवरत नाही ? जा. त्याने काम केलेच पाहिजे.'

तांडेल नव्या दमाने परत आला.

रामरखाशी तांडेल वाद घालू लागला.

'डॉक्टराने सांगितले आहे तुला कामावर बसवायला. तुझा ताप खोटा आहे.' सकाळीच रामरखाला डॉक्टरकडे नेऊन आणले होते. डॉक्टरने दाद घेतली नव्हती.

रामरखा म्हणाला, 'डॉक्टर खोटे बोलतो. नळीतील पारा माझ्याही डोळ्यासमोरून चमकून गेला. मला एकशेदोनच्या जवळपास ताप आहे.'

'आम्ही ते जाणत नाही. कामावर बसले पाहिजे.'

तांडेलाच्या जोडीला आता त्याच तुकडीवरचा दुसरा तांडेलही आला होता. त्यानेही दुजोरा दिला, 'कामावर बसले पाहिजे.'

रामरखा पुढे सरकला. समोर सोडांचा ढीग होता. त्या ढिगावर जाऊन बसला. 'झाले समाधान ?' तो म्हणाला, 'कामावर' बसलो आहे मी !'

दोघेही तांडेला चिडले. पण रामरखावर हात टाकण्यास कचरू लागले.

'हे साहस ?' त्या दोघांतील वरिष्ठ तांडेल म्हणाला, 'मी मुख्य तांडेलाला बोलावून आणतो. तो आल्यावर असाच बसून रहा. तुझी चामडी लोळावेल तो.'

उपहासाने हसून रामरखा म्हणाला, 'मुख्य तांडेलाच्या देवाला बोलावून आण जा. मला ताप आहे. मी काम करणार नाही. माझ्या हातून होत नाही.'

मोठा तांडेल चिडून चिडून निघून गेला.

मुख्य तांडेल बद्धुद्दीन पठाण, जमादार तोलाराम आणि एक उपबंदिपाल येऊन उपस्थित झाले.

आपली स्वामिनिष्ठा दाखविण्याची बद्धुद्दीनला संधी मिळाली. त्याने दोघा कनिष्ठ तांडेलांना शिव्या हासडल्या. बंदिपालाकडे वळून तो म्हणाला, 'यांना एक बंदी आवरत

नाही. त्यांची टोपी (अधिकाराचे प्रतीक) काढून घेतली पाहिजे.'

रामरखा तसाच सोडांवर बसून होता. दोघा तांडेलांना दूर सारून बद्रुद्दीन पुढे सरसावला. रामरखाच्या अंगावर त्याने दंड्याचा तडाखा मारला.

रामरखा निश्चल होता. त्याने या परिणामाची अपेक्षा केली होती. प्रदीर्घ छळाने तो वैतागला होता. मरणासाठी या यातना असतील तर त्या थोडा काळ असणार या तुलनेने त्याला मनात अवभार (रिलीफ) वाटत होता.

'याचा कुडता (सदरा) काढला पाहिजे. त्यावाचून याला फटका पोहोचणार नाही.' बद्रुद्दीनने आपली क्रूरता अपूर्ण असल्याचा प्रत्यय आल्याने उपाय शोधला.

दुसरा तांडेल साहाय्याला आला. दोघांनी मिळून रामरखाचा सदरा ओढून काढला.

'जनेवा !' (जानवे !) बद्रुद्दीन आश्चर्यनि आणि संतापाने उद्गारला.

XXXXX ' बम्मन बमवाला 'XXXXX

बद्रुद्दीनने शिव्यांच्या उपसर्गनि आणि प्रत्ययाने उद्गारांची पूर्ती केली. 'जनेवा किसने रखने दिया ? निकाल जनेवा' त्याने रामरखाला धमकावले.

रामरखाने हालचाल केली नाही. तो तसाच बसलेला पाहून बद्रुद्दीनने आणखी दोन दंडे रामरखाच्या उघड्या पाठीवर मारले. 'निकाल जनेवा' तो फटक्यागणिक ओरडत होता.

वेदनांनी व्याकुळ होऊनही रामरखाने सहनशीलतेची परिसीमा दाखविली. त्याने बद्रुद्दीनच्या प्रहारांचा आणि धमकावणीचा अपमान केला.

'ठहर बम्मन'. बद्रुद्दीन निकराचा आला. 'मैं निकालता हूँ ! हमारे बापदादाओंने मणोंसे जनेवे जलाये है, और जनेवेवालोंको भी !' स्वत:च्या पूर्वजांचे शौर्य बद्रुद्दीन सांगत होता आणि त्याच वेळी त्याने रामरखाचे जानवे ओढावे म्हणून हात पुढे केला.

इतका वेळ शांत बसलेला रामरखा ताडकन उभा राहिला. त्याने सर्व बळ एकवटले. उजव्या हाताने बद्रुद्दीनच्या कानशिलात ठेवून दिली.

बद्रुद्दीन त्या आघाताने थोडा सरला होता, पण अद्याप रामरखाच्या डाव्या हाताच्या परिघात होता. रामरखाने डाव्या हाताची मूठ वळली आणि बद्रुद्दीनच्या उजव्या कानाखाली आवेगाने ठोसा लगावला. त्या क्षणार्धात बद्रुद्दीन थोडा हालला म्हणून त्याच्या पुढच्या दातांवर ठोसा बसला. एक दात तोंडातल्या तोंडात मोडला, दुसरा खिळखिळा झाला.

त्या अचानक आघाताने बद्रुद्दीन चार पावले मागे सरला. त्याने गुळणी थुंकली. लालेलाल ! मोडलेला दातही त्या गुळणीत भुईवर पडला. 'खून ! खून !' एवढे शब्द त्याच्या तोंडातून बाहेर पडले.

त्या तुकडीतील इतर बंदी चुपचाप काम करीत होते. क्वचित थोडी दृष्टी बाकडी

करून काय चालले आहे हे कोणीतरी बघत होते. पण दंड्याच्या भीतीने सर्वजण कामातील मग्नता दाखवीत होते. 'खून खून' हे बद्रुद्दीनचे शब्द मात्र त्यांच्या कानावर स्पष्टपणे आले. त्यांनी मान वळवून पाहिले आणि त्याचे सुजलेले तोंडही त्यांनी टिपून घेतले.

उपबंदिपालाने आज्ञा दिली, "हातकडी ठोका, जानवे काढून घ्या. आणि याला खोलीबंद करा !"

आज्ञेचे पालन झाले, रामरखाला त्याच्या कक्षावलीतील खोलीत नेले गेले.

बद्रुद्दीनला रुग्णालयात नेले. त्याला तेथेच प्रविष्ट (ॲडमिट) करून ठेवले.

सर्व बंदिगृहात एक विपर्यस्त वार्ता पसरली. 'मुख्य तांडेलला मारले ! बद्रुद्दीनचा खून झाला. त्याला शवच्छेदनासाठी रुग्णालयात नेले आहे ! बमगोलेवाला रामरखा याने मारले ! त्याने जानव्याने बद्रुद्दीनचा खून केला !'

भीतीचे वातावरण निर्माण झाले. ज्या ज्या विभागात बमवाल्याकडून दंड्याच्या बळाने काम घेण्याचा उपक्रम चालू होता त्या त्या विभागात तांडेलांनी, नाइकांनी दंडे आवरते घेतले. तोंडाची दमदाटी चालू होती, पण तीही जपून.

रामरखा आपल्या खोलीत पंधराबीस मिनिटे निपचीत पडला होता. त्यानंतर त्याला दंड्याच्या घावांच्या वेदना आणि ताप यांची जाणीव होऊ लागली. त्याचा सदरा त्याच्या जवळच टाकला होता. रामरखाला थंडी वाजत होती. तो उठला. हातकडी असल्याने सदरा घालणे शक्य नव्हते. त्याने गळ्यातून सदरा अडकवला आणि हातही झाकून घेतले. खोलीच्या कोपऱ्यात जाऊन तो अर्धवट डोळे मिटून पडून राहिला.

तासाभराने मुख्य बंदिपाल त्याच्या लटांबरासह रामरखाच्या खोलीपुढे येऊन उपस्थित झाला.

रामरखा बाहेरच्या हालचालीने थोडा जागा झाला. मुख्य बंदिपालाला समोर पाहताच तो म्हणाला, "माझे जानवे द्या."

त्याला उत्तर न देता बंदिपालाने विचारले, 'तू कामाला नकार दिलास ?'

"मला ताप आहे. काम करणे अशक्य आहे. मी नकार देण्याचा प्रश्नच नाही. शरीरच नकार देत आहे." रामरखाने उत्तर दिले.

असे स्पष्टीकरणात्मक उत्तर ऐकणे बंदिपालाच्या सरावातील नव्हते. तरीही आपण वरिष्ठ अधिकारी आहोत याची जाणीव ठेवून तो म्हणाला,

"ताप डॉक्टरला कळतो. त्याने सांगितले आहे ताप नाही म्हणून. तू कामाला नकार दिलास."

"बोलवा डॉक्टरला." रामरखा म्हणाला, "तुमच्या समक्ष ताप बघा."

"ते मग बघू. तुला तीन दिवस हातकडीची शिक्षा देत आहे. कारण तू काम

नाकारलेस." बंदिपालाने शिक्षा सुनावली. तो पुढे म्हणाला,

'दुसरे, तू अधिकाऱ्याला मारलेस.'

'कोण अधिकारी ?'

'मुख्य तांडेल बद्दुद्दीन !'

'तो माझ्यासारखाच दंडित आहे.'

'पण त्याला पट्टा, टोपी (अधिकारचिन्हे) दिली आहेत. तो शासकीय सेवक आहे.'

'मला त्याच्याशी कर्तव्य नाही.' रामरखा म्हणाला, 'त्याने मला शिव्या दिल्या. दंडे मारले. पण तेही मी गौण समजतो. त्याने माझ्या जानव्याला हात घातला.'

'जानवे ठेवता येत नाही.'

'का ?'

'त्याने फाशी घेता येते. तसले काही बंद्याजवळ ठेवायचे नसते.' अधिकाऱ्याला नियमाचे जे समर्थन सुचले ते त्याने रामरखाच्या तोंडावर फेकले.

'मग आमची कांबळी, तरटं, सर्व धाग्यांचीच आहेत. फाशी त्यानेही घेता येते.'

'ते तू सांगू नको. नियमाने जानवे देता येत नाही.'

'आज वर्षभर मी जानवे वागवितो आहे.'

'ती चूक आमच्या त्या त्या ठिकाणच्या प्रशासनाची आहे. ती आता सुधारली आहे.'

'मला जानवे द्या. माझा तो अधिकार आहे, माझे ते धार्मिक चिन्ह आहे.'

'माझ्या प्रश्नाचे उत्तर दे.' मुख्य बंदिपाल दरडावणीच्या स्वरांत म्हणाला, 'तू बद्दुद्दीनचे दात पाडलेस.'

'खोटी गोष्ट आहे ! बोलवा त्याला.' रामरखा तितकेच चिडून म्हणाला.

हा बमवाला सरळसरळ खोटे बोलत आहे हे बघताच जमादार आणि दुसरा तांडेल यांना चेव आला. ते म्हणाले 'साहेब, आमच्यासमक्ष याने बद्दुद्दीनला दोन ठोसे मारले. दुसऱ्या ठोशासरशी बद्दुद्दीनने गुळणी थुंकली. तो दात खाली पडलेला आम्ही पाहिला.'

'आले लक्षात ?' रामरखाने मुख्य बंदिपालाला विचारले.

'काय आले लक्षात ?'

'हे साक्षीदार सांगत आहेत, दात खाली पडला. तुम्ही आरोप करीत आहात दात पाडले म्हणून !'

'रामरखाचा युक्तिवाद काय आहे ?' मुख्य बंदिपाल चक्रावला. 'दात पडला. पाडला नाही असे याला म्हणायचे आहे काय ?' त्याने पुन्हा दरडावून विचारले ?

'तू ठोसा मारलास की नाही ?'

'होय ! आता तुम्ही बरोबर बोललात. दात पाडले नाहीत. दात पाडला. इतर दात त्याच्या तोंडात राहिले आहेत. मला संधी मिळाली नाही. मला तेही पाडायचे आहेत. मला अवसर द्या आणि एकदमच खटला करा काय तो !'

तापलेल्या रामरखाच्या तोंडून जणू ज्वाला बाहेर पडत होत्या, आणि डोळ्यातून ठिणग्या !

बंदिपालही काही क्षण स्तिमित झाला. याला तीस फटके मारण्याची शिक्षा नोंदवून ठेवायची आणि डॉक्टरकडून याची तपासणी करून फटके मारण्याजोगी याची स्थिती आहे असे त्याचे मत देताच लगेच रामरखाला तिकटीला बांधून फटके मारायचे, असा विचार मनात करीत बंदिपाल उभा आहे तोच रामरखाने ठणकावले, 'माझे जानवे मला हवे आहे. तोवर मला अन्नग्रहण करता येणार नाही. उत्तरदायित्व तुमचे राहील.'

शिक्षा तोंडावाटे न उच्चारताच मुख्य बंदिपाल आपल्या कार्यालयाकडे गेला. तेथे जाताच त्याने डॉक्टरला बोलावून रामरखाला शारीरिक दृष्टीने तपासण्यास सांगितले.

'डॉक्टर, सकाळी मी आलो होतो. तुम्ही मला कामावर जाण्यास भाग पाडलेत.' रामरखाने डॉक्टरला सांगितले. डॉक्टरांनी ताप बघितला तो एकशेतीन होता. त्यांना त्यांचा दोष जाणवला. सकाळीही रामरखाला ताप होता हे त्यांना ठाऊक होते.

समर्थन द्यायचे म्हणून डॉक्टर म्हणाले, 'अनेक बंदी तापाचे ढोंग करून येतात. खाकेत कांदा ठेवतात. तेवढा भाग उष्ण होतो. तापनळीत ताप दिसतो, पण तो खोटा असतो. म्हणून सर्वच बंद्यांची गाऱ्हाणी खरी नसतात.'

'पण मग इतर लक्षणे ?' रामरखाने विचारले.

'सर्व लक्षणे तपासू लागले तर पन्नास बंद्यांसाठी पुरा दिवसही अपुरा पडेल.' डॉक्टर म्हणाले, 'ते असू दे, तुझी हातकडी काढण्यास सांगतो. तुला एकशे तीन ताप आहे. दोन कांबळी देण्यास सांगतो. दूध अर्धाशेर लिहीत आहे. उद्या मिळेल. मी जातोय.'

काही बोलण्याची संधी मिळण्याच्या आतच डॉक्टर बाहेर गेले. त्यांनी जमादारास सर्व व्यवस्था करण्यास सांगितले. रुग्णालयातून अमुक औषध आणण्यास हाताखालच्या तांडेलाला सांगितले.

पाच मिनिटातच खोलीत सर्व व्यवस्था झाली.

डॉक्टर आले. औषधाचा पेला रामरखापुढे धरीत ते म्हणाले, "हे औषध घे. तुला दोन दिवसांत बरे वाटेल."

'डॉक्टर, मी आभारी आहे. मी औषध घेणार नाही.'

'औषधाचा इन्कार करू नये.' डॉक्टरांनी समजावले,

'माझा इन्कार नाही, डॉक्टर. माझ्या गळ्यात जानवे नाही. औषध ठेवून द्या. जानवे घातले गेले म्हणजे औषध घेईन.'

डॉक्टर निघून गेले. जाताना औषध ठेवून गेले. जानवे हा त्यांच्या कक्षेतील प्रश्न नव्हता.

अधिकाऱ्यांनी जानवे धाडले नाही. रामरखाने औषध घेतले नाही.

रामरखाने अनशन केले आहे, हे वृत्त आता सर्वदूर पसरले. पहिल्या वृत्तातील विपर्यस्तता जाऊन आता सर्व घटना जशा घडल्या तशा बंद्यांपर्यंत पोहोचल्या. बद्रुद्दीनचे दात पाडल्याने ज्यांना आनंद वाटला त्यांत अनेक दंडित आणि तांडेल होतेच. पण काही शिपाई आणि जमादारही आनंदून गेले होते. बद्रुद्दीन त्यांच्यावरही कुरघोडी करण्याइतका मातला होता. त्याचा नक्षा एका बमगोळेवाल्याने उतरवला होता.

दुसरा दिवसही रामरखा पडून होता. डॉक्टर येऊन गेले होते, औषध तरसेच होते. ते आणखी औषध ठेवून गेले होते.

रामरखाचे अन्न सकाळचे संध्याकाळी आणि संध्याकाळचे दुसऱ्या दिवशी सकाळी मोकळे केले जाई. पुन्हा थाळी भरून ठेवली जाई. दुधाला वेगळे भांडे दिले होते. त्यातील दूध दुसरे दूध येईपर्यंत पडून असे.

तिसऱ्या दिवशी सकाळी रामरखाला जाग आली. पहाटेच घाम येऊन गेल्याचे त्याला जाणवले होते. त्याला विलक्षण अशक्तता वाटत होती. भूकही लागल्यासारखे वाटत होते.

त्याने डोळे उघडले. दुधाचे भांडे समोरच दिसले. अन्नही होते. उठावे, चुळा भराव्यात आणि दूध-भाकरी खावी असे त्याच्या मनात आले.

तो उठला. उठताक्षणीच समोरचे बंद दार त्याला दिसले. क्षणभरापूर्वी तो आपली शिक्षा, दंडाबेडी, बंदिगृह, अंदमान, जानव्यासाठी झगडा हे सर्व विसरला होता. बंद दार दिसताच तो भानावर आला आणि सर्व वस्तुस्थितीची त्याला जाणीव झाली.

तो तसाच पडून राहिला. ताप गेल्यामूळे त्याला तापाच्या वेदना नव्हत्या.

सहा दिवसांपर्यंत अधिकाऱ्यांची दरडावणीची भाषा चालू असे. नंतर मात्र त्यांनी समजावणीला आरंभ केला. ज्या मुख्य बंदिपालाने रामरखाला बेत मारावेत म्हणून मनात बेत केला होता तोच त्याच्याजवळ बसून नम्रतेने, शिष्टाचाराने इकडच्या तिकडच्या गोष्टी करू लागला.

'असे अनशन करण्यात काय स्वारस्य आहे ? तुला कागद देतो. तुझे म्हणणे

लिही. मी पुढे पाठवितो' तो म्हणाला.

माझे म्हणणे तुम्ही जाणता. तुम्हीच लिहून कळवा. उत्तर येईपर्यंत मी जगेन, समजा नाही जगलो, तर ते उत्तर नुसते माझ्यासाठी थोडेच असणार आहे ?'

'पण त्यासाठी प्राण घालवणे शहाणपणाचे आहे का ? तू उपोषण सोड. तू केलेल्या प्रयत्नाचे फळ तुझ्याच उपयोगात येईल.'

'माझ्या प्राणांचे मोल तुम्हाला वाटते म्हणून मी आभारी आहे. तुम्ही जानवे द्या. वर कळवा की प्राण वाचविण्यासाठी उपचार म्हणून मी जानवे दिले आहे. उद्या त्यांनी नकार दिला तर त्या घटकेपासून मला काय करायचे ते मी करीन.'

'तसे करता येणार नाही.'

'म्हणजेच माझ्या प्राणाचे नव्हे, तर तुमच्या नियमांचे तुम्हाला मोल आहे ! माणसासाठी नियम असतात ! नियमासाठी माणसे नव्हेत. श्रीमानजी आपले हितसंबंधच परस्परविरोधी आहेत. आपण आपली शक्ती नियम घट्ट धरून ठेवण्यांसाठी वापरा. माझे प्राण घट्ट धरून ठेवण्यासाठी नव्हे,' रामरखाने उत्तर दिले.

क्रांतिकारकांपैकी कोणास धाडले तर रामरखा अन्न घेईल, अशा हेतूने अधिकाऱ्यांनी तसा पवित्रा टाकला. क्रांतिकारकांना तसली संधी हवीच होती. लाहोर कटातील जगतराम यास रामरखाकडे धाडून त्याकरवी त्याचे मन वळविण्याचे अधिकाऱ्यांनी ठरविले. तोवर रामरखाला बंद कोठडीतून काढून रुग्णालयात हलविले होते.

जगतरामने अट घातली, 'आम्ही बोलू त्या वेळी तुमच्यापैकी कोणीही असता कामा नये. आम्ही कोणता कट करणार नाही की पळून जाणार नाही. तुमचे उद्दिष्ट तेच माझे म्हणजेच आमचे उद्दिष्ट आहे. ते साधण्याचा मी प्रयत्न करीन.'

अधिकाऱ्यांनी ते मान्य केले.

'ओळखलेस रामरखा ?' जगतरामने क्षीण रामरखाला विचारले.

'तू इथे कसा ?' रामरखाने आश्चर्य दाखविले. ते दोघे होशियारपूरचे होते. एकमेकांना ओळखणारे ! देशासाठीच ते दूर दूर फेकले गेले होते. योगायोगाने पुन्हा भेटले ! पुन्हा दूर फेकले जाण्यासाठीच जणू !

'मग तुला काय वाटले ? फाशीची शिक्षा सुनावली तेव्हा फाशी गेलो, असेच वाटले कां तुला ?'

त्या स्थितीतही रामरखा हसला. 'तसे नव्हे रे ! इथे अंदमानात भेटतो आहेस ! एकट्या ! आज दहा वर्षांनी भेटत आहोत आपण !'

'तू अनशन सोडावेस म्हणून मला अधिकाऱ्यांनी धाडले आहे. त्यांच्या उपस्थितीत

मी बोलणार नाही, असे त्यांना मी सांगितले. त्यांनी ते ऐकले आहे. ते आपण शेवटी बोलू. सोहनलालचे काय झाले ?'

जानेवारी १९१६ मध्येच त्याला फाशी दिले. मंडाले येथे फार सिद्धता करून ठेवली होती त्याने. तो आणि अमरसिंह. तुला ठाऊक आहे ?'

'काय ?'

'वर्ष १९१० पर्यंत सोहन सयाममध्येच होता. १९११ मध्ये लाहोरला होता. तेथूनच तो अमेरिकेत गेला. १९१४ पर्यंत तेथे राहिला. लाला हरदयाळ, रासबिहारी इत्यादींचा संबंध आला. 'गदर' वेगाने पुढे चालले. पत्रके, परिपत्रके, शस्त्रे यांची ये-जा चालू करण्याच्या योजना झाल्या. पण तेवढ्यात शासनाला लाला हरदयाळ आणि सोहनलालच्या हालचालींचा सुगावा लागला. लाला हरदयाळ मार्च २३, १९१४ ला पकडलेही गेले होते. ते निसटले. सोहन आधीच निसटला. पुन्हा सयामला आला. युद्ध चालू झाले होते. ब्रह्मदेशाला सैन्याकरवी उठाव करण्याच्या योजना त्याने हाती घेतल्या. वर्ष १९१५ च्या प्रारंभी तो ब्रह्मदेशात आला.

एका सैनिक तुकडीशी बोलणी करीत असता तो पकडला गेला. बहुधा १४ ऑगस्ट १९१५ ला. त्याच्याजवळ दोन चक्री छरिका, 'उठाव करा' असा फतवा, विस्फोटक बनविण्याची पुस्तिका इ. साहित्य मिळाले.

'सर्व विधी चटावर होऊन १५ डिसेंबर १९१५ ला त्याला फाशी सुनावली, आणि जानेवारीत फाशी दिलेही !

'पण त्याने इतका प्रक्षोभ पेरून ठेवला होता की अमरसिंग, मूळचंद आणि मी यांना ब्रह्मदेशात काम करणे आणि उत्थान घडविणे सोपे गेले. काही उत्थाने झालीही.

'मार्च १९१६ मध्ये हरनामसिंग, चलियाराम, नारायणसिंग इत्यादी ७ जणांना फाशी सुनावली गेली आणि ऑगस्टमध्ये मंडालेमध्ये त्यांना फाशी दिले.

'मला आणि आणखी तिघांना ६ जुलै १९१७ ला मंडाले येथे शिक्षा झाली. तुम्ही मला वाटते पन्नास जण तरी येथे आहात ना ?'

'होय. 'जवळजवळ पन्नास.' जगतराम म्हणाला, 'आमच्यातले प्रत्यक्षात फाशी गेले सात. बक्षीससिंग, विष्णु गणेश पिंगळे, सुरेंद्रसिंग ईश्वरसिंग, सुरेंद्रसिंग, भूरसिंग, हरनामसिंग सियालकोटी, जगतसिंग आणि कर्तारसिंग, आम्ही आणखी १७ जण फाशी जाणार होतो, कदाचित दोर नव्हता शासनाजवळ !'

'बरे ! असे बघ, सावरकर दोघेही येथेच आहेत. विनायक सावरकरने चिठी दिली आहे. वाच.'

चड्डीच्या नेफ्यातून कागदाची गुंडाळी काढून जगतरामने ती रामरखाला दिली.

त्याने वाचली. 'बंधो, आपले प्राण आपण आणखी कोणा उदात्त कामाल लावू. वि. दा. सा.'

'सावरकर !' रामरखाने विचार केला, लंडनमधील इंडिया हाऊसचा प्राण ! सर्वांचेच स्फूर्तिस्थान ! गदरचे उगमस्थान ! १८५७ चे स्वातंत्र्यसमर नव्या पिढीला शिकविणारा द्रष्टा !, तो म्हणाला, 'जगतराम, सावरकरांना सांग ! बंधो ! तुझ्याविषयी नितान्त आदर आहे हे म्हणणेही, आई मी तुझ्यावर प्रेम करतो ! असे मुलाने औपचारिकपणे म्हणण्यासारखे होईल. त्यांना म्हणावे, दुसरी तड दिसू लागली आहे आणि त्या तडीचे आकर्षण मला आता अधिक वाटू लागले आहे. परत नको बोलवू ! सावरकरांच्याच शब्दात त्यांना सांग 'प्रणाम' सन्मित्रांनो ! प्रणाम ! ! Fare well, dear friends, farewell !'

भेट संपली ! काहीसा हताश पण नवीन वार्ता मिळाल्याने तितकाच उल्हसित जगतराम परत आपल्या कक्षावलीत गेला.

अधिकाऱ्यांना त्याने सांगितले, माझे प्रयत्न झाले आहेत, तुम्ही तुमचे करा.'

पंधरा दिवस झाले. रामरखा अनशन सोडत नाही हे अधिकाऱ्यांनी पाहिले. आपण एक निकराचा समजावण्याचा प्रयत्न करावा म्हणून बंदिपाल त्याच्याशी बोलू लागले.

'रामरखा ! रागावू नकोस ! जानव्यात धर्म असतो ?'

'नाही. भावनेत असतो. त्या भावनेचे प्रतीक म्हणजे जानवे.'

'पण असे बघ, जानवे म्हणजे तीन धाग्यांचे बलय. त्याला का महत्त्व द्यायचे ?'

'तुम्ही विचारू नये.'

'कां ?'

'उत्तराने तुम्ही चिडाल.'

'नाही चिडणार. बोल तू.'

'मी उत्तर देण्यापूर्वी तुमचे ते युनियन जॅक आहे ना, ते माझे बूट पुसायला हवे आहे. माझे बूट तुमच्या कोठारांत आहेत.

अधिकारी इंग्रज होता. तो चिडला. चडफडला, पण त्याने राग आवरला.

रामरखाने त्याची हालचाल पाहिली. तो म्हणाला, 'श्रीमानजी ! चहा गाळायचाही कपडाच अन् युनियन जॅकही कपडाच ! बूट पुसण्याच्या चिंधीलाही धागे तसलेच ! प्रश्नाचे उत्तर तुमच्या लक्षात आले हे चांगले झाले. मी तुम्हाला मानतो ! तुम्हाला तुमचा मानबिंदू आहे ! आम्हा हिंदूच्यासारखे नाही झालात ! तुडविले तरी 'जी साहेब !' भरडले तरी 'जी साहेब !' म्हणून आम्ही अगदी मोजके लोक मानबिंदूला जपतो. आम्ही गोळ्या मारतो. गोळ्या खातो, फाशी देतो, फाशी जातो, जन्मठेप भोगतो, कष्ट सहन करतो.

'श्रीमानजी, तुम्ही म्हणालात जानव्यात का धर्म आहे ? मी जाणतो तुमचा रोख ! मी किती हिंडलो आहे याची तुमच्याजवळ नोंद आहे. मी काय काय खाऊन जगलो असेन हे परमेश्वर जाणतो. म्हणून जानवे नाही म्हणून स्नान किंवा खाणे नाही, पाणी पिणे नाही, या परिघात मी माझा धर्म ठेवलेला नाही.

'तुम्ही जानवे कां देत नाही ? तर ते धार्मिक चिन्ह आहे म्हणून. आणि त्याच कारणासाठी माझा तो मानबिंदू झाला आहे.'

'आता राहिला प्रश्न येऊन जाऊन माझ्या प्राणाचा ! पण सुख कशात आहे ? निदान या घटकेला सुख कशात आहे ते मी निवडायचे आहे. तुम्ही लादायचे नाही माझ्यावर !'

'तुला आम्ही मरू देणार नाही !'

'तुम्ही अगदी तुमचे राज्य हिंदुस्थानवर यावचंद्र दिवाकरौ राहणार आहे याच थाटात बोलत आहात !'

बंदिपाल त्यावर काही बोलला नाही. विषय बदलून तो म्हणाला,

'घरी कोण आहे तुझ्या ?'

'आई आहे.'

'तिला दु:ख होईल !'

तुझ्या मरणाने तिला दु:ख होईल हा बंदिपालाचा अभिप्राय होता. रामरखाने ते जाणले. तो म्हणाला, 'नाही होणार !'

'नाही कसे ?

'मी एकटाच नाही !'

'आणखी भाऊ आहेत ?'

'होय. इथेही आहेत काही त्यातले !'

'तुझे भाऊ इथे आहेत ?'

'होय !'

'कोण रे ?'

'हरनामसिंग, बलवंतसिंग, जगतसिंग, जगतराम, हिरदाराम, कालासिंग, रामशरण, दास , गणेश सावरकर, विनायक सावरकर, भाई-परमानंद' रामरखाने लक्षात आलेल्या क्रांतिकारकांची नामावली उलगडली.

'बस बस बस !' बंदिपाल म्हणाला. तो समजून गेला. मातृभूमीचे या तरुणाचे प्रेम खरोखर अलौकिक आहे ! तो मनात म्हणत होता. तो त्याला म्हणाला, "मित्रा ! तू ज्या जगात राहू इच्छित असशील तिथे सुखी रहा !'

पाणावलेल्या डोळ्यांनी बंदिपालाने प्रयाण केले.

आणखी दहा दिवसांनी डॉक्टरांनी आपले प्रयोग चालू केले. बलाने नळी घशातून उतरवून ते रामरखाला दूध पाजू लागले.

रामरखाची छाती फुटली ! तो रक्त ओकू लागला. बंदिगृहातील क्रांतिकारकांवर दुःखाची छाया पसरवून रामरखा इहलोक सोडून गेला.

तुरा पडलेला बद्रुद्दीन आपल्या चाहत्यांत सांगू लागला, 'जानवेवाले बम्मनको यहाँ भी जिंदा जलाया गया !'

शासनाने विज्ञप्ति काढली - 'जानवे ठेवू इच्छिणारास जानवे ठेवू द्यावे.'

वर्ष १९१९. अंदमान रामरखाच्या रक्ताने रंगून गेले. नंतर ज्यांनी जानवी ठेवली त्यांना ती त्या रक्ताने पवित्र होऊन मिळाली होती. ते परमपवित्र यज्ञोपवीत !

यज्ञोपवीतं परमं पवित्रम्... !

❋❋❋

॥ ८ ॥ प्रतिशोध

'ओडवायरला मारण्याने त्याला महत्त्व येईल आणि आपल्यालाही प्राणाला मुकावे लागेल ! तो आता वृद्ध आहे ! आपल्या मरणानेच तो मरेल !'

स्वदेशाच्या अपमानाचा प्रतिशोध घेण्यास कटिबद्ध झालेल्या उधमसिंगला हे बुजरे चर्मरक्षी विचार कसे पटावेत ?

न्यायाधीश रस्किनने जनरल डायरला विचारले, 'भारतीय लोकांत भय उत्पन्न करावे, दहशत बसवावी असाच हा प्रकार होता, नव्हे का ?'

"नाही नाही ! तसे नव्हते. एक संकटपूर्ण, भयकारी कर्तव्य मला पार पाडावयाचे होते असाच त्याचा अर्थ. मला विचाराल तर तो एक दयाशील उपाय होता. गोळ्या मारायच्या आहेत तर त्या अर्धवटपणाने नकोत, मला किंवा आणखी कोणाला पुन्हा गोळ्या माराव्या लागू नयेत असे माझे मत होते. एक गोळी मारण्याचा जर मला अधिकार होता, तर पुष्कळ गोळ्या मारण्यास मला कोणता निर्बंध अडवू शकेल ? विधीची प्रतिष्ठा उधळून लावणाऱ्या जमावाला पांगवणे हेच विधिरक्षक या नात्याने माझे योग्य कर्तव्य ठरेल, असा मी सुरांगत विचार केला. जमाव पांगविण्याला मधला उपाय असणेच शक्य नव्हते.

शस्त्रबळ एवढाच उपाय होता." जनरल डायरने उत्तर दिले.

क्रांतिकारी, सशस्त्र आंदोलनाला आळा बसावा,ठिकठिकाणी होणारे ध्वमस्फोट, छरिकेतून गोळीबार, त्यामुळे ब्रिटिशांच्या आणि त्यांच्या सेवकांच्या होणाऱ्या हत्या थांबाव्यात यासाठी न्यायमूर्ती एस्. ए. टी. रौलट यांनी १५-४-१९१८ ला प्रतिवृत्त प्रसिद्ध केले. आणि विधी कसा कडक हवा त्याचे प्रारूप (Draft) केले.

विधिमंडळांत तो विधि ६ फेब्रुवारी १९१९ ला आणि नंतर १८ मार्च १९१९ ला संमत केला गेला.

देशभरात त्या विधिविरुद्ध रान उठले. कारण त्यात कोणासही काही कारणे न देता अटक करणे, अभियोग करणे, तडकाफडकी निर्णय देणे, पुनरावेदनाचा अधिकार नसणे असे उपबंध (प्रोव्हिजन) होते.

लाहोर, दिल्ली, कानपूर, मुंबई इत्यादी ठिकाणी वादळे उठली.

एप्रिल १९१९ या महिन्यात ठिकठिकाणी लोकांच्या निषेध - आंदोलनाने उग्ररूप घेतले. क्रांतिकारकांचे कार्य चालूच होते. लाहोर कटाच्या खटल्याचे पडसाद अद्याप लोकांच्या कानांत घुमत होते. इतरत्रही अधून-मधून क्रांतिसत्र चालूच होते.

एप्रिल १९१९ मध्ये लाहोरच्या झंझावातात चार ब्रिटिशांना जमावाने घेरले आणि सापडलेल्या साहित्याने त्यांना ठार मारले. गळचेपी करणारे निर्बंध शासन आमच्यावर लादत आहे, आमचा स्वातंत्र्याचा जन्मसिद्ध अधिकार आम्हाला कधीच मिळू नये यासाठी आमच्या नेत्यांना, सामान्य जनतेला क्रूर कारावास, फाशी यासारख्या शिक्षा मुक्तहस्ताने देत आहे, म्हणून त्याचा प्रतिकार आम्हाला 'यथा साध्यंच साधनं' करणे क्रमप्राप्त आहे ही लोकांची धारणा होती.

पंजाबचा त्यावेळचा राज्यपाल मायकेल ओडवायर होता. जनरल डायर या सेनापतीने सर्व प्रांत सैनिकी प्रशासनांत घेण्याचे ठरवून घेतले. अमृतसर येथे तो दि. ११-४-१९१९ या दिवशी आला होता. तेथील उपायुक्ताला सांगून त्याने सर्व सत्ता आपल्याकडे घेतली.

दि. १३-४-१९१९ ला या कलंकित विधीच्या (ब्लॅक ॲक्टच्या) कार्यवहनाचे फार मोठे प्रदर्शन करण्याचे जनरल डायरने ठरविले.

स्थानिक नेत्यांनी जालियनवाला बाग या पटांगणात एक सभा दिनांक १३-४-१९१९ या दिवशी आयोजित केली होती. या कलंकित विधीचा निषेध करणे हा या सभेचा विषय होता. हे पटांगण तसे बंदिस्त आहे.

तीन-चार हजारांचा जमाव त्या पटांगणात जमला होता. या समुदायाला धडा शिकवला म्हणजे सर्व देशाला आपोआपच धडा मिळेल, ही डायरची बुद्धी होती.

त्याने जमाव जमू दिला. सभा घेऊ नयेत अशी सूचना ठिकठिकाणी प्रसृत करणे हे शासनाचे कर्तव्य असते. ते त्याने केले नव्हते. सैनिकी अधिकरण (मार्शल लॉ) प्रचलित झाले आहे असे प्रकट करण्याचे असते, लोकांपर्यंत ती सूचना पोहचवावी लागते. डायरला तसे काही करणे आवश्यक वाटले नाही, किंवा सैनिक अधिकरण करताना स्थानिक जिल्ह्याचा अधिकारी, आयुक्त किंवा उपआयुक्त उपस्थित असावा लागतो. डायरला ते पथ्य पाळावयाचे नव्हते.

बाहेर पडण्याच्या वाटेवर डायरचे सैनिक यांत्रिकी बंदुका रोखून बसले. आम्ही गोळीबार करणार आहोत. पटांगण मोकळे करा, अशी सूचना जमावाला देणे कोणत्याही राज्यशासनाला क्रमप्राप्त असते. मनुष्यत्वाच्या नात्याने असतेच असते. डायरला ती संधी लोकांना द्यावयाची नव्हती. त्याला मनुष्यत्वाच्या परंपरागत कल्पनेत स्वत:ला गुरफटून घ्यावयाचे नव्हते.

सैनिक डायरच्या सूचनेची वाट बघत होते. पण वाट बघण्यासाठी त्यांना खोळंबावे लागले नाही. पवित्रे नीट घेतले आहेत ना, बंदुकांची तोंडे जमावाकडे नीट रोखली आहेत ना, एवढे त्याने बघितले आणि तोंडाने 'फायर' हा आदेश दिला. डोळ्यांनी त्याने जमावाच्या दिशेचा संकेत केला.

आपआपल्या शस्त्रावर सज्ज असलेल्या सैनिकांनी फायर हा आदेश ऐकला. डोळ्यांच्या संकेताकडे बघण्याला त्यांचे डोळे मोकळे नव्हते. एकापाठेपाठ एक गोळ्यांची स्पर्धा द्रुतगतीने चालू झाली. वाघाने झाडाखाली डरकाळी फोडताच झाडावर असावध असलेल्या वानरांचे अवयव सुटून ती धपाधप धरणीवर पडावीत त्याप्रमाणे जमावातील माणसे पटापट धरणीवर कोसळू लागली. त्या वानरांइतकीच ती बेसावध होती आणि अवयवांतील त्राण नाहीसे करणारे प्रहार त्यांचे अवयव भेदून जात होते.

किती माणसे मेली कुणी मोजावे ! किर्तींच्या अवयवांच्या धांधोट्या झाल्या त्याची गणना कुणी करावी ! हाहा:कार झाला पण तो हाहा:कार शमविण्यालाही गोळ्यांचा वर्षाव उद्यत होता.

सर्वत्र सामसूम झाले. स्वत:च्या पायाने ते पटांगण सोडून जाऊ शकेल असा मनुष्यच तेथे राहिला नव्हता.

या नरसंहाराचे वृत्त थोडया अवधीतच सर्वत्र पसरले. डायरची जी अपेक्षा होती ती फलद्रूप झाली नाही. पण त्याच्याजवळ पुरेशा गोळ्या होत्या, पुरेसे ध्वम (बॉंब) होते, पुरेसे सैनिकी बळ होते.

लाहोरने आपली प्रतिक्रिया दि. १५ एप्रिल १९१९ ला व्यक्त केली. ब्रिटिशांविरुद्ध नि:शस्त्र समुदायाने प्रचंड बंडच उभे केले. त्या बंडाला स्वरूप राज्यक्रांतीचे होते.

पण त्याला दिशा नव्हती. डायरच्या क्रियेची ती प्रतिक्रिया मात्र होती.

ती प्रतिक्रिया शमविण्याचा उपाय डायरजवळ एकच होता. गोळ्यांचा वर्षाव ! आकाशातून आणि भूमीवरून ! अमृतसर म्हणजे अमृताचे सरोवर ! तेथे निर्माण केलेल्या रक्ताच्या सरोवराला त्याला झाकण बांधायचे होते. त्यासाठी त्याने प्रथम लाहोरच्या समुदायावर विमानातून ध्वमवर्षाव केला आणि यांत्रिकी बंदुकींनीही संहार केला.

आता ते झाकण ठरण्याच्या ठिकाणी नवीनच लोहित-सर निर्माण झाले. लवाच्या नावाने वसविलेले ते लवपूर म्हणजे लाहोर ! ते डायरने लहूपूर म्हणजे रक्तपूर करून टाकले.

मद्याचा मद चढला की कोणी उपाय सुचवावा. आणखी मद्य घे म्हणजे मद उतरेल, तसेच डायरचे झाले.

गुजराणवाला, लाहोर, अमृतसर हे जिल्हे त्याने सैनिकी अधिकरणात (मार्शल लॉ मध्ये) घेतले.

गोळ्या भरून प्रचंड प्रमाणावर माणसे मारण्याचा उपाय त्यांच्यावर झाला, पण जे जिवंत आहेत त्यांनी धडा घेतला पाहिजे. त्यासाठी डायरने तेथल्या तेथल्या लोकांना ब्रिटिश साम्राज्यातील परतंत्र नागरिकांना स्वामिभक्त बनविणाऱ्या दासशाळा उघडल्या.

तात्पुरते पिंजरे भर वस्तीत उभे केले गेले. भोवती सशस्त्र पहारा. लोक पकडून आणून त्या पिंजऱ्यात कोंबायचे. इतर सर्वांना ते दर्शन दिसले पाहिजे.

मुलांना धरून आणायचे. पंधरा, वीस, तीस फटके मारायचे. कुल्ल्यावर केलेल्या दुखापतीसह आणि ओघळत्या रक्तासह त्यांना सोडून द्यायचे.

हातकडयांनी लोकांना बांधून त्यांना दिवस दिवस उघड्या वाहनांत उन्हात उभे ठेवायचे.

ब्रिटिशांना राहण्यासाठी स्थानिक लोकांची घरे मोकळी करून द्यावयाची.

कोणी कोणासाठी प्रतिभू राहिला असेल तर त्या आरोपीची उपस्थिती हवी म्हणून त्या प्रतिभूची मिळकत उद्ध्वस्त करायची किंवा राजहृत (जप्त) करायची.

रस्त्यांवरून लोकांनी रांगत गेले पाहिजे. ते रांगत गेले नाहीत तर त्यांना धरून तिकटीला बांधून फटके मारायचे.

या सर्व प्रयोगांतून डायरला ब्रिटिश राज्याची घडी स्थिर ठेवायची होती.

केंद्र शासनाने "पंजाब अस्तव्यस्तता चौकशी आयोग" (पंजाब डिसऑर्डरस् इन्क्वायरी कमिटी) नियुक्त केला होता. तो 'हंटर आयोग' या नावाने प्रसिद्ध आहे.

त्या आयोगापुढे साक्ष देताना जनरल डायरने ताठपणाने उत्तरे दिली होती. एक कठोर कर्तव्य त्याने पार पाडले होते. एक गोळी मारण्याचा अधिकार असेल तर तोच अधिकार द्विगुणित, त्रिगुणित, शतगुणित किंवा अनंतगुणित करण्यास त्याला कोणी अडविणार नव्हते.

डायरचे म्हणणे होते की, सर्व समुदाय नाहीसा होईपर्यंत गोळीबार चालू ठेवणे हेही त्याचे कर्तव्य होते. ब्रिटिश शासनाच्या सुव्यवस्थेची त्याने हानी केली काय, असे विचारता त्याने उत्तर दिले, 'तसे काहीच झाले नाही, उलट ब्रिटिश शासनाने त्याचे आभारी असले पाहिजे !'

पंजाब शासनाची डायरच्या कृत्याला अनुमती होती काय, असे विचारले गेल्यावर त्याने सांगितले की असलीच पाहिजे.

अशा रक्तरंजित वातावरणांत एक मुलगा वाढत होता. बालवयात संस्कार भीतीचेही होऊ शकतात किंवा चिडीचेही होऊ शकतात. डायर, जालियनवाला बाग हत्याकांड, ओडवायर ही नावे त्याकाळी घराघरांतून बोलली जात होती. डायर, ओडवायर, ही माणसे जिवंत राहतात ती त्यांच्या सामर्थ्याच्या बलयापेक्षा आमच्या भीतिगंडावर विसंबून, हे अनेकांकडून बोलले जात असे. उधमसिंगचे वय संस्कार ग्रहण करण्याइतपतच कोवळे होते.

लहानपणीच आईवडील निवर्तलेल्या उधमसिंगच्या चरितार्थाची मात्र भ्रांत होती. एका अनाथालयात त्याचे संगोपन झाले.

उधमसिंग वाढत होता तशा आणखी काही घटना त्याच्या कानावर येत होत्या. ओडवायरचा राज्यपालपदाचा अवधी संपला. तो इंग्लंडला परतला. पंजाबातील नरसंहारामुळे डायरइतकाच तोही प्रसिद्धी पावला होता. इंग्लंडमधील मोठ्या आणि राजमान्य वर्गाला ओडवायरविषयी कौतुक वाटत होते. ते कौतुक व्यक्त करण्यासाठी त्याच्या चाहत्यांनी एक निधी गोळा केला आणि वीस सहस्र पौंडांची थैली ओडवायरला दिली.

अर्थ स्पष्टच होता. इतक्या प्रचंड संख्येने नि:शस्त्र लोक मारायला मानवी हृदयापेक्षा कसले तरी वेगळेच हृदय या मानवी शरीरात असले पाहिजे, या धारणेने त्या चाहत्यांना त्या ओडवायरविषयी प्रेम वाटले. हिंदुस्थानातील देशभक्त लोकांना आणखी एक दणका बावा हाही त्यांचा हेतू होता.

ओडवायरने तो निधी समारंभपूर्वक स्वीकारला होता.

उधमसिंगला ही घटना दुखापतीवर मीठ चोळल्यागत झाली. नुसती चरफड

करण्यापलीकडे काही करता येण्याजोगे नव्हते.

दिवस लोटले. वर्षे निघून गेली. या ना त्या प्रकारे उधमसिंगला शिक्षण मिळत गेले.

डायरने गोळीबार करून लोकांचा संहार केला. ज्यांना घाव लागले होते पण जे अद्याप जिवंत होते, त्यांना रुग्णालयात हलविण्याचे शासनाचे एक काम असते. ते करण्याचे त्याच्यावर दायित्व आहे असे त्याला वाटले नाही. त्याच व्रणित स्थितीत त्याने समुदाय सोडला होता. 'रुग्णालये उघडी होती की ! ज्याचे दुखत असेल त्याने रुग्णालयात जायचे असते' असे उत्तर त्याने आयोगाला दिले होते.

व्रणितांवर उपचार करणे हे लोकसेवेचे काम आहे. आपण तसे लोकसेवक होऊ या, असे उधमसिंगला पुष्कळ दिवस वाटत होते. त्या विचाराला पार्श्वभूमी होती डायरच्या या क्रूरपणाच्या वागणुकीची.

पण पुष्कळदा आपल्या मनातील विचार फलद्रूप होतातच असे नाही. दिशा वेगळीच लागते आणि पहिल्या विचारांना मुरड घालावी लागते. उधमसिंगचे तसेच झाले. स्थापत्यशाखेकडे त्याला आपल्या अभ्यासाची दिशा वळवावी लागली.

कोणा ज्योतिष्याने एकदा मुलांचे हात बघण्याचा उद्योग आरंभला. कोणाचा तरी हात हाती घेताच त्याच्याभोवती दहाबारा मुले गोळा झाली. परीक्षेत यश येईल का येथपासून लग्न कधी होईल येथपर्यंतचे प्रश्न त्याला विचारले जात होते.

कुतूहलाने उधमसिंगनेही आपला हात पुढे केला.

पाच मिनिटे हाताचे निरीक्षण करता करता ज्योतिषी त्या मुलांना न कळणारी बडबड करीत होता. गुरूचा उंचवटा आणि बुध यांचा त्रिकोणी रेषेने संबंध आला आहे.

शुक्रावर मंगळाचे नियंत्रण आहे, आयुष्यरेषा दोन ठिकाणी खंडित झाली आहे, हृदयरेषेचा उगम अर्धा इंच वर असला तर मनुष्याला राजाचा योग असतो....

उधमसिंगने सांगितले, शास्त्र म्हणून जे असेल ते तुमच्याजवळ ठेवा. थोडक्यात काही सांगता येते का सांगा.

'विचार,' ज्योतिषी म्हणाला.

'मला काही विचारायचे नाही. हातावरून दिसते ते तुम्ही सांगा.'

'तुला परदेशी जाण्याचा योग आहे ! तिथे तू चमकणार आहेस.'

उधमसिंग हसला, पण मनात. हसला अशासाठी की परदेशी जाणे म्हणजे कोठे सनामहून (सनाम त्याचे गांव) अमृतसरला किंवा अमृतसरहून लाहोरला जाण्यासारखे सहज नव्हते हे कळण्याएवढी बुद्धी त्याला आली होती. पण त्याला ज्योतिष्याचा

उपहासही करायचा नव्हता. 'आणखी काही ?' तो म्हणाला.

'तुला संपत्ती मिळणार आहे.'

'आणखी काही ?'

"पुन्हा बघेन तेव्हा सांगेन." ज्योतिषी म्हणाला.

नियतीची चक्रे कशी किंवा कोणाच्या प्रेरणेने फिरली कोण जाणे ! उधमसिंग याला परदेशगमनाचा योग आला. ज्योतिष्याने केव्हातरी सांगितलेले भविष्य तो विसरूनही गेला होता.

युरोपमधील काही देशांत वास्तव्य करून उधमसिंग रशियाला गेला. तेथील देशी लोकांशी संपर्क करावा, स्थिती विचारावी, हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याविषयी त्यांचे काय प्रयत्न चालू आहेत याची चाचपणी करावी, हा उपक्रम त्याने चालू केला होता. रशियात एका मुस्लिम युवतीशी त्याने लग्नही केले होते.

हिंदुस्थानात असताना एका भाषणासाठी उधमसिंगला शिक्षा झाली होती. हे राज्य उलथून टाकले पाहिजे, त्यासाठी जे म्हणून मूल्य द्यावे लागेल ते देण्याची सिद्धता तरुणांनी ठेवली पाहिजे, असा त्याच्या भाषणाचा आशय होता. 'राजद्रोही भाषण' अशी त्या भाषणाची बर्गबारी केली गेली आणि उधमसिंगला शिक्षा झाली.

शिक्षेत असतानाच त्याला वाटू लागले की, अमुक केले पाहिजे हे जेव्हा आपण सांगतो तेव्हा सांगणारा प्रत्यक्षात कोठे आहे असा लोक विचार करीत असणार. स्वाभाविकच, सांगणारा त्या दृष्टीने काही वाटचाल करीत नाही हे त्यांना दिसले तर ते तेथल्या तेथेच राहणार. म्हणून त्याला वाटले, व्यक्तीच्या त्यागाची एक आयुष्यातील परिसीमा म्हणजे आत्मसमर्पण ! आपली ती श्रेणी आहे का ? ते सिद्ध झाले तर दुसऱ्यांना सांगण्याचा अधिकार ! आपली कृती अनेक स्फूर्तिदायक भाषणांपेक्षा प्रभावी असणार !

एक प्रकारे अंतर्मुख होऊन तो बाहेर आला होता. थोडयाच दिवसांत त्याला परदेशात जाण्याची संधी मिळाली.

दुसरे महायुद्ध चालू झाले होते त्यावेळी उधमसिंग इंग्लंडमध्ये होता. इंग्लंडवर जर्मनीचा ध्वमवर्षाव अनेक ठिकाणी होत होता. मोठमोठचा युद्धनौका बुडविल्या जात होत्या. जगतो आहोत तोवर जीवन, इतकी अनिश्चितता युद्धाच्या छायेत वावरणाऱ्या लोकांना आली होती.

उधमसिंह विचारात होता, कोणता तरी मोठा घास घ्यावा आणि जीवन संपवावे. त्याच्या मनात जालियनवाला बागेच्या नरसंहाराचा करविता मायकेल ओडवायर याला संपविण्याचा बेत येऊन गेला होता. पण त्यापेक्षा अधिक काही करता येईल का

असा तो विचार करीत होता.

मित्रांशी तो कधीतरी थोडीफार चर्चा करीत असे. ओडवायरसंबंधीही त्याने चर्चा केली होती. जगदेव त्याचा एक पंजाबी मित्र होता. त्याला तो म्हणाला, 'नियतीचा न्याय पहा ! ज्याने प्रचंड नरसंहार केला तो सुखासमाधानातच नव्हे, तर विलासात राहात आहे. आणि जे हिंदुस्थानचे खरे स्वामी त्यांची अवस्था दरिद्री राहिली आहे !'

'नियतीपुढे आपण काय करणार ! त्यामुळेच तर नुसते चरफडून स्वस्थ बसावे लागते.'

'जगदेव ! उधमसिंग म्हणाला, 'गोळीबार नियतीने केला की माणसाने ?'

'माणसाने.'

'म्हणजे नियति नियति ज्याला म्हणतात ती अनेकदा मानवच घडवितो; नव्हे कां ?'

'पण माणूस हाही नियतीचाच हस्तक आहे ! हे युद्धच पहा ! माणसाला विशिष्ट बुद्धी झाल्याने त्याने शस्त्रनिर्मिती केली आणि त्या शस्त्रांचा प्रयोग शत्रू मानल्या जाणाऱ्या लोकांवर केला. विजयी झाला तो न्यायी अन् पराजयी तो अन्यायी असे थोडेच म्हणता येईल ? नरसंहारावाचून विजय मिळणार नाही, म्हणून अधिक प्रभावी शस्त्रांची स्पर्धा !'

'तू कुठेतरी गेलास जगदेव, आरंभ केलास माणूस नियतीचाच हस्तक म्हणून आणि शेवट केलास माणूसच नियतीला घडवितो अशा अर्थाचा !'

'जगदेवला विसंगती जाणवली. तो म्हणाला, 'आपण या घटकेला हिंदुस्थानच्या हितासाठी काय करू शकतो हा विचार मी करतो तेव्हा वाटते आपले आजचे अस्तित्व क्षणभंगुर ठरेल ! आपण काही प्रारंभ करण्याचा विचार करू कदाचित्, पण कृतीपूर्वीच या घरावर एखादा ध्वम पडायचा अन् सर्व संपायचे ! म्हणून स्वस्थ बसावे लागते !'

उधमसिंग जगदेवच्या विचाराच्या पूर्वार्धाशी सहमत होत असे. आपले आयुष्यच क्षणभंगुर असेल असे त्यालाही वाटे. मात्र म्हणून स्वस्थ बसावे लागते याच्याशी तो कधी सहमत झाला नाही. त्याने पाहिले होते की, सर्व दिशांनी हल्ले होऊनही इंग्लंडच्या लोकांचे व्यवहार थांबले नव्हते. आपण मरणार अशी निराशा त्यांना आली नव्हती. म्हणून, निदान बरोबर पण उपचार चुकीचे, असे जगदेवचे विचार होते असे त्याला वाटले. ओडवायरविषयीही त्याचे अस्पष्ट बोलणे झाले होते. त्याच्या मरणानेच तो मरणार आहे. आता तो वृद्ध झाला आहे. कुणी या क्षणाला त्याला मारले तर दुहेरी हानी. ओडवायरला महत्त्व मिळेल आणि जो कोणी मारणारा असेल

त्याचे प्राण जातील.

एका पिढीचे अंतर उलटल्याने माणसांत किती शैथिल्य येते, किती भीरुता येते याची चाचणी उधमसिंग करीत असे. त्याच्या मनांत येई, आपण जर काही कृती केली तर हे हिंदुस्थानचा विचार करणारे तथाकथित तरुण आपल्याला कोणते स्थान देतील याची कल्पना येऊ शकते. अकर्मण्यता हा स्थायीभाव आणि अकर्मण्यता लपविण्यासाठी नियतीचे घेतलेले पांघरूण त्याला स्पष्ट जाणवत होते. त्याने निश्चय केला, आपल्याला जे अधिकांत अधिक झेपेल ते करावे, कोणावर विसंबून राहू नये.



मदनलाल धींग्रा (हौतात्म्य १७-८-१९०९)

मार्च १९४० चा पहिला आठवडा होता. उधमसिंगच्या कानावर आले की कॅक्स्टन हॉलमध्ये एशियन सोसायटीची एक प्रकट सभा आहे. त्या वार्तेच्या विवरणासाठी तो वृत्तपत्रे वाचू लागला. कारण आशियाशी संबंध आलेले इंग्रज अशा परिषदांत बोलतात ही पद्धत होती.

उधमसिंगला एक अनुकूल वार्ता मिळाली. मायकेल ओडवायर त्या सभेला येणार होता !

संधी चालंली आहे ! त्याप्रमाणेच स्थानही ऐतिहासिक आहे ! उधमसिंगने विचार केला. तोच कॅक्स्टन हॉल ! मदनलालच्या निषेधासाठी जमलेली अशीच एक सभा !



एम्. पी. टी. आचार्य

तीस वर्षे होऊन गेली होती ! १९०९ ते १९४० ! एकतीस वर्षे ! सावरकरांचा विरोध ! एम्. पी. टी. आचार्य यांची लाठी ! वृत्तपत्रांचा गदारोळ ! मदनलालच्या वक्तव्याची प्रसिद्धी ! 'The Challange' (आव्हान !)

त्या इतिहासामुळे उधमसिंगला पुन्हा पुन्हा वाटले की ओडवायर सभेला आलाच पाहिजे.

नियतीने ओडवायरला सभेला जाण्याची बुद्धी दिली. तो आपल्या केन्सिंटनच्या घरी राहात असे. निघण्यापूर्वी त्याने सांगितले, 'बरे आहे; पाच वाजता चहासाठी मी येईनच !'

ती सभा रॉयल सेंट्रल एशियाटिक सोसायटी आणि ईस्ट इंडिया असोसिएशन या दोन्ही संस्थांनी आयोजित केली होती. अफगाणिस्थान हा विषय होता. सद्य: परिस्थितीत अर्थात युद्धाला तोंड लागलेल्या स्थितीत साम्राज्यांतर्गत कोणत्याही प्रदेशात काही गडबड नको, असा निष्कर्ष काढण्यासाठी ते सर्व प्रयोजन होते.

लॉर्ड झेटलंट अध्यक्ष होता. भाषणे झाली. सभा संपत आली. आभारप्रदर्शन झाले. लोक उठण्याच्या सिद्धतेत होते.

ही संधी साधून उधमसिंग सरळ व्यासपीठाकडे गेला. त्याने छरिका काढली आणि सहा गोळ्या झाडल्या. ओडवायर हे त्याचे लक्ष्य होते. ओडवायरला दोन गोळ्या लागल्या होत्या. त्याचे तत्काळ प्राणोत्क्रमण झाले होते. पाचच्या चहाला घरी पोहोचण्याचे त्याने दिलेले आश्वासन नियतीने थांबविले होते. कारण आयुष्य क्षणभंगुर ठरले होते !

सभा चालू होण्यापूर्वीच उधमसिंगने समोरच्या चौथ्या-पाचव्या रांगेतच स्थान मिळविले होते. तेथूनच त्याला लक्ष्यवेध शक्य होता.

सभा चालू असताना त्याने मनानेच पडताळून पाहिले, पण लक्ष्यावर वर्मी आघात होण्यापूर्वीच आपण पकडले जाऊ अशी त्याला भीती वाटली. तो थांबला. सभा संपता संपता जमेल असे त्याने मनांत ठरविले.

उधमसिंगची योजना सफल झाली. नियतीने त्याला प्रेरणा दिली असेल, पण त्याने नियती घडविली. ज्या माणसाने अधिकारपदामुळेच उन्मत्त होऊन जालियनवाला बागेत आणि अन्यत्र सहस्रावधी देशी लोकांना मारविले त्याला नैसर्गिक मृत्यू येऊ देता कामा नये, हा उधमसिंगचा निश्चय होता. स्वत:चे प्राण त्याने याच एकमेव कार्यासाठी नियुक्त केले होते. नियतीने ओडवायरला जर असंख्य लोक मारण्याची बुद्धी दिली असेल तर मलाही त्याच नियतीने ओडवायरला मारण्याची बुद्धी दिली आहे हा त्याचा स्वच्छ तर्कवाद होता.

दरवाजाच्या दिशेने उधमसिंग जाऊ लागला. त्याला अडविण्याचे काही ब्रिटिशांनी धाडस दाखविले. पण पिस्तुलाची नळी पाहताच ते दूर सरले. एक इंग्रज स्त्री समोर आली. तिने उधमसिंगला अडविले. उधमसिंगने गोळीचा प्रयोग केला नाही. पाठोपाठ आणखी लोकांनी त्याला धरले. आरक्षींनी त्याला स्वाधीन घेतले.

न्यायालयाने नाव उच्चारले - 'उधमसिंग !'

उधमसिंग उभा राहिला - 'नावांत चूक आहे !' तो म्हणाला, 'मला राम महमद सिंग आझाद म्हणतात !'

आपण हे साहस, हे कार्य, हे कृत्य म्हणा हवे तर, सर्व हिंदुस्थानाच्यावतीने, हिंदुस्थानचा प्रतिनिधी या नात्याने करीत आहोत, ही उधमसिंगची धारणा होती. सर्वांचे प्रतिनिधित्व सिद्ध व्हावे म्हणून नावही सर्वव्यापक घ्यावे ही उदात्त भावना त्याने ठेवली होती. मुस्लिमांची फुटीरवृत्ती, हिंदुद्वेषाचा स्थायीभाव अशा उदारतेने नाहीसा होणार नव्हता हा भाग वेगळा. सातआठ वर्षांनीच मुस्लिमांनी हिंदुस्थानच्या भूमीवर मुस्लिमस्थान मिळविले. हिंदूंच्या भ्रांत आणि घातक नेत्यांनी ते देऊ दिले. पण उधमसिंगची भावना मात्र मुस्लिम समाजाच्या वतीनेही हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान होत आहे हे दाखविण्याची होती.

दि. १३ मार्चला झालेल्या ओडवायरच्या अभियोगाचे काम अठरा दिवसांनी म्हणजे २ एप्रिल १९४० ला प्रारंभ झाले. त्यांत काही गोष्टी समोर आणल्या गेल्या. उधमसिंगच्या दैनंदिनीत रोख लेखा-कॅश-अकाऊंट- या पानावर ओडवायरचा ठिकाणा लिहिलेला होता.

सर एम्. ओडवायर सनीबँक थर्लस्टोन साऊथ डेवन १९४० च्या दैनंदिनीतील नोंदीप्रमाणेच १९३९ च्या दैनंदिनीतही तो ठिकाणा लिहिलेला होता.

उधमसिंगला पकडले तेव्हा त्याच्याजवळ ६ गोळ्यांची चक्री छरिका मिळाली, ती. ४४५ व्यासाची होती. ती ब्रिटिशांच्या सैन्यासाठी अमेरिकेने पंचवीस वर्षांपूर्वी बनविलेल्या घडणीतील होती. त्याव्यतिरिक्त उधमसिंगजवळ पंचवीस गोळ्या होत्या, आणि एक सुरा होता.

आपल्या उत्तरात उधमसिंगने तीच निर्भयता दाखविली. होय ! मी ओडवायरला ठार मारले ! मला कारण होते. त्या माणसाविषयी माझ्या मनांत भावना कोणती असेल तर ती प्रतिशोधाचीच ! ओडवायरला ते प्रायश्चित्त हवेच होते !

मरणाची मला कसली भीती ! मला त्याचे काही वाटत नाही ! (I do not mind dying) जगत जगत म्हातारे होऊन जायचे यात काय अर्थ आहे ! वाट कसली बघत राहायची ! तरुण असतानाच मरण स्वीकारण्यात आनंद असतो ! तेच मी करीत आहे ! माझ्या देशासाठी माझे बलिदान आहे !

ओडवायरसह आणखी कोणी क्रूरकर्मा मिळाला तर बघावा ही उधमसिंगची इच्छा होती. त्याने तसा प्रयत्नही केला होता. झेटलंडच्या रोखाने त्याने दोन गोळ्या सोडल्या होत्या. पण उधमसिंगची छरिका होती त्यापेक्षा पांच वर्षे पूर्वीच्या गोळ्या होत्या. त्यातील काही ढिल्या बसत होत्या. मदनलाल धिंग्राच्या वेळच्याच ! पण तो योग होता ! त्यामुळे झेटलंडला गोळ्या लागू शकल्या नाहीत. उधमसिंगला वाटले मात्र की झेटलंडला गोळ्या लागल्या म्हणून. त्याने आपल्या उत्तरांतच विधान केले, 'लॉर्ड झेटलंड मेला की नाही ? मेलाच असला पाहिजे. मी त्याच्याही पोटात दोन गोळ्या घुसविल्या होत्या !

बो स्ट्रीट पोलीस कोर्ट या न्यायालयांत दि. २१-४-१९४० ला उधमसिंगवर मायकेल ओडवायरच्या वधाचा आरोप ठेवला. तत्पूर्वी आरक्षी अधिकाऱ्यांनी उधमसिंगला स्वाधीन घेतले तेव्हा तसे त्याला सांगितले होते. त्यावर उधमसिंग म्हणाला, 'आता ते सर्व अनावश्यक आहे. म्हणजे तुम्ही स्वाधीन ठेवणे, चौकशी करणे, न्यायालयाचे प्रयोजन, न्यायालयाने शिक्षा सुनावणे हे सर्व सोपस्कार कामाचे नाहीत ! त्यांत कालापव्यय तेवढा आहे. माझे काम झाले आहे.

'या ब्रिटिश राज्यात हिंदुस्थानांत लोक भुकेने मरत आहेत ! मी विरोध दर्शविला

तो याही कारणासाठी ! मला त्याचा यत्किंचित पश्चात्ताप नाही !' जनरल डायरने चौकशीच्या वेळी जसे उत्तर दिले होते, माझे एक कर्तव्य म्हणून मी गोळीबार केला, त्याच शब्दांत पण न्याय्यपणेच उधमसिंगने सांगितले. 'माझ्या देशासाठी असे कार्य करणे हे माझे कर्तव्यच होते.'

पुढे तो म्हणाला - 'परिणामाची मला भीती नाही. तो प्रश्न माझा नाही. तुम्ही मला दहाबीस नाहीतर पन्नास वर्षांची शिक्षा द्या, नाहीतर फाशी द्या !'



सरदार उधमसिंग

न्यायालयांत एक नाट्यमय प्रकार घडल्याचे सेवाराम गुप्त यांनी नोंदवून ठेवले आहे. ज्या महिलेने उधमसिंगला कॅक्स्टन हॉलच्या दारातून बाहेर जाताना अडविले होते ती न्यायालयाच्या अनुज्ञेने पुढे आली आणि तिने उधमसिंगला प्रश्न विचारला,

'तरुणा ! तुला मी अडविले तेव्हा तू माझ्यावर गोळी कशी नाही चालविलीस ! किंवा तुझ्या त्या सुऱ्याचा प्रहार कां नाही केलास ? तू सहज निसटून जाऊ शकला असतास !'

त्या स्त्रीच्या अडवणुकीने उधमसिंगच्या हिंदूसंस्कृतीला जसे आव्हान होते तसेच या प्रश्नानेही होते. न्यायालयाला त्याने आधीच सांगितले होते की बचावाला मला काही सहाय्य नको आहे. या प्रश्नालाही त्याचे तेच उत्तर होते. तो म्हणाला, 'देवी !

आम्ही हिंदू लोक स्त्रियांविषयी आदर बाळगतो ! त्यांचा अनादर मातृभूमीचा अनादर आहे अशी आमची धारणा आहे ! तुला मारून मला आणखी श्रेय काय मिळवायचे होते ! माझे काम झाले होते !'

त्या विनम्र उत्तराने पुरे न्यायालय भारावून गेले होते !

इकडे हिंदुस्थानात तत्कालीन नेत्यांत एक स्पर्धा लागली होती. उधमसिंगच्या 'हिंसाचाराचा' निषेध अधिकाधिक कोण करतो. त्याच दिवसांत स्वा. सावरकरांचे शनिवारवाड्यासमोर प्रकट भाषण झाले. त्यांत त्यांनी उधमसिंग यांचा गौरवाने उल्लेख केला होता.

ओल्ड बेली सेंट्रल क्रिमिनल कोर्ट या न्यायालयाने फाशी सुनावली. हिंदुस्थानच्या दंडाग्रणि पुढाऱ्यांकडून निषेधला गेलेल्या या मातृभक्ताचे दि. १२ जून १९४० या दिवशी हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान झाले.

❀❀❀

॥ ९ ॥ मुकुंद ! मीही येते !

हिंदुस्थानच्या नव्या राजधानीत हत्तीवरून मिरवत जाणाऱ्या ब्रिटिश सत्तेला क्रांतिकारकांनी हादरा दिला ! अनेक तरुणांनी आत्मार्पण केले.

भाई मतिदास यांच्या वंशातील बालमुकुंद नवविवाहित होता. त्याच्या आत्मार्पणापाठोपाठ लाजवती अनशनाने सती गेली.

"केव्हा उठतां ?"

"सकाळी सहाला."

"झोप लागते ?"

"डासांची पोटे रक्त पिऊन भरली म्हणजे बहुधा ते झोपी जातात. मग आम्हाला झोप लागते."

"चारपायी कसली देतात ? काथ्याची की नवारीची ?"

"चारपायी ? अग, इथे चारपाईचे काय काम ? कांबळे भुईवर टाकले की चारपाईसारखाच अलगदपणा येतो."

"खुपत नाही कांबळे ?"

"पहिल्या पहिल्याने खुपायचे; टोचायचे. पण आता बहुधा शरीरच कांबळ्याला खुपत असेल. इतके ते मऊ पडले आहे ! सुतासारखे !"

बालमुकुंद आपल्या त्या बोलल्याच्या ओघांत निर्माण झालेल्या विनोदाला हसला. लाजवतीने एरवी

प्रतिसाद दिलाही असता, पण तिच्या मनावरचे पुढचे प्रश्न ओळीत उभे होते, त्यांना वाट हवी होती. तिने विचारले, "चप्पल दिसत नाही कुठे ?"

"अग, इथे कुठे फिरायला का जायचे असते ?"



हुतात्मा बालमुकुंद

"जेवण कसे असते ?"

"हे बघ !" बालमुकुंदने खोलीच्या बाहेर भिंतीलगत ठेवलेल्या कटोऱ्याकडे निर्देश केला. पाठोपाठ तो उठला. कटोरा आणि थाळी घेऊन आला. उडदाची थोडी डाळ कटोऱ्याला लागली होती. अर्धी भाकरी थाळीत उरली होती. तो म्हणाला, "ही भाकरी पाहिलीस का ? चांगली आहे. गव्हाच्या पिठात थोडे डाळीचे पीठ घालून केली आहे."

"पण मग यांत काळे काळे काय आहे ? घरच्या भाकरी अशा नाही होत." लाजवती म्हणाली.

"इथे किनई, हरभरेच दळतात. त्यांच्या सालासकट. सालात सत्त्व असते ना, म्हणून !"

कदन्नाचे हे समर्थन लाजवतीने मुकाट्याने ऐकले. बालमुकुंदचा स्वभाव तिला ठाऊक होता. एकदा त्याच्या हाताला एक दुखापत झाली होती. रक्त वाहिले. प्रसंग

चोरटा होता. डॉक्टरकडे जाण्याची सोय नव्हती. घरगुती उपचार केले गेले. कासावीस झालेल्या लाजवतीचे त्याने सांत्वन केले. 'अग, शरीरांत रक्त अधिक झाले ना की, निसर्गच कुठून तरी रक्ताला अशी वाट देतो. त्यात वाईट वाटण्यासारखे काय आहे ?' स्वत:च्या वेदनांची त्याला क्षिती नव्हती. तीच गोष्ट या कदन्नाच्या समर्थनात होती.

लाजवतीने धाडस केले. म्हणाली, "मला ती अर्धी भाकरी द्या."

बालमुकुंदने बंदिपालाकडे पाहिले. त्याने दृष्टीनेच अनुमती दिली.

बालमुकुंद उठला. हातकड्यांनी बांधलेले हात थाळीपर्यंत पोहोचवून उजव्या हाताने त्याने भाकरी उचलली. "घे" तो म्हणाला, "चांगली आहे."

"चांगली आहे हे कशाला सांगता ?" लाजवती म्हणाली.

"अग, म्हणजे उष्टीमाष्टी नाही. आधीच काढून ठेवतो मी !"

लाजवती म्हणाली, "तशी असली तरीही मला ती हवी आहे ! प्रसाद म्हणून !" तिने भाकरी आपल्या पदरात बांधून घेतली.

"लाजवती !" बालमुकुंद म्हणाला, "हेच प्रेम तू मला दिले आहेस ! जे काही माझे धाडस असेल त्याचा कणा शोधू गेले तर तो तुझे भक्तिपूर्ण प्रेम हा आहे !"

लाजवतीच्या डोळ्यांतून खळकन पाणी ओघळले.

"गहिवरून मी यायचे लाजू ! किती भाग्यवान मी ! आपली जोडी किनई, कुणालाही हेवा वाटावा अशी आहे ! आणि त्यागही !"

"माझा कसला त्याग ! सर्वस्व तुम्ही वाहिलेत !"

"नाही लाजू, सर्वस्व हे माझ्या देहापुरतेच मर्यादित नाही ! त्यात तू आहेस. इतकेच नव्हे, तर आपली न जन्मलेली पिढीही आहे !"

पुन्हा लाजवतीच्या डोळ्यांत पाणी तरळले !

बालमुकुंद बोलू लागला, "भर तारुण्य आपण या यज्ञांत लोटून दिले, उभा संसार ! होणारा संसार ! जे जे म्हणून प्रिय असेल ते त्यागले. लालसा कसली धरली नाही. कल्पना कर, इतका उच्च त्याग करण्याचे भाग्य कोणाला लाभले तर ते सुदैव नव्हे का ? सौभाग्य नव्हे का ? त्या सौभाग्यात आपले ऐहिक मरण असेल, पण त्या मरणांतच आपले अमरत्व आहे !"

लाजवतीने डोळे पुसले. तिच्या मनांत विजेसारखी कोणती तरी भावना थरारून गेली. क्षणभर तिला त्या भावनेने हदरवले, पण दुसऱ्याच क्षणी ती स्थिर झाली. ती म्हणाली, "किती सुंदर बोललात तुम्ही ! खरोखरच मला जे अंतरमनात केव्हातरी वाटले असेल त्याची तुम्ही व्याख्या केलीत. विश्वास ठेवा ! तुम्हाला हा सर्वस्वाचा त्याग जितका जितका म्हणून निर्भय वाटतो तितकाच तो मलाही वाटेल !"

"लाजू ! प्रियतमे !" बालमुकुंद पुढे बोलला नाही. पुढचा शब्द फुटणार नाही, रुद्ध गळ्यातून गहिवराचा बुडबुडा वर येईल अशी त्याला भीती वाटली.

"बरे आहे. पुन्हा भेटू. कुठे बरे ? कुठे बरे ?" असे म्हणून बालमुकुंदने बेड्यांनी जखडलेल्या हाताने निरोप घेण्याचा संकेत केला.

लाजवतीने दुःखावेग दाखविला नाही. तिच्या मुद्रेवर स्मितरेषा उमटली होती. तिने आकाशाकडे संकेत केला. 'स्वर्गात' तिला त्या संकेताने सूचित करायचे होते.

"येते हं !" असे म्हणून तिने निरोप घेतला.

भेट संपली.

लाजवतीला खिन्नपणा येणे हेच स्वाभाविक होते. कसे कोणास ठाऊक, ती सावरली होती. इतकेच नव्हे, तर आतल्या आत तिला कसला तरी उल्हास वाटत होता. हा उल्हास दाखविणे मात्र विचित्र वाटले असते. त्यामुळे सहज वाटणाऱ्या खिन्नतेचे आवरण तिने आपल्या मुद्रेवर घेतले होते.

बंदिगृहाबाहेर लाजवतीचा आतेभाऊ उभा होता. या मुलीचे दुर्भाग्य पाहून त्याचे मन करुणेने ओथंबले होते.

टांग्यातून परतताना त्याने विचारले, "भेट झाली रामरखी ?"

"हो."

पुढे बोलणे झाले नाही. रामरखी या संबोधनातूनच लाजवती भूतकाळांत मग्न झाली.

२

रामरखीचे आई-वडील तिच्यासाठी स्थळे बघू लागले होते. आर्य समाजाच्या प्रयत्नामुळे स्त्रियांना हिंदी लिहिणे-वाचणे शिकविले जाऊ लागले होते. रामरखीने अक्षरओळख करून घेतली होतीच. पण त्या आधाराने ती मिळतील ते हिंदी ग्रंथ वाचण्याचा प्रयत्न करीत होती.

रूपाने ती सुंदर होती. त्यात यौवनावस्था येत असलेली.

काही मुलांची स्थळे बघता बघता बालमुकुंदचे स्थळ जमेल असे दिसू लागले. त्याच्या घराविषयी रामरखीच्या घरांत चर्चा होऊ लागली. मुलगा चांगला आहे. सुस्वरूप आहे. सुशिक्षित आहे. या चर्चेने रामरखी लज्जित होत असे. पण या चर्चेला जोडून भाई मतिदास यांचाही विषय निघत होते.

भाई मतिदास यांची कथा रामरखीने तिच्या वडिलांकडून ऐकली होती.

साखळ्यांत जखडलेल्या हिंदू सेनानीला आणि त्याच्या सैनिकांना औरंगजेबाची दमदाटी चालू होती -

हे कुराण; हे कृपाण, बोल पुनरपि,
कुफरा हो मुसलमान, वाचशी तरी !

औरंगजेबाला त्याहीपेक्षा ठाशीव स्वरांत उत्तर मिळत होते -

धर्मान्धा ! य:कश्चित सैनिके दिले
ज्याच्या ना कवडीचे मोल कुराणा
सेनानी तो स्वयेचि घालणार का
मूढा तव भीक भीतिशी अशा खुळ्या ?

आणि त्यावर तो कसायांचा अधिपती, ज्याला बादशहा म्हणत तो उसळून उठे,

"सचमुच क्या ऐसा है ?" आणि आपल्या तांड्याला, त्या कसायांना आज्ञा देत असे -

जाबोची तरि सेनानीप्रती तया
सेनेहुनि अधिक सभादर समर्पिला
तो कुराण फेकी ? तू फेक कृपाणा
आणी जा तीक्ष्णाग्रा सांडसाग्रती
लोहाच्या लाल तापवून आण जा ।

ज्या आज्ञेसरशी लोखंडाच्या सळ्या तापवून आणल्या जात. हिंदुवीरांच्या मांसातून त्या घुसविल्या जात. प्रत्येक आघाताचे वेळी विचारले जाई -

होशी का मुसलमान ? वाचशी तरी ! आणि जिभेत शक्ती असेपर्यंत तितकेच तीक्ष्ण, तितकेच तापलेले, तितकेच कणखर उत्तर औरंगजेबाच्या कानातून त्यांच्या हृदयांत घुसविले जाई -

हिंदुधर्म मंगलार्थ मरण मी वरी ।
हिंदू मी, शीख अम्ही मरण मी वरी ।

त्या मुस्लिम अधर्म प्रचारासाठी हिंदू शरीरांना जिवंतपणी छिन्नविच्छिन्न करण्याच्या अनेकविध बादशाही प्रकारातील एक प्रकार होता - माणूस डोक्यापासून करवतीने चिरत नेण्याचा, प्रत्येक फेऱ्यागणिक त्याला विचारण्याचा, मुसलमान होतोस ? जीवदान मिळेल !

भाई मतिदास यांच्या वाट्याला ती करवत आली होती.

रक्ताची धार उडे वरि उफाळुनी
करवतल्या शीर्षातूनि शब्द उमटती
मरणाला कोण भितो ? धर्म मी स्वत:
धर्मांची तुज भीती रे अधर्मका ।

लाकडी चौकटीत जखडबंद केलेल्या मतिदासाचे डोके चिरले जात जात कंठ दुभंगला, छाती दुभंगली, पोट दुभंगले. हिंदू शरीरांच्या रक्तमांसाच्या लक्तरांतून औरंगजेब आपल्या मुस्लिम धर्माची संस्कृतिशील उन्नती बघत होता !

दिल्लीच्या मोगल बादशहाला आव्हान देणारा हिन्दुवीर मतिदास ! धर्मासाठी मरण स्वीकारणारा मतिदास !

ते वर्ष होते १६७५. स्थळ होते दिल्लीतील चांदणी चौक !

दिनांक ९ नोव्हेंबर अन्यवीरांचा अंत. भाई सतीदासचे मांस ओरबाडून त्याला ठार मारले. भाई दयालदासला उकळत्या तेलांत मारले १०-११-१६७५. गुरु तेगबहादरचा प्रथम छळ करून मग शिरच्छेद केला ११-११-१६७५. अन्य सहकाऱ्यांनीही मरण पत्करले. उपद्रवी अंधश्रद्धांना 'धर्म' समजणाऱ्या इस्मामला ठोकरले.

कथा ऐकतांना एकीकडे मतिदासच्या धीरोदात्ततेने रामरखीचे बालमन अभिमानाने भरून येई आणि दुसरीकडे असे दुष्ट बादशहा जिवंत कसे राहिले ? मोगली राज्य उद्ध्वस्त कसे नाही केले गेले याचा तिला विषाद वाटे. क्रूरकर्मा औरंगजेबाची चीड तर प्रत्येक क्षणाला तिला अस्वस्थ करी.

बालमुकुंदचा संबंध होणार आहे अशा अवस्थेत जेव्हा तिच्या बडिलांनी सांगितले की, भाई मतिदास म्हणजे बालमुकुंदचा खापरपणजा, तेव्हा तर तिला वाटले आणखी स्थळ बघणे नको. तिला वाटे ज्या घरात असे वीर पुरुष जन्मतात त्या घराण्यात आपला संबंध अनायासे होत आहे. रक्तातील गुण प्रसंग येताच आपले तेज दाखवितो ही तिची धारणा होती.

रामरखी आणि बालमुकुंद यांचा विवाह झाला. तिचे नाव लाजवती ठेवले.

३

क्रांतिकारक म्हणजे स्वराज्याच्या दिशेने निर्माण केल्या जाणाऱ्या झंझावाताचे उगमस्थान ! बालमुकुंदचे त्या उगमस्थानाशी इतके जवळचे नाते असेल याची कल्पना लाजवतीला लग्नानंतर आली.

बालमुकुंद शिक्षक होता. लाहोर येथे त्याचे वास्तव्य असे. पण कधी जोधपूर, कधी दिल्ली, कधी फेरोजपूर अशी त्याची फिरती चालत असे. स्वत:साठी त्याने बेगळी खोली घेतली होती. लाजवती त्या खोलीवर अधूनमधून जात असे.

उन्हाळ्याचे दिवस होते. मे महिना, वर्ष १९१३. दह्याची बरणी घेऊन लाजवती तिच्या चुलत सासरी जात होती.

मुकुंद दोन दिवसापूर्वी गावाला गेला होता. दिल्लीला काम आहे, असे त्याने

लाजवतीला सांगितले होते. थोड्या विरहाचीही हुरहूर नवविवाहितात असते. तिला वाटले मुकुंद आपल्याला खोलीवर भेटावा ! तो दिल्लीहून आलाही असेल आणि खोलीवर थांबला असेल.

खोलीचे दार तिने किलकिले पाहिले. मुकुंद आला आहे तर ! तिच्या मनांत आले, एकदम दार उघडावे अन् रागावून विचारावे, घरी का नाही आलात म्हणून ! रात्रभर मी तुमची स्वप्ने बघत होते. तुम्ही इथेच होतात आणि घरी आला नाहीत !



हुतात्मा अमीरचंद

ती दारापाशी पोहोचली. क्षणभर थबकली. दोघे तिघे बोलत असावेत असे शब्द कानावर आले.

लाजवतीने कडी वाजविली. प्रसन्न हास्य घेऊन बालमुकुंद दारात उभा राहिला.

लाजवतीचा राग विसरला, विरला.तीने स्मिताने प्रतिसाद दिला.

'ये लाजू !' तो म्हणाला, 'आताच अर्ध्या तासापूर्वी आलो. अवध बिहारी आणि अमीरचंदही बरोबर आले होते. म्हणून खोलीवर पहिल्याने आलो. घरी निघणारच होतो लगेच.'

लाजवतीला स्पष्टीकरण मिळाले. तिच्या मनांतील प्रश्न बहुधा बालमुकुंदने मनानेच

जाणला होता असे तिला वाटले. ती खोलीत आली.

अवधबिहारीने स्वागत केले, 'ये वहिनी.' ती अवधबिहारीला ओळखत होती. अमीरचंदचे नाव बालमुकुंदच्या बोलण्यातून येत असे. पण तिने त्याला पाहिले नव्हते.

एका ताटात मठ्ठा ठेवून तिघांचा फराळ चालला होता. (मठ्ठी मैद्याची खारी पुरी)

'वहिनी, मठ्ठी खाणार ?' अवध म्हणाला.

"नको. मी खाऊन निघाले आहे."

अवध बिहारीने बरणीकडे दृष्टी ठेवून लाजवतीला म्हटले, "वहिनी, मी एक टटोला मारु ?" ("मी एक तर्क करू ?")

"जी हाँ !"

"बरणीत दही आहे !"

"मोठेच आश्चर्य !" लाजवती म्हणाली, "अशा बरण्या दह्याच्याच असतात !"

"पण काहीही ठेवता येते त्यात ! या घटकेला दही आहे ! खरे की नाही ?"

अमीरचंद म्हणाले, "पुरावा प्रत्यक्ष पाहिजे !"

लाजवतीने बरणी उघडली. एक कटोरी घेतली. कटोरीभर दही काढले. कटोरी त्यांचे ताटाजवळ ठेवली !

मठ्ठी आणि दही संपू लागले.

"खरेच, साखर असती ना, तर सुरेख लस्सी बनविली असती !" अवध म्हणाला, "दिल्लीची डाळ आणि लाहोरची लस्सी !"

बालमुकुंदने आवर घातला, "लाड पुरे झाले अवध ! घड्याळाकडे लक्ष आहे का ?"

मुकुंदकडे बघून लाजवती म्हणाली, "मी निघू ?"

"बैस की थोडा वेळ."

"भाईच्याकडे निघाले होते मी. जाता जाता, अवध भावोजीच्या शब्दांत, टटोला मारला; वाटले तुम्ही आला असाल ! म्हणून थोडे वळण घेऊन पाहिले तो तुम्ही होतातच ! दही द्यायचे आहे तिकडे."

"बैस. मीही येईन बरोबर." मुकुंद म्हणाला.

"मुकुंद, मुकुंद ! घड्याळाकडे लक्ष आहे ना ?" अवधने घाव परत केला.

किलकिले दार सताड उघडले गेले. भाई आत आले होते. लाजवतीकडे बघून त्यांनी मोठा नमस्कार केला. "मला वाटलेच वहिनी, वाटेवर खोली आहे तिथे तुम्ही दोघे मिळून येणार आणि घरी दही पोहोचण्यास दहा बाजणार !"

भाई म्हणजे भाई परमानंद. बालमुकुंदचे चुलत भाऊ. त्या दोघांचे विशेष सख्य

असे.



भाई परमानंद

लाजवती म्हणाली, "भाऊजी तुमचेही लग्न होणार आहे हं ! काचेच्या घरात राहणाऱ्याने दुसऱ्याच्या घरावर दगड मारू नयेत !"

"चल लाजू, आपण जाऊन येऊ या. भाई तू इथेच थांब. मी पाच मिनिटांत येतो." बालमुकुंद म्हणाला आणि ते दोघे बाहेर पडले.

"लाजू, मी आज जेवायला घरी येऊन गेलो एवढेच सांगायचेरस. मी बाहेर जेवणार आहे. तुला आणखी सांगायचे कारणच नाही.

"लाजू थोडी कष्टी झाली. ती म्हणाली, "आज मी किनई तुमच्यासाठी आलू परोठे करणार होते."

"अग, मी रात्री खाईन. आणि हे बघ," असे म्हणून मुकुंदने खिशातून एक डबी काढली. तिच्या हातात देत तो म्हणाला, "आपल्या कपाटात ठेव हं !"

लाजवतीने डबी उघडली. केवड्याच्या अत्तराची कुपी होती ती ! तिला अतिशय आवडणारा वास ! जणू सुगंध दरवळला आहे अशा भावनेने तिने श्वास घेतला. तिच्या मुखावर प्रसन्नतेचा तरंग रेंगाळत राहिला. बालमुकुंदला फार फार समाधान वाटले.

"येऊ मी ? एवढेच सांगण्यासाठी तुला भेटायचे होते मला. आता आपण रात्री भेटू हं !" असे म्हणून त्याने तिचा हात दाबला "रात्री भेटायचं हं." लाजवतीने आतुर वाणीने दुजोरा दिला आणि हात सोडवून घेत ती चालू लागली.

४

लाजवतीचे परोठे गार होऊन गेले होते. शयनगृहांत तिने अत्तराची कुपी उघडून ठेवली होती. मंद वास तिच्या श्वासासह जाणवत होता. बालमुकुंद आला नव्हता.

तो लाहोरला परतला आहे हेही तिला घरी बोलायचे नव्हते. विरह तिचा तिलाच सहन करायचा होता. मुकाट्याने कोणास काही न बोलता. रात्र उलटून गेली होती. पहाटे पहाटे लाजवतीला थोडी झोप लागली होती. तिला स्वप्न पडले होते.

कोणा नदीच्या काठावर ती आणि बालमुकुंद गप्पागोष्टी करीत आहेत. नदीला एकाएकी महापूर आला आहे. ते परतू बघत आहेत तो सर्वदूर पाणीच पाणी झालेले. ते बसले होते तेवढा भाग बेट बनला होता.

मुकुंद तिचा हात धरून उतार शोधीत त्या पाण्याच्या बळ्यातून बाहेर पडत होता. एक मोठा लोंढा आला आणि मुकुंदला त्या लोंढ्याने वाहून नेले."

लाजवती थरारून जागी झाली. तोवर उजाडले होते. व्यवहार चालू झाले होते.

स्वप्नावर विचार करण्यास तिला सवड मिळाली नाही. बाहेर गलबला चालू होता. लोक दबून दबून काहीतरी बोलत जात होते. खिडकीजवळ उभे राहून लाजवतीने कान दिला.

गॉर्डन, चपराशी, बॉंब, जिमखाना क्लब, लॉरेन्स गार्डन, मॉंट गोमरी हॉल, असे असंगत शब्द तिच्या कानावर येत होते. थोड्या प्रयत्नाने तिला कळले की कोणी गॉर्डन नावाचा चपरासी बॉंबने मेला.

गॉर्डन नाव तर इंग्लिश वाटते आणि तो चपराशी कसा ? न जाणो बालमुकुंदाचा तर काही कोठे संबंध नाही ? पण कालच ती त्याला खोलीवर भेटली होती. काल म्हणजे दि. १७ मे १९१३. पण ही घटनाही कालचीच होती ! पुन्हा तो जेवायलाही आला नव्हता. पण घरीच जेवलो असे सांगण्यास सांगितले होते. तिचे मन शंकित झाले.

आन्हिक आटोपून ती लगबगीने बालमुकुंदच्या खोलीकडे निघाली.

खोलीचे दार किलकिले होते. ती दाराजवळ गेली. हळूच दार उघडले. पाहिले तो आत कोणीच नव्हते. तिच्या पोटात धस्स झाले !

थोडा वेळ थांबावे, खोली उघडी आहे याचा अर्थ बालमुकुंद जवळपास कोठेतरी

आहे असे तिला वाटले.

पाच मिनिटे ती थांबली. तेवढ्या वेळात पहाटेच्या स्वप्नाचे धागे तिला विव्हळ करू लागले.

एक तरुण मुलगा दार उघडून आत आला.

"लाजवती भामी" तो म्हणाला.

"होय"

"ही चिट्ठी घे" असे म्हणून त्या तरुणाने हात पुढे केला. लाजवतीने चिट्ठी वाचली.

"तातडीच्या कामासाठी दोन दिवस
परगांवी गेलेलो आहे. खोलीला
कुलूप लावणे. दारावरील फळीवर
कुलूप सापडेल.
काल दुपारी मी घरीच जेवण्यास
होतो. बारा ते दोनपर्यंत थांबलो होतो."

मुकुंद

"मी तुम्हाला कुठेतरी पाहिले आहे. कुठे बरे ?" लाजवती त्या मुलाकडे वळून म्हणाली.

"तुमच्या लग्नांत" त्या मुलाने उत्तर दिले.

"नाव ?"

"वसंत."

"वसंत बिश्वास ?"

"होय."

"हे कुठे आहेत ?"

"मला खरेच ठाऊक नाही."

"सुरक्षित आहेत ?"

"होय, अगदी सुरक्षित."

"कालची काय वार्ता आहे गावभर ?"

"संध्याकाळी कळेल काय ते. अद्याप नेमके काही कळले नाही. मी येतो आता. तू निश्चिंत रहा."

वसंत बिश्वास निघून गेला. बालमुकुंद सुरक्षित आहे. एवढ्या शब्दाने लाजवतीला धीर आला.

पंधरावीस पावले गेलेला वसंत परत आला.

"भाभी, ती चिट्ठी दे मला."

लाजवतीने ती चिट्ठी पुन्हा वाचली आणि ती वसंत जवळ दिली. वसंतने चिट्ठीचे तुकडे केले आणि तुकड्यांची गोळी केली. तो निघून गेला.

लाजवती खोलीला कुलूप घालून घरी परतली. परततांना ती घोकत होती, काल दुपारी बारा ते दोन बालमुकंद घरी होता.

दुपारपासून आरक्षी दलाच्या (पोलीस फोर्सच्या) हालचाली डोळ्यात भरण्यासारख्या होत्या. आगीच्या ज्वालांचा धूर निघावा त्याप्रमाणे कोठे झडती, धरपकड झालेली असली की त्या वार्तेचे लोण थोड्याच वेळांत दूरवर पसरावे. तर्कातकनि आरक्षी कोणाकोणाच्या घरावर धाड घालीत होते. अनेकांना पकडून नेत होते. पण झालेल्या घटनेला उत्तरदायी व्यक्ती त्यांना मिळाल्या नव्हत्या.

नेमके काय झाले आहे हे कळण्याची लाजवतीला उत्सुकता लागली होती. वार्तेच्या उत्सुकतेपेक्षांही बालमुकुंदचा हात कोठे दूरान्वयाने अडकलेला नाही ना, हे तिला हवे होते. तिला येऊन जाऊन अधिक वृत्त मिळाले ते एवढेच की, गॉर्डन वेगळा आणि चपराशी वेगळा. पण ते दोघे मेले, की एक मेला, हे तिला कळले नाही.

दिवेलागणीची वेळ होती. ती पाठम्होरी असताना तिच्या कानावर हाक आली, 'लाऽजूऽ !'

तिने वळून पाहिले. दोन दिवस गावाला जात आहे अशी चिट्ठी ठेवणारा तिचा बालमुकुंदच उभा होता. जाऊन एकदम मिठी मारावी असे वाटण्याइतपत ती भावाकुल झाली. परिसर तिला तसे करू देईना ! तिच्या डोळ्यांतून अश्रू येऊ लागले.

बालमुकुंदने तिची स्थिती जाणली. एकान्त साधून तो म्हणाला, "लाजू, आज खोलीवर जाऊ आपण झोपायला."

लाजवतीला तेच हवे होते. स्वप्नापासून सत्यापर्यंत तिच्या हृदयांत साचून राहिले होते ते तिला बोलायचे होते.

लाजू लगबगीने चौक्याकडे (स्वयंपाकघरातला स्वयंपाकाचा चौथरा) गेली. बटाटे उकडले. सारण केले आणि आलू-परोठे करून सर्वांना वाढले. जेवताना कोणी काही आजच्या घटनेबिषयी बोलत नव्हते. नाही म्हणायला तिचे सासरे बोलून गेले, चपराशी मेला हे वाईट झाले. तितकेच गॉर्डन वाचला हेही वाईट झाले.

कोणी प्रतिसाद दिला नाही.

५

"मुकुंद ! किती विवंचनेत टाकतोस तू मला ?" लाजवती मुकुंदच्या गळ्यांत

पडून सुंदू लागली.

"लाजू ! मला जाणीव आहे. म्हणूनच तर माझा प्रवास स्थगित करून मी आजच आलो ! नाही का ?"

"बरे, मला सांगणार का काय काय झाले ?"

"हो ! म्हणून तर इकडे आलो आपण ! पण त्यापूर्वी तू मला सांग किल्ली मागायला आणखी कोणी आले होते ?"

"नाही."

"घरी कोणी मला भेटायला ?"

"नाही."

"जवळपास कोठे झडती ?"

"जवळपास नाही, पण तीन गल्ल्या सोडून जगदीश सेठीच्या घरात झडती झाली. दोन मुलांना पकडून नेले."

"आता तू विचार" बालमुकुंद म्हणाला.

"गॉर्डन नाव ऐकले. हा कोण आहे ?"

"हा कसूर येथे बदलून आलेला ब्रिटिश अधिकारी. तो आज जिमखाना क्लबवर येणार होता. क्रांतिकारक त्याच्या मागावर होते." (कुशपूरचे कसूर झाले आज पाकिस्तानांत)

"का ?"

"त्याने बंगालमध्ये मौलवी बाजार या ठिकाणी आपल्या लोकांवर, क्रांतिकारकांवर अत्याचार केले होते."

"चपराशी कसा मेला ?"

"गॉर्डन ज्या बाटेवरून येणार होता असे कळले त्या बाटेवर बॉंब ठेवला होता. गॉर्डन न येता कोणीतरी सायकलवरून गेले. त्याची सायकल बॉंबला अडकली. तो चपराशी होता. त्याला दुखापती झाल्या. जवळच्या तारेच्या खांबाची मोडतोड झाली. चपराशी तात्काळ मेला."

"कोणाला त्या संबंधात पकडले ?"

"पुष्कळ लोक पकडल्याचे ऐकले आहे. त्यासंबंधात कोणी आहे की नाही हे कसे कळणार ?"

"एक विचारू ?" लाजवतीने एका धाडसी प्रश्नाची प्रस्तावना केली.

"बालकुमुंद हसला." इतका वेळ काय केलेस ?"

"इतका वेळ अवांतर विचारले." लाजवती म्हणाली. पण क्षरभरांत तिने आपला प्रश्न मनांतल्या मनात ठेवला. तिला विचारायचे होते, तुम्ही कोठे होतात ?

तिने वळणाने विचारले, "खोली उघडी कशी होती ?"

मी, अवध आणि अमीरचंद बाहेर पडलो. भाई त्याच्या घरी गेला. मी त्या दोघांना सोडून परत आलो. वसंत आला. म्हणाला, लगेच चल. वेळ नाही. मी तसाच बाहेर गेलो. खोलीचे दार तेवढे पुढे करून घेतले. पुन्हा परतण्यास सवडच झाली नाही. वसंत परत इकडे येणार होता त्याच्या हाती चिठ्ठी दिली.

लाजवती अधिक खोलात गेली नाही. ती समंजस होती. आपण काही प्रश्न विचारावा, उत्तर अवघड असावे. बालमुकुंदने काहीतरी उत्तर द्यावे, हे तिला टाळावेसे वाटले. विषयान्तर करावे म्हणून ती म्हणाली, "हा अगदी दिल्लीत घडलेल्या प्रकारासारखा प्रकार झाला, नाही ?"

"मी वंसतच्या हाती चिठ्ठी दिली हा प्रकार ?" बालमुकुंदने पांघरूण घेतले.

"नाही हो ! अगदी भोळे आहात तुम्ही ! म्हणजे खरे नाही म्हटले मी ! तुमच्या लक्षात आले आहे मला काय म्हणायचे आहे. मी म्हणते चपराशी मेला तो प्रकार !

"दिल्लीसारखा म्हणजे ?"

"तिथे नाही का तो शिपाई मेला ?"

"तुला काय ठाऊक ?"

"वा ! वा ! तुम्हीच नाही का सांगितले मला ?"

"अन् केव्हा ?"

६

खोलीवर बालमुकुंद आणि भाई परमानंद यांचे बोलणे चालले होते.

"हार्डिंज हाही तितकाच परका जितका औरंगजेब !" बालमुकुंद बोलत होता.

"वादच नाही. आपले संख्याबळ वाढत आहे. व्यापक प्रमाणावर उठाव अधिक परिणामकारक होईल." भाई परमानंद म्हणाले.

"सुसूत्रता राखणे आवश्यक आहे. ते तुला जमेल."

लाजवतीचे नुकतेच लग्न झाले होते. ती खोलीवर येत असे. एका प्रसंगी लाजवतीने हा संवाद ऐकला होता. कोणातरी विषयावरील तो ओझरता तुकडा होता. पण तेवढ्याने तिचे कुतूहल जागे झाले होते. एकान्तात तिने बालमुकुंदला हार्डिंज प्रकरण विचारले होते.

हार्डिंज हा व्हाइसरॉय होता. त्याच्या मिरवणुकीवर ध्वम (बॉंब) फेकला होता. हे वृत्त स्थूलपणे सर्वांनाच माहिती झाले होते. ते पाच-सहा महिने सर्वत्र तीच चर्चा होती. लग्नानंतर बालमुकुंदने लाजवतीला पहिली दीर्घकथा सांगितली ती तीच

होती.

वर्ष १९११ पासूनच हिंदुस्थानची राजधानी कलकत्ता ही हलवून दिल्ली येथे नेण्याचे ठरले होते. वर्ष १९१२ च्या डिसेंबरमध्ये दिल्ली या नव्या राजधानीतील पहिल्या राजप्रतिनिधीचे आगमन होणार होते.

तो प्रतिनिधी म्हणजे व्हाइसरॉय हार्डिंज. क्रांतिकारकांनी बंगालमध्ये इंग्रजांना भीती वाटावी इतपत स्फोट केले होते. इंग्रज अधिकारी मारले होते. स्वत: फाशी गेले होते. अंदमान भोगत होते. म्हणून सुरक्षिततेच्या हेतूनेही राजधानी दिल्लीला आणल्याचे त्यावेळच्या ब्रिटिश पाचव्या जॉर्जने-सम्राटाने-घोषित केले होते.

हार्डिंजची दिल्लीतील मिरवणूक डिसेंबर १९१२ मध्ये ठरली असली तरी पाच सहा महिने आधीपासून त्याची सिद्धता चालू झाली होती. त्यापूर्वी आठ-नऊ वर्षे दिल्लीत वीज आली होती. ब्रिटिश अधिकाऱ्यांची वस्ती सिव्हिल लाईन्स या भागात वाढविली जात होती. बांधणीही नव्या पद्धतीची चालू होती. त्या सर्व सहाय्याने नव्या राजधानीत पहिल्यावहिल्या व्हाइसरॉयचे स्वागत मोठ्या वैभवांत करण्याचे योजले जात होते.

आगगाडीच्या नियत मार्गावरील स्थानकांवर विशेष पहारे बसविले. स्थानकावरही घातपात होऊ शकतो, याचे उदाहरण तिन्नवेल्ली येथे वांची अय्यरने कलेक्टर ॲशे यास मारून घडविले होते. त्याला दीड-पावणेदोन वर्षाचाच काळ लोटला होता. आणखी कोणाच्या लक्षात असो वा नसो, ब्रिटिश अधिकाऱ्यांना ही उदाहरणे ध्यानांत घेऊनच येथे आपले आसन स्थिर ठेवण्याची दक्षता घ्यावी लागत असे.

पण अशा धसक्यानेही आपण भ्यालेलो नाही हेच राज्ययंत्रणेला दाखवायचे असते. ब्रिटिशांचे बळ, त्यांचे वैभव, या देशावर अगदी थोड्या गोऱ्यांनी चालविलेल्या राज्ययंत्रणेचा गर्व याचे दर्शन सर्व अज्ञ आणि सज्ञ समाजापुढे करून, 'शेवटी ब्रिटिशांचे शासन आहे, मोठे व्यवस्थित, मोठे घट्ट, फार पक्के,' असा अभिप्राय त्या जनतेकडून घेण्याची पद्धती पडली होती. त्या पद्धतीला अनुसरूनच सर्व व्यवस्था या नियोजित प्रस्थानाची आणि मिरवणुकीची केली होती. हा उत्साह कोणाचा ? तर इथल्या जनतेचा. हे दाखविण्याचीही बनावट उपाययोजना केली जात असे.

आगगाडीचा सर्व प्रवास निर्विघ्नपणे पार पडला. दि. २३ डिसेंबर १९१२ ला ठरल्या वेळी लॉर्ड हार्डिंज दिल्ली स्थानकावर पोहोचला.

स्थानिक उच्च अधिकारी सामोरे झाले. त्यांनी हार्डिंजला अभिवादन केले. हार-तुरे झाले. स्थानकाबाहेर सैनिकी वाद्यवृंदाने मानवंदना दिली.

'गॉड सेव्ह दि किंग' हे ब्रिटिशांचे पण हिंदुस्थानच्या माथी मारलेले राष्ट्रगीत वाद्यवृंदाने वाजविले. भव्य मिरवणुकीची रचना उभीच होती.

हत्ती हे वाहन वैभवाचे प्रतीक. यांत्रिक शक्तीची स्वयंचलित वाहने जरी निर्माण झाली तरी राजवैभवाची शोभा हत्तीवरच झुलते. विद्युत्दीपांच्या झगमगाटांत पणतीचे, लामणदिव्याचे, नीरांजनाचे स्थान ते काय ? पण तरीही पूजेसारख्या प्रसंगी पावित्र्य त्या मंद प्रकाश देणाऱ्या पणतीत, लामणदिव्यांत किंवा नीरांजनातच मानले जाते. ओवाळातांनाही, आधुनिक प्रकार म्हणून कोणी नीरांजनाच्या ठिकाणी विजेरी म्हणजे बॅटरी वापरीत नाही. निदान अद्यापपर्यंत तरी.

हिंदुस्थान आणि हत्ती यांचे हे राजवैभवी नाते पूर्वापार आहे. आणि त्याच प्रथेचा अनुसर करून जसा मोगलांनी हिंदूंच्या भावुकतेचा लाभ मिळविला तसाच तो ब्रिटिशांनीही मिळविला. एरवी इंग्लंड आणि हत्ती यांची सांगडच विसंगत होती.

हार्डिंजसाठी एक हत्ती सजविला होता. मखमलीची झूल त्याच्या विशाल पृष्ठावर पसरली होती. मस्तकावर चांदीच्या मुर्दीची आकृती चमकत होती. कलाकुसरीने घडविलेली चांदीची आणि सोन्याचा पत्रा चढविलेली अंबारी हत्तीवर बांधली होती. इतर राजेरजवाडे आपापल्या हत्तीवरून आपली मांडलिकी मिरवीत चालले होते.

हत्ती चालकाचा म्हणजे माहुताचा वेश अशा सजविलेल्या हत्तीला शोभेसाच होता. हत्ती त्याच्या नियंत्रणांत होता. कारण तो नेहमीचाच चालक होता.

शिडी लावली, हार्डिंज अंबारीत जाऊन बसला. त्याची पत्नी त्याच्यासमवेत होती. दोन रक्षक चढले. आपली आयुधे सज्ज ठेवून ते अंबारीपासच्या नियतस्थळी जाऊन बसले. इंग्रजांची गादी हत्तीवरून डुलत चालू लागली. चौकाचौकातून उभारलेल्या सुशोभित कमानीतून मिरवणूक जात होती. ते राजवैभव पाहण्यासाठी दिल्लीच्या आसपासचीही गावे आली होती. मार्गांच्या दोन्ही अंगांनी लोक तासन्तास तिष्ठत होते. मिरवणूक समोरून जाताच लोक त्या वैभवाने दिपून जात होते.

चांदणी चौक दिल्लीतील एक मुख्य केंद्र. त्या चौकात मिरवणुकीने प्रवेश केला. वर्ष १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर जेव्हा ब्रिटिशांच्या हातात दिल्ली आली तेव्हा या चांदणी चौकातील उंच वास्तूंचा त्यांनी विध्वंस केला होता. पण काळ लोटला आणि तेथे वास्तु उभ्या राहू लागल्या. दोन मजली, तीन मजली घरे बांधली गेली.

गच्च्यागच्च्यांतील मेळाव्यांना दिपवीत ब्रिटिश साम्राज्याची गादी प्रभावी आणि यशस्वी मार्गक्रमण करीत होती.

आणि एकाएकी प्रचंड हादरा बसला ! हत्तीला, हत्तीचालकाला, अंबारीला हादरा बसला. हार्डिंजची पत्नी हादरली. हार्डिंज हादरला. त्यायोगे ब्रिटिश साम्राज्याच्या त्या वैभवी उत्तुंग गादीला हादरा बसला ! 'शुभास्ते पन्थानः सन्तु' म्हणून पाचव्या जॉर्जने व्हाइसरॉयला दिलेल्या आशीर्वादाचा चक्काचूर झाला ! हिंदुस्थानच्या सुरक्षायंत्रणेने केलेल्या उपाययोजनांना दूर सारून एक स्वातंत्र्येच्छू स्फोटगोल निसटला तो थेट

त्या अंबारीवर आदळला होता.

शांतसागरांत एकाएकी प्रचंड देवमासा वर यावा आणि लाटांचा खळबळाट व्हावा तशी त्या मिरवणुकीत प्रचंड हालचाल झाली. काय झाले हे लक्षात येताच काय हानी झाली इकडे लक्ष पुरविणे भाग होते.

अंबारीची चांदीची पाठ उद्ध्वस्त झाली होती. तुकडे विखुरलेले होते. एका आरक्षीचे निर्जीव पाय लेडी हार्डिंजला दिसले, पण लगेच लक्षात आले की तो आरक्षी मेलेला आहे आणि हत्तीवरून लटकत चालला आहे. हार्डिंजच्या उजव्या खांद्याचे मांस बाहेर आले होते. त्याला पाचसहा दुखापती झाल्या होत्या.

मिरवणूक पुढे न्या म्हणून त्याने आदेश दिला खरा, पण ते शक्य नव्हते. हार्डिंजची शुद्ध जाऊ लागली होती.

कर्नल मॅक्सवेल हत्तीवरच माहुताशेजारीच होता. तो साहाय्याला आला. हार्डिंजला खाली उतरविण्याचे ठरले.

मोठ्या प्रयासाने त्याला उतरविले. मिरवणूक, पुढील समारंभ अस्ताव्यस्त झाले.

शासनाने संशयितांना पकडण्याची पराकाष्ठा केली. मोठमोठी पारितोषिके लावली. राजेरजवाडे मिरवणुकीत होते. अनेकांची मांडलिकी स्वामिनिष्ठा जागी झाली, तर अनेकांना भीती निर्माण झाली की, न जाणो आपल्यावरच काही बालंट यायचे ! म्हणून राजेरजवाड्यांनी पारितोषिकांच्या राशीची स्पर्धा लावली.

प्राथमिक शोधात निष्पन्न झाले ते एवढेच की, चांदणी चौकांतील पंजाब नॅशनल बँकेच्या बास्तूतून स्फोटगोल आला. सिगारेटच्या डब्यात तो स्फोटगोल केला होता.

आणखी कळले ते असे की, हा स्फोटगोल, म्हणजे यातील अवशेष आणि वापरलेली द्रव्ये यांचे क्रांतिकारक बंगालमध्ये वापरीत त्या स्फोटगोलांच्या द्रव्यांशी साम्य होते. नव्हे, ते एकाच प्रकारचे स्फोटगोल होते.

जवळजवळ महिनाभर तपास केला पण आरक्षींना नेमके संशयित मिळाले नाहीत. अनेक झडत्या झाल्या. अनेकांना पकडले. अनेकांचा संशयित म्हणून छळ केला. पण नाही ! देशी आरक्षी यंत्रणा आपल्यावरील डाग जितका म्हणून धुण्याचा प्रयत्न करू बघत तितका तो डाग अधिकाधिक भडक होत असे.

शेवटी दि. २४-१-१९१३ ला शासनाच्या आरक्षी विभागाने विज्ञप्ति काढली की, या दुर्घटनेतील संशयितांना पकडण्यास साहाय्य होईल अशी वार्ता देणाऱ्यास एक लक्ष रुपये पारितोषिक देण्यात येईल ! आजवर दाखविलेली प्रलोभने थोडी असल्याने (वीस हजार, तीस हजार, पन्नास हजार, इत्यादी) हे नवीन प्रलोभन दिले गेले होते.

बालमुकुंदने ही कथा आपल्या प्रिय पत्नीस ऐकविली होती. कथा ऐकताना तन्मय

झालेली लाजवती काय प्रतिसाद देते इकडे त्याचे लक्ष होते.

'दुर्दैव !' असे ती म्हणाली होती. ते दुर्दैव कोणते ? तर हार्डिंज वाचला हे ! आणि बालमुकुंदने तिची परीक्षा केली होती. आपल्या घरात, मतिदासांच्या कुळांत ही मुलगी चपखल बसते याचा त्याला विशेष आनंद झाला होता.

७

बालमुकुंदचे दिवस जितके गडबडीत जात होते तितकेच लाजवतीचे बिबंचनेत जात होते. चपराशी मेला तेथील ध्वमच्या पृथक्करणात असे आढळले की दिल्लीला हार्डिंजवर फेकलेल्या स्फोटयोलाचे घटक आणि लाहोरच्या जिमखाना क्लबजवळील स्फोटगोलाचे घटक एक आहेत. अर्थातच एकाच कोणत्यातरी सूत्रातून ही साखळी गुंफली जात आहे इतपत निष्कर्ष शासनाने काढला. पण यावेळेपर्यंतही त्यांना दिल्ली आणि लाहोर येथील घातपातातील व्यक्तींवर हात ठेवता आला नव्हता.

वर्ष १९१३ संपून गेले होते. जानेवारी १९१४च्या मध्यांत बालमुकुंद जोधपूरला गेला होता. तेथे त्याला काही शिकविण्या मिळाल्या होत्या.

बालमुकुंदच्या अनुपस्थितीत खोलीवर एकदा वसंत आला. त्याने एक पुडके लाजवतीजवळ दिले.

बालमुकुंदची चिठ्ठीही दिली.

चिठ्ठीत एक निरोप होता. पत्रके कोठे पोचवायची ते त्यांत लिहिले होते. वसंतला आणखी तातडीने कोठे जायचे होते. लाजवतीने, ते पुडके नेऊन देईन, असे सांगितले. आणि वसंत निघून गेला.

पुडके दुपारी पोचवायचे म्हणून तिने ते घरातच नीट ठेवून दिले.

दुपारी पुडके उघडलेले तिला आढळले. अर्धवट उलगडलेल्या वरच्याच कागदावर तिची दृष्टी गेली.

ते एक भित्तिपत्रक होते !

"दिल्लीची ती बनावट मिरवणूक आठवा !

तो परकी गव्हर्नर जनरल व्हाइसरॉय हार्डिंज !

त्याला हादरा बसला आहे. या हादऱ्यातूनच हिंदुस्थानचे भवितव्य घडत आहे. वीरहो उठा !

मातृभूमी मुक्त करा. ही धर्माची हाक आहे !

हे गीताबचन आहे !"

लाजवतीने ते पत्रक वाचले. हे काहीतरी ज्वलंत आहे याची तिला जाणीव झाली.

म्हणूनच हे पुडके कसे उघडले याचा छडा लावण्याचे कामही अवघड झाले. समजा आणखी कोणी पत्रक वाचले असेल तर ?

तिची समस्या दूर झाली. तिच्या सासूनेच सुतळीसाठी पुडके सोडले. आपण बालमुकुंदचेच काही कामाचे कागद अव्यवस्थित केले आहेत याची तिला जाणीव झाली होती. तिचे काम होताच ती पुडक्यापाशी आली तो लाजवती तिथे होती. तिला ती म्हणाली-- 'सूनबाई, ही सुतळी घे. ते कागद मी सोडले होते. त्याच्या कामाचे असतील. जसेच्या तसे बांधून ठेव.'

लाजवतीने सुतळी घेऊन कागद बांधले.

तिने ते पुडके ठरल्याठिकाणी नेऊन दिले होते.

८

लाहोरमध्ये क्रांतिकारी भित्तिपत्रके काही शासकीय कार्यालयावर, तर काही शाळांवर लावली गेल्याचे आढळल्याने आरक्षी अस्वस्थ होऊन गेले होते. वृत्तपत्रांत वार्ता आल्या. लाजवतीच्या कानावर त्या वृत्तपत्रीय वार्ता आल्या. तिला विसरायचे होते ते एक की तिने ती पत्रके पाहिली होती.

बालमुकुंद आज चार दिवसांनी एकांतात तिला भेटला होता. त्याने तिचे काम व्यवस्थित झाले ना म्हणून विचारले होते. तिला राहवेना. ती म्हणाली, "एक चूक झाली. मी एक पत्रक वाचले !"

बालमुकुंद मुग्ध झाला.

"रागावलात ?"

"नाही लाजू !" अनेक गोष्टी अशा असतात की त्या माहित नसल्यानेच कार्याला साहय्य होते. पण एक बरे झाले. तू ते पाहिलेस हे मला समजले."

"पण मुकुंद, मी ते पाहिले आहे हेही मी विसरले आहे !"

"मग मला कशाला बोललीस ?"

"मुकुंद ! तू म्हणजे माझेच मन ! माझ्या मनाची मी जितकी मोकळी असेन तितकीच तुझ्याशी असेन तरच आपले अद्वैत ! म्हणून ज्या गोष्टी तुला हेतुपुरस्सर लपवायच्या आहेत असे मला दिसते तशा गोष्टी मी पाहिल्यावर विसरून जाणे एवढेच मला करता येईल."

"तू उत्तीर्ण आहेस लाजू ! मला तिळमात्र भीती नाही."

दाराची कडी वाजली.

हलकेच हाक आली, "मुकुंद !"

मुकुंदने दार उघडले. तेवढ्या वेळात लाजवती उठून बसली होती.

"वहिनी, अवेळी आलो हं मी ! क्षमा कर ! कारणच तसे होते !"

"बसंतजी तुम्ही संकोच कसला करता ? मला त्याचे काही वाटत नाही."

बसंतला लाजवतीच्या समंजसतेचे कौतुक वाटले.

बसंतने एक पत्र बालमुकुंदला दिले. बसंतचे वडील वारल्याचे वृत्त पत्रांत होते. बालमुकुंदचे डोळे पाणावले. बसंतच्या पाठीवर थाप मारून तो म्हणाला, "झाल्या गोष्टीला उपाय नाही. तू जातो आहेस ?"

"होय ! पोहोचायलाच तीन दिवस लागतील."

"नीघ तू," असे म्हणून बालमुकुंदने आपल्याजवळचे पन्नास रुपये त्याच्या स्वाधीन केले.

"माझ्या वरिष्ठांना कळविण्यास हवे."

"या पत्रासह एक विनंती-पत्र लिहून माझ्यापाशी देऊन ठेव. मी व्यवस्था करीन."

बसंतने एक आवेदन खरडले. बालमुकुंदजवळ ते पत्र आणि आवेदन दिले.

"पंधरा दिवसांनी भेटू !" असे म्हणून तो निघून गेला.

लाजवतीलाही दुःख झाले होते. या कोवळ्या मुलाचे वडील गेले ! बंगालमधल्या नादिया जिल्ह्यातून हा उद्योगासाठी इकडे आलेला ! बालमुकुंदला ज्येष्ठ मानणारा ! ती त्याच विचारात चूर होती !

"लाजू !" बालमुकुंदने तिची तंद्री तोडली !

"वाईट कसले वाटते, सांगू ?"

"हं !"

"आपल्या मुलाची योग्यता काय आहे हे कळण्याचे वडिलांच्या दैवी लिहिलेले नव्हते याचे !" थोडा वेळ थांबून तो म्हणाला...

"एकापरीने बरेच झाले !"

"मी नाही समजले !" लाजवती म्हणाली. तिला बालमुकुंदचे उद्‌गार क्रूर नव्हे पण विचित्र आणि विसंगत वाटले.

आपले जणू स्वगत मुखावाटे बाहेर गेल्याची जाणीव बालमुकुंदला झाली. त्याला लाजवतीला काही समजावणे भागच होते.

तो म्हणाला, "असे बघ. मुलगाच रुग्ण झाला आहे, किंवा आजच्या या यंत्रयुगात कोणा अपघातात सापडला आहे, आणि वाईटात वाईट म्हणजे मुलगा गेला आहे असे कळण्याचा प्रसंग मातापित्यांवर आला तर ते दुःख सहन करणे त्यांना किती कठीण जाते ? त्यापेक्षा असे मुलाचे मरण होण्यापूर्वी त्यांचे निधन झाले तर त्या मुलाला मरताना बघण्याचे दुःख तरी त्यांना नाही !"

"पण मग त्या मुलाला नाही का दुःख होत ?"

"होते, पण तो ते सहन करतो ! जाऊ दे लाजू ! मन उगीच उदास होते !"

दोघेजण स्वस्थ पडले होते. झोप नव्हती.

"मुकुंद" लाजवतीने शांतताभंग केला. मुकुंदचे लक्ष होते हे तिने पाहिले.

"बोल" तो म्हणाला.

"या बसंतला पहिल्याने मी आपल्या लग्नात पाहिले. मला काय वाटले सांगू ?"

"काय ?"

"ही मुलगी आहे !"

"खरे ?"

"अगदी खरे ! त्याची सुंदर मुखमुद्रा पुरुषाचे किंवा मुलाचे म्हण सौंदर्य दाखवीत नव्हती. त्यात मुलीचा कोवळेपणा वाटतो. सरळ नाक, नाजूक जिबणी, रेखीव भुवया, गोरा वर्ण, छोट्या केसांचे वळण, कृश अंगकाठी या अनेक घटकांचा एकत्रित परिणाम प्रथमदर्शनीच तो मुलगी वाटावा असा होतो ! त्यात भर म्हणजे त्याचा बुटका बांधा !"

मुकुंद हसला ! "म्हणजे तुझे म्हणणे त्याला साडी नेसवून केसांचा टोप ठेवून मुलींच्या घोळक्यात मिसळवून दिले तर त्याला कोणी ओळखणार नाही !"

लाजवतीही हसली. "हळू बोला !" ती म्हणाली. "बसंतने ऐकले कधी तर म्हणेल माझी अशी थट्टा करता काय ?"

मुकुंदही हसला. म्हणाला... "लाजू, थट्टा नव्हे ! एक प्रसंगच असा होता ! त्याला खरेच असे स्त्रियांच्या घोळक्यात सोडले होते. प्रसंग कठीण होता ! समोर आरक्षी आले तेव्हा त्यांना त्याने चारपाच मिनिटे घोळ घालून गुंतवले ! त्या मुलीच्या सौंदर्याकडे टकमक बघत आणि तिच्याशी अधिक हुज्जत न घालता ते निघून गेले ! इतरांना तेवढाच अवधी हवा होता !"

"खरेच ?" आपला तर्क कसा चपखल आहे याचे कौतुक वाटून लाजवती म्हणाली. पण त्याच क्षणी असा सुदर्शन मुलगा, मुलगी वाटणारा मुलगा, आणि आरक्षी यांचा मेळ हे विसंगत वाटू लागले. ती म्हणाली, "अशा मुलाचा आरक्षींशी संबंध कसा काय ?" ही कोमल मुले छानछोकीपणातच मुरडत राहतात. धकाधकीत ती कशी पडणार असा तिचा अभिप्राय होता.

मुकुंद म्हणाला, "मनाचा राकटपणा कुठेही आढळतो लाजू ! एक फार मोठे उदाहरण आहे. नुकतेच घडले आहे. नुकतेच म्हणजे झाली त्याला चार वर्षे ! 'अनंत कान्हेरे' नाव ऐकले आहेस ?"

"पुसटसे आठवते. आपल्याकडचे नाव नाही वाटत. म्हणून अधिक लक्षात राहिले

नाही."

"नाशिक कट सांगितल्याचे आठवते ?"

"होय. चांगले आठवते. आणि आता अनंत कान्हेरे हे नावही आठवले. त्याने जॅक्सनला मारले ना ?"

"होय ! बरोबर ! केवढा होता तो ?"

"सतरा - अठरा वर्षांचा !"

"मग ?"

"तो असाच सुंदर, असाच सुदर्शन, असाच मोहक होता ! आणखी ऐक. तो खरोखरीच साडी नेसून नाटकात स्त्रीची भूमिका करीत असे !"

"पण त्याच्या मनाचा राकटपणा..." लाजवतीने मुकुंदचा 'राकटपणा' शब्द घेऊन पूर्ती केली... "इंग्रजांच्या हृदयाला फाडून उरला !"

"म्हणून म्हणतो..." मुकुंद म्हणाला, "काही मरण असे असू शकते की ज्यायोगे या लहानशा मर्त्य देहाची योग्यता कळते. आणि आम्हांना तशा मरणाचे दुःख तर वाटतेच, पण त्यापेक्षा अधिक त्या मरणाचा अभिमान वाटतो."

लाजवती त्याच विचारात झोपी गेली.

बसंतचे सुटीचे आवेदन त्याच्या नोकरीच्या ठिकाणी म्हणजे पॉप्युलर डिस्पेन्सरी सूत्रमंड (लाहोर) येथे पोचवायचे होते म्हणून बालमुकुंद लाजवंतीला सांगून निघाला. आपणास अल्पांशाने सहयोग देता आला तर बाबा म्हणून ती म्हणाली, "नुसते आवेदन पोचवायचे असेल तर मी देऊन आलेले चालेल का ?"

"नुसते तेवढेच नाही. कदाचित डॉक्टरांशी काही बोलावे लागेल."

बालमुकुंदच्या ओळखीने बसंतला नोकरी लागली होती हे तिला ठाऊक होते. तिला ते ठिकाणही शोधता येणे कठीण नव्हते. पण मुकुंदने नको म्हणून सांगितल्यावर ती आणखी बोलली नाही.

९

इडापिडा टळो असे मनोमन चिंतणाऱ्या लाजवतीच्या वाट्याला पीडा आली होती.

तिचे दुःस्वप्न तिने बालमुकुंदला सांगितले होते. त्यावर तो म्हणाला होता, 'बाईट स्वप्न याचा अर्थ अनिष्ट टळून जाते, अमंगल जळून जाते, लाजवतीने मनाला तेवढे समाधान दिले होते.

पण ते समाधान वरवरचे होते याची तिला मनोमन जाणीव होत होती. युद्धावरच्या

सैनिकाचे 'मी सुखरूप आहे' हे पत्र आलेले असावे. पण ते पत्र लिहिण्याची वेळ आणि पत्र पोचण्याची वेळ या मध्यंतरात तो सुखरूप आहे याची शाश्वती नसावी. तसेच तिचे झाले होते. आगीभोवती फेऱ्या मारून बालमुकुंद ती आग समिधा टाकून प्रज्वलित करण्याच्या उद्योगात होता हे तिला दिसत होते. न जाणो, तो स्वत:च तर समिध होणार नाही ना ?

विचाराच्या या टोकाशी आल्यावर तिचे मन थरारून उठे.

आज बालमुकुंदला अटक झाली होती. जे कधी तरी होणार अशी जिवात धागधूग होती ते प्रत्यक्षात आले होते. आता तिच्या मनाची ती धागधूग संपली होती. पुढे काय काय वाढून ठेवले आहे हे बघण्यात तिने मन व्यग्र केले होते.

ती वृत्तपत्रे आता नियमाने वाचू लागली. इंग्रजीचे तिला वाचण्यापुरते ज्ञान बालमुकुंदने दिले होते. म्हणून त्यातून काही अधिक माहिती मिळते का हे बघण्याचाही ती प्रयत्न करीत असे.



राशबिहारी बोस

दोन दिवसापूर्वी बालमुकुंदने दिल्लीचे वृत्त वाचलेही होते आणि त्याला काही सूचनाही आल्या होत्या. लाजवतीला बरोबर घेऊन त्याने आपली खोली तपासून पाहिली होती. घरही तपासले होते. कोणतीही आक्षेपार्ह वस्तू किंवा चिठ्ठी त्याने

ठेवली नव्हती. आज लाजवतीला तो बोलला होता, 'ऋतुमान बदलेल एखादे वेळेस ! जेवढी होईल तेवढी संरक्षणाची सिद्धता करायची. संरक्षण अपुरे पडले तर पावसाच्या धारा, बर्फाचा मारा अंगावर झेलायचा ! छत्री असेल तोवर ठीक, नाहीतर उन्हाचे चटकेही सहन नाही का करीत आपण !'

ते भाषण लाजवतीला भावी संकटाची नांदी वाटले होते. वृत्तपत्रातून लाजवतीला घटनांचे सार कळत होते.

लाहोर येथे क्रांतिकारी पत्रके चिकटवली गेली होती. त्याच वेळी ती दिल्लीतही ठिकठिकाणी लागली होती. पत्रके चिकटविणाऱ्या कोणा मुलाचा माग काढीत काढीत आरक्षी दलाने दि. १४ फेब्रुवारी १९१४ ला दिल्लीतील एका घराची झडती घेतली.

लिबर्टी साप्ताहिक नियतकालिकाच्या पुष्कळ प्रती आरक्षींना मिळाल्या. त्याच महिन्यातील दोन अंक जालंधरला छापले जात आणि इतर कलकत्त्यात. पंजाब, बंगाल जोडले गेले दिल्लीला!

लिबर्टीमध्ये हुतात्म्यांची चरित्रे येत. स्थानिक लोकांना स्वातंत्र्याच्या प्रयत्नांचे आवाहन असे. हे नियतकालिक गुप्तपणे वाटले जाई.

राशबिहारी बोस हे बंगाल आणि पंजाबच्या क्रांतिकार्याचे सूत्रधार होते. ते सापडले नाहीत. त्यांचे एक पत्र हाती लागले होते. मित्राला लिहिलेल्या पत्रात त्यांनी लिहिले होते, 'अरे, मरणाचे काय घेऊन बसायचे ! पारतंत्र्याच्या टाचेखाली जगणे हे कसचे जगणे ! आपण शूराचे मरण मरू या. तेच अमरत्व आहे. तेच जीवन आहे. तेच जगणे आहे. चैतन्य, आत्मशक्ती, ब्रह्म सर्व काही तेच आहे ! बंगालची चेतना पंजाबात रुजलीच पाहिजे ! त्याच रक्तामासाची माणसे आहेत ती !'

धाग्याने धागा मिळता मिळता दि. १९ फेब्रुवारीला अवधबिहारींना अटक झाली. त्यांच्या घरी लिबर्टी साप्ताहिकाव्यतिरिक्त 'तलवार' या नियतकालिकाची काही मूळ हस्तलिखिते सापडली. 'तलवार' पत्राचा पहिला अंक १९ मार्च १९१० ला बर्लिनहून प्रसिद्ध केला गेला. दि. १ जुलै १९०९ ला कर्झन वायलीला गोळ्या घालून ठार केलेल्या आणि दि. १७ ऑगस्ट १९०९ ला हौतात्म्य पावलेल्या मदनलाल धिंग्राचे चित्र 'तलवार' च्या त्या मुखपृष्ठावर होते. अवधबिहारींच्या घरी ते अंक सापडले होते.

येवढे साहित्य मिळाल्यावर अवधबिहारींना राजद्रोहासाठी अडकवणे कठीण नव्हते. त्यात पुन्हा विस्फोटके युरोपियनांविरुद्ध कशी वापराबीत याची संहिता (मॅन्युअल) तेथे मिळाली. ध्वजचे एक कवचही मिळाले.

परमेश्वराचे भक्त ! देवाचे सेवक ! वारकरी ! workers of God' असे अभिधान घेतलेल्या कार्यकर्त्यांची ही मालिका होती. अमीरचंदचा वृत्तांतही लाजवतीच्या

वाचनात आला. केंब्रिज मिशन हायस्कूलमधील हे एकेकाळचे शिक्षक. स्वत्वाला वाव मिळाला नाही. संधी मिळताच ती सेवावृत्ती सोडली. जाडजूड वेतन सोडले. आणि चरखेवाला या गावात संस्कृत शाळेचे मुख्याध्यापक झाले. त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा अनुभव, त्यांचे वय, हे घटक क्रांतिसंघटनेला फार उपयुक्त ठरले.

रासायनिक द्रव्याचे संस्कार केलेल्या कापसाच्या काही गुंड्या त्यांच्याकडे मिळाल्या.

बालमुकुंदच्या चरित्राची गहनता लाजवतीला त्याच्या सान्निध्यातही कळली नव्हती. वृत्तपत्रातून त्या खोलीचा काही अंश तिला कळला. देशभक्तिपर म्हणजेच इंग्रजांच्या दृष्टिकोनातून राजद्रोही वाङ्मय पंजाबात प्रसारण्याचे काम बालमुकुंद आणि अवधबिहारी करीत असत. त्याव्यतिरिक्त ध्वमविषयकही त्यांचा अभ्यास होता.

तो मध्यंतरी जोधपूरला गेल्याचे लाजवतीला ठाऊक होते. त्याचे कारण शिकवण्या हे नसून तेथील कोणाच्या तरी मध्यस्थीने व्हाइसरीगल लॉजमध्ये म्हणजे राजभवनात प्रवेश मिळवणे हे होते, असे लाजवतीला आता समजले. पंजाब, त्यात मुख्यत्वे लाहोर, येथील कारभार त्याचेवर सोपविला गेला होता.

बसंत बिश्वास जर या प्रकरणात असेल तर तो तरी मोकळा राहील अशी लाजवतीची अटकळ होती. कारण तो कोठे गेला आहे हे त्याच्या चिकित्सालयाच्या अधिकाऱ्यांनाच काय ते ठाऊक होते असे तिला वाटले. ती या अटकळीशी खेळत होती तोच वार्ता आली की नदिया जिल्ह्यातील पारागाचा गावी त्याला दि. २६-२-१९१४ ला अटक झाली.

बालमुकुंदला आठ दिवसापूर्वीच अटक झाली होती. अमीरचंद यांच्या पुतण्याला अटक झाल्याचे कळले होते. आणखी सातआठ नावे तिने वाचली होती.

जे सापडले नव्हते त्यांचे मूल्य शासनाने रुपये आणे पै यात ठरविले. त्यावरून त्यांचे प्रत्यक्षातील कार्य किती मोलाचे आहे याची कल्पना लाजवती करीत होती. दि. १४ मार्च १९१४ या दिवशी शासनाने विज्ञप्ति काढली की राशबिहारींना पकडून देण्यास साहाय्य करणारास पाच सहस्र रुपये पारितोषिक मिळेल. त्याचप्रमाणे त्यांची सर्व स्थावर जंगम मिळकत राजहृत केल्याचेही शासनाने प्रकट केले होते.

या रंगमंचावर कोण कोण पात्रे आहेत कोण जाणे ! लाजवती स्वत:वरून इतर पकडलेल्या व्यक्तींच्या घरच्या मंडळींचीही कल्पना करी. मनाने का होईना, ती स्वत:वरचे संकट त्या क्षणापुरते विसरत असे आणि इतरांशी सहानुभूत होत असे.

व्यक्तींची नावे लाजवती वाचू लागली की तिला भास होई, धुक्यातून कोणी आकृती दिसत आहे. मग वाटे, आपल्याला परिचित आकृती आहे. नंतर तिला आकृतीच्या परिचयाचा बोध होई.

तिला व्यक्तींची नावे ठाऊक झालेली होती. पण त्यांच्या कार्याचे स्पष्टीकरण

वाचू लागताच तिला वाटू लागे आपण या व्यक्तींना कधी ओळखलेच नाही !

तरीही आपण अमक्याला आता ओळखले असे तिला वाटे तेव्हा त्या ओळखलेल्या व्यक्तींचे आणखी कोणते तरी कार्य न्यायालयापुढे सांगितले गेल्याचे तिला समजे. आणि मग ती उमजे की आपण जे ओळखले ते शतांश तरी असेल का ? 'नेति नेति' या शब्दामागे कोणता आत्मप्रत्यय होता याचाच जणू तिला प्रत्यय येई.

प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या अकरा तरुणांवर दिल्लीला दि. १६-६-१९१४ ला अभियोग चालू झाला होता. जे आरोपी अनुपलब्ध पण आवश्यक (Absconding and Wanted) होते त्यात राशबिहारी बोस प्रमुख होते. षड्यंत्र, राजद्रोह, हत्या, स्फोटके बाळगणे, हत्येला साहाय्य, असे आरोप लावले गेले होते.

लाहोर येथे चपराशी मेला होता. त्याची हत्या केली असा आरोप अवध बिहारी आणि बसंत विश्वास यांच्यावर ठेवला होता.

दिल्लीला हार्डिंजवर स्फोटगोल टाकण्यात बसंत विश्वास आणि बालमुकुंद होते, तर त्यांचे सूत्रधार राशबिहारी होते, अशी कथा न्यायालयापुढे मांडण्यास आणि सिद्ध करण्यास शासनाजवळ पुरावा नव्हता. तसेच बसंत विश्वास पंजाब नॅशनल बँकेच्यावर जमलेल्या स्त्रियांच्या घोळक्यात होता, इतपत विधान करण्यासही त्यांना सबळ साक्षीदार मिळू शकले नाहीत.

बालमुकुंदने लाजवतीला बसंत बिश्वासचे एक नाट्यमय कार्य सांगितले होते. ते कुठले, कशासाठी याची तिने चौकशी केली नव्हती. पण त्या गोष्टींचा उलगडा तिला त्या त्या वेळी होऊ लागला. बालमुकुंदचे शब्दही तिला आठवले. आपल्या मुलांची योग्यता केवढी आहे हे कळण्याचे त्याच्या बडिलांच्या दैवी नव्हते किंवा उज्वलतेने मृत्यू आला तर मरणाराच्या आप्तेष्टांना दुःख वाटते आणि अभिमानही वाटतो. कोणत्या योग्यतेचे हे तरुण आहेत हे तिला कळे तसतशी ती अधिकच भारावून जाई.

सत्र न्यायालयाचे (सेशनस् कोर्टाचे) काम दिल्लीला २१ मे १९१४ ला चालू झाले.

दिल्लीच्या बंदिगृहात आरोपी बंदी ठेवले गेले होते. त्या अवधीत लाजवतीला बालमुकुंदला भेटण्याची अनुज्ञा मिळाली.

लाहोर ते दिल्ली हा प्रवास ती प्रथमच करीत होती. कोणत्या स्थितीत आपली भेट होत आहे ? आपल्याला रडू येईल काय ? आपल्याला बोलता येईल काय ? काय बोलावे ? काय विचारायचे ? त्यांच्या मनाची स्थिती काय असेल ? ते बोलतील काय ? काय बोलतील ? अशा प्रश्नांच्या फेऱ्यात ती सारखी गुरफटून गेली होती.

बंदिगृहाची क्रूर देवडी तिने बघितली. तिला वाटले तिचे हृदय वेगाने स्पंदन करीत आहे ! या दरवाजाने आपला पति दडपून ठेवला आहे ! तिला एकदा वाटले आपणही त्यांच्याबरोबर आतच राहू या ! काय करायला लागेल याचा विचार करता तिला वाटले आपण मोठ्याने ओरडावे, चपराशाचा ध्वम मी पेरला होता. हत्तीवर स्फोटगोल मी फेकला होता ! यांच्यापैकी कोणीही नव्हे ! देऊ देत मला फाशी !

पुन्हा तिला वाटे, बालमुकुंदने कोठे स्फोटगोल लपवून ठेवला असेल तर विचारून घ्यावे. तो स्फोटगोल आणून या दारावरच टाकावा. भगदाड पडले की सरळ सर्वांना बाहेर घेऊन जावे !

भेटीचे बोलवणे आले. धीम्या पावलाने पण अधीऱ्या मनाने लाजवती भेटीच्या खोलीपाशी गेली.

भेटीला नुसता बालमुकुंदच नव्हता, त्याचे सवंगडीही होते ! त्यांच्याही भेटी आलेल्या होत्या. त्यामुळे तो योग आला.

तीच हसरी मुद्रा ! तोच प्रसन्न भाव ! लाजवतीला स्वत:च्या वेदनांचेच दु:ख झाले ! मृत्यूच्या जबड्यात वावरणारे हे तरुण इतके उल्हसित आहेत आणि यांच्या मरणाच्या कल्पनेनेच माझ्या पायाखालची भुई सरकल्यासारखे मला वाटत आहे ! तिला क्षणार्धात वाटले, मरणाची भीती झटकून टाकावी ! यांच्या आणि स्वत:च्याही !

'हे आरोप ठेवले असले तरी ते सिद्ध व्हावे लागतात. 'आतापासूनच काही भयानक परिणामाचा घोर मनाला लावू नको, पुढे जो प्रसंग येईल त्याला तोंड देण्याची सिद्धता ठेव' असे सात्वनाचे, धीराचे शब्द लाजवतीने मनात सामावून घेतले. 'मरण कुणाला चुकले का आहे ? जो जन्माला आला तो मरणारच !' हे बालमुकुंदचे सहज शब्द मात्र लाजवतीस सहन झाले नाहीत ! तिच्या अश्रुधारा चालू झाल्या.

भेट संपली होती. तिला पश्चात्ताप झाला अश्रुपाताचा. तिला वाटले, त्या डबडबलेल्या डोळ्यांमुळे आपल्याला मुकुंदचे मुखावलोकनही करता आले नाही !

अभियोगाच्या काही ठळक वार्ता धडाधड लाजवतीपर्यंत पोहोचत होत्या. राजद्रोहासारख्या अभियोगात कोणी अडकला असेल तर जवळपासचे लोकही दूर दूर सरतात हा अनुभव तिला आला. त्याचप्रमाणे अशा तरुणांच्या तेजाने आकृष्ट झालेले लोक या ना त्या मागनि सहानुभूती पोहचवतात हेही तिला दिसून आले.

कोणा सज्जनाने लाजवतीच्या घरी एक बंद पाकीट आणून दिले. ते उघडले तेव्हा त्यात एक चिठ्ठी मिळाली. 'जेव्हा केव्हा लाजवतीला आणि घरच्या मंडळींना बालमुकुंदला भेटण्यास जायचे असेल तेव्हा यातून विनियोग करावा !' दोनशे रुपये त्या पाकिटात होते.

एक पत्र आले होते. 'यासारखे तेजस्वी तरुण जे कुल निर्माण करते त्या कुळाला

आमचे सहस्रश: प्रणाम !'

नाव - गाव काहीजण देत असत. काहीजण लिहीत, 'आमचे नाव प्रकट झाले तर जे परिणाम होतील ते आम्हाला अधिक तापदायक नसणार. पण तेवढा तापही सहन करण्याचे आमचे धाडस नाही. पण आमच्यासारख्या 'भित्र्यांच्या' वर्गालाही या तरुणांच्या साहसाचे मूल्यमापन आहे हे कळावे म्हणून हे पत्र आहे !'

या पत्रांनी तात्कालिक उल्हास मिळत असे. तिला पुन्हा एकदा भेटीची अनुज्ञा मिळाली होती. जवळ द्रव्य नव्हते. या स्थितीत ज्या अनामिकाने दोनशे रुपये धाडले ते उपयोगी पडले होते. त्या भेटीत लाजवती अतिशय धीराने वागली होती.

सत्रन्यायालयात साडेचार महिने अभियोग चालू होता. दि. ५ ऑक्टोबर १९१४ ला निर्णय दिला गेला.

अवधबिहारी, अमीरचंद आणि बालमुकुंद यांना फाशी. वसंत विश्वास यास जन्मठेप. कारण त्याचे कोवळे वय ! इतर सातही जणांना जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षा झाल्या होत्या.

तो निर्णय ऐकण्याने त्या त्या घरावर सुन्नपणा आला होता. पण त्यांना सहानुभूतीचा विरंगुळा मात्र पुष्कळ मिळाला.

मन स्थिर झाल्यावर लाजवती वसंतविषयी विचार करू लागली. कोमल वयापेक्षाही कोमल मुखमुद्रेचा प्रभाव न्यायाधीशावर पडलेला दिसतो ! तिला वाटले.

शासन स्वस्थ नव्हते. न्यायालयात प्रत्यक्ष पुरावा म्हणून आणता येत नाही. पण आरोपी उत्तरदायी मात्र भरपूर आहे. अशी स्थिती असेल तर त्या आरोपीला अधिकात अधिक दंडित करण्याची शासनाची धडपड असते. वसंतला फाशी झाली नाही याने शासन अस्वस्थ झाले.

अवधबिहारी, अमीरचंद आणि बालमुकुंद यांनी फाशीच्या शिक्षेविरुद्ध पुनरावेदन केले. शासनाने त्यांच्या शिक्षा स्थिर करण्यासाठी आणि वसंत विश्वासची शिक्षा वाढवून फाशी करण्यासाठी पुनरावेदन केले.

दि. १० फेब्रुवारी १९१५ ला तिघांची फाशी संमोदित केली गेलीच, पण वसंत विश्वास याचीही शिक्षा वाढविली गेली.

प्रीव्ही कौन्सिल हे तेव्हा सर्वोच्च न्यायालय असे. त्याच्यापुढेही आवेदने झाली होती... १ मार्च १९१५ ला ती फेटाळली गेली. या निर्णयाची कागदपत्रे हिंदुस्थानात येण्यास जवळजवळ दोन महिने लागले.

लाजवतीचे आयुष्य निर्जीव झाले होते. कोणत्याही कामात उत्साह नसे. एकच विवंचना. बालमुकुंद !

आपणासमक्ष आपण ते मरण बघणार आहोत याची तिला लज्जा वाटे. आपला

काही उपाय नसावा याचा तिला खेद वाटे. अशा स्थितीतच तिची बालमुकुंदची तिसरी भेट झाली होती.

त्या भेटीत ती मानसिक उत्साह भरून घेऊन आली होती. फाशीच्या छायेत वावरणाऱ्या त्या तरुणांचे आपापसातही आनंदाने ओतेप्रोत संवाद चालत असलेले तिने पाहिले होते. ते सर्व मनात येऊन तिला वाटू लागले होते, मरण ही काही तशी भयावह वस्तू नव्हे !

शेवटच्या भेटीतून घरी परतताना 'रामरखी' या शब्दासरशी तिचे मन माहेरपणापासून सासरचा आणि त्यानंतरचा हा वियोगाचा प्रवास करीत होते.

१०

बालमुकुंदच्या घरावर दुःखाची छाया पसरली होती. अनिष्ट म्हणून जेवढे व्हायचे ते झाले होते.

अंबाला बंदिगृहात दि. १५ मे १९१५ या दिवशी अमीरचंद, बालमुकुंद, अवधबिहारी आणि बसंत विश्वास यांना फाशी देण्यात आले होते.

लाजवती सुन्न झाली होती. पण ती सावधही होती. प्रेत घरी आणणार आहेत असे कळले म्हणून दुसरे दिवशी दहनासाठी साहित्य गोळा करण्याची व्यवस्था होत होती.

हा योग चांगला येईल ! लाजवतीला वाटले. दहनासह दहन होऊन जाईल. तिने आपला निश्चय दृढ केला होता. तिचे अश्रू थांबले होते.

पण तिचे मनोरथ पूर्ण होऊ नये अशा घटना घडत होत्या. प्रेत स्वाधीन देण्यास अधिकाऱ्यांनी नकार दिला होता.

गेले काही महिने लाजवती वेगळ्या पद्धतीने वागत होती. ती बालमुकुंदला प्रथम भेटून आली तेव्हापासून शारीरिक यातना भोगणे म्हणजे काय याचा अनुभव ती घेत होती. संरक्षणे काढून टाकून राहता येते का, या प्रश्नापेक्षा ते तिकडे बंदिगृहात नाही का राहत, मग आपण कां तसे राहू नये हा तिचा विचार प्रबळ झाला. घरची मंडळी आणि सहानुभूत व्यक्ती यांच्याकडे काही दुर्लक्ष करून तिने मच्छरदाणी वापरणे बंद केले. उकाड्याच्या दिवसातही अगदी खालच्या खोलीत ती झोपू लागली.

सर्वांना जेवण करून वाढल्यावर ती स्वत:साठी बंदिगृहातून आणलेल्या भाकरीसारखी भाकरी खाऊ लागली. जे काही सुखासीनतेचे प्रतीक दिसते ते वापरायचे नाही, आवश्यकतेपुरते तेवढे वापरायचे, हा तिने नियम केला. चारपायी काढून टाकली. घोंगडीवर झोपण्याला प्रारंभ केला.

बालमुकुंदचे दहन परस्पर बंदिगृहाकरवी केले गेल्याचे वृत्त तिला समजले.

ती आपल्या खोलीत गेली. ध्यानस्थ बसावे तशी एका स्थितीत बसून राहिली.

घरच्या मंडळींनी एक दिवस जाऊ दिला. मग ते तिला समजावू लागले. लाजवती, ही मरणाची लक्षणे आहेत ! ही घे, थाळी आणली आहे. तुला हवे तेवढे, निदान घासभर खा.

लाजवती कष्टी झाली. या थोरामोठ्यांचा अवमान करावा लागत आहे ! तिला दुःख झाले. तिने नम्रपणे पण निग्रहाने सांगितले, मला भूक लागताच मी येईन, खाईन. आपण व्यथित होऊ नये. मला बळाने अन्न देण्याचा प्रयत्न करू नये.

दिवसामागून दिवस गेले. पद्मासन तसेच होते.

दहा दिवस, अकरा, बारा, तेरा दिवस झाले.

लाजवतीला वाटले, तेराव्या दिवशी आत्म्याशी भेट होईल. आपण हा देह सोडून मुकुंदच्या आत्म्याशी एकरूप होऊ !

पण नाही ! तिची परीक्षा ती उत्तीर्ण होते की मध्येच ती कोलमडते हे बघणे हेच नियतीने निग्रहाने ठरविले होते.

आज अठरावा दिवस. लाजवतीची भूक, तहानेची वासना केव्हाच नाहीशी झाली होती. तिला त्या यातना होत नव्हत्या. आज तिला अर्धवट झोप लागली होती. कदाचित ती अर्धवट ग्लानी होती. केवढा प्रकाश ! केवढा प्रकाश !! ती म्हणत होती. कधी तिला वाटे, हा गंगेचा केवढा स्वच्छ ओघ ! आपण गंगेत स्नान करू या !

एकाएकी तिला भासले गंगेच्या काठावर मुकुंद आणि ती बसली आहेत. गेल्या सव्वादोन वर्षांच्या काळाचे सिंहावलोकन करीत आहेत. वर्षभर सहवासाचे आणि नंतरचे सव्वावर्ष विरहाचे !

तो पहा लोंढा येतोय. तिला वाटले ! पुन्हा तसेच ! ते बसले होते त्या टेकाडाचे बेट झालेले ! जिकडून बाहेर पडू बघावे तिकडे पाणी !

मात्र त्या टेकाडावर ती दोघेच नव्हती. हे अमीरचंद, त्यांचा पुतण्या, हे अवधबिहारी, हा बसंत, हे भाई परमानंद ! आणखी दहाबारा मंडळीही तशीच अडकली होती.

बालमुकुंद धीर देत होता. माझा हात धरून चल ! सगळे तरून जाऊ. लाजू, तूही चल ! हात घट्ट धर हं ! मागच्या वेळेसारखे होईल.

उतार बघून, हातात हात घालून सर्वचजण गंगेचा पूर पार करीत होते.

लाजवतीला वाटले, सर्वच जण वाहून जात आहोत. आपला हात मात्र मुकुंदाच्या हातातून निसटत आहे.

गेले ! गेले !! लोंढ्याबरोबर ! ती उद्गारली ! मुकुंद, हात घट्ट धर ! हात घट्ट

धर ! मी तुझ्याबरोबर येते मुकुंद ! मुकुंद, मुकुंद !

'मुकुंद' या उच्चारासरशी लाजवतीचे प्राणोत्क्रमण झाले होते !

भाई परमानंद तिला दिसले होते. पुढच्या घटनांची जणू पूर्वसूचना ! कारण लाहोर कटांत भाई परमानंदांना फाशी झाली होती आणि ती पुढे जन्मठेप झाली.

एका कुळाची हौतात्म्य - परंपरा चालत राहिली.

※※※

॥ १० ॥ इंदुभूषण : एक कोवळे बलिदान

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धात अंदमानची फळी लढविणाऱ्या ज्या देशभक्तांना ब्रिटिश अधिकाऱ्यांनी छळाबळाने प्राणत्याग करावयास लावले त्यांतील एक हुतात्मा इंदुभूषण.

इंदुभूषणला मुली सांगून येत होत्या. कारण तो आता शालांन्त वर्गात गेला होता. खुलना येथील प्रशालेत त्याचे शिक्षण चालू होते.

ते वर्ष १९०७ होते. आजपासून (म्हणजे वर्ष १९७१ : पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली ते वर्ष) पासष्ट ते सत्तर वर्षांपूर्वीचा तो काळ होता. मुलांची लग्ने सोळाव्या किंवा सतराव्या वर्षी उरकून टाकण्याची पद्धत असे.

इंदुभूषणच्या मनात लग्न करण्याचे नव्हते. आणखी शिकावे असे त्याला वाटत होते. जितक्या आग्रहाने त्याचे मातापिता त्याला लग्नाविषयी सांगत होते तितक्याच निग्रहाने तो आपला लग्न इतक्यात न करण्याचा विचार त्यांना पटविण्याचा प्रयत्न करीत होता.

बंकिमचंद्राचे 'आनंदमठ' त्याच्या वाचनात आले होते. बंगालची फाळणी हा त्या काळचा ज्वलंत प्रश्न होता. 'युगान्तर', 'वंदेमातरम्' इत्यादी वृत्तपत्रे तरुणांना प्रोत्साहित करणारे अग्रलेख लिहीत होती. तेही तो वाचीत असे. त्याचे मन

देशप्रेमाने भरू लागले होते. आपले जीवन देशाच्या कामी यावे ही त्याची भावना मूळ धरू लागली होती.

इंदुभूषण अबांतर वाचनात इतका रंगून गेला होता की शालान्त परीक्षेकडे त्याचे दुर्लक्ष झाले आणि तो अनुत्तीर्ण झाला. दुसरीकडे राहावे या विचारात तो होता. त्याची बारींद्र कुमार घोष या क्रांतिदूताशी गाठ पडली.

इंदुभूषण माणिकताला परिसरात राहण्यास गेला.

सर्व क्रांतिकारकांचा स्फूर्तिस्रोत गीता आहे ही इंदुभूषणची श्रद्धा बळावली. चाफेकर बंधू फाशी गेले तेव्हा त्यांनी गीता आपल्या हातात ठेवली होती हे त्याच्या वाचनात आले होते. ८ मे १८९९ आणि १२ मे १८९९ या दिवशी वासुदेव आणि बाळकृष्ण या चाफेकरबंधूंना येरवडा बंदिगृहात फाशी दिल्याचे त्याने वाचले होते.

अशोक नंदी हा इंदुभूषणचा मित्र झाला. तोही त्याच्याचसारखा १६।१७ वर्षाचा होता. त्याला अभिमान वाटावा असे त्याचे आणखी एक श्रद्धेय स्थान झाले होते. तो मुलगा होता १५ वर्षाचा सुशील.

२६ ऑगस्ट १९०७ या दिवशी कलकत्ता येथील किंग्जफोर्ड सेशन्स जज्जच्या न्यायालयात 'युगांतर'चे संपादक अरविंद घोष यांच्यावरील अभियोग चालू होता. बिपिनचंद्र पाल यांना अरविंद विरुद्ध साक्ष देण्यास भाग पाडले जात होते. बाहेर आणि न्यायालयातही गर्दी लोटली होती.

बिपिनचंद्र पाल यांनी साक्ष देण्यास नकार देताच त्यांच्यावर तत्काल न्यायालयाचा अवमान केल्याचा अभियोग करून सहा महिन्याची शिक्षा सुनावली गेली. बाहेरील गर्दीने वंदेमातरम् घोषणांनी वातावरण दुमदुमून सोडले.

गोरे सार्जंट आले. त्यांनी आपल्या आरक्षीच्या पथकाला लाठी मारण्याचा आदेश दिला. लाठीच्या प्रहारांनी लोकांचे रक्त वाहू लागले. एक सार्जंट स्वत:च दांडके घेऊन लोकांना उभे-आडवे मारत सुटला होता.

पंधरा वर्षाचा सुशील सेन त्या गर्दीत होता. फिरंग्याचा तो मोकाट लाठीमार त्याच्याने बघवला नाही. त्याने समोर जाऊन त्या उंचापुऱ्या गोऱ्याला तडाखा हाणला. पुन्हा एकदा ! आणखी एक !

गोरा सोजिर तो चमत्कार बघतच राहिला. शरीराने तो धिप्पाड होता. सर्व इंग्रजी साम्राज्याचे बळ त्या गोऱ्याच्या पाठीशी होते. पण हे पोर आपल्या इवल्याशा शक्तीने त्या साम्राज्यावरच प्रहार करू धजत आहे हे कसे काय ?

आरक्षी सहाय्याला आले. सुशील कुमारला खाली पाडले.

दुसरे दिवशी सुशीलला न्यायालयात उभे केले. २७ ऑगस्ट १९०७ हा तो दिवस होता.

आपल्यावर आक्रमण म्हणजे हल्ला केल्याचा अभियोग त्या गोऱ्या सार्जंटने सुशीलवर भरला होता.

किंग्जफोर्डने त्या कोवळ्या मुलाला स्पष्टीकरण विचारले. तो म्हणाला,

"मी अपराधी आहे किंवा नाही मला ठाऊक नाही. सियाल्डावरून मी येत होतो. लाल बाजारापाशी मला मोठा घोळका दिसला. काय आहे हे बघायला मी तेथे गेलो. तेवढ्यात हा गोरा दिसेल त्याला बाटेल तेथे फटके मारीत सुटलेला दिसला. मी त्याचे फटके परतवले. मग तो मलाच आणखी मारायला लागला. त्याला प्रत्युत्तर म्हणून मी माझ्या हातांनी ठोसे मारीत त्याचे ठोसे थांबू लागलो. आणखी काही आरक्षी आले. त्यांनी मला खाली पाडले, मारले.

न्यायाधीशाने सुनीलला पंधरा फटक्यांची कठोर शिक्षा सुनावली.

धीरोदात्त मनाने सुशीलने शिक्षा भोगली.

वृत्तपत्रांनी शासनावर आग पाखडली. सुशीलच्या धीरगंभीर वर्तनाचा लोकांनी उत्स्फूर्त गौरव केला.

सुशील ! सुशील ! सर्व बंगालचे ते श्रद्धास्थान झाले.

माणिकतालाचा तो परिसर क्रांतिकार्याचा अड्डा बनला. कन्हैयालाल दत्त, सत्येंद्रनाथ बोस आदि क्रांतिकारकांनी मोठा गट जमविला.

किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला जगू देता कामा नये, अशी योजना आखली गेली. त्याच्या क्रूर निर्णयामुळे शासनाला त्याच्या सुरक्षिततेची चिंता वाटली म्हणून त्याला २८ मार्च १९०८ या दिवशी मुझफ्फरपूर स्थलांतरित केले.

दिनेशचंद्र रे आणि खुदीराम बोस यांनी २० एप्रिल १९०८ या दिवशी किंग्ज फोर्डच्या बग्गीवर बॉंब टाकला पण ती बग्गी त्याची नव्हती. केनेडी नावाच्या दोन बाया त्यात मेल्या होत्या.

दिनेशचंद्रला पकडताना त्याने स्वत:वर गोळी झाडून घेतली. त्याची ओळख नंतर प्रफुल्ल कुमार चाकी (रंगपूर) अशी पटली होती. खुदीराम बोस पकडला गेला. त्याच्यावर खटला चालला आणि ११-८-१९०८ ला मिदनापूर बंदिगृहात त्याला फाशी दिले.

पण दिनेश (प्रफुल्ल) आणि खुदीराम यांच्या धरपकडीनंतर सर्वत्र धरपकड झाली आणि मे २, १९०८ या दिवशी मुरारीकपूर मार्ग, माणिकलाल बाग, राजा नाभी किसन मार्ग, गोपी मोहनदत्त लेन, हॅरिसन रोड, देवगड इत्यादी ठिकाणी झडत्या झाल्या. अनेक कागदपत्रे, रसायने मिळाली. छरिका, गोळ्या मिळाल्या. एकेचाळीस तरुणांना अटक झाली.

'अलीपूर कट' या नावाने ३८ तरुणांवर दोन तुकड्यांत खटला भरला गेला.

इंदुभूषण त्यातील पहिल्या तुकडीत आरोपी होता.

त्याच खटल्यात नरेंद्र गोस्वामी हा क्षमेचा साक्षीदार झाला होता. तो बंदिगृहात होता. कन्हैयालाल दत्त आणि सत्येंद्रनाथ बोस यांनी त्याला गोळ्या घालून ठार मारले.

अलीपूर कटाच्या खटल्याचा निर्णय ६ मे १९०९ या दिवशी लागला. इंदुभूषणला दहा वर्षे काळेपाणी शिक्षा झाली.

सहा महिन्यांनी म्हणजे डिसेंबर १९०९ मध्ये इंदुभूषणची अंदमानला पाठवणी झाली.

अंदमानला पहिले पहिले 'बमगोलेवाले' गेले त्यात इंदुभूषण होता.

नाव, वय, जात, धर्म इत्यादी नोंदणी झाली. उंची, वजन नोंदले गेले. आलेल्या दंडितांना प्रथम कोलूतील (तेलाच्या घाण्यातील) जबसाप्रमाणे किंवा खोबऱ्याप्रमाणे पिसून काढायचे म्हणून कोलूवरच त्यांची पाठवणी असे. सिंधी मुसलमान आणि पठाण आपल्या चापलुसी वागणुकीने अधिकाऱ्यांशी जवळीक साधत असत. त्यांना अधिकाराची प्रतीके दिली जात. म्हणजेच त्यांना तांडेल बनविले जाई, क्रूरपणा करणे हे नियतकाम (ड्यूटी) समजले गेल्याने स्वत:चाही लभ्यांश साधण्यासाठी हे पठाण मुसलमान त्या क्रूरपणाचे उतू जाणारे अवलंबन करीत असत.

ज्याचे शारीरिक बळही कोलू रेटण्याचे असणे शक्य नव्हते त्या इंदुभूषणला कोलूवर धाडले गेले.

कधी कोणाच्या साहाय्याने, तर कधी स्वत: तो कोलू हलविण्याचा प्रयत्न करीत राहिला. तांडेलांना नेहमी मारा करण्यासाठी काही दुबळे दंडित लागत असत. त्यातच एक इंदुभूषण होऊन गेला.

पंधरा दिवसांनी त्याची छिलका (नारळाची सोडे) कुटण्याच्या कामावर पाठवणी झाली.

कदन्न आणि अतिश्रम यांनी इंदुभूषण अत्यंत दुबळा झाला.

इंदुभूषण मर्यादित शिक्षेचा दंडित असल्याने त्याची बाहेरच्या कामावर पाठवणी केली गेली. बाहेरचे काम राजबंद्यासाठी तितकेच कष्टप्रद निवडले जाई.

इंदुभूषणच्या वाटचाला क्वचित विश्राम येत असे. तो आजारी असण्याला आणि त्याचवेळी डॉक्टरने त्याला तपासायला गाठ पडली, आणि डॉक्टरची मन:स्थिती या बंद्याला खोटे ठरवावे अशी नसली तर इंदुभूषणला रुग्णालयात प्रविष्ट करून घेतले जाई.

बंगालमधून आणि अन्य प्रांतांतूनही एकामागून एक राजबंद्यांचे जथे अंदमानात येऊ लागले होते. पंजाब, महाराष्ट्र आणि मद्रास प्रांतातूनही राजबंदी आले होते.

अधिकाऱ्यांनी त्या सर्वांना एकमेकांपासून फोडून ठेवावयाचे म्हटले तरी त्यांना शक्य होत नसे.

एकमेकांना धीर देणे, शक्यतेप्रमाणे कामाला साहाय्य करणे, अधिकाऱ्याशी अधिकारासाठी भांडताना एकत्र येणे, हे नित्याचे घडू लागले. पण एकेकाला फोडून त्याला त्याला छळायचे हा अधिकाऱ्यांचा मार्ग असे.

दोन वर्ष होऊन गेली होती. सर्वच दिवस कष्टात जात होते. बाहेरच्या कामावर असताना इंदुभूषणच्या हाताला एकदा जे फोड आले त्यात विषबाधा झाली. त्याच्या हाताला असह्य वेदना होऊ लागल्या.

काम बदला म्हणून इंदुभूषण विनवू लागला. बाहेर काम असे तेव्हा बाहेरच एक रुग्णालय असे. तेथील डॉक्टर दाद देईनात. मला आत पाठवा असे इंदुभूषणने सांगितले. त्याला आत आणले पण ते खोलीत पडून राहण्यासाठी नव्हे.

सावरकरांनी त्याची चोरून भेट घेतली. मला आता जगणे असह्य झाले आहे असे इंदुने सांगितले. देता येणे शक्य होते तेवढा धीर सावरकरांनी दिला. इतर राजबंद्यांनीही तसा धीर दिला. पण दहा वर्षे काढणे माझ्याच्याने होणार नाही. या यातनातून मी स्वत: सुटका करून घेतली नाही तर मध्यंतरीच केव्हातरी मृत्यू मला गाठेल. तो वेळपर्यंत मी प्रतीक्षा का करावी, असा त्याचा हट्ट असे.

बंदिपालाने इंदुभूषणची स्थिती पाहिली पण ती सहानुभूती दाखविण्यासाठी नव्हे, तर त्या व्याधीग्रस्त हाताना आणखी वेदना देणे शक्य होईल या विचाराने.

"तुला आत येऊन आराम करावयाचा आहे काय ?" बंदिपाल बारीने दरडावले.

"मला डॉक्टरकडे न्या." इंदुभूषण म्हणाला.

"मी ते जाणत नाही." असे म्हणून बारीने तांडेलाला सांगितले, "याला कोलूवर (तेलाचा घाणा) न्या उद्यापासून."

इंदुभूषण खोलीत बंद झाला. आजवर असे तसाच तो एकटा होता. पण आज त्याला एकटेपणाची आणखी एक प्रचीती आली.

स्वत:चेच चित्र इंदुभूषण बघू लागला. प्रथम प्रथमचा कोलूचा परिचय, हाताला आलेला फोड, कोलूचा दांडा हालत नाही म्हणून दांडयालाच लोंबकळून फरफटत जाणे. संध्याकाळी अंगावर खोबऱ्याचा भुसा, कधी सदरा असलेला तर कधी उघडेच. तेलाची जड बादली वाकत वाकत त्या कोठीपर्यंत-गुदामापर्यंत न्यायची. पुन्हा बंद होण्यासाठी खोलीत जायचे.

विटा वाहण्याचे बाहेर मिळालेले काम ! पाण्याचे हंडे नेण्याचे काम ! सर्व काही जिवापलीकडील.

त्याच्याजवळ काही पुस्तके होती. त्यात रमण्याइतके शरीरस्वास्थ्य त्याला कधीच

मिळाले नाही !

उद्या कोलू ! या विचाराने तो पुन्हा भानावर आला. त्याने हाताकडे पाहिले. विषबाधा होऊन चिरलेले हात ! या हातांनी कोलू रेटणे शक्य आहे काय ? आणि तो रेटला जात नाही म्हणून पाठीवर फटके ! मानवाने केलेली मानवाची ही स्थिती ! स्वातंत्र्य संपादन करण्यासाठी हे मूल्य ! हे सतीचे वाण ! हे असिधारा व्रत !

संपले ! तो म्हणाला, "बारी !" उद्या कोलू चालेल तुझा. मी नाही चालविणार. पुष्कळ नवे नवे क्रांतिकारक येत राहतील. हा झरा अखंड चालू राहील स्वातंत्र्य मिळेपर्यंत."

त्या हातानीच त्याने पुस्तकाचे कोरे पान फाडले. एक पेन्सिलचा तुकडा त्याने मिळविला होता. लिहून ठेवले - दिनांक २९।४।१९१२ 'मला अत्यंत अमानुष वागणूक मिळाली आहे. मी स्वत: होऊन मरावे अशी अधिकाऱ्यांनी स्थिती आणली आहे. माझ्या हातावरील दुखापती बघाव्यात.' इंदुभूषण.

इंदुभूषणने आपल्या दुखऱ्या हातांनी पायाच्या साहाय्याने सदरा फाडला. त्याच्या लांब धांदोटचा गाठविल्या. एक दोरी केली.

बाहेर रात्रीचा पाहारेकरी दूर आहे असे पाहिले.

दोरीचे एक टोक मागील खिडकीच्या गजातून काढले. त्याला गाठ दिली. आपल्या गळ्याला पुरेल इतपत लांबी ठेवली. फास केला. पायाखाली लोखंडी थाळी आणि भांडे ठेवले. हाताने वरचा दोर लोंबकळल्यासारखा धरून ठेवला आणि सर्व काही ठीक आहे याची निश्चिती पटताच पायाने थाळी दूर सरकवून दिली.

हात ढिला पडला. इंदुभूषण लोंबकळत राहिला. क्षणार्धात त्याचे प्राणोत्क्रमण झाले !

बारी बंदिपालने इंदुभूषणने गळ्यापाशी दोरीला बांधून ठेवलेली चिठ्ठी पुढे आणली नाही. थिऑसॉफीचे एक पुस्तक खोलीत होते. त्या पुस्तकाचा आधार घेऊन बारीने ठोकून दिले, थिऑसॉफी बाचून डोके फिरल्याने इंदुभूषणने आत्महत्त्या केली !

आमचे तथाकथित राष्ट्रीय पुढारी अशा रक्ताचे ऋणी राहिले नाहीत ही इंदुभूषणसारख्या तरुणाच्या आत्मयज्ञाची सर्वात क्रूर शोकांतिका आहे.

❋❋❋

॥ ११ ॥ मी बोलणार नाही !

स्वत: नित्याचेच मूक होण्याची ज्याची छाती होती तो भास्कर कर्णिक देहत्यागाने मूक झाला आणि त्याने 'मी बोलणार नाही' हे वचन खरे केले.

मध्य पुण्यांतील एका घरातील खोलीत आठदहा तरुण बसले होते. ब्रिटिश राज्य विरोधी गुप्त परिपत्रके एक दोघे हाताळीत होते.

"या पत्रकात आता दम राहिला नाही. आवाज पाहिजे." एकाने आपला अभिप्राय दिला.

"आपली सिद्धता आहे. आपण या पत्रकांत पुन्हा प्राण आणू." दुसरा तरुण म्हणाला.

"त्यासाठीच तर जमलो आहोत आपण ! तरुण सिद्ध आहेत. साहित्य हाताशी हवे." आणखी एकाने आपली अडचण पुढे केली.

"साहित्याची चिंता नको. योजना हवी."

"हे पहा, वाऱ्यावर बोलू नका. एकेक काम एकेक जण उचला बघू. साहित्य कोण आणेल ?" त्या बैठकींतील मुख्य व्यक्तीने सरळ प्रश्न केला.

"काय हवे ?"

"चार हस्तस्फोटगोल-हँडग्रेनेड-हवेत." बहुधा त्याच्या मनात काही योजना आकार घेत होती.

"मी दोन दिवसांत सांगतो."

"बरे. साहित्य आल्यावर पुन्हा आपण जमू."

बैठक विसर्जित झाली.

बेचाळीसच्या उत्थानाने प्रथम प्रथम घेतलेली पकड थोडचाच दिवसांत ढिली होऊ लागली होती. क्रांतिप्रवण कार्यकर्ते भूमिगत झाले होते. पण त्या स्थितीत राहून नेटाने उत्पात चालू ठेवणे अत्यंत अवघड झाल्याने मंदावू लागले होते. पुण्याच्या काही तरुणांना या स्थितीची जाणीव होती. कोठे चोरून परिपत्रके काढणे आणि ती तितकीच चोरून वाटणे तेवढ्यावर त्यांचे समाधान नव्हते. आपल्यात कल्पकता नाही, आपल्यात योग्य दिशेचे धाडस नाही, अशीच खंत त्यांचे मन पोखरू बघत होती. ज्यांना हे दु:ख तीव्रतेने होते त्यांनी पुण्यातच काही तरी प्रयोग करण्याची मनीषा बाळगली होती. स्फोटगोलाने कोठे तरी धडाका उडवून द्यावा अशी अगदी मोघम योजना त्यांच्या मनात वावरू लागली होती.

"कर्णिक, चार स्फोटगोल हवे आहेत." बैठकीतील त्या तरुणाने कर्णिकला गाठून विचारणा केली. कर्णिकच्या मनात त्याने अन्यत्र जो संग्रह करून ठेवला होता तो उभा राहिला. त्याने एवढेच विचारले, "नेणार कोण अन् केव्हा ?"

"मीच नेईन."

"ठीक आहे. केव्हा ?"

"आज रात्री."

"नाही. उद्या संध्याकाळी सहा ते आठ यावेळात पर्वतीच्या पायऱ्यांपाशी एक मुलगा तुला भेटेल. त्याला नाव विचारू नको. तुझे सांगू नको. तू त्याला एवढेच विचार, तू रानडे का ? ही खूण. तो तुला विचारेल चार चोक किती ? ही दुसरी खूण. त्याच्याजवळील पिशवी तू घेऊन जायचेस."

"ठीक आहे. पण हे बघ, आपण दोघे समक्ष भेटत असताना मध्यस्थ ठेवणे धोक्याचे आहे." त्या तरुणाने शंका दर्शविली.

कर्णिक म्हणाला, "उलट धोका कमी करण्याचा मला तेवढाच मार्ग आहे. तुला संग्रह कोठे आहे ते ठाऊक नाही. बरे, प्रत्यक्ष मी तुला वस्तू दिलेल्या नसल्याने तू माझे नाव सांगणार नाहीस."

"पण मार खाण्याच्या नंतरच्या स्थितीत मी तुझे नाव सांगितले तर ?"

"तर माझ्याकडून आरक्षींना काही मिळणार नाही."

"स्वत:विषयी एवढा अतिविश्वास धरू नको भास्कर !"

"तुला काम करायचे आहे की गप्पा मारायच्या आहेत ?" कर्णिकने संभाषणाला

छाट दिला.

तरुण समजला. ज्या गोष्टी झाल्याच नाहीत त्याची चिकित्सा आपण उगीचच करीत आहोत असे त्याला वाटले.

"ते हस्तगोलक आणले आहेत. पुढचे बोला." तो तरुण मुख्याला म्हणाला.

"फार मोठे काम केलेस तू. आता या साधनावर आधारित योजना अधिक वेगाने हाती घेता येईल."

"बरे, दामू भेटला होता." तो तरुण सांगू लागला. "मला तो उपदेश करू लागला, 'बापू हे आपले दैवत ! अहिंसा हे ब्रीद ! आपण काहीतरी केले तर बापूंना दु:ख होईल.' मला त्या भ्याडाच्या तोंडात भडकवावी असे वाटले. पण मी क्षणभरातच स्वत:ला सावरले. मी त्याला बोलू दिले. थोडासा विरोध करीत गेलो आणि शेवटी आपण तसले काही करणार नाही, असे त्याला सांगितले. तुझ्या कानावर एवढ्याचसाठी घातले की त्याला वास येऊ द्यायचा नाही."

मुख्याने ती सूचना स्वीकारली, "सांगितलेस हे बरे केलेस." तो म्हणाला, "प्रत्यक्ष कृतीपर्यंत कितीतरी ढेपाळतील. पण त्यातूनही जेवढे उरतील तेवढे आपल्याला पुरेत."

"राग कसला येतो, ठाऊक आहे का ? हे दळभद्री लोक स्वत:च्या नाकर्तेपणासाठी 'गुरूची अवज्ञा होईल' हे पांघरूण घेतात आणि दुसऱ्यांनाही शिकवण देतात, 'तू माझ्यासारखाच षंढ हो' म्हणून. त्यापेक्षा बाळू मला परवडला. तो त्या दिवशी जाता जाताच मला म्हणाला, 'माझ्याच्याने होणार नाही. मी पुढच्या बैठकीला येणार नाही. ज्या गोष्टीत मी नाही त्या मला ठाऊकही असू नयेत !" बाळूमध्ये प्रामाणिकपणा तरी होता.

कोठे गाडचा उडविणे किंवा पूल उद्ध्वस्त करणे यापेक्षा ब्रिटिशांची प्रत्यक्ष हानी झाली पाहिजे या विचाराबर स्थिर होऊन ते तरुण असे स्थान शोधू लागले की जेथे ब्रिटिश सैनिक अधिक प्रमाणांत मिळतील. क्रांतिवीर वा. ब. गोगटे यांच्या अभियानाला बारा वर्षे झाली होती.

कॅपिटॉल या पुणे छावणीतील (कॅंपमधील) बोलपटगृहात त्या युद्धाच्या दिवसांत प्रामुख्याने सैनिकांसाठी ठेवले होते. हे ठिकाण चांगले जमेल असे त्या तरुणांना वाटले.

हस्तस्फोटगोल फेकण्यापेक्षा तो समयनियंत्रित करून ठेवणे सोयीचे होईल अशी योजना करण्याचे ठरले. पुन्हा प्रयोग ! पण तेच बेड म्हटल्यावर त्यातच बुद्धी कामाला

लावली गेली.

ग्रेनेडची द्विदल पाचर (स्प्लिट पिन) काढून लोखंडी पट्टी नाडीने बांधून ठेवावी. आणि रासायनिक क्रियेने ती नाडी ठराविक वेळी जळेल आणि स्फोट होईल अशी रचना करावी, अशी या तरुण 'शास्त्रज्ञांनी' युक्ती काढली. काही प्रयोगांतच युक्ती सफल झाली. वेळ किती लागतो तेही कोष्टक बसले. आपल्याला मध्यंतरी जितका वेळ हवा आहे तितक्या वेळाच्या मयदिचे अडसर विशिष्ट द्रव्यामध्ये घालण्यात आले.

अधिकाऱ्यांना पत्रे धाडण्यात आली. '२६ जानेवारी हा स्वातंत्र्याच्या उद्घोषाचा दिवस आहे. म्हणून त्या दिवसापासून सर्व बोलपटगृहांतून वंदेमातरम् हे राष्ट्रगीत म्हटले गेले पाहिजे, नाहीतर आम्ही बोलपटगृहे उद्ध्वस्त करू. त्याचे उत्तरदायित्व तुमचे राहील !'

आरक्षीदल जागे झाले. २६ जानेवारी १९४३ ला सैनिकांसाठी असलेल्या बोलपटगृहांवर विशेष पहारा ठेवण्याचे बेत आखले गेले.

आणि दि. २४ जानेवारी १९४३ ची रात्र कॅपिटॉल बोलपटगृहातील अंधारात एका हस्तध्वमच्या धडाक्याने क्षणभर लख्ख प्रकाश देऊन गेली !'

दुसऱ्या दिवसाच्या वृत्तपत्रांनी सर्व पुणेच काय, महाराष्ट्र, महाराष्ट्रच काय पुरा हिंदुस्थान दुमदुमून गेला.

'कॅपिटॉल बोलपटगृहात गोऱ्या सोजिरांवर ध्वमफेक ! हस्तध्वम वापरल्याचा संशय ! दोन गोरे सैनिक मेले. दोघे अत्यवस्थ. अनेकजण व्रणित (जखमी) संशयित भूमिगत !' मेलेल्या सोजिरांची संख्या नंतर चार झाली.

आरक्षी दलाला सावध केले होते खरे, पण चकविलेही होते. याची चीड आरक्षी अधिकाऱ्यांना होती, तर त्याच गोष्टीचा आनंद संबंधित तरुणांना होता !

आरक्षी धागे जुळवीत होते. तीनचार दिवसातच धूमधडाक्याने धरपकड चालू झाली होती.

हस्तध्वम वापरला हे स्पष्ट झाले होते. खडकीच्या शस्त्रनिर्माणीत (ॲम्युनिशन फॅक्टरीत) सिद्ध झालेला तो हस्तध्वम असला पाहिजे इतका दुवा जुळविण्यास पुरावा मिळाला होता.

खडकीच्या त्या निर्माणीत काम करणाऱ्या कर्णिकपर्यंत भाग येऊन पोहोचला. त्याला पाच दिवसांनी म्हणजे दि. ३०-१-४३ ला अटक झाली.

भास्कर पांडुरंग कर्णिक हा तिशीचा तरुण. मूळचा करूळचा. (देवगड, रत्नागिरी).

पुणे, कर्जत, गुलबर्गा इत्यादी ठिकाणी शिक्षण होत होत बी. एस्सी. झाला. विसाव्या वर्षी त्याने सत्याग्रहात भाग घेतला होता.

कर्णिकचे संबंध अनेक ठिकाणी होते. त्यामुळे अचूक ठिकाणी आपणच पुरविलेले साहित्य वापरले गेले आहे किंवा नाही हे त्याला सांगता येणे शक्य नव्हते. त्याने काही मर्यादेपर्यंत अशा घटकांशी संबंध अप्रत्यक्षपणे ठेवला होता. तरीही प्रत्यक्ष संबंध असलेले काही लोक होते.

तो म्हणाला होता, "कोणी माझ्यापर्यंत दुवा आणून भिडविला तर माझ्याकडून आरक्षींना काही मिळणार नाही !'

स्वत:विषयी अतिविश्वास ठेवणाऱ्यांपैकी कर्णिक नव्हता. उलट तो हे जाणून होता की मूकं करोति वाचालम् ही आरक्षी दलाची शक्ती असते. पण त्याचबरोबर तो हेही जाणून होता की त्यांना मनुष्य मुका असला तरी जिवंत पाहिजे. आणि तेथेच कर्णिकचा आत्मविश्वास होता.

या देशासाठी आपल्याला काय करता येईल ? कोठे जाऊन आक्रमण करणे आपल्याला जमणार नाही. कोणाशी समोरासमोर दोन हात करणे होणार नाही. जे लोक काही धडाडी दाखवीत आहेत त्यांना साहित्य पुरविणे आपल्याला शक्य होईल. त्यात असणारा धोका आपल्याला झेपेल. जेव्हा केव्हा वेळ येईल तेव्हा या लोकांना आपण अबोल राहून संरक्षण देणे हेही आपल्याला करता येईल, अशी स्वत:च्या मनाशी खूणगाठ त्याने बांधली होती. या स्वातंत्र्ययुद्धात प्राणार्पण करण्यासाठी आघाडीवरच असायला हवे असे नाही. आघाडीवरील प्राणपणाने जे साधेल त्याला पूरक कार्य दुसऱ्या फळ्यांवर राहून प्राणार्पण केल्यानेही साधेल हे त्याचे मनन होते. स्वत:चे प्राण दुसऱ्यापेक्षा स्वत:च्याच हाती आहेत हा विश्वास बाळगून तो आरक्षीदलाच्या स्वाधीन झाला.

फरासखाना या आरक्षी चौकात अडकविलेल्या कर्णिकवर प्रश्नांचा भडिमार चालू झाला. काही स्थळांची त्याने नावे सांगितली. पण दुसऱ्या दिवशी तेथे जाण्याचे मान्य करवून घेऊन !

आरक्षी दलाने ती विशिष्ट ठिकाणे रातोरात परस्पर धुंडाळली. सर्व ठिकाणांचा शोध घेऊन निष्कर्ष काढेपर्यंत पुष्कळ वेळा गेला. कोठेही काही खरे ठिकाण मिळाले नव्हते.

कर्णिकने बनविले होते तर ! अधिकाऱ्यांचा संताप झाला. पहिल्याने कर्णिकची फिरती घ्यायची आणि मग व्यवहार चालू करायचे असे ठरवून त्यांनी पहारेकऱ्याला सांगितले, 'कर्णिकला घेऊन ये !'

आज्ञा शिरसावंद्य मानून पहारेकरी कोठडीवरील पहारेकऱ्याला सांगण्यास जातो तो तोच पहारेकरी भ्यालेल्या स्थितीत सांगू लागला, 'आरोपी... आरोपी... बहुधा बेशुद्ध झाला !' मेला असे त्याला म्हणावयाचे होते, पण पुन्हा शब्द वळवून त्याने आरोपीला बेशुद्धीच दिली.

बरिष्ठाची तारांबळ उडाली ! जवळात जवळ असलेल्या डॉक्टराला बोलावणे धाडले.

डॉक्टराला वाटले फरासखान्यात बोलावणे आहे तेव्हा गेले पाहिजे. वातावरण तापलेले होते. नकार दिल्यास भारत संरक्षणविधीखाली (डी. आय. आर. खाली) कोंडून ठेवायचे !

"डॉक्टर, या आरोपीला तपासा अन् औषध द्या." आरक्षी बरिष्ठाने आज्ञा केली !

'मी... ? मी ?' डॉक्टरने चाचरत विचारले.

'मग मी कुणास सांगत आहे ?' बरिष्ठ काहीसे चिडून म्हणाला.

'मी... मी दातांचा डॉक्टर आहे ! डेंटिस्ट ! डेंटिस्ट ! दंतचिकित्सक !' बरिष्ठाने कपाळाला हात लावला.

"बरे, जा तुम्ही !' असे म्हणून त्याने त्या डॉक्टरला निरोप दिला.

'का रे ? बरिष्ठ अधिकारी शिपायाला म्हणाला, यापेक्षा गुरांच्या डॉक्टरचा उपयोग झाला असता ! तरी बरे पीएच. डी. नाही धरून आणलास एखादा ?'

त्यातल्या त्यात त्वरेने डॉक्टरची व्यवस्था झाली. त्याचा उपयोग कर्णिक निष्प्राण आहे हे अधिकारवाणीने सांगण्यापुरता झाला. कर्णिकने सायनाईड खाल्ले होते.

इतर माग काढता काढता फेब्रुवारीच्या शेवटपर्यंत आरोपी पकडले गेले आणि छाननी करून शेवटी २० मार्च १९४३ ला सात जणांवर हत्या, स्फोटके वापरणे, कट करणे, अशा आरोपाखाली अभियोग चालू झाला. आरोपी होते श्रीधर पुरुषोत्तम लिमये, बाबूराव विठोबा चव्हाण, प्रभाकर शिवराम साळवी, शंकर त्र्यंबक कुलकर्णी, रामसिंग रतनसिंग परदेशी, हरि वामन लिमये आणि दत्तात्रय वि. जोशी. भाल बायाळ आणि बापू डोंगरे हेही आरोपी होते पण 'सर्व काही खरे सांगू' या वचनाने त्यांना क्षमासाक्षीदार बनविले होते.

अभियोग चालू असतानाच आणखी एक नाटच घडले. तपास करणारा मुख्य आरक्षी अधिकारी रोच साक्ष देण्यासाठी उभा राहिला आणि अनपेक्षितपणे तो भोसकला गेला !

बलवंत दिवेकर (चिंगोपंत दिवेकर) यांच्यावर वेगळा अभियोग उभा राहिला आणि त्याला सहा वर्षे सश्रम कारावास झाला. कारण रोच वाचला होता.

रोच बरा होऊन त्याची साक्ष झाली. क्षमेच्या साथीदारांचे शासनाला तसे साहाय्य झाले नाही.

न्यायसहाय्यकांनी (ज्यूरी) सर्व आरोपींना निर्दोष घोषित केले. न्यायाधीश श्री. पाटील यांनी ज्यूरीचे मत ग्राह्य धरून आरोपींना बंधमुक्त केले.

प्रभाकर शिवराम साळवी याचा खटला पुन्हा चालवावा, असे वरिष्ठ न्यायधीशांनी मत दिले, पण पुढे तो आरोपीही बंधमुक्त झाला.

शासनाजवळ भारत संरक्षण विधी असल्याने सर्व बंधमुक्तांना त्या विधीने शासनाने अडकवून ठेवले.

दत्तात्रय जोशी या तरुणाचा त्या बंदिवासातच दि. १०-९-१९४४ ला अंत झाला.

या सर्व प्रकरणांत प्रत्येक संबंधित तरुणाने आपले शिर तळहातावर घेऊनच या झंझावातात उडी घेतली होती. ज्यांचे शिर खांद्यावर राहिले त्यांचेही मूल्य तितकेच, जितके शिर धडावेगळे झाले त्यांचे. त्या त्या क्षणाला कर्तव्याशी अत्यंत प्रामाणिक असणे हा क्रांतिकारकांचा असामान्य गुण.

❋❋❋

॥ १२ ॥ पांढरा चाफा

सत्कारासाठी कोणी पांढरा चाफा वापरतो काय ? दादू दंडिताने तो वापरला होता. शबरीच्या प्रेमाचा भाव त्याच्या मनात होता.

दादू दंडिताला त्या सत्कारासाठी फटके बसले होते. कारण तो सत्कार सावरकरबंधूंचा होता !

काथ्या कुटून कुटून मोगरीने हाताला पडलेले घट्टे निगरगट्ट झाले होते. प्रथम प्रथम त्या लाकडी दांडाच्या स्पर्शानेही तळहाताला होणारे घर्षण रक्ताळले जाई. जोखडाखाली मान घातलेल्या नवख्या बैलाला गाडी ओढण्याने त्रास होतो. खांदा सोलवटतो, मग रक्ताळतो. पण तेवढ्याने कीव येऊन माणूस त्या बैलाचा पिच्छा सोडीत नाही. त्या त्रासावरच आणखी त्रास दिला की नैसर्गिकपणेच शरीराची प्रतिकारशक्ती वाढते, म्हणजेच ते घर्षण सहन करण्याइतपत जाड कातडी निर्माण होत जाते हा माणसाचा अनुभव असतो. जे बैलाचे तेच मनुष्याचे, हाही माणसाचा अनुभव असतो. म्हणून पहिल्या पहिल्याने रक्ताळलेल्या त्या हातावरच घर्षणाचे आणखी आघात चाबकाच्या फटक्याने देऊन त्याचा हात घट्ट बनवायचा उद्योग इंग्रजी राज्यकर्त्यांनी चालविला होता. अनेक क्रांतिकारकांनी ब्रिटिशांचा हा छळ सहन केला होता. प्रत्येक आघात हे देशभक्तीचे मूल्य होते. प्रत्येक

फटका स्वातंत्र्य जवळ आणण्यास साहाय्यभूत होत आहे ही त्यांची श्रद्धा होती, हा त्यांचा विश्वास होता.

अंदमानात कोलूने पिचून निघालेली शरीरे घेऊन आज दोन क्रांतिकारक हिंदुस्थानकडे प्रस्थान करणार होते. अनेक रोगांशी झुंज देऊन सुद्धा त्यांचे शरीर अद्याप टिकून होते. एखाद्या दीर्घकालीन क्रॉनिक रोगाप्रमाणे चिवट शासन आज अकरा वर्षे त्यांच्या राशीला लागले होते. नैसर्गिक रोगापेक्षा हा कृत्रिम रोग अधिक जाचक होता. नैसर्गिक रोगाचा उगम सापडण्याची शक्यता असते, तो उगम आपल्या टप्प्यात असू शकतो. त्याचे निर्मूलन करणे शक्यतेतली गोष्ट असू शकते. या शासन नावाच्या रोगाचे परिणाम तर सारखे होत असत. त्याचे मूळही ठाऊक असे. पण ते मूळ निर्मूलित करण्यास जावे तो बंदिगृहाच्या अनेक हालत्या बोलत्या भिंती आडव्या येत असत. शासनाला धक्का पोहोचणे दूर स्थानी असलेल्या एखाद्या स्तंभाला वायुलहरींनी हलविण्यासारखेच दुर्घट होते.

पण दगडापेक्षा दुर्बल असलेले पाणीही सतत आघात करीत राहिले तर त्या दगडालाही झिजविते, कोसळविते, त्याच्या कडा घासून टाकते. त्याची एरवीची भव्यता, ओबडधोबडता नाहीशी करते. त्याच नियमाने अंदमानातूनही सतत आघात देत देत क्रांतिकारकांनी शासनाची धार बोथट करीत आणली होती.

क्रांतीचा पूर्वार्ध होता प्रत्यक्ष धक्के देणे आणि उत्तरार्ध होता धक्के सहन करीत करीत प्रतिकार शक्ती वाढविणे, धक्के देण्यासाठी नवीन चेतना निर्माण करणे.

सावरकरबंधू, बाबा आणि तात्या, म्हणजे क्रांतिवीर गणेश सावरकर आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर आज हिंदुस्थानकडे निघाले होते. वर्ष १९१० मध्ये बाबांना आणि १९११ मध्ये तात्यांना अंदमानला नेले होते. राजद्रोह हा त्यांचा अपराध मानला गेला होता. जो आपला राजाच नाही त्याशी द्रोह संभवतच नाही, ही त्यांची भूमिका होती. बळाने बसलेले ब्रिटिश शासन उखडून टाकण्याची त्यांची धडपड होती.

फुलांच्या सहवासाने अगंध मातीला सुगंध यावा तसे सावरकरांच्या सान्निध्याने अनेक समकालीन दंडितही प्रभावित झाले होते. ते हत्या, चोऱ्या, दरोडे इत्यादी अपराधांसाठी अंदमानात शिक्षा भोगीत होते. सावरकरबंधूंनी त्या विजनवासांतही त्यांच्यासाठी परिश्रम केले होते. त्यांच्यावर संस्कार केले होते. अशिक्षितांना अक्षर-ओळख दिली होती. देश म्हणजे काय, स्वराज्य म्हणजे काय याची कल्पना त्या दंडिताच्या आकलनशक्तीप्रमाणे त्यांना दिली होती. अनेकांची आकलनशक्ती वाढविली होती.

बडे बाबू म्हणजे बाबा आणि बालिष्टर बाबू म्हणजे तात्या अशी नावे बंद्यांनी रूढावली होती. त्यांच्याविषयी बंद्यांच्या मनात प्रेमभाव आणि आदर निर्माण झाला

होता.

हे दोघे क्रांतिवीर मायदेशात जातील, आपल्या मुलामाणसात जातील, त्यांचे आपण अभिनंदन करू या, त्यांना शुभास्ते पंथान : म्हणूया, अशी तळमळ अनेक बंधांना होती. ते जाणार म्हणून दोन तीन दिवस आधीच ठाऊक झाल्याने अनेक बंधांनी त्यांना भेटूनही घेतले होते.

दादू नावाचा दंडित हत्येसाठी शिक्षा भोगीत होता. तो बंधांचा अधिकारी (वॉर्डर) झाला होता. बंदिगृहाच्या मुख्य द्वारापाशी त्याला प्रवेश होता. आपणही या क्रांतिवीरांचे अभिनंदन करूया असा त्याने विचार केला.

आवारात असलेल्या एका पांढऱ्या चाफ्याची फुले त्याने वेचून आणली. दोरा घेतला. फुले गाठबून त्यांच्या दोन माळा केल्या.

त्या माळांना रंगीत धागा नव्हता. शोभावृद्धीसाठी फुलांची विविधता नव्हती. रंगांचे वैचित्र्य नव्हते. चाफ्यालाही एक वास असतो. पण तशी ती फुले निर्गंध म्हणूनच उपेक्षिली जातात. त्या वासापलीकडे आणखी वास त्या माळांना नव्हता. माळांना कलावतू नव्हता. लोकरी तंतु नव्हते. मारुतीसाठी रुईच्या पानांची करावी तशी साधी फुलांची माळ ! अर्भकांच्या निष्पाप मनासारखी ! मातेच्या निर्व्याज चुंबनासारखी !

तात्यांच्या काव्याचा परिचय दादूला बाबांकडून झाला होता. त्याला सर्वात प्रभावी वाटली ती कमलपुष्पाची उपमा !

अनेक फुले फुलती ! फुलोनिया सुकूनि जाती ॥
कोणी त्यांची गणती महती । ठेविली असे ॥
परी जे गजेन्द्रशुंडेने उपटिले । श्रीहरीसाठी मेले ।
कमळफूल ते अमर ठेले । मोक्षदाते पावन ॥
अशीच सर्व फुले खुडावी । श्रीरामचरणी अर्पण व्हावी ।
काही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची ॥

दादूला वाटे हीच ती मानवरूपी कमलपुष्पे ! देशासाठी आत्मार्पणाच्या वेदीवर उभी राहिलेली. मृत्यूच्या दरीवर उभे राहून मृत्यला आव्हान देणारी ! निर्भयपणे जीवनाची पायवाट चालणारी ।

हत्या हा दादूचा अपराध होता. शेतावरून झालेले ते भांडण होते. तुकडा माझा की तुझा या वादात प्रतिपक्षही त्या तुकडयाला वंचित झाला. कारण त्याचे अस्तित्वच मी मिटविले आणि मीही वंचित झालो. कारण मी दीर्घ अवधीची शिक्षा घेऊन इकडे येऊन पडलो याची दादूला आठवण होती. साहस आपण केले तसेच, यातना

आपण भोगल्या त्याच; पण आपण वंचित झालो असे दुःख यांना नाही, हे दादू जाणत होता. शेताचा तुकडा मिळवायचा आहे म्हणून हत्या असरा यांचा अपराध नाही म्हणून तो शेताचा तुकडा आपण गमावून बसलो याचे यांना दुःख नाही ! अशा निरपेक्ष त्यागी जनांना वंदन करणे आपले कर्तव्य आहे अशी त्याची श्रद्धा होती.

पण चाफ्याची फुले ? त्याचे मन लाजले. पण क्षणभरच ! त्याने विचार केला, ही कमळाची फुले आहेत ! ती मातृभूमीच्या मस्तकावर विराजमान असू देत. त्यांची तीच श्रेष्ठ योग्यता आहे. त्या कमळांची पूजा मला करू दे, कमळ होण्याचे माझे सुदैव नव्हते. चाफा तर चाफा ! या चाफ्यानेच या कमलपुष्पांचे पूजन मला करू दे ! मातृभूमीने यांना कमळाचा मान दिला तर मला गंधहीन, सौंदर्यहीन चाफ्याचा मान मिळाला तरी मी भाग्यवान ठरेन.

आणि फुलांचे सौंदर्य तरी परिणामावरूनच सिद्ध होणार नाही काय ? देशभक्तांचा कंटकमय मार्ग सुकर करण्याचे कार्य जरी फुलांनी केले तरी त्यांच्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे होते.

आपली यांच्यासारखी असीम त्यागाची योग्यता नाही. पंढरीला जाणे तरी सर्वांना कुठे जमते ? ज्यांची भावना असेल ते वारकऱ्यांना भाजी-भाकरी देतात आणि त्याने जे पुण्य मिळेल त्यात समाधान मानतात ! या देशाच्या स्वातंत्र्यमंदिराच्या या वारकऱ्यांना आपण भावनांचे अन्नोदक देऊया, प्रतीक म्हणून चाफ्याची माळ त्यांना वाहूया !

परिणामाची त्याला भीती नव्हती, प्रेमाने तो वेडा झाला होता ! त्याचा अधिकार हिरावून घेतला तर ? घेऊ देत ! त्याची पिटाई केली तर ? करू देत !

क्रांतिकारकांचे, विशेषत: सावरकरांचे सान्निध्य दाहक आहे हे त्याने समक्षही पाहिले होते. होय ! या अभिनंदनासाठी तेही संकट आपल्या अंगावर आले तर आपण ते आनंदाने भोगू ! पण ही वेळ पुन्हा येणार नाही. ही संधी आपण गमावली तर आयुष्यभर चुटपूट तेवढी मनावर बागवत बसू.

आरक्षी दलाच्या कोंडाळ्यातून दादूने वाट काढली. मार्गस्थ सावरकरबंधूंना तो सामोरा आला. त्याने त्यांच्या पायाला स्पर्श केला, त्यांना आलिंगन दिले आणि आपल्याजवळील माला त्याने त्यांच्या गळ्यांत घातल्या. क्षणभर समरस होऊन आरक्षी दलाने ते करू दिले. पण दुसऱ्याच क्षणी त्यांना नियम आठवला ! ब्रिटिशांचे शासन अद्याप त्याच्यावर अंकुश धरून होते. आणि तो अंकुश काढून टाकू बघणाऱ्या सावरकरांचा सत्कार होत होता ! त्यांनी दादूला मागे खेचले होते.

॥ १३ ॥ त्वत्स्थंडिली अतुल धैर्य वरिष्ठ बंधू !

'या स्वातंत्र्ययुद्धात जे जे योद्धे लढले, रणी पडले, त्यात काहींची नावे दोनचार दिवस लोक आठवतील, तर काहींचा लोकांना पत्ताही लागणार नाही. पण श्रेय दोघांना समान ! त्यातल्या त्यात पुतळा उभारावयाचा तर तो आपल्यासारख्या कर्मवीराचाच !'

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी असा ज्यांचा गौरव केला त्या बाबांचे, गणेशपंत सावरकरांचे कार्य होते तरी काय ?

'बाबा !'

"आपल्या तिघा भावांचे जीवितकार्य एकरूप, एकजीव असेच होते. आपण आपल्या पिढीत आपल्या कुलाचे ऋण फेडले आहे. भारताच्या इतिहासातील एक अध्याय सुवर्णाक्षरांनी नोंदला गेला पाहिजे, 'सावरकर युग !' शत्रूंनी तो शब्द रूढविला आहे.

'कर्तव्याच्या दृष्टीने कालच्या पत्रात लिहिले होते, पण फलाविषयी बोललो नव्हतो. कारण 'मा फलेषु कदाचन.' पण सापेक्षत: बोलावयाचे तर दोन वेळा उभ्या राष्ट्राचा जीवनप्रवाह प्रतिकूलाकडून. अनुकूलकडे आपण आपल्या सहकाऱ्यांसह उलटून दिला आहे. 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय' ही पहिली

क्रांतिघोषणा आपली; व तिलाच पूर्तता देणारी 'हिंदुस्थान हिंदुओंका, नहीं किसीके बापका' ही दुसरी क्रांतिघोषणाही आपलीच ! आपण दोन वेळा राष्ट्राची विचारक्रांती व आचारक्रांती घडवून आणली आहे.

"यांत जे योद्धे लढले, रणी पडले, त्यात काहींची नावे दोन-चार दिवस लोक आठवतील, तर काहींचा लोकांना पत्ताही लागणार नाही. पण श्रेय दोघांचे समान ! त्यातल्यात्यात पुतळा उभारावयाचा तर तो आपल्यासारख्या कर्मवीरांचाच !



कर्मवीर बाबा सावरकर

"पहिली गोष्ट म्हणजे आता अगदी हात धरून उभा असलेला मृत्यू हा शत्रू नसून मित्रासारखा भेटत आहे. आयुष्याचे सार्थक झाले, लहानपणी ज्या स्वातंत्र्ययज्ञाचे कंकण हाती बांधले ते यावज्जीव सोडले नाही. घनघोर यातना, दु:खे ! - सुखही तसेच - इकडे अंदमान - तर तिकडे लाखो स्वजनांचे जयघोषांत हिमालयाचे शिखराशिखरावर, काश्मीर, हरद्वार ते आसामपर्यंत फडकविलेला कीर्तिध्वज ! पण घनघोर दु:खात तरेच सुखात याच कार्यी, त्याच हिंदुस्वातंत्र्याचा क्रांतीचा 'ध्वज हातातून ढळला नाही. व्यक्तीच्या हातून जी शक्य ती सारी झुंज आयुष्यभर लढवली. तिशीच्या आतच फासाशी उभे राहावे लागले तरी झुंजतच राहिलो, हे केवढे समाधान ! 'कर्मण्येवाधिकारस्ते' म्हणून फलाविषयी मी काहीच बोलत नाही.

'जो स्वातंत्र्ययज्ञ आपण प्रथम चेतविला, तो आज राष्ट्रभर भडकलेला आहे. या आपल्यासारख्या सतत साठ वर्षे लढत असलेल्या वीराची काया जी पडेल ती मानवी काया नव्हे, तर देवांच्या हातच्या वज्राची एक महान् दिव्य समिधाच होय !'

'यासाठी ज्याचे परम सार्थक झाले त्या देहाची दिव्य समिधा आज आपल्या वैयक्तिक जीवनाची पूर्णाहुती म्हणून त्या महान् यज्ञात पडत आहे ही केवढ्या समाधानाची गोष्ट आहे ! मित्र म्हणून भेटावयास आलेल्या त्या मृत्यूचे स्वागत करू या - 'योगश्चित्तवृत्तिनिरोध: ' हे सूत्र आहे. चित्तवृत्ती निरोधाने समाहित झालेल्या समाधीत, 'आपले मरण पाहिले म्या डोळां, तो जाहला सोहळा अनुपम ।' अशा समाधानाने आपला सारा जन्म जनार्दनाच्या सेवेत झिजविलेल्या, कीर्तिनिरपेक्ष, केवळ कर्तव्यरत वीराला योगनिद्रेत - सुख - समाधीत विलीन होण्याचा अधिकार आहे.

'पूर्वी, विशी, तिशी, चाळीशीमध्ये वारंवार मृत्यूची गाठ पडली होती तेव्हाही आपण त्याचे स्वागत केले, पण ते काहीसे आव्हानाच्या स्वरूपात होते.

'येतोस तर ये, कोण भितो तुला !' असा ध्वनी त्या वेळच्या सिद्धतेचा होता. आज प्राकृत संसारात ज्यांना सुखे, सार्थकता म्हणतात तीही सुलटलेल्या काळाने आपल्याभोवती विखुरलेली आहेत. स्वजन, आप्तेष्ट पुन्हा भेटले, कारागारात जी कार्यपिपासा अपुरी राहिली होती ती आज भरतखंडभर झालेल्या युगप्रवर्तक कार्याच्या व्यापात सिंधू - गंगा - यमुना ते दक्षिणसिंधूपर्यंत सर्व पवित्र नद्यांचे प्रत्यक्ष जल पिऊन शांत होत आहे. घरी-दारी मुले हसतखेळत आहेत. आता मृत्यू आला नाही, तर आपण होऊन महाप्रस्थानाला निघायची घडी भरली. वास्तव समाधानाने, मित्राचा जसा हात धरावयाचा तसाच मृत्यूचा ! आव्हानाने नव्हे, तर आनंदाने ! ज्यात भागे किंवा पुढे उरले नाही, तृषा तृप्त झाल्या, एका झटक्यासरशी जगाची वार्ता लोभ, क्षोभ नाहीसे होऊन केवळ शांतता उरली. 'मी' देखील नाहीसा झाला, त्या आनंदात, हे कर्मवीरा, आता पूर्ण समाधानाने विलीन व्हावे.'

स्वा. सावरकर यांचे ज्येष्ठ बंधू बाबा उपाख्य गणेश यांचे दि. १६।३।१९४५ या दिवशी सांगली येथे प्राणोत्क्रमण झाले. त्यांचे वय तेव्हा सहासष्ट वर्षांचे होते.

प्रथम उद्धृत केलेले पत्र स्वा. सावरकरांनी बाबांना त्यांच्या मृत्यूपूर्वी काही दिवस लिहिले होते.

बाबांविषयी आजच्या पिढीला इतकीच माहिती कदाचित आहे की ते स्वा. सावरकरांचे बंधू होते. आज ज्या गोष्टी सहज वाटतात, धाडसाच्या आहेत असे वाटत नाही त्या गोष्टी एकेकाळी करणे किती भयकारी होते, घोर परिणाम करणारे होते याचे ज्ञान हवे असेल तर बाबांच्या कार्याच्या काही अंशाचे दर्शन केले पाहिजे.

कारण बाबांचे कार्य, त्यांचा बंदिवास, सुटकेनंतर त्यांनी बांधलेली क्रांतिकारी संघटना हे सर्व आजच्या पिढीला तितकेच अपरिचित आहे जितके बांछी आय्यर यांचे बलिदान आणि शीतलप्रसादचा आत्मयज्ञ.



स्वा. सावरकर

अभिनव भारत संघटनेचे इंग्लंडमधील कार्य तात्यांच्या प्रेरणेने चालू होते. त्याला पूरक कार्य महाराष्ट्रात बाबांच्या करवी चालू होते. हिंदुस्थानला स्वातंत्र्योन्मुख करण्यासाठी, इटलीने किती अडचणीतून स्वराज्य मिळविले याचे उदाहरण जोसेफ मॅझिनी या चरित्रग्रंथाने स्वा. सावरकरांनी पुढे ठेवले. मराठीचे हस्तलिखित हिंदुस्थानात पोहोचले. बाबांनी १९०७ च्या जूनमध्ये ते पुस्तक प्रसिद्ध केले. त्या पुस्तकातील प्रस्तावना हा हिंदुस्थानच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग होता. दोन हजार प्रती दोन महिन्यात संपल्या. प्रस्तावना अनेकांनी मुखोद्गत केली. वयाच्या बावीसाव्या वर्षी सावरकरांनी तो ग्रंथ लिहिला होता.

'अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ हिंदुस्थानात मुद्रित करण्यासाठी आला. बाबांनी फार प्रयत्न केला पण येथे मुद्रण जमू शकले नाही. हस्तलिखित परत गेले. त्याचे इंग्रजी भाषांतर केले आणि हॉलंडमध्ये ते मुद्रित झाले.

कवि गोविंद म्हणजे गोविंद आबाजी दरेकर. हा एक पांगळा मुलगा होता. नाशिक

येथे तो राहात असे. प्रतिभा उत्तम होती. लावण्या करण्याचा छंद होता. सावरकरांच्या सहवासाने त्याची दिशा वळली ती क्रांतिमार्गाकडे. देशभक्तिपर गीते लिहिण्याचा उपक्रम त्याने चालू केला. त्याच्या कविता प्रसारित करण्याचे काम बाबांनी केले.

कवि गोविंद यांनी कवितेतून स्वत्व जागविण्याचा सतत प्रयत्न केला. त्याचप्रमाणे स्वराज्य मिळविण्यासाठी रक्तपात अटळ असतो, युद्ध अटळ असते याचीही जाणीव त्यांनी समाजाला दिली.

रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना
असा भूतकालीन सिद्धान्त जाणा ।
स्वराज्येच्छुने पाहिजे युद्ध केले
रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ॥

हा त्यांनी सिद्धांत सांगितला.

नाना फडणवीस यांनी मराठी साम्राज्य टिकविण्यासाठी जे बुद्धिचातुर्य वापरले त्याची जाणीव ठेवून त्यांनी त्यांच्याच तोंडून शूर वीर पूर्वजांना आवाहन करविले आणि पारतंत्र्यात सुस्त पडलेल्या लोकांच्या भावना चेतविल्या.

श्रीरामचन्द्रांची प्रार्थना करताना त्यांनी म्हटले -

ज्यांही स्वातंत्र्याच्या शोभत सिंहासनीच शोभावे ।
त्या श्री आर्यांनी का शत्रूशिरी चामरासि ढाळावे ?
स्वातंत्र्य कौस्तुभास्तव ज्यांही रिपुरुधिरसिन्धु शोधियले ।
ते दिव्य वीर आता परवशता कर्दमांत रे रुतले ।

कवि गोविंदांची गाणी गणेशोत्सवांतील मेळ्यात म्हटली जात. त्यायोगे ती लोकांच्या तोंडी रुळली.

स्वा. सावरकरांचे बाजी प्रभु, तानाजी यांचेवरील पोवाडे पुस्तकरूपाने आधीच प्रसिद्ध झाले होते.

क्रांतिसंघटना उभी करण्यासाठी बाबा सतत परिश्रम घेत होते. ठिकठिकाणी तरुण मुले गोळा झाली होती. बंगालमधील क्रांतिकारी घटनांच्या वार्ता अभिनव भारतात प्रसृत केल्या जात. आरक्षीदलाला या हालचालींचा सुगावा लागला होता.

बाबांना अटक झाली. त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला गेला.

दि. ८-६-१९०९ ला केनेडी न्यायाधीशाने बाबांना जन्मठेप आणि मालमत्तेचे समपहरण (जप्त) करण्याची शिक्षा दिली.

अभियोग चालला त्यावेळी असेही दिसून आले की माणिकताला कटात पकडले गेलेले हेमचंद्र दास यांचा बाबांशी संबंध होता. ध्वम (स्फोटगोल) करण्याच्या पद्धतीचे एक हस्तलिखित पुस्तक त्यांच्याकडे मिळाले. इंग्लंडहून इंडिया हाऊसमध्ये शिजलेली योजना हिंदुस्थानात पोहोचली होती.

बाबा शिक्षा भोगत होते. त्यांच्या शिक्षेचा प्रतिशोध म्हणून तीन आठवड्यांनीच म्हणजे १ जुलै १९०९ ला मदनलाल धींग्रा यांनी कर्झन वायलीला लंडनमध्ये गोळ्या घातल्या.

इंग्लंडमधून ब्राऊनिंग पिस्तुले बाबांकडे धाडली गेली होती, ती बाबांना अटक होण्यापूर्वीच आली होती. पण बाबांच्या हाती पिस्तुले पडण्यापूर्वीच बाबांना अटक झाली होती. पण पेणला ती पिस्तुले अण्णा कर्वे यांना मिळाली. प्रथम योजना हाती घेतली ती बाबांच्या शिक्षेचा प्रतिशोध म्हणून. मदनलालने जे लंडनमध्ये केले ते येथे घडले पाहिजे.

अनंत कान्हेरे या मुलाने जॅक्सन कलेक्टरला २१ डिसेंबर १९०९ या दिवशी म्हणजे बाबांना शिक्षा झाल्यावर सहा महिन्यांनी ठार मारले. बाबांच्या शिक्षेचा प्रतिशोध, असेच त्याने आपले निवेदन आरक्षींना दिले.

बाबांना शिक्षा झालेली होती. त्यामुळे आता बाहेर घडत असलेल्या घटनांशी त्यांचा संबंध जोडणे असंबद्ध होते. पण तो जोडला गेला होता.

अनंत कान्हेरे याने आरक्षींना असेही निवेदन केले होते की, मॅझिनीची प्रस्तावना वाचून त्याचे मन सिद्ध झाले होते. त्यावेळी आरक्षींनी नव्याने ती प्रस्तावना पाहिली.

"नाही नाही ! राष्ट्रे कधीही मरत नाहीत. परमेश्वर गांजलेल्याचा कैवारी आहे. त्याने मनुष्य स्वातंत्र्यात राहण्यासाठी उत्पन्न केला. तुम्ही मनात आणा की तुमचा देश स्वतंत्र झालाच !" याहून अधिक उत्साहक असा दुसरा कोणाचा राष्ट्रमंत्र आहे ? "एकदा मनुष्याने असा निश्चय केला की, मी स्वातंत्र्य, स्वदेश व मानव्यासाठी लढले पाहिजे, सर्व आयुष्यभर लढले पाहिजे, तिरस्कारापासून तो मरणापर्यंत सर्व संकटे तुच्छ मानली पाहिजेत, द्वेषाला व निंदेला तोंड दिले पाहिजे, दुसऱ्या कोणत्याही फलाची आकांक्षा न करता फक्त कर्तव्य म्हणून त्याने तत्पर झाले पाहिजे !" याहून अधिक दिव्य असा दुसरा कोणता राष्ट्रमंत्र आहे ? "प्रीती करा, तरुणहो प्रीती करा. मनुष्याला परमेश्वराकडे नेणारी प्रीती ही सोपानपरंपरा आहे. कुटुंबावर प्रीती

करा, स्वदेशावर प्रीती करा, तरुणहो, मनुष्यजातीवर प्रीती करा !" याहून अधिक प्रेमळ असा दुसरा कोणता राष्ट्रमंत्र आहे ? व "नुसतीत इटली स्वतंत्र होऊन काय उपयोग ? आपण स्वतंत्र होताच दुसऱ्यांना स्वतंत्र केले पाहिजे." याहून अधिक उदात्त असा दुसरा कोणत्या राष्ट्रमंत्र आहे ? अशा या राष्ट्रीय मंत्राचा द्रष्टा जो इटलीचा स्वातंत्र्यदाता देशभक्त मॅझिनी, त्याचे आत्मचरित्र व काही राजकीय लेख यांचे भाषांतर या ठिकाणी केले जात आहे. या लेखांनी दोन कोटी लोकांना चैतन्य आले. या लेखांचे पाणी गॅरिबाल्डीच्या तरवारीवर झळकत होते. या लेखांनी युरोपची सिंहासने उलथीपालथी केलेली आहेत. या लेखांनी इटली देश स्वतंत्र झाला आहे व सर्व परतंत्र देशांना स्वातंत्र्य देण्याचे सामर्थ्य या लेखांमध्ये भरलेले आहे ! मॅझिनीने ही तत्त्वे केवळ इटलीकरिताच सांगितलेली नाहीत. इटली निमित्त मात्र असून ही राजकारणशास्त्रातील महत्सत्ये त्या महात्म्याने सर्व मनुष्यजातीसाठी प्रकट केलेली आहेत. चातकांनो, ही संधी साधून आपल्या तृष्णा भागवून घेणे हे आता तुमच्या हाती आहे."

अशा उत्कट स्फूर्तिप्रद भाषेत सावरकरांनी मॅझिनीच्या चरित्राच्या प्रस्तावनेतून परतंत्र हिंदुस्थानांतील जाणत्या मुलांची मने पेटविली होती.

"यापेक्षा मॅझिनीच्या लेखांची प्रस्तावना मी पामर जास्त ती काय लिहिणार" असे नम्रतेने सांगून सावरकर पुढे म्हणतात की, "तुटक रीतीने भाषांतर केलेल्या लेखांची साखळी जुळविणे सोपे जावे म्हणून माझा प्रयत्न आहे."

तितक्याच स्फूर्तिप्रद ओघांत त्यांनी पुढे लिहिले आहे;

"जगामध्ये आजपर्यंत जेवढ्या राज्यक्रांत्या झाल्या त्या सर्वांहून इटलीच्या राज्यक्रांतीत उदात्तवृत्तीचा कळस झालेला आहे. स्वदेशाभिमानाची ज्योत इतकी प्रज्वलित झालेली होती, प्रत्येक देशभक्त व्यक्तीविषयक सुखाबद्दल इतका उदासीन होता, स्वदेशासाठी सर्वस्व वाहण्याची इतकी चढाओढ सुरू होती, परक्या सत्तेकडून हे चैतन्य दाबून टाकण्यासाठी इतके भयंकर जुलूम करण्यात येत होते, त्या जुलमांत देशभक्तांचे तांडे चिरडले जात असताही प्रत्येक वर्षी लोकक्षोभाची उसळी इतकी विलक्षण व निधड्या छातीची होती व अखेर साठ वर्षांवर लढून लढून देशवीरांनी इतक्या चिकाटीने यश मिळविले की या सर्व महत्कृत्यांनी व महनीय नरमण्यांनी अलंकृत अशी दुसरी राज्यक्रांती आजपर्यंत झालेली नाही, असे इतिहासास मान्य करावे लागते. या इटलीच्या राज्यक्रांतीत सद्गुणांचा जो इतका उत्कर्ष झाला याचे मुख्य कारण हे आहे की ती राज्यक्रांती ही व्यक्तीसाठी, लोभासाठी किंवा द्वेषासाठी झालेली नसून तिचा पाया अत्यंत उन्नत अशा महत्तत्त्वांवर रचलेला होता. "मोठाल्या

क्रांत्या ह्या तरवारीपेक्षा तत्त्वांनीच घडवून आणलेल्या असतात." पण तरवारीशिवाय तत्त्वांचा जय होत नाही ही दु:खाची गोष्ट आहे व म्हणून इटलीने तलवार उपसली. परंतु "त्या तरवारीचे अग्रभागी जर सत्याचे अधिष्ठान नसते तर त्या तरवारीला तिने स्पर्शही केला नसता." ज्या तत्त्वांवर या पवित्र स्वातंत्र्ययुद्धाचा पाया रचला होता ती तत्त्वे प्रथमत: मॅझिनीने इटलीस शिकविली. इटलीसाठी लढलेल्या देशभक्तांमधे मॅझिनीच्या 'तरुण इटलीत' ज्यांनी शिक्षण घेतले नव्हते असे फारच थोडे लोक होते. ह्या तत्त्वविचारांत व इतर राजकारणपटु कारस्थानांच्या उपदेशात एक महत्त्वाचा भेद आहे. मॅझिनीचे राजकारण हे केवळ ऐहिक व स्वार्थ प्रवृत्तीचे नव्हते. तसे असते तर त्या राजकारणाने प्रवृत्त झालेल्या देशवीरांच्या अंत:करणात इतक्या उदात्त वृत्तीचा उदय झाला नसता. मॅझिनीचे राजकारण हे प्रवृत्ती व निवृत्ती ह्यांचे एकीकरण होते. त्याच्या राजकारणाची इमारत ही नीतीच्या पायावर उभारलेली होती, हे सिद्ध केल्याने त्यावेळपर्यंत राजकारणाची थोर पुरुषांकडून जी अवहेलना होत असे ती नष्ट झाली. राजकारण हे स्वार्थाचे व अप्पलपोटेपणाचे शास्त्र आहे व यात 'जो बळी तो कान पिळी' या पशुवृत्तीचाच प्रभाव आहे, अशी सर्वत्र समजूत असल्याने या राजकारणाचा साधु पुरुषांना तिटकारा येणे साहजिकच होते. दुसऱ्याच्या देशावर घाला घालणे, त्यांचे स्वातंत्र्य लुबाडून घेणे, जर राजकारण असेल तोपर्यंत व अजूनही ते बहुतेक राष्ट्रांकडून तसेच आहे असे मानण्यात येते, तर मग त्या राजकारणांत व नरकांत भेद कोठे राहिला ? मॅझिनीने राजकारणास या नरकगामी कल्पनेपासून मुक्त केले. राजकारण हे परमेश्वरी कर्तव्य आहे, असे त्याने स्पष्ट रीतीने सिद्ध केले. प्रवृत्ती व निवृत्ती ही दोन परस्परविरोधी तत्त्वे नसून ती एकाच मार्गांच्या दोन भिन्न भागांची नावे आहेत असे त्याने प्रतिपादन केले. "नाही, स्वर्ग व पृथ्वी यांच्यामध्ये विरोध आहे किंवा ती भिन्न आहेत हे सत्य नाही. नाही ! स्वर्गात सत्य व न्यायाने ईश्वरी राज्य चालावे व पृथ्वीवर असत्य व अन्याय यांचा धुडगुस चालावा हे खरे नाही. पृथ्वी ही स्वर्गाची शिडी आहे." राजकारणाला स्वार्थपरायणतेचे हिडीस स्वरूप देणाऱ्या लोकांची चुकी अशा रीतीने उघडकीस आणून मग मॅझिनीने फाजील धर्माभिमान्यांचा समाचार घेतला आहे. धर्माने राजकारणांत लक्ष घालणे अवश्य आहे. इतकेच नव्हे, ते त्यांचे कर्तव्य आहे. राजकारण म्हणजे समाजाची, स्वदेशाची व स्वराष्ट्राची दास्यमोचना व संवर्धना होय. तिकडे दुर्लक्ष करणे म्हणजे मनुष्यजातीवर आलेले भयंकर संकट निमूटपणे पाहण्याचे अक्षम्य पातक करणे होय. धर्मांची खरी व्याख्या म्हणजे मनुष्यमात्राचे धारण करणे ही होय. मनुष्यमात्र दास्यपंकात किंवा अनीतीत पिचत असता आपण तेवढे स्वत:स मुक्त करून घेऊ ही समजूत ढोंगीपणाची

आहे. भूतदयेशिवाय स्वत:च्या मुक्तीला दुसरा मार्ग नाही. "तुमची जेव्हा चौकशी होईल तेव्हा परमेश्वर तुम्हाला असे विचारणार नाही की 'तुम्ही स्वत:च्या कल्याणासाठी काय केलेत ? तर तो तुम्हाला असेच विचारणार आहे की, तुम्ही भूतमात्रांच्या कल्याणाकरिता काय केले आहे ?' हे भूतमात्रांचे अंतिम कल्याण करण्यासाठी, त्यांची ज्ञानाने व पावित्र्याने आत्मोन्नती होण्यासाठी व त्यांना सत्कृत्ये करण्यास सामर्थ्य येण्यासाठी पहिली अत्यंत आवश्यक गोष्ट म्हटली म्हणजे त्यांचे दास्यविमोचन करणे, त्यांस स्वातंत्र्य मिळवून देणे, ही होय."

अशासारखी जाज्वल्य प्रस्तावना असलेला हा ग्रंथ बाबांनी हिंदुस्थानात प्रसिद्ध केला असल्याने आणि त्या प्रस्तावनेत आपले मन सिद्ध झाले असे अनंत कान्हेरे याने सांगितल्याने बाबांचा जॅक्सनवधाच्या घटनांशी किंवा त्या कृत्याशी संबंधित लोकांशी संबंध जोडण्याचा प्रयत्न शासन करीत होते.

गायडर नावाच्या कारा निरीक्षणाधिकाऱ्याने बाबांचा बंदिगृहांत अतिशय छळ केला. विजेचे चटके देऊन त्यांच्याकडून मित्रमेळा, हरी अनंत थत्ते चतुर्भुज (इंग्लंडमधून पिस्तुले आणणारा) याबिषयी माहिती काढून घेण्याचा प्रयत्न केला. तो सर्व छळ बाबांनी सहन केला. नाशिक कटाच्या अभियोगाची पूर्वसिद्धता शासन करीत होते.

तात्यांना इंग्लंडमधून हिंदुस्थानांत आणले आणि २२-७-१९१० ला नाशिकला नेले. १५-९-१९१० ला तेथून त्यांना पुन्हा मुंबईस नेले. नाशिक कटाचा खटला १५-९-१९१० ला उभा राहिला. त्यांत ३५ आरोपी होते.

तिसरे बंधू नारायणही एक आरोपी होते. त्यांना सहा महिन्याची शिक्षा झाली.

बाबांना अटकेनंतर वर्षभराने अंदमानला धाडण्यात आले. तात्यांना दोन जन्मठेपींची शिक्षा लागली आणि त्यांनाही जुलैमध्ये अंदमानांत धाडले.

अंदमानांत सावरकरबंधूंचा सर्व प्रकारे छळ केला गेला. पण धक्क्यामागून धक्के अन्य बंधांच्या सहकार्याने दिले गेले आणि राजबंद्यांचा जाचक छळ काही अंशी उणावला.

बाबांची पत्नी यशोदाबाई क्रांतिकार्यात अग्रेसर असे. तिने पुरुषांच्या संघटनेला पूरक स्त्रियांचा संघ चालविला. स्वदेशीचा प्रचार आणि क्रांतिप्रद वातावरणनिर्मिती हे पूरक घटक भावी पिढीची मने सिद्ध होण्यास कारण झाले.

या साध्वीचा मृत्यू बाबा अंदमानांत असतांनाच झाला. बाबांची भेट मिळावी म्हणून अनेक वर्षे प्रयत्न चालला होता. शासनाने ती भेट कधी दिली नाही आणि अनुज्ञा दिली ती अशावेळी की यशोदाबाईना भेटीस जाणे असंभव असावे ! प्रतीक्षेची

तार तुटली होती. यशोदाबाई निवर्तल्या होत्या. त्यापाठोपाठ शासनाचा उदार संदेश येऊन पोहोचला, 'यशोदाबाईंना बाबांची भेट घेण्याची अनुज्ञा देण्यात शासनाला आनंद वाटत आहे !'



सौ. येसू वहिनी

अंदमानांत लहानलहान अधिकारासाठी सुद्धा संघर्ष करावा लागत असे. असे अनेक संघर्ष करून आणि घडवून आणून राजबंद्यांची स्थिती थोडी थोडी सुधारू लागली.

हिंदूंना बाटवून मुसलमान करणे आणि मुस्लिमसंख्याबळ वाढवणे किती सोपे असते हे आता सर्वांना ज्ञात आहे. मुसलमानांचे ते तंत्र अंदमानांतील हिंदू बंद्यांवरही वापरले जात असे. पंक्तीत बसवून बंदी वाटविणे, एकदा कोणी बंदी असा मुस्लिम पंक्तित बसला आहे असे दिसताच हिन्दू बंद्यांनी त्याच्यावर बहिष्कार घालणे आणि त्याला नित्याचाच मुस्लिम करून टाकणे हे रूढिग्रस्त प्रकार होत असत. अशा धर्मान्तराने राष्ट्रान्तर होते ही दूरदृष्टी सावरकरबंधूंची तेथपासून होती. अशा बाटवाबाटवीला विरोध केला जाई. हिन्दू बंद्यांची मने वळविली जात. आपली हानी मुस्लिम करीत आहेत, त्याला त्यांच्यापेक्षा आपणच अधिक उत्तरदायी होत आहोत हे त्यांना पटवून दिले. परिणामी शुद्धिकार्याला सहकार्य मिळू लागले.

अंदमानच्या वसाहतीपर्यंत हे शुद्धिकार्य पोहोचले.

हिंदुस्थानचे विभाजन झाले ते संख्याबळावर. अंदमान बहुसंख्य हिंदू राहिले म्हणूनच तो टापू हिंदुस्थानशी संलग्न झाला. धर्मान्तराकडे दुर्लक्ष झाले असते तर अंदमान पूर्वबंगाल किंवा सिंध जसा बहुसंख्य मुस्लिम झाला त्याप्रमाणे मुस्लिम बहुसंख्य झाला असता, आणि सरळच ते पाकिस्तान झाले असते.

सावरकरबंधूंना वर्ष १९२१ च्या मे महिन्यांत हिंदुस्थानात आणले. बाबांना विजापूरच्या बंदिगृहांत ठेवले.

विजापुरात पुन्हा तीच चक्की, तीच एकलकोंडी ! बाबांची प्रकृती क्षीण झाली होती. धाकटे बंधू डॉ. नारायणराव यांना महत्प्रयासाने वर्ष १९२१ च्या डिसेंबरमध्ये बाबांना भेटण्याची अनुज्ञा मिळाली.

नारायणराव भेटीला आले तो त्यांच्या डोक्यावरील गांधीटोपी पाहताच बंदिपालाने ती टोपी काढण्यास सांगितले. नारायणरावांनी नकार दिला. ते निमित्त करून बंदिपालाने भेट नाकारली !

भेट मिळविणे हा मुख्य उद्देश होता हे खरे. गांधीटोपीविषयी विशेष प्रेम असाही भाग नव्हता. त्या दिवसात परकीय शासनाचा निषेध नोंदविण्याचे एक मूक प्रतीक गांधीटोपी झाले होते. नारायणरावांनी ते प्रतीक बागविले होते. पण त्या निरुपद्रवी मूक प्रतीकाला शासनाने महत्त्व देऊन भेट नाकारली म्हणून नारायणरावांनी टोपीचाच मानबिंदू केला.

त्यांनी व्हाइसरॉयपासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना तारा केल्या. भेटीची आज्ञा नव्याने दिली गेली. बाबांची भेट झाली. अर्थात गांधीटोपी सकट !

अंधाऱ्या गुहेत अर्धवट पुरलेल्या तपस्व्याप्रमाणे बाबांची स्थिती झाली होती. त्यात क्षयाची लक्षणे, खोकला, गुडघेदुखी, संधिवात, अमांश अशा रोगांनी बाबांचे शरीर पोखरले होते.

या स्थितीला वाचा फोडणे आवश्यक होते. अंदमानात बाबांना कोलूतून पिळून काढून निःसत्त्व केल्यावरही ते शरीराचे चिपाड आणखी पिळावे हा शासनाचा क्रूरपणा नारायणरावांनी लोकांसमोर मांडला.

त्या वृत्तपत्रीय वार्तांचा काही परिणाम झाला आणि दोन महिन्यांत म्हणजे जानेवारी १९२२ मध्ये बाबांचे साबरमती बंदिगृहात स्थानांतर झाले.

साबरमती बंदिगृहात त्या दिवसात सत्याग्रहात भाग घेतलेले काही राजबंदी ठेवले होते. वास्तविक हिंदुस्थान स्वतंत्र करण्याच्या इच्छेने त्यागाला प्रवृत्त झालेल्या त्या देशभक्तांचा ओघ भ्रांत, भीरू नेतृत्वामुळे मुस्लिम अनुनयाकडे वळविला जात होता. बाबांना या विकृतीचा प्रत्यय त्या बंदिगृहात प्रथम आला. हसरत मोहानी हे अशा

सत्याग्रह्यांपैकी एक होते. अफगाणच्या अमीराने हिंदुस्थानवर सशस्त्र स्वारी करावी हे तथाकथित शस्त्रशत्रू पुढाऱ्यांचे कारस्थान बाबांना तेथे या हसरत मोहानीकडून कळले.

तेथेही बाबांची प्रकृती रोगग्रस्त राहिली. डॉ. नारायणरावांना त्यांची दिवसेंदिवस क्षीण होत चाललेली स्थिती समजली तेव्हा त्यांनी अधिकाऱ्यांशी तारातारी केली. सरणाचा व्यय आपल्यावर नको असाच जणू काटकसरीचा विचार शासनाने केला आणि सप्टेंबर १९२२ मध्ये बाबांना बंदिगृहातून बाहेर काढले.

बाबा तेरा वर्षांनी मुक्त वातावरणाचा अनुभव घेत होते. प्रकृतिस्वास्थ्यासाठी त्यांनी कळकळीच्या धन्वंतरींनी औषधोपचार केले. ज्या कार्यासाठी उभे तारुण्य जाळून घेतले तेच कार्य उर्वरित आयुष्यात करण्याचे बाबांनी व्रत घेतले.

अफगाणच्या अमीराबरोबर महमद अली, शौकत अली, गांधी यांनी जो कट चालविला आहे तो किती राष्ट्रविघातक आहे, याच्यावर बाबा लिखाण करू लागले. पण राष्ट्र याची व्याख्या काय, व्याप्ति काय याचाच संभ्रम उत्पन्न केला गेल्याने त्यांना त्याबर लिखाण करणे अगत्याचे वाटले. 'राष्ट्रमीमांसा' हा त्यांचा ग्रंथ.

त्यानंतर हिंदूराष्ट्र-पूर्वी-आता पुढे हा ग्रंथ लिहून त्यांना त्याकाळात हिंदू-मुस्लिम एकतेच्या नावाने हिंदूंच्या भ्रांत पुढाऱ्यांनी हिंदूंचा घात करून मुस्लिम अनुनय कसा चालविला याचे साधार विवेचन केले आहे. त्या भ्रांतीपोटी हिंदुस्थानाला सतत दुष्परिणाम भोगावे लागले आहेत.

बाबांची आणखीही ग्रंथरचना आहे. पण त्यांचा पिंड क्रांतिप्रवण होता म्हणून कोठे काही क्रांतिकारी घटना घडत असेल तर त्यातील व्यक्तींना सर्वतोपरी साहाय्य देण्याचा त्यांचा उपक्रम होता.

दिनांक ८-१०-१९३० ला मुंबईच्या लॅमिंग्टन रोडवर एका साजटवर गोळीबार झाला. तो बाचला. त्याच्या हातातून गोळी गेली.

पंजाबचे हुतात्मा भगवतीचरण वर्मा यांची पत्नी दुर्गादेवी आपल्या मुलासह मुंबईस आलेली होती. तिचा प्रत्यक्ष संबंध या गोळीबाराशी होता, तर तिचा ९ वर्षाचा मुलगा हरी हा बाबांच्या स्वाधीन केला गेला होता.

चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव आदींनी बाबांशी निकटचे संबंध ठेवले होते.

अशा या क्रांतिवीराचे, कर्मवीराचे सांगली येथे दि. १६-३-१९४५ ला निधन झाले. शेवटपर्यंत ध्येयाशी एकनिष्ठ राहणारा प्रामाणिक माणूस समाजाकडून किती उपेक्षिला जातो याचे एक उदाहरण म्हणजे कर्मवीर बाबा साबरकर !

हे मातृभूमि !

त्वत्स्थंडिली ढकलिली गृहवित्तमत्ता
दावानलांत वहिनी नवपुत्र कान्ता
त्वत्स्थंडिली अतुल धैर्य वरिष्ठ बंधू
केला हवी परम कारुण पुण्यसिन्धू
त्वत्स्थंडिलावरि बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिली बघ अता मम देह ठेला
हे काय, बंधु असतो जरि सात आम्ही
त्वत्स्थंडिलीच असते दिधले बळी मी !

स्वा. सावरकर
लंडन १९१०

(लंडनमधील ब्रिक्स्टन बंदिगृहांतून वहिनीला
धाडलेल्या मृत्युपत्राचा अंश)

